# श्री. कृ. वा. चितळे लिखित सुबोधसंस्कृतलोकमान्यटिळकचरितम् या ग्रंथाचा परिचय

**अजय पेंडसे**

संस्कृत विभाग, मुंबई विद्यापीठ.

**सारांश**

*संस्कृत भाषेची आजच्या काळातील स्थिती काय ? असा प्रश्न पडल्यास याचे उत्तर शोधण्यासाठी आपल्याला दोन गोष्टींचा विचार करावा लागतो. संस्कृत ही भाषा आजच्या काळात बोलली जाते का ? संस्कृत भाषेत आजच्या काळात साहित्यनिर्मिती होते आहे का? भाषेच्या जिवंतपणाचे आणि तिची स्थिती थोडक्यात चटकन जाणून घेण्याचे हे दोन उपाय आहेत. संस्कृत भाषा बोलणारे लोक भारताच्या लोकसंख्येचा विचार केला असता, निश्चितच अल्प आहेत परंतु; या भाषेत आजच्या काळात म्हणजे इसवी सनाच्या एकविसाव्या शतकात साहित्यनिर्मिती होत आहे.*

*सदर शोधनिबंधाचा विषय या साहित्यनिर्मितीशी संबंधित आहे. प्रादेशिक तसेच विदेशी भाषांचा वापर आजच्या काळात संवादाचे आणि साहित्य निर्मितीचे माध्यम म्हणून जरी होत असला तरी संस्कृत भाषेत होणारी साहित्य निर्मिती थांबलेली नाही. अनेक संस्कृत लेखक आपल्या प्रतिभेने नवनवीन कल्पना संस्कृतसाहित्यात घेऊन येत आहेत. प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे इसवी सनाच्या विसाव्या शतकात श्री. कृ.वा. चितळे यांनी लिहिलेल्या सुबोधसंस्कृतलोकमान्यटिळकचरितम् या ग्रंथाचा परिचय करून देणार आहे.*

**Keywords –** chitale, tilak, Sanskrit literature, tilakcharita

## प्रस्तावना

अभिजात संस्कृत साहित्यातील नाटके, महाकाव्ये, चम्पूकाव्ये आजही रसिकांच्या आणि अभ्यासकांच्या मनाला आकर्षून घेत आहेत. भासादिकांची नाटके, कालिदासादिकांची महाकाव्ये, खंडकाव्ये, बाणाची कादंबरी तसेच हर्षचरित, पञ्चतन्त्रासारखे कथासंग्रह या साऱ्यांनी संस्कृत साहित्याला अजरामर केले आहे. या कलाकृती प्रादेशिक तसेच परदेशी भाषांमधून भाषांतरित झाल्याने त्यांचा रसास्वाद संस्कृतभाषेचे ज्ञान नसलेल्या व्यक्तीस सुद्धा घेता येत आहे. यामुळे, वेदापासून चालत असलेली ही संस्कृत साहित्याची परंपरा अनेकांना ज्ञात आहे. भारत देशाची जागतिक साहित्याला ही देणगीच आहे. मात्र, सध्याची या भाषेची, तिच्यातील साहित्याची भारतातील परिस्थिती काय आहे? संस्कृत ही मृतभाषा आहे, अशी विधाने समाजाच्या विविध स्तरातून वारंवार ऐकू येत असतात. त्यामुळे, संस्कृत ही फक्त संशोधनापुरती किंवा प्राचीन भाषा शिकण्याच्या छंदापुरती मर्यादित होते आहे का ? खरच ही भाषा आता गतप्राण होते आहे का ? अशी शंका उत्पन्न होते.

कोणतीही भाषा जीवंत आहे असे मानण्यासाठी ती भाषा बोलणारी, समजणारी माणसे लागतात. तसेच त्या भाषेत साहित्य निर्मिती व्हावी लागते. संस्कृत भाषा आमची मातृभाषा आहे, असे २४,८२१ भारतीयांनी २०११ च्या जनगणनेत नमूद केले आहे. संस्कृतातील साहित्यनिर्मिती देखील अविरतपणे अगदी इसवी सनाच्या एकविसाव्या शतकातसुद्धा सुरु आहे. डॉ. ग. बा. पळसुले, डॉ. श्री. भा. वर्णेकर, पं. श्री. भि. वेलणकर, डॉ. मधुसुदन पेन्ना असे किती तरी संस्कृत विद्वान लेखक आजही संस्कृत साहित्यात आपल्या प्रतिभेद्वारे विविध विचारांची, कल्पनांची भरटाकत आहेत आणि संस्कृत भाषेत नव्याने येत असलेल्या या साहित्याला आधुनिक किंवा अर्वाचीन संस्कृत साहित्य अशी संज्ञा सर्वसमान्यपणे दिली जाते. याच आधुनिक संस्कृत साहित्यातील एक ग्रंथ आहे – श्री. कृ. वा. चितळे लिखित

सुबोध संस्कृत लोकमान्यटिळकचरितम्। प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे या ग्रंथाचा थोडक्यात परिचय करून दिलेला आहे. प्रस्तुत शोधनिबंध पुढील भागांमध्ये विभागलेला आहे – १. लेखकाचा परिचय २. ग्रंथाची रचना ३. ग्रंथाची कथावस्तू ४. ग्रंथाची भाषा आणि शैली ५. उपसंहार

**१. लेखकाचा परिचय –**

प्रस्तुत ग्रंथाचे लेखक आहेत श्री. कृष्ण वामन चितळे. ह्यांनी शारदाश्रम विद्यामंदिर दादर, मुंबई येथे मुख्याध्यापक पद भूषविले होते. श्री. चितळे यांचे हे पदच त्यांची विद्वत्ता, जनमानसातील त्यांची प्रतिमा आणि त्यांचे कार्य यांची साक्ष देणारे आहे.

श्री.चितळे यांनी B.A (Hons.) आणि B.T. या पदव्या संपादन केल्या होत्या. त्यांचा जन्म दिनांक १६ नोव्हेंबर, १८९३ रोजी सातारा जिल्ह्यातील बावधन येथे झाला. त्यांनी प्राचीन पद्धतीने संस्कृताध्ययन केले होते. सुभाषितरत्नावली, वाग्-रत्नहार या दोन्ही ग्रंथांचे संकलन, विद्यार्थ्यांचा पाणिनी हा पाणिनीय व्याकरणाचे नियम विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगणारा ग्रंथ अशी ग्रंथसंपदा त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने मुंबई महानगरपालिकेने दादर (पश्चिम) येथील एका पथाचे नामकरण 'कृ. वा. चितळे मार्ग' असे केले आहे. यावरून, त्यांची प्रसिद्धी आणि जनमानसातील त्यांची आदर्श प्रतिमा प्रकट होते. इसवी सन १९५६ हे लोकमान्य टिळक यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याने श्री. चितळे यांनी हा ग्रंथ लिहून लोकमान्यांविषयीचा त्यांच्या मनातील आदर व्यक्त केला आहे.

**२. ग्रंथाची रचना** – बाणभट्टाची कादंबरी, हर्षचरित हे संस्कृतातील गद्य ग्रंथ आहेत. कदाचित यांच्याकडून प्रेरणा घेऊन श्री. चितळे यांनी प्रस्तुत संपूर्ण ग्रंथ हा गद्यात लिहिलेला असावा.

ग्रंथाच्या सुरवातीला असलेल्या हृद्‌गतातून लेखकाने ग्रंथलेखनामागचे आपले प्रयोजन स्पष्ट केले आहे. लोकांच्या मनात संस्कृतविषयी प्रीति उत्पन्न व्हावी या उद्देशाने आपण ग्रंथ लिहित असल्याचे लेखकाने म्हटले आहे.[१] संस्कृत ग्रंथाच्या रचनेच्या दृष्टीने मंगलाचरण आदि बाबी फार महत्त्वाच्या आहेत. ग्रंथनिर्मितीत कोणतीही बाधा येऊ नये म्हणून ग्रंथारंभी मंगलवाचक श्लोक लिहिण्याची संस्कृत कवींची परंपरा आहे. या परंपरेस अनुसरून लेखकाने ग्रंथांच्या सुरवातीला मंगलाचरण रचले आहे. परंपरानियत गोष्टी एकाच मंगलाचरणातून श्लेषाच्या माध्यमातून न देता सहा मंगलवाचक श्लोक रचले आहेत. मंगलाचरणाच्या पहिल्या श्लोकात परब्रह्माला वंदन केलेले आहे.[२] दुसऱ्या श्लोकामधून विघ्नहर्ता असलेल्या गणेशास वंदन केलेले आहे.[३] ग्रंथाच्या लेखनासाठी वाक् आणि अर्थ यांची संपृक्तता निकडीची आहे. म्हणून, ही संपृक्तता प्राप्त करून देणाऱ्या सरस्वतीला वंदन तिसऱ्या श्लोकातून केले आहे.[४] चौथ्या श्लोकातून कवीने स्वतःचे वडील वामन, आई लक्ष्मी आणि आपले गुरु वैयाकरणभूषण त्र्यंबक यांना नमन केले आहे.[५] प्रस्तुत ग्रंथाचे नायक असलेले, भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील जहाल मतवादी नेते बाळ गंगाधर टिळक यांना कवीने पाचव्या श्लोकात वंदन केले आहे.[६] सातव्या श्लोकातून कवीने पूर्वसुरींचे ऋण मान्य केले आहे.[७] या पूर्वकवींचा नामनिर्देश आणि त्यांचे कार्याचा उल्लेख ग्रंथाच्या सुरवातीला आलेल्या हृद्‌गतात केला आहे.[८] प्रत्यक्ष ग्रंथाला सुरवात करत असताना 'नमो वाचे नमो वाचस्पतये' असे नमन केले आहे.

लोकमान्य टिळकांचे संपूर्ण चरित्र लेखकाने अठरा भागांमध्ये विभागलेले आहे. या प्रत्येक भागासाठी 'पर्व' ही संज्ञा

वापरली आहे. महाभारताची विभागणी देखील पर्वांमध्ये असून त्यांची संख्या अठरा इतकीच आहे. अठरा या साम्यदर्शक संख्येमागचे कारण नोंदवत असताना ‘केसरी’ या वृत्तपत्राचे तत्कालीन विश्वस्थ ज. स. करंदीकर म्हणतात, “टिळकांच्या चरित्राचे महाभारताशी अनेक प्रकारे साम्य असल्याने लेखकाने ‘पर्व’ अशी संज्ञा वापरून अठरा पर्वांमध्ये हे चरित्र रचले आहे.”[९] प्रत्येक पर्वाची विभागणी ही काही प्रकरणांमध्ये केलेली आहे. या प्रकरणांची संख्या एकूण एकशे एकोणसाठ इतकी आहे. प्रत्येक पर्व हे लोकमान्यांच्या आयुष्यातील काही घटना एकत्रित करून लिहिलेले आहे. जसे की, लोकमान्यांनी वेदाच्या काळासंबंधी केलेले विवेचन, आर्यांच्या वसतिस्थानाविषयीची त्यांनी मांडलेली मते, गीतारहस्य या ग्रंथाची रचना या सगळ्या गोष्टी मिळून ग्रन्थपर्वाची रचना केलेली आहे.

जसे ग्रंथांच्या प्रारंभी तसेच ग्रंथाच्या शेवटी देखील मंगल करणे गरजेचे असते. श्री. चितळे यांनी ग्रंथाच्या शेवटी हे चरित्र तरुणांना स्फूर्ती देवो, शिक्षकांना आदर्शपाठ घालून देवो, लोकांना दानाचे महत्त्व सांगो, शासकीय अधिकाऱ्यांना किर्ती देवो आणि राजकारण्यांना लोककल्याणाचा मार्ग दाखवो अशी प्रार्थना केली आहे.[१०] जिच्या कृपाप्रसादाने ग्रंथ रचण्यासाठी सरल, सुसंस्कृत, अर्थपूर्ण अशी वाणी मिळाली, त्या सरस्वतीला हा ग्रंथ लेखकाने समर्पित केला आहे.[११]

### ३. ग्रंथाची कथावस्तू –

ग्रंथाच्या नावावरूनच हा संपूर्ण ग्रंथ लोकमान्य टिळकांच्या जीवनचरित्रावर आधारलेला आहे हे समजते. लोकमान्यांचे बालपण ते त्यांचा मृत्यू आणि मृत्यूनंतरही त्यांचे दिसून येत असलेले विभूतिमत्त्व असा प्रवास या ग्रंथाचा आहे. लोकमान्यांच्या आयुष्यातील अगदी छोट्या वाटणाऱ्या घटनेचा उल्लेख देखील लेखकाने केलेला आहे. स्वातंत्र्य लढ्याचा काळ, लोकमान्यांना मदत केलेल्या लोकांचे नामोल्लेख, त्यांचे परिचय, तत्कालीन राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थिती या ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाच्या गोष्टी देखील लोकमान्यांच्या या चरित्रातून आपल्या समोर येतात. लोकमान्यांचे चरित्र अत्यंत प्रसिद्ध आहे, सर्वांना माहित असलेले आहे. त्यामुळे, शब्दमर्यादेचे भान ठेवून हा मुद्दा जास्त न वाढवणे येथे योग्य ठरेल.

### ४. ग्रंथाची भाषा आणि शैली –

एखादा ग्रंथ किंवा एखादा लेखक याच्या प्रेमात वाचक पडतो याचे कारण म्हणजे एकतर त्या ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय आणि दुसरे म्हणजे त्या ग्रंथाची भाषा आणि शैली. लेखकाला आपल्या मनातील भाव हा वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी शब्द हेच एकमेव माध्यम असते. त्यामुळे, अचूक, योग्य, अर्थवाही, आशयपूर्ण, संदर्भास अनुसरून शब्द वापरलेले असले की ग्रंथाची भाषा अधिक समृद्ध होते आणि वाचकाला देखील आनंद प्राप्त करून देते.

प्रस्तुत चरित्रग्रंथाच्या लेखनासाठी लेखकाने संस्कृत भाषा निवडली तेंव्हा संस्कृत भाषा कोणाला समजते, ती तर एक मृत भाषा आहे अशा पूर्वग्रहदूषित दृष्टीने भारतातील ‘टाईम्स ऑफ इंडिया’ या अग्रगण्य वृत्तपत्राने ‘संस्कृतभाषेतले चरित्र ग्रंथालयातील कपाटाची शोभा वाढविण्यासाठी लिहिले जात आहे का? मराठी, इंग्रजी इत्यादि भाषांतली चरित्रे सोडून हे संस्कृत चरित्र कोण वाचणार आणि ते किती जणांना समजणार? अशी विचारणा केली होती. ही विचारणा भारतातील वृत्तपत्राने करणे हे जरी अश्लाघ्य असले तरी संस्कृतभाषेच्या तत्कालीन नकारात्मक स्थितीवर भाष्य करणारे नक्कीच आहे. लेखकाने आपण हे चरित्र संस्कृतात का लिहित आहोत ते हृद्गतात स्पष्ट केले आहे. लोकमान्यांचे संस्कृतभाषेवर अपार प्रेम होते. वैदिक संशोधनात त्यांना

अभिरुची होती. महाभारत, भगवद्गीता अशा संस्कृत ग्रंथांचा त्यांना व्यासंग होता. हिंदी, मराठी, कन्नड, गुजराती अशा भाषांमध्ये लोकमान्यांचे चरित्र लिहिलेले आहेच. त्यामुळे, लोकमान्यांचे ज्या भाषेवर अपार प्रेम आहे अशा संस्कृत भाषेत त्यांचे चरित्र असणे योग्य ठरेल, या विचाराने मी हा ग्रंथ संस्कृत भाषेत लिहित आहे, असे लेखकाने स्पष्ट केले आहे.[१२]

भाषेच्या बाबतीत सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे काळानुरूप भाषेत बदल होत जातात. ते बदल साहित्यकृतींमध्ये देखील दिसतात. भारवि, माघ या संस्कृत कवींच्या काळी असलेली पाण्डित्यप्रदर्शनाची लाट इसवी सनाच्या विसाव्या शतकापर्यंत कुठच्या कुठे निघून गेलेली होती. विसाव्या - एकविसाव्या शतकातील कवींचा संस्कृत साहित्यलेखनामागील हेतू वेगळा आहे. त्यांना संस्कृतनवसाहित्यनिर्मिती करावयाची आहे ती या भाषेला टिकवण्यासाठी, वाढवण्यासाठी. या भाषेच्या द्वारा संपूर्ण भारताला एकत्र बांधण्यासाठी. यामुळे, अनेक लेखकांनी पल्लेदार वाक्ये, लांबच लांब समास, एकाक्षरी श्लोक हे निर्माण करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असूनसुद्धा स्वतःला यापासून लांब ठेवले आहे.

श्री. चितळे यांनी ग्रंथात वापरलेल्या भाषेविषयी स्वतःच ग्रंथाच्या हृद्गतात खुलासा केला आहे. लोकमान्यटिळकांच्या या चरित्रात अनेक नव्या कल्पना, नव्या विचारसरणी, नवे सिद्धांत यांचा उल्लेख आलेला आहे. त्यांच्यासाठी संस्कृत शब्द उपलब्ध नाही, म्हणून अशा ठिकाणी त्यांनी संस्कृत शब्द नव्याने तयार केले आहेत. संस्कृतभाषेत लिहायचे म्हणजे संधीकार्य ओघानेच आले. म्हणून, संधीकार्य लेखकाने केलेले आहे, मात्र जिथे लेखकाला असे वाटत आहे की, संधीकार्य केल्यास विशेष शब्दांचे ज्ञान वाचकाला नीट होणार नाही तेथे लेखकाने संधीकार्य करण्याचे टाळलेले आहे. 'तदाऽस्माकम्', 'भवेदिति', 'शिक्षणशुल्कमप्यददुः' यांसारखे छोटे आणि सोपे संधी आपल्याला या ग्रंथात वाचावयास मिळतात. 'छात्रधर्मानुष्ठानातिक्रमणम्', 'सम्पादनप्रकाशनकार्यभारः' यांसारखे सामासिक शब्द देखील विग्रहसुलभ आणि सुबोध आहेत. वैदिक संस्कृतात आढळणारा पण अभिजात संस्कृतात नसणारा 'ळ' हा वर्ण चितळ्यांच्या ग्रंथात मात्र आलेला आहे. टिळक, केळकर, चिपळुणकर अशा शब्दांमधून येणाऱ्या 'ळ' चा 'ल' जो सामान्यपणे संस्कृतलेखनात केला जातो, तसा बदल श्री. चितळे यांनी केलेला दिसत नाही.

या सर्व गुणवैशिष्ट्यांमुळे ग्रंथाचा पुरस्कार करत असताना ले. श्री. ज. स. करंदीकर म्हणतात, "महाविद्यालयांतील छात्रांना संस्कृतभाषेचा जेवढा परिचय होतो, तेवढा परिचय असलेल्या कोणाही वाचकास हे चरित्र वाचून, सहज समजणारे आहे. त्यात क्लिष्ट किंवा गूढ शब्दरचना नसून भाषा सरळ ओघवती आहे."[१३]

**५. उपसंहार**

इसवी सनाच्या विसाव्या शतकातील या ग्रंथाचा घेतलेला हा एक आढावा आहे. यातून, विसाव्या शतकातील काव्याचा रचनाबंध थोडक्यात समोर येईल.

सध्या इसवी सनाच्या एकविसाव्या शतकाची सुरवात होऊन वीस वर्षे लोटलेली आहेत. आजही अनेक संस्कृत लेखक आपापल्या परीने या भाषेला वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र संस्कृत भाषेकडे बघण्याचा दृष्टिकोन आमूलाग्र पद्धतीने बदललेला आहे, असे म्हणता येईल असे वाटत नाही. मात्र, अधिकाधिक गुणांसाठी किंवा छंद जोपासण्यासाठी अनेक लोक संस्कृत भाषा शिकत आहेत, हे मात्र नक्की. अशा

लोकांनी भाषेवर चांगली पकड मिळवल्यास आणि आपले विचार या भाषेतून मांडल्यास संस्कृत भाषेचे साहित्यिक दालन अधिकाधिक समृद्ध होण्यास नक्कीच हातभार लागेल.

**संदर्भ –**

1) यद्येतच्चरितं जनमनसि गीर्वाणवाग्विषयिकामा-भिरुचिमुत्पद्येत तर्हि इदं चरितलेखनकार्यं सफलं जातमिति मन्ये । (उक्त ग्रंथ पृष्ठ क्र. ४)
2) ओमित्येकप्रतीकाय सच्चिनानन्दरुपिणे । विश्वात्मकाय देवाय परस्मै ब्रह्मणे नमः ॥
3) गणानां त्वा गणपतिं मन्त्रेणैतेन यः स्तुतः । नमस्तस्यै गणेशाय सर्वप्रत्यूहनाशिने ॥
4) वाग्रूपिण्यै सरस्वत्यै भुक्तियुक्तेन चेतसा । शब्दसम्पत्प्रदानार्थं प्रार्थयेऽहं सदा नतः ॥
5) जनकं वामनं वन्दे लक्ष्मीं स्वजननीं तथा । त्र्यम्बकं ज्ञानदातारं वैयाकरणभूषणम् ॥
6) लोकचित्तविजेतारं टिळकेत्युपनामकम् ।गङ्गाधरसुतं बालं वन्देऽहं केशवं मुदा ॥
7) तस्य विस्तीर्णचरितं वर्णितं पूर्वसुरिभिः । देववाण्यां वक्तुकामः प्रयते तत्प्रसादतः ॥
8) लोकमान्यनिकटवर्तिभिः साहित्याचार्यैः 'नरसिंह चिंतामण केळकर' महाशयैः विरचितम् आसन्नद्विसहस्त्रपृष्ठात्मकं विस्तीर्णं लोकमान्यचरितम् । अतः केळकरविरचित-टिळकचरितमाश्रित्य प्रथमं पञ्चषाणि प्रकरणानि लिखितुमहं सयत्नोऽभूवम् ।(उक्त ग्रंथ पृष्ठ क्र. ४)
9) टिळकचरित्रस्य महाभारतेन सह नैकविधं साम्यम्। लेखकेन प्रकरणानि 'पर्व' शब्देन संज्ञितानि कृत्वा अष्टादशपर्वयुक्तं चरित्रमिदं विरचितम् ।(उक्त ग्रंथ पृष्ठ क्र.१५)
10) एतादृशं जीवनस्य विविधशाखान्वितं, शास्त्रपूतं, पराक्रमपूर्णम्, उर्जितसत्त्वं, निर्मलाचारयुक्तं, बुधबुद्धिवर्धकं, लोकमान्यटिळकचरितं तरुणेभ्यः स्फूर्तिं यच्छेत्, अध्यापनकार्यरतेभ्यः आदर्शपाठान् दद्यात्, धनलुब्धान् लोकशिक्षणाय द्रव्यदानं शिक्षयेत्, लोकधुरीणान् अभयवृत्तिमध्यापयेत्, शासनसंस्थाधिकारिभ्यः कीर्तिं वितरेत्, राजकारणधुरंधरान् लोककल्याणमार्गं दर्शयेत् ।(उक्त ग्रंथ पृष्ठ क्र. २७९)
11) वाग्रूपिण्यै सरस्वत्यै भक्तियुक्तेन चेतसा । सुबोधाक्षररूपोऽयं पुष्पहारः समर्प्यते ॥(उक्त ग्रंथ पृष्ठ क्र. २८०)
12) सपदि एव मनस्येका कल्पना पदमकरोत् यल्लोकमान्यानां सुबोधचरितं देववाण्यां यदि विरचितं भवेत् तर्हि किं स्यात् इति । संस्कृतभाषायां लोकमान्यानां महती प्रीतिः। वैदिक संशोधनाय तेषां दृढाऽभिरुचिः। महाभारतभगवद्गीतादिग्रन्थानां महान् व्यासङ्गः। यथा हिन्दी–मराठी–कानडी–गुजराथी–त्यादिभाषासुलोकमान्यटिळकमहोदयानां चरितं लिखितं विद्यते तथा गीर्वाणभाषायामपि तेषां चरितलेखनं समुचितं भवेत् । एवं मनसि विचार्य अनेन मार्गेणाहं किं न येतेयेति विचारः समुत्पन्नः । (उक्त ग्रंथ पृष्ठ क्र. ३)
13) उक्त ग्रंथ, पृष्ठ क्र. १२.

**संदर्भ ग्रंथ –**

संस्कृत – सुबोधसंस्कृतलोकमान्यटिळकचरितम्, श्री. कृ. वा. चितळे, श्री. कृ. वा. चितळे (प्रकाशक), प्रथमावृत्ती, मुंबई, १९५६.

**मराठी –**

1. अर्वाचीन संस्कृत साहित्य, श्री. भा. वर्णेकर, रतनलाल अगरवाल प्रकाशक, नागपूर, पहिली आवृत्ती, १९६३.
2. ललित संस्कृत साहित्याला महाराष्ट्राचे योगदान, डॉ. (सौ.) हंसश्री स. मराठे, श्री मंगेश प्रकाशन, पहिली आवृत्ती, २००६.

# पंडितभट्टजीशास्त्रीघाटे यांचे संस्कृतसाहित्यातील योगदान

**अंजली सुनील जोशी**

क.का.सं. वि. रामटेक.

**नंदा पुरी**

क.का.सं. वि. रामटेक.

**सारांश**

*प्राचीन काळापासून प्रवाहित झालेल्या संस्कृत साहित्यरुपी मंदाकिनीचा प्रवाह एकविसाव्या शतकातही अव्याहतपणे प्रवाहीत होताना दिसतो. आदिकवी वाल्मीकी तथा व्यासांनी आर्ष काव्यरूपात लौकिक संस्कृत साहित्यरुपी मंदाकिनीस पृथ्वीतलावर आणले . पुढे भास कालिदास आदीप्रभृतींद्वारे हा प्रवाह पुढे गेला. संस्कृत अनुरागी वाचकांनी या संस्कृत मंदाकिनीचा आस्वाद घेतला व तृप्त झाले. हा मंदाकिनीचा प्रवाह पुढे नेण्याच्या कार्यात अर्वाचीन कविंनीही हातभार लावला आणि तेवढ्याच सामर्थ्याने संस्कृत साहित्याचा मनोरम प्रवाह प्रवाही ठेवण्याचे मोलाचे कार्य केले. आजही रसिक वाचक या संस्कृत साहित्यरुपी मंदाकिनीचा आस्वाद घेत प्रमोदीत होताना दिसतात. ज्याप्रमाणेसंस्कृत मंदाकिनी कवींनी प्रवाहित केली त्याचप्रमाणे त्यांच्या काव्यांवर टीकालेखन करीत टीकाकारांनीही संस्कृत साहित्यसाठी महत्वपूर्ण योगदान दिले. या टीकाकारांमध्ये अर्वाचीन टीकाकार पंडित भटजी शास्त्री घाटे यांनी उत्तररामचरित या अभिजात संस्कृत नाटकावर उत्कृष्ट तथा बहुआयामी टीका लेखन करून संस्कृत साहित्यासाठी मोलाचे योगदान दिले.*

## उद्देश

पंडित भट्टची शास्त्री घाटे यांची उत्तररामचरितावरील भावभूतार्थबोधिका टीका सद्यपरिस्थितीत दुर्मिळ आहे. त्यांच्या बहुआयामी टीकेचे महत्त्व पटवून देणे तथा संस्कृत साहित्यातील त्यांच्या अमूल्य योगदानाचा परिचय देणे या एकमेव उद्देशाने प्रस्तुत शोधलेखाचे लेखन करण्यात आले आहे.

## प्रस्तावना

संस्कृत वाङ्मयात टीकासाहित्याचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. दुर्बोध ग्रंथांचा अर्थ सुबोध करून वाचक अभ्यासकांना ग्रंथाचे यथायोग्य ज्ञान करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य टीकाकार करीत असतात. संस्कृत साहित्यात केवळ ग्रंथ दुर्बोध असल्यानेच टीका लेखन झाले असे नाही .काव्याची रचनाच मुळी आस्वाद घेण्यासाठी झाली आहे काव्याचे महत्वपूर्ण प्रयोजन तात्काळ आनंदप्राप्ती असल्याचे मम्मटाचार्यांनी सांगितले आहे. तेव्हा काव्य आस्वादक व्हावेव काव्याचा आस्वाद सहृदय वाचकांना घेता यावा या उद्देशाने साहित्यात ज्या टीका लिहिल्या गेल्या त्या टीकांना अधिक महत्त्व आहे. त्या टीकांना आस्वादक टीका म्हणता येईल. अशा टीका फारच कमी टीकाकारांनी लिहिल्या. परंपरागत टीका लेखनामध्ये कोशानुसार शब्दार्थ देणे, व्याकरण स्पष्ट करणे, छंद - वृत्त, अलंकार यांचे थोडक्यात स्पष्टीकरण करणे, हीच पारंपारिक पद्धत असल्याचे दिसून येते. अशा टीका अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरतात. परंतु काही टीकाकार याहीपुढे जाऊन काव्य - नाट्याची साहित्यशास्त्रीय नियमानुसार असलेली तांत्रिक बाजू स्पष्ट करतात. काव्य कितपत साहित्याच्या नियमास अनुसरून आहे किंवा नाही याचेही विवेचन करतात. काव्य निर्मितीमागील कविची भूमिका, काव्यातील आशय, भाव तथा काव्यतत्व हे वाचकास अधिक आनंद प्रदान करणारे असते.काव्य रचनेचा काळ तथा सांप्रत काळ यात अनेक बदल झालेले असतात. काव्यातील विविध संदर्भ, संस्कृती मुल्येतसेच शास्त्रीय संदर्भ हे वाचकांना

सहजगम्य होत नाही. परिणामी त्याचा संपूर्ण आस्वाद घेता येत नाही किंवा हे संदर्भ काव्याचा आस्वाद घेताना बाधक ठरतात. टीकाकार मात्र याच बाबींचे स्पष्टीकरण तथा विवेचन करतो. केवळ काव्याची तांत्रिक बाजू समजून किंवा कविने काव्यशास्त्राच्या नियमानुसार रचना केली आहे किंवा नाही या बाबी समजून काव्याचा आस्वाद घेणे अशक्य आहे. टीकाकाराचे कार्य काव्यातील भाव तथा आशय उलगडून सांगणे हे आहे. अशा टीकांच्या साह्याने सहृदय वाचक काव्याचा खरा आस्वाद घेत असतो. अशा आस्वादक टीका साहित्यशास्त्रात अधिक उपयुक्त ठरतात. काव्य निकषावर टीकाकारांनी विचार केला आहे का किंवा काव्यातील सौंदर्य, कवीची प्रतिभा प्रसंगानुरूप टीकाकारांनी उलगडून दाखविली आहे का यावर टिकेची प्रत ठरत असते. प्रसिद्ध मराठी भाषा अभ्यासक तथा टीकाशास्त्राचे तज्ञ श्री. के. क्षीरसागरटिकाविवेक पुस्तकात लिहितात -"जुन्या संस्कृत टीकेत स्पष्टीकरणाप्रमाणेच सौंदर्यनिर्देश, अभिप्रायनिर्देश यांचाही भाग असे."[1] ज्या टीकांमध्ये काव्यातील सौंदर्य स्पष्ट केले जाते त्या टीका वाचकास काव्यानंद घेताना सहाय्यभूत ठरतात. उत्तररामचरित हे नाटक मुळातच गंभीर तथा तत्त्वज्ञानाने युक्त असे दृश्य काव्य आहे. अशा काव्याचा अभ्यास करताना उत्कृष्ट टीकेची जोड मिळाली तर वाचनाचा प्रवास अधिकच सुखकर होऊन आनंददायी ठरतो.

नाटककारांचा कवी म्हणून संस्कृत साहित्यात प्रसिद्धी प्राप्त कवी भवभूतिचे उत्तररामचरित हे काव्य गंभीर तंत्वज्ञानाने युक्त असून करूण रसाने परीपूर्ण असे काव्य आहे. अखिल साहित्य प्रेमींकडून या काव्यास विशेष झुकते माप दिल्या गेले. प्रचंड लोकप्रियता प्राप्त या काव्यावर अनेक प्रमाणात टीकालेखन झाल्याचे दिसून येते. या विविध टीकांमधून अर्वाचीन टीकालेखक पंडित भट्जी शास्त्री घाटे यांची भावभूतार्थबोधिका टीका मुंबईस्थित इंदुप्रकाश मुद्रणालयाने इ. स. १८९५ मध्ये प्रकाशित केली. विनायक सदाशिव पटवर्धन यांच्या टिप्पणीसह असलेली भवभूतिविरचित उत्तर रामचरिताची प्रत सर्वप्रथम १५ डिसेंबर १८८५ मध्ये प्रकाशित करण्यात आली व त्याची द्वितीय आवृत्ती १७ ऑक्टोबर १९०९ मध्ये काढण्यात आली. अनेक संस्कृत अभ्यासक तथा तज्ञांनी प्रस्तुत टीकेची नोंद घेत त्यांच्या लिखाणात भावभूतार्थबोधिका टीकेचे संदर्भ दिल्याचे आढळून आले आहे.

## भावभूतार्थबोधिकाटीका

भवभूतिविरचित उत्तररामचरितावरिल भावभूतार्थबोधिका टीकेची माहिती प्रो.डॉ. नंदा पूरी मॅडमच्या "दोन दुर्मिळ टीकाकार" या शोधलेखात प्राप्त झाली. त्यांच्याच प्रेरणेने तथा मार्गदर्शनाखाली भावभूतार्थबोधिका टीकेचे समीक्षणात्मक अध्ययन करण्यात आले. प्रस्तुत टीकेचा अभ्यास करताना व शोध घेताना अनेक माहिती स्त्रोत प्राप्त होत गेले. नागपुरातील ज्येष्ठ अभ्यासक डॉ. म. रा. जोशी यांनी लिहिलेला व प्रज्ञालोक मासिकात प्रसिद्ध झालेला 'घाटे भटजी यांची भावभूतार्थबोधिनी" शोधलेख प्राप्त झाला. तसेच डॉ. आशा अंभोरे यांच्या "अभिजात नाट्यावरील टीकासाहित्य" या नागपूर विद्यापीठात सादर झालेल्या लघुशोधप्रकल्पात घाटे भटजी भावभूतार्थबोधिनी" यातून प्रस्तुत टीकेबद्दलची विपुल माहिती प्राप्त झाली. सद्यपरिस्थितीत दुर्मिळावस्थेत असलेल्या प्रस्तुत टीका असलेल्या उत्तररामचरिताची प्रत नागपुरातील हिंदू धर्म संस्कृती मंदिरात बघावयास मिळाली.

प्रस्तुत टीकेचा अभ्यास करताना विविध पैलू लक्ष वेधून घेऊ लागले व पंडित भट्टजी शास्त्री घाटे यांच्या संस्कृत

[1] टीकाविवेक-श्री.के.क्षीरसागर, पृ.4

साहित्यातील योगदानाची जाणीव झाली. अर्वाचीन काळात म्हणजे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेल्या या टीकाकाराचे संस्कृत साहित्यास लाभलेल्या योगदाना अंतर्गत प्रस्तुत शोधलेखात टीकेतील काही वैशिष्ट्यांचा आढावा घेण्यात आला आहे.

**परिचय**

संस्कृत साहित्याचा इतिहास पाहता भास कालिदास आदी महाकवींनी प्रसिद्धीपराङ्मुखतेच्या मार्गाचे अवलंबन केलेले दिसते .त्यांचाच मार्ग स्विकार करीत टीकाकारांनी केवळ मंगलाचरण तथा समाप्ती दर्शक पुष्पिकेत स्वतः विषयक अत्यंत थोडकी माहिती दिलेली आहे.

"विदर्भ प्रांतातील तळेगाव दशसहस्त्र या भागात इ.स. १८३४ मध्ये भट्टजीशास्त्री यांचा जन्म झाला. त्यांनी उत्तर रामचरिता वरिल आपली भावार्थ बोधिका ही टीका इ.स. १८९५ मध्ये लिहून पूर्ण केली. इ.स. १९०० साली त्यांना व्हॉइसरायच्या हस्ते महामहोपाध्याय ही सन्माननीय पदवी प्राप्त झाली. त्यांच्या टीकेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी नाटकातील रस, भाव व ध्वनी यांचे साक्षेपाने विवेचन केले आहे. त्यांची टीका पद्धती संक्षेपयुक्त असली तरी नाटकाचा सर्व अंगांचा परामर्श घेणारी आहे"[2]अशा प्रकारची माहिती तथा संदर्भ संस्कृत टीका व टीकाकार या सुरेश महाजन लिखित पुस्तकात प्राप्त होतात. तर डॉ. म. रा. जोशी यांच्या लेखातून "घाटे भटजी हे नागपूरकर भोसल्यांच्या उत्तरकालीन व्याकरणाचे जाडे पंडित होते" [3] अशी माहिती प्राप्त होते. टीकाकारांनी टिकेआरंभी लिहिलेल्या काही श्लोकात त्यांच्याविषयी माहिती प्राप्त होते. ते लिहितात -

"श्रीगणेशाय नमः। महः किमपि मन्महे
शिवमनोविनोदास्पदम्।
गजास्यमुमया सदाललितलालितं
पालितम्।।अमन्दमदगण्डसंमिलमिलिन्दमालाकुलम्।
सविघ्नगणपं तथा गिरमपि स्तुमः कामदाम्।।"[4]

असे मंगलाचरण करीत टीकाकार वाणीची स्तुती करीतटीकालेखना मागचे प्रयोजन स्पष्ट करताना सांगतात- "भावभूते नाटकेऽस्मिन् भावभूतार्थबोधिकाम् टीकांकर्तुं यदुद्युक्तः सा हि कृष्णगुरोः कृपा।।"[5]नाटकाचा भाव तथा सत्य अर्थाचा बोध करून देणारी ही टीका कृष्ण गुरुच्या प्रेरणेने लिहीत असल्याचे टीकाकार सांगतात. नाटकाअंती पुष्पिकेअंतर्गत सप्तम अंकाच्या शेवटी टीकाकारांनी त्यांच्या माता - पित्याचा नामनिर्देश करून टीका पूर्णत्वास गेलेल्या तिथीची नोंद केली आहे.

"अहिल्यागर्भजातेन श्रीकृष्णतनुजन्माना।।
कृष्णशिष्येण रचिता जयकृष्णेन धीमता।।
घाटे इत्युपनाम्नेयं भट्टजीपदलक्ष्मणा ।।
अत्यष्टि १७ नाम ८ कु १ मिते शके १८१७ याम्यायाने शुभे
**भाद्रमास्यसिते पक्षे गुर्वष्टम्यां समापिता ।।**
भवभूतिसरस्वत्या भावभूतार्थबोधिका ।। "[6]

अशाप्रकारे टीकाकारांनी समाप्ती दर्शक पुष्पिकेत त्यांच्या माता- पिता यांची माहिती देत टीका संपूर्ण झाल्याची तिथी नोंद केली आहे.याव्यतिरिक्त टीकाकाराने अवांतर काहीच माहिती दिलेली नाही.

भावभूतार्थबोधिका टीका टीकाकारांनी टीकालेखन करताना टीकालेखनाच्या पारंपरिक पद्धतीचा स्वीकार करीत शब्दार्थ

[2]संस्कृत टीका व टीकाकार-सुरेश महाजन.पृ.83

[3]प्रज्ञालोक ISSN 2330 -अंक 237,पृ.106

[4]उत्तररामचरित भावभूतार्थबोधिका टीके समवेतं-पृ.1

[5]तत्रैव-पृ.1

[6]उत्तररामचरित भावभूतार्थबोधिका टीके समवेतं-पृ.192

देताना विविध कोषांचे संदर्भ दिले आहेत. टीकाकारांनी काव्यातील पाठभेदाची दखल घेत कोणता पाठ योग्य असू शकतो त्याबद्दलचे तर्कनिष्ठ मत देखील नोंदविले आहे. यावरून टीकाकारांनी उत्तररामचरिताच्या एकाच प्रतीचा आधार न घेता विविध प्रति तपासून योग्य पाठ कोणता ते सुचविले असे लक्षात येते. यावरून टीकाकाराच्या संशोधक वृत्तीचे दर्शन होते." योग्य शब्द योग्य अर्थाचे द्योतक असतात. कवी द्वारे मुळ प्रतीत प्रयोग केलेल्या शब्दापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न क्रिटिकल एडिशन द्वारे संशोधक करीत असतात. घाटे शास्त्रींच्या टिकेचा अभ्यास करताना याचा प्रत्यय येतो. साहित्याच्या दृष्टीने हे योगदान महत्त्वपूर्ण ठरते."घाटेसारखे भारतीय विद्वान पाठान्तर, अपपाठ व इतरांचे व्याख्यान (commentary) नजरेआड करीत नाहीत उलट ग्रंथकाराचा नेमका आशय सादर करतात."[7] अशाप्रकारे घाटे शास्त्रींवरील लिहिलेल्या शोधपत्रात नोंद करीत "व्याकरणचा आधार घेऊन त्यांनी संपूर्ण संहितेची शुध्दता व सुसंगती दाखविण्याचे मोठेच कार्य केले आहे" [8]असे डॉ. म. रा. जोशीलिहीतात.

भावभूतार्थबोधिका टीकेचे वैशिष्ट म्हणजे टीकाकारांनी साहित्यशास्त्रीय नियमानुसार नाटकाचे नाट्यशास्त्रीय मूल्यमापन करीत नाटकाच्या विकासाच्या दृष्टीने तसेच इतरही सूक्ष्म तंत्रांचे भरताच्या नाट्यशास्त्रानुसार तसेच धनंजयच्या दशरूपकातील लक्षण देत स्पष्टीकरण दिले आहे. टीकाकारांनी नाटकाचे काव्यशास्त्रीय दृष्टीने केलेले परीक्षण तथा मूल्यमापन साहित्याच्या दृष्टीने अधिक महत्वाचे आहे. काव्यातील रस, भाव, ध्वनी यांचे स्पष्टीकरण करीत टीकाकारांनी मम्मटांच्या काव्यप्रकाशाचे प्रमाण दिले आहे.

प्रसिद्ध टीकाशास्त्रज्ञ तथा मराठी भाषेचे अभ्यासक श्री. के. क्षीरसागर टीकाविवेक पुस्तकात लिहितात ."टीकेचा मुख्य उपयोग म्हणजे लोक अभिरूचीला वळण लावणे"[9]

साहित्यातील नेमका कशावर प्रकाश टाकावा व त्यातून काय भाव प्रतीत होतो त्यातून कविस नेमके काय सांगावयाचे आहे हे एक उत्कृष्ट टिकाकार सहृदय वाचकास मार्गदर्शनच करीत असतो व अशाप्रकारे लोक अभिरूचीला वळण लावतो. पंडित भट्जी शास्त्रींनी नेमकी हीच भूमिका घेतलेली दिसतेम्हणूनच साहित्यासाठी त्यांचे योगदान महत्वपूर्ण ठरते.

## घाटे शास्त्रींचे योगदान

उत्तररामचरिताची प्रत मोठ्या प्रमाणात पाठभेदाने दूषित असल्याची खंत डॉ. काणे यांच्या उत्तररामचरिताच्या संपादन केलेल् प्रतीच्या प्रस्तावनेत व्यक्त केलेली आहे. विविध प्रतीचा अभ्यास करताना त्यातील पाठभेदप्रकर्षाने जाणवतात. अशा परिस्थितीत घाटे शास्त्री यांच्या टीकेत केलेले पाठ भेदाचे परीक्षण अधिक उपयोगी ठरते"उदा. अंक ४ श्लोक २१ वरील घाटे शास्त्रींचेटीकाभाष्य पहाण्यासारखे आहे.या श्लोकातील "मनो मे सम्मोहः स्थिरमपि" या पदातील पाठान्तराची नोंद करून प्रस्तुत श्लोकात 'अधिक पद दोष' आहे या शंकेचे निरसन घाटेशास्त्री करतात."[१०]

"तद्याख्यानम् उपमान वाक्ये परिलघु इति पदस्य अनर्थकताऽऽपत्या निर्दुष्टस्य भवभूतिश्लोकस्य अधिकपद दोषत्वेन दूषितत्वम् परिकल्पयन्तः स्वस्य विपरिलघुतां आविश्चक्रुः। एतद् व्याख्याने तु बालके लघुतया विशेषस्य उभयत्र साम्येन तत् दोष परिहारः।"[10]

असे हे पाठभेद परिक्षण तथा काव्यशास्त्रीयमूल्यमापन साहित्यासाठी महत्वपूर्ण ठरते.

---

[7]प्रज्ञालोक ISSN 2330 -अंक 237,पृ.108

[8]प्रज्ञालोक ISSN 2330 -अंक 237,पृ.109

[9]टीकाविवेक-श्री.के.क्षीरसागर ,पृ-6

[10]उत्तररामचरित भावभूतार्थबोधिका टीके समवेतं- पृ. 123

**नाट्यशास्त्रीयविश्लेषण**

नाट्यतंत्र यथा नाट्याचा विकास याचा विचार करता असे दिसून येते की टीकाकारांनी भरतांच्या नाट्यशास्त्राचा तथा धनंजयच्या दशरूपकाचे प्रमाण देत संपूर्ण उत्तररामचरिताचे नाट्यशास्त्रीय विश्लेषण केले आहे. प्रत्येकच बारीक-सारीक बाबींचे विवेचनव्याख्या व प्रमाण देत टीकाकार स्पष्ट करतात व नाट्याच्या विकासाचे तंत्र उलगडून सांगतात. नान्दीपाठाचे नाट्यशास्त्रीय विश्लेषण टीकेत पुढील प्रमाणे येते-"अयं च श्लोकः कविकृतमङ्गलाचरणरूपोऽपि 'सुत्रधारःपठेन्नान्दी मध्यमं स्वरमाश्रितः। नान्दी पदैर्द्वादशभिरष्टभिर्वाप्यलङ्कृता ।'इति भरतानुसारेण द्वादशपदनान्दी रुपः।" [11] असे स्पष्टीकरण करीत विविध पैलुंनी देखिल नान्दीपाठाचेटीकाकाराने विस्तृत विवेचन केले आहे.

नान्द्यन्ते सूत्रधारः, इतिवृत्त, प्रस्तावना, नाट्यबीज, असे प्रत्येक बाबींचे विवेचन टीकेत येते.

**काव्यशास्त्रीयविश्लेषण**

नाटकातील रस भाव, ध्वनी यांचेही सुरेख विवेचन टीकाकार करतात. भरतानुसार तथा त्यांच्या काव्यप्रकाशाचे प्रमाण देत त्यांनीकाव्यातील काव्य तत्वाचे अतिशय सूक्ष्म विवेचन केले आहे. रसादिध्वनिचेविवेचन करताना भावोदय, भावशान्ती, भावसन्धी, भावशबलता यांचेही स्पष्टीकरण टीकाकार करतात.

**उदाहरणार्थ-**

"तटस्थं नैराश्यादपि च कलुषं विप्रियवशा-
द्वियोगे दीर्घेऽस्मिन् झटिति घटनोत्तम्भितमिव ।
प्रसन्न सौजन्याद्दयितकरुणैर्गाढकरुणं
-द्रवीभूतं प्रेम्णा तव हृदयमस्मिन् क्षण इव" ।। [12]

हा श्लोक उतररामचरिताच्या तृतीय अंकात येतो. रामाने त्याग केल्यानंतर अनेक वर्षांनी झालेल्या रामाच्या दर्शनाने सीतेची अवस्था व त्यावरील तमसेचे समजावणे या भावपूर्ण अवस्थेचे टीकाकाराने केलेले विवेचनपुढील प्रमाणे- "नैराश्यात निर्गता आशा पुनः समागमाशा यस्मात् तन्निराशं तस्य भावो नैराश्यं औदासिन्य। अस्मिन् दीर्घे वियोगे बहुकालसञ्जातविरहे। झटिति अकस्मात्। घटनया परस्परदर्शनेन उत्तम्भितमिव जडिकृतं स्तब्धप्रायमिव । सौजन्यात् प्रियेत्यादिवाक्यश्रवणैनाऽनुरागदर्शनात् प्रसन्नं प्रीतं।दयितस्य प्रियस्य करुणैः शोक व्यञ्जक वाक्यैः । गाढः घनीभूतः करुणः शोको यस्मिन् तत्त अतिशोकव्याप्तं । अस्मिन् क्षणे तव हृदयं प्रेम्णा द्रवीभूतं विलीनघ्रुतवत् द्रवत्वमापन्नं अस्तीति शेषः। इयं भावशबलता ।" [13] असे टीकाकाराने भवभूतिच्या काव्यातील भावाचे वभावशबलता या रसादिध्वनि चे सुरेख विवेचन केले आहे.प्रसंगोपात आलेल्या विवक्षितान्य परवाच्य ध्वनी, शब्दशक्ती उद्भवध्वनी , काव्यातील रस तथा रसादी ध्वनीयांचे टीकाकाराने केलेले स्पष्टीकरण साहित्याच्या अभ्यासकांसाठी विशेष महत्त्वपूर्ण ठरते. भवभूतीच्या काव्यातील भाव जाणून घेणे हे महत्त्वाचे आहे. टीकाकारांनी टीके आरंभीच वचन दिले आहे .काव्यातील भाव तथा सत्य अर्थाचा बोध करून देणारी ही टीका आहे .तेव्हा टीकेतील विविध प्रसंगी टीकाकारांनी काव्यातील भावाभिव्यक्तिचे सुरेख विवेचन केले आहे . हे स्पष्टीकरण काव्याचा आस्वाद घेणाऱ्या सहृदय वाचकांसाठी अधिक महत्त्वपूर्ण असून रसिक वाचकांना आनंदानुभूतिघडवून देणारे आहे . असे हेस्पष्टीकरण

[11]उत्तररामचरित भावभूतार्थबोधिका टीके समवेतं- पृ. 1

[12]उत्तररामचरित भावभूतार्थबोधिका टीके समवेतं-पृ.74

[13]उत्तररामचरित भावभूतार्थबोधिका टीके समवेतं-पृ.74

वैशिष्ट्यपूर्ण असून इतरत्रअसेकाव्याचे विवेचन आढळत नाही म्हणून देखील ही टीका वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

## उपसंहार

भवभूतिविरचित उतररामचरितावरीलपंडित भट्टजी शास्त्री घाटे यांची भावभतार्थबोधिका टीका काव्याचे विविध पैलुंनी परिक्षण तथा मूल्यमापन करणारी टीका असून वैशिष्ट्यपूर्ण टीका आहे. साहित्याच्या दृष्टीने प्रस्तुत टीकेचे महत्त्व अनन्यसाधारण असून टीकाकाराने भवभूतिच्या काव्यातील भाव तथा सत्य अर्थाचा बोध करून देण्याचा सार्थ प्रयत्न करुन साहित्यासाठी मोठे योगदान दिले आहे.

## संदर्भसूची

1. टीकाविवेक-श्री.के.क्षीरसागर, पृ.४
2.संस्कृत टीका व टीकाकार-सुरेश महाजन.पृ.८३
3.प्रज्ञालोक ISSN २३३० -अंक २३७,पृ.१०७
4.उत्तररामचरित भावभूतार्थबोधिका टीके समवेतं-पृ.१
5.तत्रैव-पृ.१
6.तत्रैव पृ.१९२
7.प्रज्ञालोक ISSN २३३० -अंक २३७,पृ.१०८
8.तत्रैव-पृ.१०९
9.टीकाविवेक-श्री.के.क्षीरसागर,पृ-६
10.प्रज्ञालोक ISSN २३३० -अंक २३७,पृ.१०७
11.उत्तररामचरित भावभूतार्थबोधिका पृ.१
12.तत्रैव–पृ.-१
13.तत्रैव-पृ.-७४
14. तत्रैवपृ.-७४

## संदर्भग्रंथसूची

1.काव्यप्रकाशव्याख्याकार-आचार्य विश्वेश्वर
संपादक-हळदे श्रीश. वर्ष ५७ शके १९३६
संपादक – डॉ.नरेन्द्रप्रकाशक - ज्ञानमंडल ग्रंथमाला, वाराणसी, पुनर्मुद्रण - डिसेंबर २०१३
2. टीकाविवेक क्षीरसागर श्री.के., मुंबई - १९६१
3. भवभूति के नाटकोंकी ध्वनिसिध्दान्तपरक समीक्षा तिवारी डॉ. दयाशंकर
प्रकाशक-विद्यानिधि प्रकाशन, प्रथम संस्करण- २००९
4. भवभूतिविरचितं उत्तररामचरितं नाम नाटकं घाटे इत्युपनाम्ना भट्टजी पदलक्ष्मणा श्रीकृष्णसूनुना श्रीमता जयकृष्णेन विरचितया,भावभूतार्थबोधिकया टीकया समवेतं विनायक सदाशिव पटवर्धन
इत्यनेनटिप्पण्यादिभिश्चालंकृतम्मुंबापुरवर्तिनि 'इंदुप्रकाशा'ख्ये मुद्रणालये प्रकाशितम्प्रथमावृत्ती- १५ डिसेंबर,१८९५
5. संस्कृत टीका व टीकाकारमहाजन सुरेश विनायक
प्रकाशनः जिद्द पब्लिकेशनप्रथम आवृत्ती - ०१/०९/२०११

### लघुशोधप्रकल्प

अभिजात संस्कृत नाट्यावरील टीकासाहित्य
संशोधिका-आंभोरे डॉ.आशा, नागपूर विद्यापीठ

### लघुशोधप्रबंध

उत्तररामचरितावरील पंडित भट्टजी शास्त्री घाटे यांच्या भावभतार्थबोधिका टीकेचे समीक्षणात्मक अध्ययन
संशोधिकाः जोशी अंजली सुनील
क.का.सं.वि.,रामटेक, वर्ष- २०१७ -१८

### शोधलेख

जोशी डॉ.मनोहर रामचंन्द्र
प्रज्ञालोक-ISSN-२३२०-३५६०- अंक - 5

# आधुनिक महाकाव्य राधाचरितम् व सीताचरितम् प्रस्तुत आदर्श स्त्री चरित्र

**सविता चिटकलवार**

संस्कृत विभाग, यशवंत महाविद्यालय, नांदेड.

## सारांश

*आधुनिक महाकाव्याच्या श्रृखंले मध्ये डॉ.हरिनारायण दीक्षित रचित 'राधाचरितम्' या महाकाव्याला व डॉ.रेवाप्रसाद द्विवेदी रचित ' सीताचरितम्' या महाकाव्याला उत्कृष्ट स्थान दिले जाते. या दोन्ही महाकाव्यात मुख्य स्त्रीपात्र राधा व सीता यांच्या त्याग, कर्तव्यनिष्ठा, सहनशिलता यांचे वर्णन या महाकाव्यात केले आहे. त्रेतायुगात जन्मलेली सीता व त्यानंर द्वापरयुगात जन्मलेली श्रीराधा यांच्या जीवनात अनेक समानता दिसून येतात. दैवीय स्वरुपात असलेल्या या दोन्ही स्त्रीया पृथ्वीवर कष्टमय जीवन जगणाऱ्या प्रेम आणि त्यागाच्या मूर्ति म्हणून प्रसिद्ध आहेत.*

*राधाचरितम् मध्ये कवि ने वज्रवासी लोकांच्या उन्नतिसाठी निरंतर कार्यशील राहणाऱ्या संपूर्ण मानव समाजाच्या कल्याणासाठी, जीवनाचा त्याग करणाऱ्या, कर्मयोगिनी राधाच्या चरित्राविषयी सांगतिले आहे. सीताचरितम् मध्ये वर्णित सीता ही केवळ पतिव्रता नसून एक महान स्त्री आहे. जी मानवतेच्या कल्याणासाठी सर्व प्रकारच्या सुखा सोबत आपल्या जीवनाचा त्याग करण्यास तयार असते. गृहस्थाश्रमात राहून वधूरुपात असताना सर्वांचा यथोचित आदर सन्मान करुन स्वइच्छेने पति सोबत वनात जावून पतिव्रता धर्माचे पालन करते तसेच पतिद्वारा लोकापवादामुळे प्राप्त झालेला वनवास सुद्धा सहर्षपणे स्विकारते.*

### प्रस्तावना

समाजरुपी रथाचे स्त्री आणि पुरुष हे दोन चाक आहेत. समाजाची रचना स्त्री आणि पुरुष यांच्या समन्वयाने बनली आहे. स्त्री साठी पुरुष व पुरुषासाठी स्त्रीची आवश्यकता असते. ज्याप्रकारे सृष्टिचक्रात प्रकृतिविना पुरुषाचे कार्य अपूर्ण आहे. त्याच प्रकारे प्रत्यक्ष जीवनात स्त्रीविना पुरुष अपूर्ण आहे. दोन्ही स्त्री व पुरुषरुपी चाक समान चालणे आवश्यक आहे. कारण स्त्री व पुरुष या दोन्हीपैकी एकाचा अभाव झाला तरी समाज विकृत होईल. वैदिक साहित्यात पत्नीला पतीची अर्धांगीनी म्हटले आहे. प्राचीन भारतात स्त्रीला समाजात उच्च स्थान दिले होते. या स्त्रीयांमध्ये श्रीराधा तसेच देवी सीता हिंदू समाजातील स्त्रियांसाठी आदर्श आहे. सर्व स्त्रियांसाठी पथ-दर्शक आहेत. यांच्या समान त्यागशील, असाधारण, धर्मपरायण, क्षमाशील सेवाभावी, सदाचारी, व्यवहारकुशल इत्यादी गुण एकत्र इतर स्त्रियांमध्ये मिळणे कठीणच आहे.

### आदर्श स्त्रीचरित्र

डॉ. हरिनारायण दीक्षित रचित राधाचरितम् मध्ये श्रीराधा तसेच डॉ.रेवाप्रसाद द्विवेदी रचित सीताचरितम् मध्ये सीता यांच्या पवित्र जीवन कथेचे तसेच अनुपम भक्ति चे जे उदाहरण जगासमोर प्रस्तुत केले आहे ते इतर आधुनिक महाकाव्यात कमीच दिसून येते. महाकाव्याच्या आरंभापासून ते शेवटपर्यंत यांच्या चरित्र्याची विशेषता हि सर्व स्त्रीयांसाठी आदर्श व अनुकरणीय आहे. डॉ. रेवाप्रसाद द्विवेदी रचित सीताचरितम् महाकाव्याच्या दहा सर्गात श्रीराम सिंहासनावर आरुढ होण्यापासून सीता चे पाताळात प्रवेश करणे इथपर्यंतची कथा वर्णित आहे. यामध्ये रामाची पत्नी सीताच्या जीवनातील उत्तरार्ध सांगितला आहे. यांच्या कथावस्तुचे स्त्रोत वाल्मीकिकृत रामायणाच्या उत्तरकाण्ड मधील चाळीसाव्या सर्गा पासून सत्यानवे सर्ग पर्यंत ची कथा आहे. याशिवाय श्रीराधा च्या चरित्रावर आधारित महाकाव्य राधाचरितम् बावीस सर्गात विभक्त आहे. यामध्ये श्रीराधा चे उदात्त चरित्र महाकवि डॉ.हरिनारायण दीक्षित ने आपल्या

लेखनीद्वारे अतिशय सुंदरपणे लेखनीबद्ध केले आहे. राधाचरितम् चे कथास्रोत ब्रह्मवैवर्त पुराण मधील प्रकृतिखण्डाच्या एकोणचाळीसव्या अध्यायातील आहे. ज्यामध्ये राधा - श्रीदामा यांच्या शापाचे कथानक आहे. या दोन्ही महाकव्यात मुख्य स्त्री पात्र सीता तसेच श्रीराधा यांच्या त्यागीवृत्ती, कर्तव्यनिष्ठता, सहनशीलता तसेच सौम्यता यांचे वर्णन महाकाव्यात केले आहे. देवी सीताला भारत देशाच्या राष्ट्रदेवी पदावर सुशोभित केले आहे.[१] कारण रामकथेमध्ये सर्वाधिक कष्ट सीता ने सहन केले. म्हणून असे म्हणने अनुचित ठरणार नाही की यांचे संपूर्ण जीवन कष्टमय होते. तर दुसरीकडे राधाचरितम् मधील राधा ने सुद्धा वज्रवासी लोकांसाठी त्यांच्या कल्याणासाठी त्याग व तपस्वीपणा चा सुंदर आदर्श प्रस्तुत केला आहे. दोन्ही नायिकांचे चरित्र हे संस्कृत साहित्यातील तपस्वीनी सीता आणि कर्मयागिनी राधा यांच्यारुपाने आदर्श स्त्री प्रतिबिंबीत करते. सीताचरितम् मध्ये कविने सीताला आदर्श स्त्रीच्या रुपात चित्रीत केले आहे. ती एक आदर्श पत्नी आहे. श्रीरामाच्या सुख - दु:खात सहभागी आहे.

कृते ममैषा नृपमन्दिरादितो वनान्यपि प्रीततराण्यमन्यत ।[२]

निनाय या तां शरदां चतुर्दशींप्रसन्नमुद्रैव फलैरुपोषितैः ।।[३]

या शिवाय राधाचरितम् ची मुख्य स्त्रीपात्र श्रीराधा च्या प्रशंसेमध्ये म्हटले आहे की, पूर्वीकाळी जे कार्य सीता ने श्रीरामसाठी नाही केले, शिवानी ने जे कार्य शिवसाठी केले नाही. कोणत्याही महिलेने जे कार्य कोणत्याही पुरुषासाठी केले नाही ते श्रीराधा ने निश्चितच कीर्तिवर्धक कार्य श्रीकृष्णासाठी केले.[४] वज्रवासी लोकांची उन्नति वाढविण्यासाठी निरंतर कार्यशील राहून संपूर्ण मानवाच्या, समाजाच्या हितासाठी कार्य करणारी एक उच्च आदर्श स्त्री मानली जाते. भारतीय लोकांनी आदर्श स्त्री चरित्रासोबत स्त्रीमध्ये आदर्श माता असण्याची कल्पना ठेवली आहे. सीता चे चरित्र दाखविण्याऱ्या या रुपाचे अत्याधिक सुंदर आणि मनोरमय वर्णन केले आहे.

सुत-वपुषि ततः स्वदुग्धराशैरियमतनोदिव कामधुग्यथैव

अमृतमयहतित्वमात्मशुद्धिर्भवति हि मातृजनस्य राष्ट्रपुष्ट्यै ।।[५]

या शिवाय डॉ. दीक्षीत ने राधाचरितम् मध्ये राधाला महत्त्वपूर्ण स्थान दिले आहे.

साधारणीयं महिला न राधा विभूतिराद्या जगदीश्वरीयम् ।

अस्याः पदाम्भोजपरागपूता लोकद्वये भूरि सुखं लभन्ते ।।[६]

श्रीराधा ने म्हटले की जो मनुष्य संकटाच्या सागरात सापडलेल्या आपल्या मातृभूमीची रक्षा करु शकत नाही तो अतिनिन्दनीय आहे. म्हणून मनुष्य ज्याप्रकारे आपल्या जन्मादात्री मातेची सेवा करतो. त्याचप्रकारे त्याला आपल्या जन्मभूमिची सेवा केली पाहिजे.[७] तर दुसऱ्या बाजूला सीताचरितम् मधील सीता भूमिवर निद्रीस्त असताना स्वत:ला भारतभूमिच्या वक्ष:स्थलावर निद्रीस्त आसल्याचे मानते. आपल्या देशाच्या विकासासाठी श्रम देखील करते. आपल्या हाताने वृक्ष-वृल्ली यांचे सिंचन सुद्धा करते, ज्यामुळे देशाच्या प्रत्येक कणाविषयी देशभक्तिचा आनंद प्राप्त होवू शकेल.[८] श्रीरामापासून दूर झाल्यावर विराहाच्या वेदनेमूळे आपल्या भाग्याने केलेली चेष्टा विसरुन राष्ट्राच्या विकासासाठी मुलांचे पालनपोषण करते. शिक्षण, सम्पति, श्रम-उद्योग आणि मैत्रीभाव इत्यादीची स्थापना वज्र येथे करुन वज्रवसी लोकांसाठी निरंतर कर्मयोगाचा संदेश देते इत्यादी भावना आपल्याला श्रीराधा च्या राष्ट्राप्रति असलेल्या प्रेमभावनेतून प्रकट होताना दिसून येते.

राधाचरितम् मधून डॉ.हरिनारायण दीक्षित ने स्त्रीच्या आदर्श तसेच उदात्त चरित्राचे वर्णन केले आहे. ते खरोखरच प्रशंसनीय आहे. त्याच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास भारतातील

कोणतीही स्त्री आपल्या राष्ट्राच्या हितासाठी झगडताना दु:खाचा अनुभव करीत नाही, ती तिच्यावर आधारीत आपल्या सुखाचा स्वाभिमानपूर्वक त्याग करते, परंतू आपला मार्ग थांबवित नाही.[८] आदर्श स्त्री रुपातील श्रीराधा सुसंगठित राष्ट्र निर्माण करु इच्छिते, ती जानते की, राष्ट्र विघटित झाल्यास संकट निर्माण होईल. सीताचरितम् मधील सीता दृढसंकल्पी तसेच आत्मविश्वासी आहे. गर्भावस्थाच्या वेळी आपल्यावर वनात जाण्याची वेळ आल्यावर ती क्षणभर देखील विचलित होत नाही. तर आपल्याला निष्कासित केल्याबद्दल प्रसन्नता दाखविते, एवढेच नाहीतर उर्मिला ला दृढपणे सांगते की मी आज पुन्हा वनेचरी झाले आहे.[९] राधाचरितम् चे रचनाकार डॉ.हरिनारायण दीक्षित सांगतात श्रीराधा ही साधारण स्त्री नाही तर पृथ्वीची स्वामिनी आहे. तीच्या चरणकमळाने पवित्र झालेले लोक पृथ्वीवर व स्वर्गात देखिल सुख प्राप्त करतात. दीक्षित ने श्रीराधाला एक श्रेष्ठ नायिका मानले आहे, जी सर्वगुणसंपन्न आहे. सीता श्रीराम व प्रजेच्याहितार्थ आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्यासाठी सदैव तत्पर असते. ती प्रजेच्या हितासाठी अयोध्याच्या वैभवाचा त्याग करुन वनात जाण्यासाठी तयार असते. सीताला माहित होते की, रघुकुळाच्या मर्यादेसाठी तिला वनात जाणे अनिवार्य आहे. याच विशेषतेमुळे सीता त्यागाचे प्रतिक मानली जाते.[१०]दुसरीकडे राधारचितम् मधील राधामध्ये हीच भावना प्रबळ आहे, श्रीराधा भगवान श्रीकृष्ण तसेच संपूर्ण वज्र लोकांच्या कल्याणासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करण्यासाठी तत्पर असते. हिची त्यागशीलता सांगणारा महाकाव्यात राधाचरणरेणु नावाचा चौदावा सर्ग आहे. ज्यामध्ये भगवान श्रीकृष्ण शिरोवेदनेमूळे पीडित होते, तेंव्हा राधा आपली चरणधूळ उपचार करण्याच्या हेतूने देवर्षि नारद ला देते, कारण भगवान श्रीकृष्णाच्या इतर पतिव्रता स्त्रीयांना पाप लगेल या भितीने त्या चरणधूळ देणे योग्य समजत नाहीत. यासर्वांपेक्षा वेगळी असलेली श्रीराधा म्हणते

तापापहारी जगती नृणामसौ प्रपीडितश्चेन्निजशीर्षपीडया ।
ध्रुवं समर्प्योपि तदा निजानसून सेवनीय: प्रतिभाति मुने ।।[११]

सीता गर्भावस्था मध्ये रामाद्वारे निष्कासित झाल्यावर सुद्धा सर्व काही सहन करते. राजधर्माचे पालन करण्यासाठी ती स्वत: वनात जाणे योग्य समजते.[१२]वज्रवासी लोकांचा उद्धार करणारी श्रीराधा सहधर्मचारिणी आहे. ती वेळोवेळी वज्रवासियाना निरंतर कर्मशील राहण्यासाठी संदेश देते. मातृभूमि विषयी दोघींचेही अतूट प्रेम दिसून येते.

परोपकारिता, दयाळूपणा, मानवता, शालीनता इत्यादी गुणांमुळे या दोन स्त्रिया पाठकाच्या मन:पटलावर आपली छाप सोडतात. या दोन महाकाव्यात सीता देवी व श्रीराधा यांचे चरित्र प्रशंसनीय असल्याचे सांगितले आहे. विश्वातील समस्त आदर्श स्त्रीयांमध्ये श्रीराधा व सीतादेवी चे चरित्र त्यांच्या मधील सर्वोत्तम गुणांमूळे, शब्दात व्यक्त करणे कठीण आहे. दोन्ही स्त्रीयांचे चरित्र सर्वोत्तम व सदा सर्वकाळ अनुकरणीय आहे. त्यांचा असाधारण त्यागशीलपणा, शांन्ति, क्षमाक्षीलता, सौहार्द, व्यवहार-पटुता, साहस, शौर्य इत्यादी गुण इतर कोणात्याही स्त्रीमध्ये मिळणार नाहीत. त्यांच्या सारखी पवित्र जीवनशैली तसेच अनुपम भक्ति चे उदाहरण जगातील इतिहासामध्ये मिळणे कठीण आहे. प्रस्तुत महाकाव्यात आरंभापासून शेवटपर्यंत सांगितलेली त्यांच्यामधील असलेली सर्व विशेष गुणे सर्व भारतीय स्त्रीयांसाठी आदर्श आहे. सीता तसेच श्रीराधा यांचे नाव घेतले की आपल्या हृदयात पवित्र भाव उत्पन्न होतात. सावित्री, दमयन्ती या श्रेष्ठ स्त्रियांसोबत सीता तसेच श्रीराधा यांचे नाव घेतले जाते, कारण या दोन्ही स्त्रियांचे जीवन संघर्षमय राहिले आहे. सीता एक पतिव्रता स्त्री आहे. तर श्रीराधा कर्मयोगिनी

आहे. तसेच श्रीकृष्णाची प्रेमदायक शक्ति आहे. आचार्य दिङ्नाग रचित कुंदमाला मध्ये देवी सीता यांच्या पतिव्रतेचे चित्रण स्पष्ट दिसून येते.[१३]आधुनिक साहित्यकारांमध्ये श्रीराधाला आधार मानून अनेक काव्यांची रचना केली आहे. राधा तसेच सीता यांना हिंदू धर्मात अत्यंत उच्च स्थान दिले आहे. अत्यंत कमी काळात त्यांची विविध रुपे आपल्याला दृष्टिगोचर होतात. यांची समानता इतर कोणत्याही देवी / देवता सोबत करता येणार नाही, यांच्या विभिन्न लीला अनुकरणीय आहेत. यांचे चरित्र समस्त प्रथ्वीवासीयांसाठी मनमोहक व उदात्त आहे. तसेच ज्ञानप्रदायी सुद्धा आहे.

## निष्कर्ष

प्रस्तुत अर्वाचीन संस्कृत साहित्यातील काव्य, नाट्य, कथा तसेच समीक्षाग्रंथाविषयी पारखण्याची दृष्टी तसेच नवीन प्रतिभा, अर्थगाम्भीर्य व पदलालित्य या मुळे उत्कृष्ठतेच्या शिखरावर पहोचविणाऱ्या डॉ.हरिनारायण दीक्षित व डॉ.रेवाप्रसाद द्विवेदी यांचे महाकाव्य म्हणजे पाठकांसाठी परमोच्च आनंद देणारे ज्ञानवर्धन करणारे महाकाव्य होय. संस्कृत साहित्य इतिहासात मोठ्या गौरवाचा विषय आहे की, 20 वी शताब्दी मध्ये डॉ.हरिनारायण दीक्षित रचित राधाचरितम् व डॉ.रेवाप्रसाद द्विवेदी रचित सीताचरितम् महाकाव्यात दोन्ही महाकवींनी राधाचा प्रेम विरह आणि त्याग व सीतात्यागाचा प्रसंग महाकाव्यात नवीन रुपात प्रस्तुत केले आहे. आपल्या दिव्य कवित्व प्रतिभाद्वारे, नवीन परिकल्पनाद्वारे त्यांच्या चरित्र्याला दिव्यता प्रदान केली आहे. महाकाव्याची कथावस्तु कोणत्याही सज्जन पुरुष अथवा महापुरुषावर आधारित असते. त्यांच्या माध्यमातून मानवजीवनचे समग्र चित्रण यामध्ये केले जाते. राधाचरितम् व सीताचरितम् महाकाव्यांची कथावस्तु महापुरुषावर आधारित नसून महान स्त्रीयांवर आधारित आहे. राधा व सीता या केवळ महान स्त्रिया नाही तर त्या मानवतेच्या कल्याणासाठी समस्त सुखांचा व जीवनाचा त्याग करणाऱ्या स्त्रिया आहेत. डॉ.हरिनारायण दीक्षित यांच्या महाकाव्यातील राधा ही वज्रवासी लोकांना कलियुगात होणाऱ्या दुर्व्यसना विषयी सांगून कृष्णभक्ति चा मार्ग दाखविते, जो समस्त पापाचे निवारण करणारा मार्ग आहे. सीतारामचरितम् मधील सीता ही कोणती साधारण स्त्री नाहीतर माता पृथ्वी द्वारे प्राप्त झालेली रत्नरुपदेहधारी साकारणारी मूर्ति होय. योगविद्येमुळे समस्त प्राकृतिक कष्टांना सहन करण्याचे सामर्थ्य तिच्यामध्ये आहे. गृहस्थाश्रमात असताना सुद्धा नुकतीच वधुरुपात आलेली असताना सर्वांना यथोचित आदर सन्मान देवून ती स्वइच्छेने पतीसोबत वनात जावून पतिव्रता धर्माचे पालन करते. तसेच पतिद्वारे जेंव्हा जनहितासाठी तिचा त्याग केला जातो तेंव्हा वनवास देखील ती सहर्षाने स्वीकारते.

भारतीय संस्कृती मध्ये सीतेचा त्याग व राधा ने केलेला त्याग यांचे अतिशय अनुपम वर्णन आपल्या महाकाव्यात करण्याचा उल्लेखनीय प्रयत्न या दोन्ही महाकवींनी केला आहे. यानी भारतीय स्त्रीला भारतीय संस्कृतिच्या सर्वोच्च शिखरावर प्रतिष्ठित केले आहे. बदलत्या संस्कृतीच्या संक्रमणकाळात देखील राधाचरितम् व सीताचरितम् या महाकाव्याद्वारे संस्कृती समन्वय साधण्याच्या स्तुत्य प्रयत्न डॉ.हरिशंकर दीक्षित व डॉ.रेवाप्रसाद द्विवेदी यांनी केलेला दिसुन येतो.

## संदर्भ सूची


1) सीताचरितम्, डॉ.रेवाप्रसाद द्विवेदी, चौखम्बा सुरभारती वाराणसी, द्वितीय संस्करण 1978, मुखबन्ध, पृ.सं.-1 पंक्ति-1
2) सीताचरितम् / द्वितीय सर्ग, पद्य सं.-28.

3) राधाचरितम्, डॉ.हरिनारायण दीक्षित, ईस्टर्न बुक लिंकर्स, 5825, न्यूचन्द्रावल, जवाहरनगर दिल्ली-7, प्रियदर्शन सर्ग/पद्य सं.63
4) सीताचरितम् / षष्ठ सर्ग / 46.
5) राधाचरितम् / महाप्रस्थान सर्ग/55.
6) सीताचरितम् / चिन्तन सर्ग / 62.
7) सीताचरितम् / षष्ठ सर्ग / 42.
8) राधाचरितम् / उद्बोधन सर्ग / 30.
9) सीताचरितम् / तृतीय सर्ग / 31.
10) सीताचरितम् / तृतीय सर्ग / 8-267.
11) राधाचरितम् / राधाचरणरेणु सर्ग / 48.
12) सीताचरितम् / चतुर्थ सर्ग / 44.
13) कुंदमाला, आचार्य डिग्नाग, चौखंबा सुरभाती प्रकाशन, वाराणसी. प्रथम संस्करण / 1992 / प्रथम अंक / श्लोक सं.30/पृ.सं./42.

## प्रा. विमल लेले विरचित नाटक 'सञ्जीवनसमाधि:' - एक अवलोकन

**अनिरुद्ध अशोकराव मंडलिक**

विभाग प्रमुख, संस्कृत विभाग, संगमनेर महाविद्यालय, संगमनेरजि. अहमदनगर, महाराष्ट्र, ४२२६०५

aniruddhamandlik@gmail.com

**सारांश**

*संस्कृत साहित्य परंपरेचा विचार करता अती प्राचीन ग्रथांनी ही भाषा नटलेली आहे. या भाषेतील साहित्यवैभव हे समस्त भाषांना खूप मोठी देणगी आहे. आज ही या भाषेतील साहित्याची शिदोरी अभ्यासकांना नवनिर्मितीला प्रेरक आहे.*

*प्राचीन अथवा आधुनिक काव्यरचनेचा विचार करता असे लक्षात येते की, हे साहित्य पौराणिक कथा, ऐतिहासिक कथानके, ऐतिहासिक व्यक्तिमत्वे, प्राचीन प्रवास वर्णने, वास्तु वर्णने अशा अनेक विषयांचा मागोवा घेणारे आहे. डॉ. ग. बा. पळसुले, डॉ. श्री. भा. वर्णेकर, डॉ. दे. खं. खरवंडीकर, डॉ. श्रीकांत केळकर, प्रा. विमल लेले इत्यादि संस्कृत अभ्यासकांनी संस्कृत भाषेला आपल्या काव्यात्वाची झालर जोडली आहे. महाराष्ट्रातील संस्कृत साहित्याचे हे जणू शिलेदारच आहेत. शिवराज्योदयम्, वैनायकम्, महात्मगान्धीचरितम्, विवेकानन्दचरितम् इत्यादि काव्यरचना आधुनिक साहित्यातील महत्तम व सुप्रसिद्ध ग्रंथ आहेत. या सुप्रसिद्ध कवींमध्ये एक आगळं वेगळं व्यक्तिमत्व म्हणजे स्व. प्रा. विमल लेले. विसाव्या शतकातील एक प्रसिद्ध व्यक्तिमत्व, महाराष्ट्र राज्याचा महाकवि कालिदास संस्कृत साधना पुरस्कार प्राप्त कवयित्री म्हणजे प्रा. विमल लेले. संस्कृत साहित्याला सर्वसामान्यां पर्यंत पोहोचविण्याची सातत्याने धडपडणार व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. विमल लेले. संस्कृतभाषेच्या प्राध्यापिका या नात्याने त्यांनी केलेले लेखन वेगळ्या धाटणीचे, सुगम शैलीत व वेगळा आयाम असणारे असे आहे. यांचे ज्ञानेश्वर माऊलींच्या चरित्रावर आधारित 'सञ्जीवनसमाधि:' हे नाटक अभ्यासकांच्या मनावर वेगळा ठसा उमटवून जाते. या नाटकात मनुष्यरूपातील दिव्यत्व वा दिव्यत्वातील मानुष्यत्व हे शब्दांच्या माध्यमातून लेखिका सहजतेने रेखाटतात.*

### प्रस्तावना

संस्कृत भाषेत आधुनिकसाहित्य हे पूर्वीच्या मानाने अगदी तुरळक म्हणावे लागेल. वैदिक वाङ्मयापासून ते अभिजात संस्कृत भाषेत विपूल असे साहित्य निर्माण झाले आहे. परंतु मागील काही शतकांमध्ये संस्कृत भाषेतील साहित्य निर्मितीला मर्यादा आल्या आहेत. संस्कृत भाषेत रचना करण्यापेक्षा संस्कृत साहित्याचे अनुवादकार्य अधिक होताना दिसते आहे. तसेच संस्कृतमूळग्रंथावर टीका, त्यांचे विश्लेषण या गोष्टींना अधिक प्राधान्य देताना अभ्यासक दिसतात, अर्थात तेही रास्त आहे. कारण त्याशिवाय संस्कृत ग्रन्थ जगासमोर येणे शक्य नाही.

प्राचीन असो वा आधुनिक काव्यरचनेचा विचार करता आपण एक गोष्ट लक्षात घेऊ शकतो की, या काव्य रचना पौराणिक कथा, ऐतिहासिक कथानके, ऐतिहासिक व्यक्तिमत्वे, प्राचीन प्रवास वर्णने, वास्तु वर्णने, अशा अनेक विषयांना अनुसरून काव्य निर्मिती झालेली आहे. डा. ग. बा. पळसुले, डॉ. श्री. भा. वर्णेकर, भगवदाचार्य, डा. अभिराजराजेन्द्र मिश्र, डॉ. दे. खं. खरवंडीकर, डॉ. श्रीकांत केळकर, प्रा. विमल लेले आदि संस्कृत अभ्यासकांनी संस्कृत भाषेत काव्यरचना केली आहे. शिवराज्योदयम्, वैनायकम्, महात्मगान्धीचरितम्, विवेकानन्दचरितम् इत्यादि काव्यरचना आधुनिक साहित्यातील महत्तम व सुप्रसिद्ध ग्रंथ आहेत. प्रा. विमल लेले यांचे माऊलींच्या चरित्रावर आधारित 'सञ्जीवनसमाधि:' हे नाटक अभ्यासकांच्या मनावर वेगळा ठसा उमटवून जाते.

या नाटकात माऊलींच्या जीवन प्रसंगांचे सुंदर व भक्ती पूर्ण असे चित्रण प्रा. लेले यांनी रेखाटले आहे. याचे पुण्यातील विद्यानंद प्रकाशनाच्या माध्यमातून २००३ या वर्षी प्रकाशन झाले. या ग्रंथाच्या प्रारंभी प्रा. लेले यांनी ग्रंथाची वैशिष्ट्ये

सांगितली आहेत व पुणे येथील वैदिक संशोधन मंडलाच्या डॉ. भाग्यलता पाटसकर यांची मार्मिक अशी प्रस्तावना आहे. संजीवन समाधीचा प्रसंग वर्णिताना विविध संतांची मांदियाळी नाटकाला परिपूर्णता प्रदान करते. मनुष्यरूपातील दिव्यत्व वा दिव्यत्वातील मानुष्यत्व हे शब्दांच्या माध्यमातून लेखिका सहजतेने रेखाटतात.

प्रा. लेले माऊलींविषयी व नाटकाच्या शीर्षकाबद्दल म्हणतात, "ज्ञानदेवांच्या व्यक्तित्वाचे एक प्रमुख वैशिष्ट्य येथे जाणवते की त्यात मानुषत्व असूनही दिव्यत्व आहे आणि दिव्यत्व असूनही मानुषत्व आहे. ज्ञानदेवांसारख्या महापुरुषांना, आपल्याला परमेश्वराने कोणत्या कार्यासाठी पृथ्वीतालावर पाठविले आहे याचा, त्याचप्रमाणे या जगाचा आपण कधी निरोप घ्यावयाचा याचाही अन्त:प्रेरणेनेच साक्षात्कार झालेला असतो. हीच मध्यवर्ती कल्पना घेऊन त्याभोवतीच यातील सर्व नाट्यदृश्यांची गुंफण केली आहे. आणि म्हणूनच नाटकाला 'सञ्जीवनसमाधि:' असे नाव दिले आहे."[१]

प्रा. लेले यांनी अर्पण पत्रिकेत माऊलींना अर्पण केलेली शब्दसुमने वाचकाला प्रारंभीच भक्तिरसात भिजवून टाकतात. या शब्दसुमनांचा मकरंद या काव्यातून सहजतेने पाझरतो. कवयित्रीची माऊलींवरील भक्ती प्रत्येक अक्षरातून अनुभवयास मिळते. या अर्पण पत्रिकेतील काव्यात ज्ञानसागर, ज्ञानभास्कर, ज्ञानेश या विशेषणांनी माऊलींच्या अगाध ज्ञानाचा महिमा वर्णिला. कवयित्री या अक्षरांच्या माध्यमातून साक्षात् ज्ञानेश्वरमाऊलींशी संवाद साधत आहेत व आपला भक्तिभाव प्रकट करीत आहेत.

"ज्ञानसागरत्वं साक्षात् । साक्षात् त्वं ज्ञानभास्कर: ।
करणीया कथं पूजा ? किं वा तुभ्यं समर्प्यते ? ।।१।।
दीयतेऽर्घ्यं समुद्राय । नीराञ्जलिं समर्प्य वा ।
नीराजनाऽपि सूर्यस्य । प्रज्वाल्य वर्तिकां यथा ।।२।।
एवं मयाऽर्प्यते नाट्यमिदं ज्ञानेश ! त्वत्पदे ।
तत्रौचित्यं न द्रष्टव्यं द्रष्टव्या भक्तिभावना ।।३।।"[२]

कवयित्रीला इथे केवळ भक्तिभावच महत्त्वाचा वाटतो. भक्ती पुढे काळ-वेळ, मुहूर्त महत्त्वाचे नसतात, तर मनात भक्तीचा झरा पाझरणे महत्त्वाचे, तोच मुहूर्त आणि तीच वेळ. बाकी सर्व शून्य असते, असे कवयित्रीला वाटते.

संत एकनथांनी भक्तीचे महात्म्य वर्णन केले आहे, ते म्हणतात,

"भक्तीपाशीं नित्य तृप्ती । भक्तीपाशीं नित्य मुक्ती ।
भाक्तीपाशीं भगवत्प्राप्ती । मायानिवृत्ती हरिभजने ।"[३]

संत एकनाथांनी गायीलेला भक्तिभाव हा प्रा. लेले यांच्या शब्दांतूनही सहजतेने प्रवाहित होतो. माऊलींच्या चरणी ग्रथ अर्पण करतांना त्यांनी भक्तीला प्राधान्य दिले आहे.

नाटकाच्या पाचही दृश्यांचे चिन्तन करताना डॉ. पाटसकर यांनी या ग्रथास दिलेली प्रस्तावना अधिक उपयुक्त आहे. त्यांनी या नाटका विषयी काढलेले गौरवोद्गार नाटकाचे महात्म्य प्रकट करतात. त्यांच्या प्रस्तावनेतील प्रत्येक शब्द हा या ग्रंथाचे रचनोच्चगामित्व दर्शविणारे आहेत.

त्यांच्या शब्दात, "नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्" असे कुलगुरु कालिदासयांनी म्हटले आहे. कालिदासची ही उक्ती ह्या नाटिकेनं सार्थ केली आहे. .....हे संगीत नाटक आहे. नाटकाची सुरुवातच मुळी ज्ञानदेवांच्या तोंडी घातलेल्या एका तृप्त गीतिकीने होते. या गीतिकेची परिणती पुढे ज्ञानदेवांच्या समाधीमध्ये होते. .....अन्त्यज, न्हावी, सोनार, शिंपी, कुंभार, ब्राह्मण असे समाजातले सगळे स्तर भक्तीच्या ध्वजाखाली एकत्र आणले ......"[४] हे सर्व शब्द काव्याची अधिकच उंची वाढविणारे आहेत.

पाच दृश्य आणि विविध प्रसंग. जीवन समाधीकडे नेणारे भावविश्व, विसोबा खेचर, चोखा मेळा, नरहरी सोनार, आदि सर्व संतांची माऊलींच्या सञ्जीवनसमाधीकरिता जड

अन्त:करणाने चाललेली तयारी, समाधी प्रसंगी गजबजलेली अलंकापुरी आणि यावेळी सर्वांची झालेली करुण अवस्था, गहिवरून आलेली प्रत्येकाची अन्त:करणे, आर्त संवाद, या सर्वांची नाट्यरूपाला साजेशी मांडणी व नाटकाच्या संवादांतून प्रत्यक्ष प्रसंगाचा अनुभव, ही या कलाकृतीची विशेष बाजू.

प्रा. लेले या नाटकाचा क्रम देताना त्या प्रसंगांचे दृश्यानुरूप विभाजन करतात. त्यामुळे प्रत्येक प्रसंग वाचकाला समजण्यास सोईचा झाला आहे. प्रथम दृश्य – संजीवन सधी तयारी. द्वितीय दृश्य – अन्य संतांचे संभाषण व समाधी पूर्व नियोज, अलंकापुरीचे दु:ख. तृतीय दृश्य – मातेच्या आठवाणीणे ज्ञानदेवांची हृदय व्याकुलता . चतुर्थ दृश्य – निवृत्ती, सोपान, मुक्ता आदींचा शोक, पंचम दृश्य – प्रत्यक्ष समाधिप्रसंग

प्रथमदृश्य हे पंढरपुरातील आहे व द्वितीय ते पंचम प्रसंग हे अलंकापुरीतीत घडलेले आहेत. त्याचे सुरेख वर्णन प्रा. लेले यांनी केले आहे. निवृत्तिनाथ, सोपान, मुक्ताई, नामदेव, नरहरी सोनार, सावता माळी, गोरा कुंभार, विसोबा खेचर, सेना न्हावी, चोखामेळा, उमादेवी या पात्रांच्या रूपात संतांची मांदीयाळी ज्ञानदेवांच्या भक्तीत एकरूप झाली आहे.

पंढरपुरातील पांडुरंगाच्या मंदिराच्या सभामंडपात विठ्ठलाच्या भक्तीत विठ्ठलाला आळवणी करणारे ज्ञानदेव आर्त स्वरात गात आहेत. या आर्तशब्दांना प्रा. लेले यांनी संगीतातील तोडी रागात गुम्फूण करूण रस रेखाटला आहे.

"नास्ति जीवने मे किमपि किमपि शेषम् । देहतापपूर्वं,
प्राप्तविदेहत्वम् ।।

वयम् एव देवा: । वयम् एव भक्ता: । वयम् एव मुक्ता: ।
सर्वमेकरूपम् ।।१।।

वयम् एव ज्ञानम् । वयम् एव ध्यानम् । वयम् एव चिह्नम् ।
सोऽहं स्वरूपम् ।।२।।" [५]

हा अभंग असो की प्रत्येक दृश्यांतील अभंग अथवा विवध संवाद असो, हे भवभूतीच्या 'एको रस: करुण एव' या शब्दांची प्रचिती देतात.

प्रा. लेले यांच्या संस्कृत अभंगातच नव्हे तर गद्य संवादातूनही दु:ख - आर्ततेची, विरहव्याकुळतेची, मनोवेदनांची प्रचिती येत असली तरी, त्यातून एक कर्तव्य परायणता, विश्वकल्याणाची तळमळ याचे ही भाव प्रकट होताना दिसतात. प्रथम दृश्यातील नामदेवांचा व ज्ञानदेवांचा संवाद याचे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल.

ज्ञानदेव व नामदेव यांच्यातील संवादा :-

"ज्ञानदेव: - ...। अधुना एकमेव अवशिष्टम् ।

नामदेव: - किम् अवशिष्टम् ?

ज्ञानदेव: - जीवितसमाप्ति: ।

नामदेव: - (सविस्मयं सास्रं च ।) ज्ञानदेव ! मा ! मा ! न ते वय: अद्यापि जगत् आमन्त्रयितुम् । न ते वय: योग्यं मरणशब्दस्य उच्चारणाय अपि ।

ज्ञानदेव: - नामदेव ! नाहं भाषे मरणमिति ।

नामदेव: - तत् किं वक्तुकामोऽसि ।

ज्ञानदेव:-सञ्जीवनसमाधि:। सञ्जीवनसमाधिना जीवितसमाप्ति: ।परमेश्वरे परमतत्त्वे ब्रह्मज्योतिषि चिरविलय: ।

नामदेव: - इदमपि न उचितम् । ज्ञानेश ! कथं त्वं समाप्तकार्यम् आत्मानं मन्यसे ? विश्वधारणया: कृते त्वदृशानां महापुरुषाणाम् अद्यापि अस्ति आवश्यकता ।

ज्ञानदेव: - ......... विश्वधारणाया: कृते यं सन्देश: कथयितुं परमेश्वरेण अहम् आदिष्ट: आसम् – स: श्रावित: मया ।" [६]

हा संवाद पाहता लेखिकेच्या लेखन शैलीची सहज ओळख होते. सहजता, ओघवती वाणी, माधुर्यता तसेच कर्तव्यता व

कर्तव्य पूर्ततेची जाणीव होते. सहज अशी शब्द रचना, कुठेही भाषेचा बोजडपणा दिसत नाही.

ज्ञानदेवांच्या निर्णयाने सद्गदित झालेल्या नामदेवाच्या शब्दात कारुण्य व कर्तव्याबद्दल जाणीव करून देण्याची सहजता. हे लेखिकेचे प्रमुख वैशिष्ठ्य.

पुढेही आलेल्या संवादात "दग्ध: मे देहभाव: सर्व: । अवशिष्टं केवलम् आत्मतत्त्वम्। ..........सबाह्यान्तरं विठ्ठल: एव एक: अनुभूयते मया ।"[७] या शब्दांतून ज्ञानदेवांची स्थितप्रज्ञता, तर "..........परं, त्वया विना कथं जीवितव्यं मया वा सकलभक्तजनै: वा इति दु:खेन व्याकुलीभवति मे मन: ।"[८] या शब्दांतून नामदेवांची विचलितता लेखिका भावपूर्ण शब्दांमध्ये वर्णितात.

द्वितीयदृश्यात शुद्धसारङ्ग या रागातील संस्कृत अभंग अधिकच शोकार्णवात खोलवर नेणारे भाव लेखिका प्रकट करतात. सर्व अलंकापुरी, करुणरसात निमग्न झाली आहे. सर्वांचीच मने दु:खाने हेलावून गेली आहेत. इन्द्रायणी ही स्तब्ध झाली आहे. "निश्चलम् इन्द्रायण्या जलम्। धूसरं मध्याह्ने गगनम् ।"[९]

पंचमदृश्यात लेखिकेने भैरवी रागाची योग्य पद्धतीने योजना केली आहे. व ती सार्थ ही ठरते. निवृत्तिनाथांच्या विरह वेदनांचा बांध फुटतो आणि दु:खार्ततेने प्रकट झालेले शब्द करुण रसाची परमसीमाच गाठतात. इथे मात्र पुन्हा म्हणावेसे वाटते की खरोखरच करुण हा एकमेव रस आहे.

निवृत्तिनाथ म्हणतात,

"कथं निवार्यं नयनस्थबाष्पम् ? कथं नु धार्यं हृदयं विशीर्णं
यदा गतौ तौ पितरौ द्युलोकम् । दु:खं मयैवं न तु चानुभूतम्
दु:खस्य संवेदनमद्य एकम् ।।३।।

नाम्ना निवृत्तिस्तु पुनर्विरक्त: । तथापि शोकं सहितुं न शक्त: ।
क्षमस्व ! ज्ञानेश ! गुरुं तमेवम् ।। क्षमस्व ! ज्ञानेश ! गुरुं तमेवम् ।। ४।।"[१०]

सर्वांचे सांत्वन करणारे माऊली, दृढनिश्चयी माऊली, स्थितप्रज्ञ माऊली, कर्तव्यनिष्ठ माऊली, ज्ञानपरायण माऊली, भक्तपरायण माऊली अशी किती तरी भाव, पैलू माऊलींच्या व्यक्तिमत्वात पाहावयास मिळतात. मातेसमान सर्वांना सामावून घेणारे माऊली. सर्वांच्या जितके जवळ, तितकेच दूर असणारे माऊली. समाधीचा विचार यत्किंचितही विचलीत न होता दृढ निश्चयाने, सहजतेने मार्गस्थ होणारे माऊली, लेखिकेने आपल्या अमरवाणीतून रेखाटण्याचे शिवधनुष्य सहजतेने पेलविले आहे.

नामदेवांची असो वा निवृत्तिनाथांची असो की आजी उमादेवी असो किंवा सर्वच संत समुदाय असो. यांना ज्ञानादेवरूपी ब्रह्माशी संधान बांधणार्या भाव विश्वात नेण्याचे कौशल्य, ज्ञानदेवांसाठी व्याकुळ झालेल्या प्रत्येकाचे करुण भाव प्रकट करण्याचे कौशल्य प्रा. लेले यांनी ज्ञानदेवांच्या भक्तीत एकरूप होऊन एकात्मबुद्धीने प्रकट केले आहे.

प्राकृतातून संस्कृतात पसायदान अनुवादीत करताना मूळ पसायदानाचे रसभाव कुठेही निरस झालेले नाहीत. यातील काही पंक्ती इथे उद्धृत केल्याशिवाय राहवत नाही.

"चन्द्रमसो ये कलङ्कहीना: । मार्तण्डा वा तापहीना: ।।
भवन्तु ननु ते सदा सज्जना: । जनप्रियास्तु ।।४।।"[११]

अजूनही वर्णन करण्यासारखे अनेक पैलू आहेत. शब्दमर्यादेचा विचार करता या आधुनिक ग्रंथ रचनेबद्दलचा परिचय होण्याच्या दृष्टीने थोडक्यात विश्लेषण केले आहे.

लेखिकेचे संगीतातील परीपूर्ण ज्ञान, नाट्यशास्त्राविषयीचे सखोल ज्ञान, संस्कृत भाषेचे परिपूर्ण ज्ञान, आध्यात्मिक चिंतन, आध्यात्मिक स्वभाव या सर्वच गोष्टी या कलाकृतीला सर्वोत्तम करण्यास आधारभूत ठरल्या आहेत, यात कोणतीच

शंका नाही. म्हणून असे वाटते, की वीसाव्या-एकवीसाव्या शतकातील या कलाकृतीकडे सर्वोत्तम कलाकृती म्हणून पहावयास हरकत नाही.

**"तृण अग्निमेळें समरस झालें । तैसें नामें केले जपतां हरी ।।"**[१२]

## संदर्भ सूची


१) सञ्जीवनसमाधि:, पृ.क्र.९

२) सञ्जीवनसमाधि:, पृ.क्र.३

३) एकनाथी भागवत, ३.६२०

४) सञ्जीवनसमाधि:, प्रस्तावना, पृ. क्र.१३

५) सञ्जीवनसमाधि:, पृ.क्र.१९

६) सञ्जीवनसमाधि:, पृ.क्र.२१,२२

७) सञ्जीवनसमाधि:, पृ.क्र.२३

८) सञ्जीवनसमाधि:, पृ.क्र.२३

९) सञ्जीवनसमाधि:, पृ.क्र.२९

१०) सञ्जीवनसमाधि:, पृ.क्र.३७

११) सञ्जीवनसमाधि:, पृ.क्र.२६

१२) संत सुभाषित कोश, प्रथम आवृत्ती, पृ. क्र. १६

# श्री. भा. वर्णेकरांचे योगक्षेत्राला योगदान

**कलापिनी अगस्ती**

भारतीय दर्शन विभाग, क.का.सं.वि,रामटेक.

**सारांश**

*केवळ विदर्भभूमीलाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला ललामभूत ठरलेले, आपल्या प्रतिभाशक्तीने महाकाव्य, खंडकाव्य, गीतकाव्य, नाटक, कथा इ. सर्व साहित्यप्रकार निर्मितीत अप्रतिहत गती प्राप्त करणारे आणि प्रज्ञाभारती या उपाधीने सन्मानीत झालेले विदर्भपुत्र प्रज्ञाभारती श्रीधर भास्कर वर्णेकर. श्री.भा. वर्णेकर केवळ संस्कृत विद्वानच नव्हते तर संस्कृतचा जनसामान्यांपर्यंत प्रसार व प्रचार व्हावा यासाठी अत्यंत तळमळीने व पोटतिडकीने कार्य करणारे ते निस्वार्थी कार्यकर्ते होते. साहित्तिक, कविहृदय, सामाजिक कार्यकर्ता असे बहु आयामी असलेले व्यक्तित्व मात्र स्वतःत एक योगसाधकत्व जपून होते, हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचं वैशिष्ट. जनार्दन स्वामींच्या योगछत्राखाली राहिलेल्या व योगप्रकाश या मासिकाचे आद्य संस्थापक संपादक म्हणून कार्य करणाया या योगसाधकाचे योगचिंतन कसे असावे असा प्रश्न मनात उत्पन्न झाला व त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्त्याने त्यांच्या योगचिंतनाचा आढावा घ्यावा व त्याद्वारे त्यांच्या प्रती श्रद्धासुमन अर्पित करावे या उद्देशाने प्रस्तुत विषयाचे चयन करण्यात आले आहे.*

प्रस्तुत शोधपत्रात संकलनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. श्री. भा. वर्णेकरकृत योगसूक्तावली या ग्रंथाच्या आधारे हे संपूर्ण विवेचन करण्यात आले आहे.

योगसूक्तावली - श्री. भा. वर्णेकर यांनी पातंजल योगसूत्रांवर योगसूक्तावली नामक ग्रंथ लिहला. सूत्रग्रंथांचे भाष्य, टीका इ. शिवाय कोणी अध्ययन केल्यास त्या अभ्यासकाला सूत्रांमध्ये आलेले तत्र, तस्य, तत् ततः या सर्वनामांचा संबंध पूर्वसूत्रांसोबत जोडणे कठीण होते. त्यामुळे केवळ सूत्र वाचून पूर्ण अर्थबोध होणे क्लिष्ट जाते. उदा.- योगसूत्र-" तदभावत्संयोगाभावो हानं तद्दशेः कैवल्यम्।"1 येथे तत्-अभाव याचा अर्थ केवळ सुत्रावरून ग्रहण करणे कठीण जाते, भाष्याच्या आधारे अर्थ करावा लागतो म्हणून प्रज्ञाभारतींनी "अविद्याक्षयस्वरूपं कैवल्यम् एव योगशास्त्रास्य परं साध्यम्।"2 अर्थात् वाक्य पूर्णार्थक करून अविद्याक्षय म्हणजे कैवल्य होय असा अर्थ सूक्तीत केला आहे. म्हणजे केवळ सूक्तींच्या आधारे सूत्रांचा पूर्ण अर्थबोध व्हावा हा यामागील उद्देश आहे.

योगसूत्रांवर संपूर्णार्थक अशा सूक्ति लिहून योगाभ्यासकांसाठी योगमार्ग सुकर व्हावा असा विचार त्यांच्या मनात १९८१ ला जेव्हा त्यांचे वास्तव्य अमेरिकेत बोस्टनजवळ वूस्टर नगरात होते त्यावेळी आला. चार महिन्यांच्या या निवासकालात योगसूत्रांवर सखोल चिंतन करून त्यांनी "योगसूक्तावली" लिहण्यास प्रारंभ केला व तेव्हाच हा ग्रंथ पूर्णही केला मात्र चार महिन्यानंतर भारतात परतल्यावर त्यांच्याकडे संस्कृत वाङ्मय कोशाच्या तीन खंडाचे कार्य असल्याने योगसूक्तावलीच्या परिशीलनास ते वेळ देऊ शकले नाही. त्यानंतर १३ वर्षांनी म्हणजे १९९४ मध्ये जनार्दन स्वामींच्या जन्मशताब्दी निमित्याने त्यांना योगसूक्तावली रूपाने श्रद्धांजली अर्पण करावी म्हणून त्यांनी या ग्रंथाचे पुनः परिशीलन करून व योगसूत्रावरील अनन्तपण्डित यांच्या वृत्तिचे अनुसरन करून योगसूक्तावली ग्रंथ पूर्णरूपाने प्रकाशित केला.

अल्पाक्षरांमुळे दुर्बोध वाटणाया सूत्रांना यथामती सुबोध वाक्यांच्या रूपात प्रस्तुत करणे हा या ग्रंथामागचा त्यांचा उद्देश आहे असे ते प्रांजळपणे आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत नमूद करतात.

सूत्रांचे अध्ययन करण्यासाठी पूर्वसंदर्भाचे ज्ञान असण्याची आवश्यकता असते तर सूक्ती ही सर्वार्थाने परिपूर्ण असते हा सूत्र आणि सूक्ती यातील भेद आहे. अर्थात् अल्पाक्षर वाक्य जे संदर्भनिरपेक्ष आणि स्वतः पूर्ण अर्थ देण्यास समर्थ असते असे सूत्रापेक्षा तत्त्वतः भिन्न स्वरूप म्हणजे सूक्ती होय असा अर्थ करणे योग्य ठरेल अशा योगसूत्रांवरील सूक्तीचा संग्रह म्हणजे श्री.भा. वर्णेकर कृत योगसूक्तावली होय. योगसूत्रांवर भाष्य, वृत्ती, टीका असे लिखाण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. मात्र सूक्ती रूपात असलेला हा ग्रंथ म्हणजे श्री.भा. वर्णेकरांनी योगशास्त्राला दिलेले योगदान होय.

पातंजल योगसूत्रांची एकूण संख्या ही १९५ एवढी आहे त्यावर वर्णेकर यांनी २०५ सूक्ती लिहल्या आहेत.

| | समाधीपाद | साधनपाद | विभूतिपाद | कैवलपाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| योगसूत्र | ५१ | ५५ | ५५ | ३४ | १९५ |
| योगसूक्तावली | ५४ | ४१ | (२७/३५) | ४८ | २०५ |

या सूक्तावलीच्या आधारे खालील मुद्दयांनुसार श्री. भा. वर्णेकर यांचे योगचिंतनाचा आढावा घेण्यात येईल.

1. योगलक्षण 2. समाधी स्वरूप प्रकार 3. लक्षणाचा भावत्मक दृष्टिकोण 4. ईश्वरलक्षण 5. वृत्ती स्वरूप6. गुणपर्वाणि 7. यम–नियम-विचार

1. योगलक्षण -योगश्चित्तवृतिनिरोधः3 योग अर्थात् चित्ताच्या वृत्तिंचा निरोध म्हणजे योग असे पतंजलींनी सूत्र केले आहे. यात प्रज्ञाभातींनी ”चित्तवृत्तिनिरोधः एव योग“4 अर्थात् चित्तवृत्तीनिरोध म्हणजेच योग होय असे वर्णिले आहे. एव पदामुळे निश्चयार्थ जास्त प्रभावाने मांडला तसेच आपल्या ग्रंथाच्या प्रथम सूक्तीत ”स्वरूपावस्थ्थानार्थं योगानुशासनम् एव अनुसर्तव्यम्।“5 अर्थात् स्वरूप ज्ञानासाठी योगशास्त्राचेच अनुसरण करावे असा स्पष्ट निर्देश केला आहे. ”तदा द्रष्टुः स्वरूपेऽवस्थानम्।“असे चित्तवृत्तिनिरोधाचे स्वरूप न मांडता”विषयभानरहितत्वं स्वरूपभानवत्वं च चित्तवृत्तिनिरोधस्य स्वरूपम्।“असे लक्षण केले आहे.

2.समाधीचे स्वरूप-योगसूत्रांमध्ये समाधीचे लक्षण ”क्षीणवृत्तेरभिजातस्येव मणेग्रहीतृग्रहणग्राह्येषु तत्स्थतद×जनतासमापत्तिः।“6 अर्थात् वृत्तिरहित चित्तात, स्फटीक मण्याप्रमाणे ग्रहण, ग्राह्य, ग्रहीता यांच्या प्रति होणारी तदञ्जनता, तन्मयता म्हणजे समाधी होय. सम्प्रज्ञात समाधी ही वितर्क, विचार, सानन्द आणि सास्मित अशी चार प्रकारची असून असम्प्रज्ञात समाधीचे प्रकार योगदर्शनात वर्णिलेले आढळत नाही मात्र प्रज्ञाभारतींनी सम्प्रज्ञात आणि असम्प्रज्ञात दोनही समाधी चतुर्विध असल्याचे वर्णिले आहे.

”चित्तस्य वितर्क-विचार-आनन्द-अस्मितानां सम्यक् अनुगमात् चतुर्विधः सम्प्रज्ञात समाधिः सम्यद्यते।“7 ”वितर्क-विचार आनन्द-अस्मितानां सम्यक् विरामाभ्यासात् चतुर्विधः असम्प्रज्ञात समाधिः सम्पद्यते।“8 अर्थात् वितर्क, विचार, आनंद आणि अस्मिता याचे सम्यक् अनुगमन करणे संप्रज्ञात तर यांची सम्यक् विराम म्हणजे असंप्रज्ञात असे लक्षण करून एक नव संकल्पना प्रज्ञाभारतींनी मांडली.

”सम्प्रज्ञातस्य असम्प्रज्ञातस्य च समाधेः सिद्धये वितर्कादीनां संस्कार-शेषः नेति नेति भावनया निराकर्तव्यः।“9 संप्रज्ञात आणि असम्प्रज्ञात समाधिच्या सिद्ध्यर्थ वितर्क, विचार इ. संस्कारांचे अवशेष नेति नेति भावनेन दूर करावे. नेति नेति भावना वेदांन्तस्वीकृत असल्याने प्रज्ञाभारतींनी योग-वेदान्त यांच्या परस्पर समन्वयाच्या दृष्टीने हे प्रतिपादित केले असावे व तो समन्वय त्यांना स्वीकृत आहे असे स्पष्ट होते.

ग्रंथारंभी स्वरूप प्राप्त्यर्थं योगानुशासनाचे अनुसरण करावे असे स्पष्ट करून योगानुशासनाचे अंतिम उद्दिष्ट काय हे लिहतांना -

"निर्बीजसमाधिलाभः एव योगानुशासनस्य पारमार्थिकम् उद्दिष्टम् अस्ति।"10 व निर्बीजसमाधीलाभ हेच योगाचे उद्दिष्ट असल्याचे वर्णिले आहे.

3.लक्षणांचा भावात्मक दृष्टिकोन -योगसूत्रातील अनेक सूत्रांचे स्वरूप निरोधात्मक आहे, मात्र प्रज्ञाभारतींनी या सूत्रांच्या निरोधात्मक स्वरूपाला भावात्मक अर्थाची जोड प्रदान केली आहे.

अ)उदा. "अभ्यासवैराग्याभ्यां तन्निरोधः।"11

सूक्ती-"योगसाधनाभ्यासेन वैराग्येन च चित्तवृत्तीनाम ऐकाग्र्य निरोधश्च सिध्यति।"12

म्हणजे केवळ चित्तवृत्ति निरोध होतो असे न म्हणता एकाग्रताप्राप्ती हा भावत्मक अर्थ त्यांनी केला.

सूक्ती" विषयभानरहितत्वं स्वरूपभानवत्वं च चित्तवृत्तिनिरोधस्य स्वरूपम्।"13

ब) योगसूत्र - "तत्परं पुरुषख्यातेर्गुणवैतृष्ण्यम्।"14

सूक्ती-"लौकिकेषु अलौकिकेषु च विषयेषु वितृष्णता स्वानन्दमग्नता च परं वैराग्यम्।"11

यातही विषय व गुणांची वितृष्णा म्हणजे वैराग्य नसून स्वानन्दमग्नताही त्याचा भाव आहे असे वर्णिले आहे. असे अनेक उदाहरण उधृत करता येतील मात्र शब्दमर्यादेमुळे देणे शक्य नाही.

4. ईश्वरलक्षण -योगसूत्रामध्ये समाधीपादातील ईश्वरप्रकरणात ईश्वर तत्त्वांचे विश्लेषण करतांना सहा सूत्रांचा अन्तर्भाव करण्यात आला आहे.

"क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेषः ईश्वरः।"16

"तत्र निरतिशयं सर्वज्ञबीजम्।"17

"स पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात्।"18

"तस्य वाचकः प्रणवः।"19 इत्यादी

या सर्व सूत्रांचे एकत्रीकरण करून सर्वसमावेशक अशी सूक्ती प्रज्ञाभारतींनी केली आहे.

"पंचक्लेशैः द्विविधैः त्रिविधैः विपाकैः विविधवासनाभिश्च अलिप्तः चैतन्यमयः सर्वज्ञः ओंकारनामा आदिगुरुश्च ईश्वरः।20

व ईश्वर प्रसादानेच निर्बिज समाधीप्राप्त होऊ शकते केवळ योगाभ्यासाने नाही असा स्पष्ट निर्देश केला आहे.

"ईश्वरप्रसादतः एव समाधिसिद्धिः सम्भवति न केवलेन योगाभ्यासेन।"21

5. वृत्तीस्वरूप -सामान्यतः योगाभ्यासकांना चित्तवृत्ती विषयी माहिती असते मात्र प्रज्ञाभारतींनी प्रमाण, विपर्यय, विकल्प, निद्रा आणि स्मृती हे चित्तवृत्तींचे प्रकार परंपरेने वर्णिले आहेच पण आणखी पुढे जाऊन त्यांनी वृत्तींचे तीन भाग केले अ) चित्तवृत्ती ब) क्लेशवृत्ती क) गुणवृत्ती

"चित्तवृत्तयः क्लशोवृत्तयःगुणवत्तयः चेति त्रिविधा वृत्तयः।"22मात्र क्लेशवृत्ती आणि गुणवृत्ती यांचे विश्लेषण या ग्रंथात आढळले नाही.

6. गुणपर्वाणि-यास योगसूत्रांमध्ये गुणपर्वाणि ही संज्ञा प्रयुक्त करण्यात आली आहे.

"विशेषाविशेषलिङ्गमात्रलिङ्गानि गुणपर्वाणि।"23 याचे वर्णन प्रज्ञाभारती "त्रिगुणानाम् षडवस्था" असे केले आहे.

"महाभूतानि इन्द्रियाणि तन्मात्राणि अन्तकरणं बुद्धिः अव्यक्तं च इति षड्विधाः त्रिगुणानां षड्वस्थाः भवन्ति।24

7.यम-नियमांचे स्वरूप -

यम-नियमांना सामान्यतः बहिरंग योगात अन्तर्भूत करतात मात्र प्रज्ञाभारतींच्या मते "आसन-प्राणायाम प्रत्याहारैः बहिरंगो योग सम्पद्यते।"25

कारण यम नियमांचे स्थान व आचरण हे अंतिमसिद्धिपर्यंत महत्त्वाचे असल्याने त्यास गौणत्व देणे अयोग्य आहे असा त्यांचा दृष्टिकोण असावा.

अ) परिग्रह -परिग्रहाचेही त्यांनी दोन प्रकार वर्णिले आहे. 1. शरीर परिग्रह2. साधनपरिग्रह

"साधनपरिग्रहः शरीरपरिग्रहश्च इति द्विविधः परिग्रहः मन्यते।"26

ब) ब्रह्मचर्य -तसेच ब्रह्मचर्यही नैष्ठिक आणि उपकुर्वाण असे दोन प्रकारचे वर्णिले आहे.

"नैष्ठिकम् उपकुर्वाणं चेति द्विविधं ब्रह्मचर्यं मन्यते।"27

असंभोगरूपी नैष्ठिक आणि नियमसम्भोगरूप उपकुर्वाण असे दोन प्रकाराने ब्रह्मचर्याचे वर्णन प्रज्ञाभारतींनी केले आहे. योगविषयक ग्रंथांमध्ये ब्रह्मचर्याचे प्रकार आढळत नाही मात्रा स्मृतीग्रंथांमध्ये ब्रह्मचर्याच्या नैष्ठिक आणि उपकुर्वाण या प्रकारांचे विस्तृत विवेचन आढळते त्यावरून स्मृतीग्रंथांच्या आधारे हे प्रकार प्रज्ञाभारतींनी वर्णिले असावेत.

क)शौच- नियमांमधील शौच हा आभ्यन्तर आणि बाह्य या दोन प्रकारचा मान्य आहे. प्रज्ञाभारतींनी हठयोगात वर्णित षट्क्रियांद्वारे होणरी शरीराची शुद्धता म्हणजे बाह्य शौच तर मैत्रिकरुणादि उपायांनी होणारी चित्तप्रसादनता म्हणजे आभ्यंतर शौच असा अर्थ केला आहे.

"हठयोगाङ्गभूताः षट्क्रियाः शरीरशौचकाराः। मैत्रीकरुणाद्या भावनाः च अन्तःशौचकराः भवन्ति।28तसेच शौच याचे फल वर्णन करतांना योगसूत्रात -

"सत्त्वशुद्धिसौमनस्यैकाग्रतेन्द्रियजयात्मदर्शनयोग्यात्वानि च।"29

या संदर्भात प्रज्ञाभारतींनी योग्यतेचे लक्षण लिहून त्यावरून सत्पुरुषाच्या लक्षणांचे वर्णन केले आहे.

"शौचात् सत्त्वशुद्धि, सौमनस्यम्, एकाग्रता, इन्द्रियजयः आत्मदर्शनयोग्यता च जायते। इदमेव सत्पुरुषलक्षणम्।"30

अर्थात् अन्तबाह्य शौच्यामुळे चित्ताची शुद्धी, मनाची प्रसन्नता, एकाग्रता, इन्द्रियजय आणि आत्मसाक्षात्काराची योग्यता उत्पन्न होते, हेच सत्पुरुषाचे लक्षण आहे.

**उपसंहार-**

योगसूक्तावलीच्या आधारे प्रज्ञाभारतींच्या योग चिंतनाचे पुढीलप्रमाणे विश्लेषण करता येईल.

- "अभ्यास" या संकल्पनेचा उल्लेख समाधीपादात "अभ्यासवैराग्याभ्यांतन्निरोधः।"या सूत्रात आला आहे. मात्र अभ्यासाच्या विविध प्रकारांचे वर्णन संपूर्ण ग्रंथात अनेक ठिकाणी विखुरलेल्या रूपात आढळते. प्रज्ञाभारतींनी या सर्व सूत्रांना एकत्रित आणण्याचा प्रयत्न केला आहे. उदा.-"ईश्वरप्रणिधानं-प्रणवजपः तपः एकतत्त्वाभ्यासः मैत्री-करुणादि भावना प्राणायामः दिव्यविषयानुसन्धानं महापुरुषसेवा स्वप्ननिद्रादिनिरीक्षणं यथाभिमत ध्यानं रसभावादि तन्मयता च इति, एकादशविधः चित्तैकाग्रतार्थम् अभ्यासः।31हे त्यांच्या सूक्तीचे वैशिष्ट्य आहे.
- विभूती पादात वर्णित सर्व सूत्रांचे विभाजन त्यांनी दोन भागात करून पूर्वार्धात सिद्धीप्राप्ती साठी आवश्यक उपायांचे वर्णन केले तर उत्तरार्धात सर्व सिद्धिंचे वर्णन केले आहे त्यामुळे अभ्यासकाला विभूतींचे विषयक्रमाने ज्ञान होणे सुकर होते.
- संप्रज्ञात व असम्प्रज्ञात या दोनही समाधी चतुर्विध असल्याचे वर्णिले आहे.
- चित्तवृत्ती, क्लेशवृत्ती, गुणवृत्ती अशा वृत्ती त्रिविध असल्याचे प्रतिपादीत केले आहे.

- ईश्वराचे सर्वसमावेशक एकच लक्षण वर्णिले आहे.
- योगात वेदान्ताचाही अन्तर्भाव करून समन्वयात्मक दृष्टी प्रतिपादीत केले आहे.
- योग्यतेला सत्पुरुषलक्षणाच्या माध्यमाने वर्णिले आहे.
- या सूक्तावलीतील सूक्ती अर्थात् वाक्यरचना क्रियापदांच्या आधारे पूर्ण केली असून सूत्रांचा अर्थ प्रतिपादीत करतांना स्वाभिप्रायानुसार शब्दयोजना केलेली आढळते.
- पातंजल योगसूत्रांना असे सूक्तीरूपात लिहण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे हिच या ग्रंथाची अपूर्वता होय.

साहित्तिक, कवि, हृदयाच्या व्यक्तिचे योगचिंतनही त्याचप्रमाणे मृदु संवेदनशील आहे यात वाद नाही. मात्र शास्त्राच्या मर्यादेला कुठेही बाधा येऊ न देता आपल्या योगविचारांचा अन्य अभ्यासकांनाही अनुभव घेता यावा व सहाय्य मिळावे यास्तव त्यांनी या ग्रंथाची रचना केली मात्र काही ठिकाणी जसे पुरुषाला चित्तप्रभु, "पुरुषो हि चिन्मयरूपित्वाद् अपरिणामि चित्तप्रभुः अस्ति।25अशा प्रकारच्या संज्ञा वापरून शास्त्रातही आपल्या काव्यप्रतिभेने सौंदर्यस्थळे जपली आहेत हे त्यांचे वैशिष्ट्य म्हणायला हरकत नाही.

## संदर्भ


1. योगसूत्र - 2/25
2. योगसूक्तावली - 3/22
3. योगसूत्र - 1/1
4. योगसूक्तावली - 1/2
5. तत्रैव - 1/1
6. योगसूत्र - 1/41
7. योगसूक्तावली - 1/17
8. तत्रैव - 1/18
9. तत्रैव - 1/19
10. तत्रैव - 1/54
11. योगसूत्र - 1/12
12. योगसूक्तावली - 1/11
13. तत्रैव - 1/13
14. योगसूत्र - 1/16
15. योगसूक्तावली - 1/15
16. योगसूत्र - 1/24
17. तत्रैव - 1/25
18. तत्रैव - 1/26
19. तत्रैव - 1/27
20. योगसूक्तावली - 1/29
21. तत्रैव - 2/32
22. तत्रैव - 2/8
23. योगसूत्र - 2/19
24. योगसूक्तावली - 2/12
25. तत्रैव - 2/41
26. तत्रैव - 2/25
27. तत्रैव - 2/24
28. तत्रैव - 2/22
29. योगसूत्र - 2/41
30. योगसूक्तावली - 2/27
31. तत्रैव -1/36

# गुलाबगीतेतील योगदर्शनाचे विश्लेषणात्मक अध्ययन

**राजेंद्र धा. मेश्राम**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

कविता होले

संस्कृतभाषा तथा साहित्य विभाग, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक

## सारांश

*भारतीय दर्शनांपैकी योग दर्शन एक महत्त्वाचे दर्शन आहे. पारंपारिक योग दर्शनाच्या पार्श्वभूमीवर श्रीगुलाबराव महाराजांना अपेक्षित असलेल्या योग दर्शनाचे वर्णन काव्याच्या माध्यमातून महाकवी प्रा. मधुसूदन पेन्ना यांच्याद्वारे गुलाबगीतेत करण्यात आले आहे. प्राचीन शास्त्रांबद्दल महाराजांच्या मनात अतिशय आदरभाव होता. महाराज शास्त्रांकडे समन्वय दृष्टीने बघत होते. गुलाबगीतेतील योग विचार हे पारंपारिक योग सिद्धांतांवर आधारित असले तरी ते सांख्य, योग, वेदांत आणि भक्ती यांचा योग्य समन्वय साधणारे आहेत. यामध्ये समाधी, आसन, ऋतंभरा प्रज्ञा, कुंडलिनी, धारणा, ध्यान, नियम, प्रत्याहार, प्राणायाम, भक्तिचा अधिकारी, यम, योग अधिकारी, योग प्रकार, योग रहस्य, योग लक्षण, योग व्याख्या, योग स्वरूप, राज योग, समाधी, हिरण्य योग इत्यादि विषय यात आलेले आहेत.*

## उद्देश

गुलाबगीता ही विद्वान संत श्री गुलाबराव महाराज यांच्या तत्त्वज्ञानाने ओतप्रोत भरलेली आहे. या गुलाबगीतेत काव्याच्या माध्यमातून रेखाटण्यात आलेल्या योगदर्शनाचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.

## संशोधन पद्धती

या शोधपत्रासाठी विश्लेषणात्मक अध्ययन पद्धती उपयोगात आणली आहे.

## परिचय

'प्रज्ञाचाक्षुषम्' या महाकाव्याचे नायक श्रीगुलाबराव महाराज हे आहेत. दि. ६ जुलै १८८१ साली अमरावती जिल्ह्यातील लोणीटाकळी या गावी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या वडीलाचे नाव श्री. गोंदुजी मोहोड व आईचे नाव सौ. अलोकाबाई मोहोड होते. वयाच्या नवव्या महिन्यात डोळे आल्याचे निमित्त झाले व त्यांना कयमचे अंधत्व आले. अंधत्वामुळे शाळेत जावून त्यांना शिक्षण घेता आले नाही. महाराजांचे वय १२ वर्षांचे असतांना त्यांचा विवाह झाला. त्यांना केवळ ३४ वर्षांचे आयुष्य लाभले. त्यांची बुद्धी तल्लख होती. एकदा ऐकलेले ते कधी विसरत नसत. अशा विपरित परिस्थितीत व अल्प कालावधीत अतिशय उल्लेखनीय असे कार्य त्यांनी केले. श्रीगुलाबराव महाराजांनी मांडलेल्या समन्वय विचारामुळे त्यांना 'समन्वयमहर्षी' म्हणून संबोधले जाते. त्यांनी विपुल व अमुल्य अशी ग्रंथरचना केली आहे.

महाराष्ट्राच्या विदर्भदेशातील संत महात्मा श्री गुलाबराव महाराजांच्या जीवनावर आधारित 'प्रज्ञाचाक्षुषम्' या महाकाव्याची रचना प्रो. मधुसूदन पेन्ना यांनी केली आहे.या महाकाव्याचे प्रकाशन न्यू भारतीय बुक कार्पोरेशन, नवी दिल्ली यांच्याद्वारे २०१४ वर्षी झाले. नागपूर येथे झालेल्या श्री. गुलाबराव महाराज यांच्या स्मृतीशतक महोत्सवात या महाकाव्याचे लोकार्पण करण्यात आले. या महाकाव्यात एकूण ११ सर्ग आहेत. महाकवींनी सर्गांना 'ईक्षण' असे म्हटले आहे. पहिल्या १० ईक्षणात विद्वान संत श्री गुलाबराव महाराज यांचे चरित्र काव्यबद्ध रीतीने रेखाटण्यात आले आहे. या भागाला 'श्री गुलाबराव महाराजचरितम्' असे म्हटले

आहे. अकराव्या ईक्षणात एकूण सात अध्याय आहे. या भागाला 'गुलाबगीता' असे म्हटले आहे. या सातही अध्यायांत श्रीगुलाबराव महाराजांचे तत्त्वज्ञान सांगितलेले आहे. गुलाबगीतेच्या पाचव्या अध्यायात गुलाबराव महाराजांच्या योगसिद्धान्तांचे विश्लेषण काव्यस्वरुपात करण्यात आले आहे. यात योगस्वरूप, योगप्रकार, योगाविघ्ने, योगरहास्य, चित्त, योगसाधन, हठयोग, राजयोग, ईश्वर, कैवल्य इत्यादींचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**विषय विस्तार**

प्रा. मधुसूदन पेन्ना यांनी 'प्रज्ञाचाक्षुषम्' या महाकाव्याची रचना केली आहे. या महाकाव्याचे दोन भाग केलेले आहेत पहिल्या भागाला श्रीगुलाबरावमहाराजचरितम् असे म्हटले आहे तर दुसऱ्या भागाला गुलाबगीता म्हटले आहे. गुलाबगीतेत वैदभीय संत प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराज यांचे तत्त्वज्ञान विशद केलेले आहे. या तत्त्वज्ञानाच्या माध्यमातून मानवासाठी कल्याणकारी असा उपदेश दिलेला आहे. भारतीय तत्त्वज्ञानात प्रामुख्याने सहा आस्तिक दर्शने आहेत. ती म्हणजे सांख्य, योग, वैशेषिक, न्याय, पूर्वमीमांसा आणि वेदान्त. ही सहाही दर्शने वेदांचे प्रामाण्य मानतात. याशिवाय तीन नास्तिक दर्शने आहेत. ती म्हणजे चार्वाक, जैन व बौद्ध. ही दर्शने वेदांचे प्रामाण्य नाकारतात.

**ध्यानेन ब्रह्मसारूप्यं चित्तस्य योग उच्यते।**
**ज्ञानेन ब्रह्मतादात्म्यं तस्य वेदान्त उच्यते।।**
**अहं ममेति तत्त्वतस्त्यक्त्वैकाग्रमानस।:**
**ध्यायीत देवदेवं तद् योगरहस्यमुच्यते।।**
**मोक्षार्थं चित्तवृत्तीनां निरोधो योगसंज्ञक।:**
**कर्तृसम्पाद्यरूपश्च वस्तुसम्पाद्यरूपक।।:**
**भावनाविशदस्त्वाद्यो भावनाजन्मवान् पर।:**
**एवं द्वैविध्यमापन्नो योगश्चित्तमलापहा।।**
**सांख्येन त्वंपदार्थस्य तत्पदार्थस्य च योगत।:**
**वेदान्तेन तयोपूर्णमैक्यस् :य शोधनं भवेत्।।**[१]

ध्यानसाधनेद्वारे मनाचे ब्रह्मासोबत साम्य किंवा सादृस्यता साधने म्हणजेच योग होय त्याचप्रमाणे ज्ञानसाधनेद्वारे ब्रह्मासोबत मनाची एकरूपता साधने म्हणजे वेदांत होय. योग रहस्य म्हणजे मी, माझे या प्रकारचे विचार नाहीसे करून एकाग्र मनाने देवदेव असे ध्यान केले तर ते योग रहस्य होय. मोक्षप्राप्तीसाठी चित्तवृत्ती म्हणजेच योग होय. तो वास्तविक-ज्ञानप्रप्तीरूप किवा परमात्माप्राप्तीरूप असतो. वास्तविक-ज्ञानप्राप्तीरूप योग हा भावनांना शुद्ध करतो तर परमात्माप्राप्तीरूप योग हा शुद्ध भावना निर्माण करणारा असतो. अश्या प्रकारे चित्ताचा मळ घालविता येतो. 'त्वम्' पदार्थाचे सांख्याद्वारे, 'तत्' पदार्थाचे योगाद्वारे आणि 'त्वम्' व 'तत्' या दोहोंचेही वेदांताने पुर्नतादात्म्याने निर्धारण होईल.

**हठो ध्यानं तथा मन्त्रो लयो नादश्च पञ्चम।:**
**योगस्यैते प्रकारास्तु राजयोगस्य सिद्धये।।**
**पातञ्जलो राजयोगो निदिध्यासननामक।:**
**योगिनश्चितिरूपेण केवला सा ह्यवस्थिति।।:**
**चित्तवृत्तिनिरोधेन चैतन्यमवशिष्यते।**
**तस्या।।:स्थितेरुपायास्तु योगशब्देन कीर्तिता :**
**श्रद्धामूलो हि योगस्यात् श्रद्धेयं जननी स्मृता। :**
**योगाभ्यासप्रवृत्तं या कल्याणी पाति सर्वदा।।**
**श्रद्धातो वर्धते शक्तिस्तस्याश्च वर्धते स्मृति।:**
**स्मृतेर्दार्ढ्येन सम्पन्नो योगी समाधिमाप्नुते।।**[२]

योगाचे पाच प्रकार आहेत. हठयोग, ध्यानयोग, मंत्रयोग, लययोग तसेच नादयोग या पाच योगप्रकारांमुळे राजयोगाची सिद्धी होते. निदिध्यासन नावाचा पातंजल राजयोग आहे. योगासाधकाच्या चैतन्य स्वरुपामुळेच कैवल्याची स्थिती प्राप्त होते. चित्तवृत्तीचा नाश झाल्यावर फक्त चैतन्य शिल्लक

राहते. चैतन्य शिल्लक राहणे म्हणजेच योग होय. योग साधनेसाठी श्रद्धा अतिशय महत्त्वाची आहे. श्रद्धा म्हणजेच योगाची माता. ती कल्याण करणारी आहे त्याचप्रमाणे योगाभ्यास करण्याची इच्छा असणाऱ्यांचे सतत रक्षण करते. योगासाधकाला समाधी अवस्थेला पोहोचण्यासाठी श्रद्धा अतिशय आवश्यक आहे. त्यामुळे शक्ती वाढते, शक्ती वाढल्यामुळे स्मृतीचा विकास होतो व विकसित झालेल्या स्मृतीमुळे समाधी अवस्थेला सहज पोहोचता येते.

**समाधौ परिपक्वे हि प्रज्ञा सञ्जायते परा।**
**ऋतम्भरेति शास्त्रेऽस्मिन् गीयते सा सदोदिता।।**
**श्रद्धा रुद्राक्षमालेव स्वेच्छात।:स्वीकृता पुन :**
**गले स्थापयितुं शक्या नैवेति ज्ञायतां परम्।।**
**श्रद्धामयो भवेज्जीवस्तस्माच्छ्रद्धा भवेत् स्वयम्।**
**सा सात्त्विकी योगमार्गेऽस्मिन् योगिनं पाति सर्वदा।।**
**श्रद्धासत्त्वेऽपि यो योगे शङ्कावान् वर्तते सदा।**
**शङ्का श्रद्धां विनिघ्नन्ती प्रज्ञाश्च तानयेत् सताम्।।**
**सशङ्कपण्डितान्नूनं निष्ठावान् पामरो वर।:**
**यतो निष्ठा फलं सूते शङ्का नाशयते नरम्।।**[३]

योगसाधक जेव्हा समाधीमध्ये परिपक्व अवस्थेला पोहोचतो ती श्रेष्ठप्रज्ञा म्हणजेच निर्मळ बुद्धी होय. यालाच योगशास्त्रात ऋतंभरा असे म्हणतात. जीव हा श्रद्धामय असतो त्यामुळे श्रद्धा ही स्वयंभू असते व कुणालाच त्यासाठी प्रवृत्त करता येत नाही. सात्त्विक श्रद्धा नेहमी योगासाधाकाचे रक्षण करते. जो योगसाधक श्रद्धाशील असूनही योगाविषयी शंकाग्रस्त असतो, ती शंका श्रद्धेच्या नाशाला कारणीभूत ठरतो व त्याची प्रज्ञा कमी होते. याचे कारण असे की, श्रद्धा ही फलदायी असते तर शंका ही विनाशक असते.

**योगाभ्यासे विरक्तेस्तु महत्त्वं शास्त्रसम्मतम्।**
**अविरक्तसदा योगं कुर्वाणोऽपि न सिद्धिभाक्।। :**
**अविरक्तपुनर्योगे प्रवृत्तोऽपि क्षणे क्षणे। :**
**विषयासक्तित।।:श्रान्तो योगमेव त्यजेत् खल :**
**विषयेषु मानसं यस्य न सक्तं निर्मलं पुन।:**
**अधिकारी स एवात्र शमादिषट्कसंयुत।।:**
**अष्टाङ्गयोगनिष्ठस्य क्रमश :ास्त्रेषु कथ्यते।**
**तत्क्रमानुगते तस्मिन् तत्फलं हस्तगं भवेत्।।**
**नियमेषु प्रधानं स्याच्छ्रवणं गुरुवक्त्रत।:**
**तेनैव तामसी शक्तिर्निरुद्धा योगिनश्चिरात्।।**[४]

योगाभ्यासात विरक्तीला शास्त्रसंमत महत्त्व आहे. विरक्ती प्राप्त झालेल्यालाच योगाभ्यासामुळे फलप्राप्ती होते. जो माणूस अविरक्त आहे तो वारंवार योगदिशेकडे प्रवृत्त होऊ नही विषयासक्तीमुळे योगाचे फळ प्राप्त करू शकत नाही व अंतिमतः योगसाधना सोडून देतो. ज्याचे मन शम, दम, तितिक्षा, उपरति, समाधान आणि श्रद्धा यांनी परिपूर्ण आहे तोच योगाचे फळ प्राप्त करू शकतो. अष्टांगयोगाचे आचरण करण्यासाठी शास्त्रात क्रम सांगितला आहे. त्या क्रमाचे आचरण केले तर त्याला निश्चित फलप्राप्ती होते. योगाभ्यासाच्या नियमांपैकी गुरुमुखातून श्रवण हा नियम योगासाधकाने पाळणे आवश्यक आहे. त्यामुळे सत्त्व, रज, तमोगुणापैकी तमोगुणामुळे उत्पन्न झालेल्या तामसी वृत्तीचे शमन होते.

**यमाभ्यासेन निष्ठात इन्द्रियाणां क्रमेण हि।**
**निरोधो जायते तस्मादात्मशक्तिर्विवर्धते।।**
**आसनानां जये देहे स्थैर्यमुत्पद्यते परम्।**
**ततो द्वन्द्वप्रहारात् स योगी दुखं न विन्दति।।:**
**प्राणायामेन चित्तस्य चाञ्चल्यं नाशितं भवेत्।**
**तस्मादेकाग्रता नूनं जायते मनसोऽचिरात्।।**
**एतैर्नियतमभ्यस्तैर्मूढावस्था नाश्यते ननु।**
**क्षिप्तावस्था तथा नष्टा प्रत्याहारेण मानसी।।**

**धारणाध्यानसामर्थ्यादन्या विक्षिप्तनामिका।**

**नाशं याति सदा चित्ते योगाभ्यासविरोधिनी।।**[५]

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या यमांचे निष्ठेने व क्रमाने पालन केले तर चित्तवृत्तीनिरोध होऊन आत्मशक्तीचा विकास होतो. आसनांवर विजय मिळविल्याने शरीरात स्थिरता निर्माण होते त्यामुळे शीत-उष्ण, भूक-तहान अश्या पिडा उत्पन्न झाल्या तरी तो योगसाधक दु:खी होत नाही. प्राणायामामुळे मनाची चंचलता नष्ट होऊन एकाग्रता निर्माण होते. प्राणायामांचा सराव केल्याने चित्ताची विवेकशून्यता नाश पावते. प्रत्याहारामुळे विषयासक्त होणारी चित्ताची चंचलता दूर होते. धारणा आणि ध्यान यांच्या सामर्थ्यामुळे सत्त्वगुणाच्या आधिक्याने समाधी अवस्था प्राप्त झाल्यावर चित्ताची विषयांकडे आकर्षित होणारी योगाभ्यासाची विरोधी, विक्षिप्तवृत्ती नाश पावते.

**सम्प्रज्ञातसमाधेस्तु चित्तैकाग्र्यं भवेन्नृणाम्।**

**निर्विकल्पसमाधेश्च निरोधो मनसो भवेत्।।**

**प्राणायामेन चित्तस्य चाञ्चल्यं नाश्यते ध्रुवम्।**

**तथापि विषयासक्तिर्मनसो नैव नश्यति।।**

**परात्परतरे दृष्टे चित्तस्य विषयस्पृहा।**

**नष्टा भूत्वाऽथ कैवल्यं योगिनो भवति ध्रुवम्।।**

**तदर्थं प्राणरोधेन सहान्यद्दोषदर्शनम्।**

**नियतं क्रियते चेत् तत् मनसो हन्ति कल्मषम्।।**

**चित्तस्य मृदुसंवेगो वासना परिकीर्तिता।**

**स्वप्नश्च मध्यसंवेगस्तीव्रसंवेगकारणम्।।**[६]

सात्विकि, रजसि आणि तमसि हे वृत्तीचे तीन प्रकार आहेत. सात्विक वृत्तीमुळे ध्येयविषयाचा पूर्ण साक्षात्कार होतो त्यालाच संप्रज्ञात समाधी असे म्हणतात. संप्रज्ञात समाधीमुळे मानवाचे चित्त एकाग्र होते. सर्व चित्तवृत्तीचा निरोध झाल्यावर केवळ संस्कारच शिल्लक राहतो त्या अवस्थेला निर्विकल्प समाधी असे म्हणतात. प्राणायामाच्या अभ्यासाने मनाची चंचलता निश्चितपणे निघून जाते परंतु मनातील विषयाबद्दलची आसक्ती तशीच राहते. परवैराग्यामुळे परब्रह्माचे दर्शन होताच चित्ताची विषयास्पृहा नष्ट होऊन योगी निश्चितपणे कैवल्यस्थितीला पोहोचतो. प्राणायामाने इतर दोषांचे दर्शन सतत केले तर मनातील सर्व दुष्टविचारांचा नाश होतो. चित्ताच्या वैराग्याचे तीन प्रकार असतात. मृदुसंवेग (मृदूवैराग्य), मध्यसंवेग (मध्यवैराग्य) व तीव्रसंवेग (तीव्रवैराग्य) मृदुसंवेग म्हणजे वासना, मध्यसंवेग म्हणजे स्वप्न तर तीव्रसंवेग म्हणजे वैराग्याचे कारण होय.

**मनसस्तीव्रसंवेगाज्जगत् सत्यमिव स्फुरेत्।**

**ईश्वरे तीव्रसंयोगात् समाधिसिद्धिरीश्वरात्।।**

**ईश्वरप्रणिधानेन साधकश्च समाधिभाक्।**

**व्युत्थानेऽपि जगद् ब्रह्म द्रष्टुं शक्नोति केवलम्।।**

**वैराग्यादपराख्याच्चेदिन्द्रियाणां विनिग्रह।:**

**अभ्यासाच्च समाधिसदा नृणाम्।। :स्यात् सम्प्रज्ञात :**

**परवैराग्यदाढर्येनासम्प्रज्ञातो भवेद् ध्रुवम्।**

**प्रारब्धनाशको यश्च त्रिविधकथ्यतेऽधुना।। :**

**अक्षीणवासनं चित्तं दृश्यते पुनरुत्थितम्।**

**असंप्रज्ञातभेदोऽयं स्वयंव्युत्थान।।:नामक-**

**विष्णुश्च शंखनादेन प्रह्लादं शान्तमानसम्।**

**अबोधयद् गाढसुप्तन्तु पुरा लोकशिवाय हि।।**

**एवं व्युत्थानमापन्नं बाह्यतो दृश्यते परम्।**

**असंप्रज्ञातप्रभेदोऽयमन्यव्युत्थाननामक।।:**

**पुरा शिखिध्वजस्यायमसंप्रज्ञातनामक।:**

**समाधिर्नाभ्रुवन् भङ्गं व्युत्थानेऽप्यश्चितोऽभवन्।।**

**एवं व्युत्थानकालेऽपि समाधिस्थितिरश्चिता।**

**असंप्रज्ञातभेदोऽयं व्युत्थानरहिताभिध।।:**[७]

मनामध्ये तीव्रसंवेग उत्पन्न झाल्यामुळे हे जग सत्याप्रमाणे भासेल तर ईश्वरामध्ये तीव्रसंवेग झाल्यास ईश्वरापासून समाधि सिद्धीही होईल. योगसाधक ईश्वर भक्तीने समाधी प्राप्त करून घेण्यास पात्र ठरतो व समाधीतून बाहेर आल्यावरही तो जगाला ब्रह्मरूपातच पाहू शकतो. अपर वैराग्यामुळे योगासाधकाला जर इंद्रिय निग्रह साधता आला तर योगाभ्यासाने संप्रज्ञात समाधी मानवाला नेहमी साधता येईल. परवैराग्य दृढ झाल्यामुळे निश्चितच असंप्रज्ञातसमाधी प्राप्त होऊ शकते तसेच प्रारब्धाचा नाश करणारा हा योग तीन प्रकारचा असतो. योगासाधकाच्या वासनांचा नाश झाला नाही तर परत व्युत्थान पावलेल्या मनामध्ये नामरूपात्मक संस्कार मध्ये मध्ये पुन्हा जागृत होतात. हा असंप्रज्ञातयोगाचा 'स्वयं व्युत्थान' नावाचा एक प्रकार होय. पूर्वीच्याकाळी विष्णूने शंखानाद करून गाढ झोपेत असलेल्या शांत मनाच्या प्रह्लादाला जागे केले होते त्याच प्रमाणे दुसऱ्यांकडून अथवा बाह्यदृष्टीने जागृत केल्या गेलेला असंप्रज्ञातसमाधीचा हा 'अन्यव्युत्थान' नावाचा दुसरा प्रकार होय. पूर्वी ही असंप्रज्ञात समाधी शिखिध्वज नावाच्या राज्याला व्युत्थानामध्ये देखील विच्छेद न होता प्राप्त झाली होती. त्याचप्रमाणे व्युत्थानकाळातही समाधिस्थिती प्राप्त झाली तर तो 'व्युत्थानरहित' नावाचा असंप्रज्ञातसमाधीचा तिसरा प्रकार होय.

**व्यतिरेकेन या निष्ठा त्वम्पदार्थगामिनी।**
**सा व्युत्थानं भजेन्मध्ये नामरूपविवर्जिता।।**
**अन्वयेन तु या निष्ठा सा तत्पदार्थगामिनी।**
**सा न व्युत्थानमाप्नोति नामरूपान्विता तथा।।**
**यदन्तस्फूर्तिजं ज्ञानं तदेवाऽत्र विशिष्यते।:**
**अन्येभ्यो ज्ञानरूपेभ्यो ऋतम्भरेति कीर्तितम्।।**
**ज्ञानानन्तरमप्येषोऽसंप्रज्ञातनामक।:**
**समाधिश्च समभ्यस्तस्ताप्नोति परमं पदम्।। :**
**क्वचित् स्वप्नोपि योगत्वं याति हिरण्यनामक।:**
**यथार्थापार्थभेदेन स्वप्नो हि द्विविध।।:स्मृत :**[८]

जी निष्ठा व्यतिरेकाने 'त्वम्' पदार्थाचे अनुगमन करते ती नामरूपरहित होऊन मध्येच जागृतावस्था प्राप्त करेल. परंतु जी निष्ठा अन्वयाने उत्पन्न होते ती 'तत्' पदार्थाचे अनुगमन करते व ती नामरूपात्मक असून पुन्हा जागृत अवस्था प्राप्त करीत नाही. जे अंत:करणात साकारलेले ज्ञान आहे तेच ज्ञान विशेष ठरते, हे विशेष ज्ञान म्हणजे 'ऋतंभरा' होय. ज्ञानानंतरही जेव्हा असंप्रज्ञात समाधीचा चांगला अभ्यास होतो व तो निरंतर चालूच असतो तेवा योगसाधाकाला सर्वोच्च स्थान प्राप्त होते. स्वप्नाला हिरण्ययोग म्हणतात व तो यथार्थ आणि अपार्थ अशया दोन प्रकारचा आहे.

**अन्यार्थश्च भवेत् स्वप्न।:क्वचिदन्यार्थसूचक :**
**स्वप्ने च देवदेवस्य गुरूणामपि दर्शनम्।।**
**यथार्थकथ्यते भाग्याद् भाग्योदर्कश्च कथ्यते। :**
**स्वप्नादिष्टैश्च विद्वद्भिर्निर्मितं वाङ्मयं महत्।।**
**देहेस्मिन् कुण्डलाकारा कुण्डलिनी प्रकाशिनी।**
**मूलाधारमधिव्याप्य भासते शक्तिरीश्वरी।।**
**या शक्तिपृथिवीं धत्ते कुण्डलाकारिणी परा। :**
**सैवादिशेषनामानं भजते तन्त्रवाङ्मये।।**
**एवं योगरहस्यं यो ज्ञात्वा योगं समभ्यसेत्।**
**कैवल्यं प्राप्य जन्मादिचक्रस्यान्तं समाप्नुयात्।।**[९]

स्वप्न हे कधी एखादा अर्थ देणारे किंवा अन्य अर्थाची सूचना देणारे असू शकते. कधी स्वप्नामध्ये परमात्म्याचे किंवा गुरूचेही दर्शन होऊ शकते. भाग्य चांगले असेल तर यथार्थ स्वप्न पडते आणि तेव्हा भाग्याचे फळ सांगितले जाते. त्यामुळेच स्वप्नामध्ये आदेश प्राप्त झाल्याने विद्वानांनी विपुल साहित्यनिर्मिती केली आहे. या देहामध्ये कुंडलाकर असलेली

तेजस्वी कुंडलिनी आहे. ही ईश्वरी शक्ती मूलाधारचक्राला व्यापून राहते. जी कुंडलाकारिणी परा शक्ती पृथ्वीला धारण करते तीच तंत्रवाङ्मयामध्ये 'अदिशेष' नावाने ओळखली जाते. अश्याप्रकारे जो योगाचे रहस्य जाणून योगाचा अभ्यास करेल तो कैवल्य प्राप्त करील आणि जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्त होईल.

**निष्कर्ष**

प्रा.मधुसूदन पेन्ना विरचित प्रज्ञाचाक्षुषम् या महाकाव्यातील गुलाबगीता ए वैचारिक अमूल्य असा खजिना आहे. मानव ल्याणसाठी हितकर बाबीचेतत्त्वज्ञानाच्या माध्यमातून उपदेशात्मक मौलिक विचारांचे, तत्त्वज्ञानाचे व योगदर्शनाचे विवेचन त्यात आलेले आहे. जसे -

१. काम, क्रोध, लोभ, मद, मोह, मत्सर यांच्यापासून अलिप्त राहावे.

२. दुःखाची करणे शोधून स्वतः दुःखविनाश करावा.

३. कोणत्याही बाबतीत अति लोभ करून नये.

४. ध्यानाने ब्रह्मासोबत साम्य साधणे म्हणजेच योग होय.

५. ज्ञानाने ब्रह्मासोबत एकरूपता साधणे म्हणजे वेदांत होय.

६. एकाग्र मानाने देवदेव करणे म्हणजे योगरहस्य होय.

७. योग भावनांना शुद्ध करतो.

८. परमात्मा प्राप्तीरूप योग शुद्ध भावना निर्माण करतो.

९. हठयोग, ध्यानयोग, मंत्रयोग, लययोग, नादयोग या पाच योगप्रकारांमुळे राजयोगाची सिद्धी होते.

१०. चित्तवृत्तीच्या नाशानंतर चैतन्यच शिल्लक राहते.

११. श्रध्दा ही योगाची माता होय.

१२. श्रेष्ठ प्रज्ञा म्हणजे निर्मळ बुध्दी होय.

१३. निर्मळ बुध्दी म्हणजे ऋतंभरा प्रज्ञा होय.

१४. अष्टांग योगाचे आचरण क्रमाने करावे.

१५. आसनांनी शरीरात स्थिरता निर्माण होते.

१६. चित्तवृत्तीनिरोधाने आत्मशक्तीचा विकास होते.

१७. प्राणायामाने चित्ताचे चांचल्य नाहीसे होऊन मनाची एकाग्रता साध्य होते.

१८. प्रत्याहाराने चित्ताची चंचलता दूर होते.

१९. संप्रज्ञात समाधीमुळे चित्त एकाग्र होते.

२०. चित्तवृत्तीनिरोधाने निर्विकल्प समाधी प्राप्ती होते.

२१. अंत:करणात साकारलेले ज्ञान म्हणजे ऋतंभरा प्रज्ञा होय.

२२. स्वप्नयोग म्हणजे हिरण्ययोग होय.

या लेखात दिलेल्या श्लोकांच्या व्यतिरिक्त अन्य बरेच असे श्लोक आहेत जे अमूल्य मार्गदर्शन करतात. त्यामुळे त्याही श्लोकांचे अध्ययन करणे आवश्यक आहे. गुलाबगीतेचा उपदेश हा सर्वांना व सर्वकालिक लागू पडणारा आहे, त्यामुळे गुलाबगीतेचे सखोल अध्ययन करणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची**

१. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-५, श्लोक - २, ३, ४, ५, ६.

२. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-५, श्लोक - ७, ८, ९, १०, ११.

३. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-५, श्लोक - १२, १३, १४, १५, १६.

४. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-५, श्लोक - १७, १८, १९, २०, २१.

५. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-५, श्लोक - २२, २३, २४, २५, २६.

६. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-५, श्लोक - २७, २८, २९, ३०, ३१.

७. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-५, श्लोक -३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४०.

८. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-५, श्लोक - ४१, ४२, ४३, ४४, ४५.

९. प्रज्ञाचाक्षुषम्-गुलाबगीता, अध्याय-५, श्लोक - ४६, ४७, ४८, ४९, ५०.

## संदर्भग्रंथ

१. पेन्ना मधुसूदन, प्रज्ञाचाक्षुषम्, न्यु भारतीय बुक कॉरपोरेशन, नवी दिल्ली, २०१४

२. घटाटे कृष्ण माधव, श्रीगुलाबराव महाराजांची विचारसंपदा, श्रीगुलाबरावमहाराज जन्मशताब्दी प्रकाशन, नागपूर, द्वि.आ. १९८१ व तृ.आ. २००३

३. अगस्ती कलापिनी, प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबराव महाराजांचे योग-दर्शन, कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, २००१

४. घटाटे कृ.मा., समन्वय महर्षि दिव्यचक्षु श्रीगुलाबरावमहाराज प्रणीत सर्व धर्म समन्वय, प्रकाशक- सुमेधा गोविंदराव लिमये, मुंबई.

# संस्कृत सांगितिकेचे अध्ययन

**रुपाली कवीश्वर-कुकडे**

शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्थामहाराष्ट्र ,अमरावती ,

kavishwar.rupali66@gmail.com

**सारांश**

*संस्कृत भाषा प्राचीन काळापासून आजपर्यंत विविध साहित्यप्रकारांनी सुशोभित झाली आहे. एकविसाव्या शतकात प्रादेशिक भाषांच्या आदानप्रदानातूनही संस्कृत साहित्य समृद्ध झाले आहे. महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या मराठी संगीत नाटकांच्या परंपरेच्या आधारावर अनेकविध साहित्यकृती विविध भाषांमध्ये निर्माण झाल्या. कण्टकार्जुन रचित प्रीतगौरीगिरीशम् या संस्कृत सांगितिकेचा परिचय आणि रसास्वाद प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे मांडण्यात आला आहे. संगीतनाट्य परंपरा आणि संस्कृत भाषेची समृद्ध साहित्य परंपरा यांचा अनोखा संगम; कविकुलगुरू कालिदास रचित कुमारसम्भवम् महाकाव्याच्या पाचव्या सर्गातील उमाबटुसंवादावर आधारित असलेल्या प्रीतगौरीगिरीशम् या संस्कृत सांगितिकेत झालेला आहे. एकविसाव्या शतकातही संस्कृत भाषेच्या वाङ्मयकोशात अनेक नाविन्यपूर्ण कलाकृती निर्माण होत आहेत, हेच संस्कृतभाषेचे श्रेष्ठत्व प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेच्या अध्ययनातून लक्षात येते.*

**महत्त्वाचे शब्द** –प्रीतगौरीगिरीशम्, सांगितिका, संस्कृतभाषा, संगीत नाटक, मराठीभाषा.

## प्रस्तावना

संस्कृतभाषेच्या वाङ्मयात शतकानुशतके अनेकविध नवीन साहित्यप्रकार अनेक विद्वानांनी हाताळले आहेत. गद्य, पद्य, चम्पूकाव्य इत्यादि प्राचीन साहित्यप्रकारांचा नूतनाविष्कारही विसाव्या शतकातील संस्कृत साहित्यामध्ये झालेला दिसतो. संस्कृत भाषा प्राचीन काळापासून आजपर्यंत विविध साहित्यप्रकारांनी सुशोभित झाली आहे. अर्वाचीन संस्कृत साहित्यामध्ये नवीन साहित्यप्रकारांची देखील भर पडत गेलेली दिसून येते. प्रादेशिक भाषांच्या आदानप्रदानातूनही संस्कृत साहित्य 21 व्या शतकात समृद्ध होत गेले आहे. महाराष्ट्रात प्रसिद्ध असणाऱ्या मराठी संगीत नाटकांच्या परंपरेतून जसा संगीत विश्वामध्ये उल्लेखनीय कलाकृतींचा प्रभाव जनमानसावर पडला त्याचप्रमाणे साहित्यिक कलाविश्वात देखील अनेक उल्लेखनीय कलाकृती निर्माण झाल्या.

संस्कृत साहित्यवाङ्मयामध्ये मराठी संगीत नाटकांच्या आधारावर तयार झालेल्या एका दुर्मिळ साहित्यकृतीचा परिचय प्रस्तुत शोधनिबंधाद्वारे करून देण्यात येणार आहे. ज्ञानमुद्रा, पुणे यांनी 1993 मध्ये कण्टकार्जुन रचित प्रीतगौरीगिरीशम् या संस्कृत सांगितिकेचे प्रकाशन केले आहे या अभिनव संस्कृत सांगितिकेचा परिचय व रसास्वाद या शोधनिबंधाद्वारे करून देण्याचा उद्देश आहे.

प्रीतगौरीगिरीशम् ही संस्कृत सांगितिका कण्टकार्जुन या अभिनव नावाने संस्कृतविद्वान डॉ. कृष्ण श्री. अर्जुनवाडकर यांनी रचलेली आहे. अनेक वैशिष्ट्यांनी युक्त अशी ही संस्कृत सांगितिका म्हणजे संस्कृत नाट्यपरंपरा, संगीतनाट्य परंपरा आणि संस्कृत भाषेची समृद्ध साहित्य परंपरा यांचा अनोखा संगम आहे. प्रीतगौरीगिरीशम् सांगितिकेचा प्रयोग पुणे, महाराष्ट्र येथे संगीत संयोजन करून सादर करण्यात आला होता. या प्रयोगास रसिकांचा उत्तम प्रतिसाद प्राप्त झाला होता, हे लेखकाने प्रस्तावनेत सांगितले आहे.

प्रीतगौरीगिरीशम् ही संस्कृत सांगितिका कविकुलगुरू कालिदास रचित कुमारसम्भवम् महाकाव्याच्या पाचव्या सर्गातील उमाबटुसंवादावर आधारित आहे.

**प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेचे संक्षिप्त कथानक**

प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेची सुरवात नाट्यपरंपरेला अनुसरून नांदी द्वारे केली आहे. नांदीनंतर सूत्रधार नाविन्यपूर्ण रीतीने सांगितिकेच्या रचनाकाराची ओळख करून देतो आणि कविकुलगुरू कालिदासाची प्रेरणा या सांगितिकेच्या रचनेमागे आहे याचे सूचन करतो. यानंतर किंनर व किंनरी यांच्या संवादातून उमा म्हणजेच पार्वती शंकराला प्रसन्न करण्यासाठी तप आचरित आहे , हा संपूर्ण कथाभाग समजतो. यानंतर उमा आणि सखी यांच्या संवादातून वसंताचे अकाली झालेले आगमन सूचित करून वातावरण निर्मिती साधली आहे. यानंतर किंनर व किंनरी यांच्या संवादामधून कामदेवदहनाचा प्रसंग आणि तपाचरण करणाऱ्या पार्वतीसमोर जटा धारण केलेल्या बटूचा म्हणजेच शंकराचा नाट्यमय प्रवेश सूचित केला आहे. यानंतर उमा आणि बटुरूपी शंकर यांच्या मधील रोचक संवाद, त्यातून उमा व भगवान शंकर यांच्यामध्ये निर्माण होणारा स्नेह आणि शंकराने उमेसमोर स्वरूप प्रकट केल्यामुळे उमेची होणारी अवस्था अशा क्रमाने घडणाऱ्या घटनांनी ही सांगितिका नटली आहे. शेवटी लेखकाने प्राचीन नाट्यपरंपरेला अनुसरून भरतवाक्याने या सांगितिकेचा शेवट केला आहे.

प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेतील पात्र सूत्रधार, किंनर, किंनरी, नायिका उमा, नायिकेची सखी, नायक बटुरूपी शिव ही या सांगितिकेतील पात्र आहेत.

प्राचीन संस्कृत नाटकांमध्ये असणाऱ्या सूत्रधाराचे पात्रविशेष या सांगितिकेत अंशतः दर्शविण्यात आले आहेत. अगदी थोडक्यात सांगितिकेचा रचनाकार आणि सांगितिकेवरील कालिदासाचा प्रभाव सांगण्यासाठी सूत्रधाराची योजना केली आहे. ही सांगितिका असल्यामुळे प्रयोगप्रधानता या कलाकृतीत असल्याचे सूत्रधार स्पष्ट करतो, अशी रचना करून लेखकाने प्राचीन नाट्यपरंपरेतील सूत्रधाराची योजना आणि आधुनिक नाटकातील समयाची मर्यादा राखून बोलणारे सूत्रधार हे पात्र, यांचा सुरेख मेळ साधला आहे.

किंनर आणि किंनरी यांच्यातील संवाद प्रामुख्याने पूर्वकथानक सांगणे आणि वातावरणनिर्मिती करणे याकरिता योजले आहेत. तर नायिकेचे अवस्था वर्णन आणि नायिकेच्या मनातील भाव नायकासमोर येण्याच्या दृष्टीने रिकाम्या असणाऱ्या जागा भरणारी अशी नायिकेची म्हणजेच उमेची सखी रंगवण्यात आली आहे.

नायिका उमा आणि नायक बटु यांच्या संवादामध्ये लेखकाचे संवादकौशल्य, नाट्यमयता, रसनिर्मिती साधण्याचे कौशल्य प्रभावीपणे दिसून येते.

**प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेतील नाट्यशास्त्रीय बाबी**

सूत्रधाराच्या संवादात प्रामुख्याने आकाशभाषिताचा प्रभावी वापर लेखकाने केला आहे. यामुळे सूत्रधार या एकाच पात्राची योजना करूनही नाटकाची प्रस्तावना रसिकमनाचा ठाव घेणारी ठरली आहे.

नाट्यसूचनांचा उपयोगही सूत्रधाराच्या संवादावेळी पाच वेळा करण्यात आला आहे. तर संपूर्ण सांगितिकेत फक्त चार नाट्यसूचना येतात. त्यापैकी दोन नाट्यसूचना उमेच्या चेहऱ्यावरील हावभाव प्रकट करण्यासाठी, एक सूचना बटूचा मिश्किल स्वभाव दर्शविण्यासाठी आणि एक सूचना बटू शिवाच्या रूपात प्रकट होतो हे सांगणाऱ्या आहेत.

प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेची नांदीदेखील वैशिष्ट्यपूर्ण आहे. गंगेची उपमा देऊन कल्याणकारक अशा वाणीला म्हणजेच भाषेला उद्देशून नांदीची रचना केली आहे. नांदीमध्ये

गंगेचे उपमान वापरल्यामुळे भाषेचा प्रवाहीपणा आणि पवित्रता प्रभावीपणे दर्शवली गेली आहे. तसेच दिविजा म्हणजे स्वर्गीय गंगेची उपमा दिल्यामुळे संस्कृतभाषेची म्हणजे गीर्वाणवाणीची प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत अखंडितपणे चालू असणारी साहित्यनिर्मितीची समृद्ध परंपरा सूचित झाली आहे. याशिवाय भाषेला मातेची उपमा दिल्यामुळे भाषेचे परिपालन करण्याचे सामर्थ्य आणि भाषेतील कल्याणकारकता सुद्धा लेखकाने सूचित केली आहे. अशाप्रकारे देवतावंदन, गुरूवंदन करणारी, सारगर्भित असणारी अशी या सांगितिकेची नांदी आहे.

याशिवाय या सांगितिकेची नायिका उमा आणि शिवाच्या डोक्यावर असणारी गंगा नदी यांच्या नात्यातील मिश्किलभाव लक्षात घेऊन लेखकाने सांगितिकेतील मिश्किलता गंगेचे नाव प्रथम घेऊन सूचवलेली असावी. प्रीतगौरीगिरीशम् हे सांगितिकेचे नाव आणि या सांगितिकेच्या कथानकाचा मूलस्रोत असणाऱ्या कालिदासाचे नाव लेखकाने हुशारीने भरतवाक्याच्या शेवटच्या चरणात गुंफले आहे.

**प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेवरील कालिदासाचा प्रभाव**

प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेत सुरवातीलाच सूत्रधार 'कालिदासप्रतिच्छायकं प्रीतगौरीगिरीशम् नाम गीतनाट्यम् ।'असे सांगतो, यावरूनच या सांगितिकेवर कालिदासाचा प्रभाव असल्याचे लक्षात येते.

कालिदासरचित कुमारसंभवम् च्या उमाबटुसंवादनामक पाचव्या सर्गातून काही शब्द लेखकाने जसेच्या तसे वापरलेले आहेत.

उदा. अवनताङ्गि, अद्यप्रभृति तव (अहं) दासः, असे प्रीतगौरीगिरीशम् मध्ये म्हटले आहे तर कुमारसंभवात अवनताङ्गि अद्यप्रभृति तवास्मि दासः अशी रचना आहे.

प्रीतगौरीगिरीशम् मध्ये अनेक ठिकाणी कुमारसंभवम् मध्ये वापरलेल्या शब्दांना समानार्थी असणाऱ्या सोप्या शब्दांचा वापर केलेला दिसतो.

उदा. कुले प्रसूतिः प्रथमस्य वेधसः या कुमारसंभवातील वाक्याला समांतर असणाऱ्या प्रीतगौरीगिरीशम् मधील वाक्यात विधातुः कुले जन्म अशी रचना आढळते. यावरून प्रसूतिः या शब्दाच्या ऐवजी जन्म असा समानार्थी सोपा शब्द प्रस्तुत सांगितिकेत वापरलेला दिसतो.

कालिदासाच्या कुमारसंभवाव्यतिरिक्त इतर कलाकृतींचा त्यातही प्रामुख्याने रघुवंशाचा प्रभावही प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेत दिसून येतो.

उदा. प्रीतगौरीगिरीशम् च्या सुरवातीला श्रूयतामिदं जगतः पित्रोश् चरित्रकौतूहलम्। आणि भरतवाक्यामध्ये येणाऱ्या वाचामर्थैः सह परिणतः। या रचनांमध्ये वागर्थाविव सम्पृक्तौ वागर्थप्रतिपत्तये । जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ।। या कालिदासाच्या रघुवंशातील रचनेचे प्रतिबिंब दिसून येते.

**प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेवरील तत्त्वज्ञानाचा प्रभाव**

प्रीतगौरीगिरीशम् ही जरी शृङ्गाररसप्रधान कलाकृती असली तरीदेखील यामध्ये काही ठिकाणी भारतीय तत्त्वज्ञानपर वाङ्मयाचा प्रभाव जाणवतो.

उदा. उमेने केलेल्या शंकराच्या आरतीमध्ये 'ईशावास्यमिदं चेत् सकलम् ।' या वाक्यातून ईशावास्योपनिषदाच्या प्रथम मंत्राची आठवण होते.

'नाहं त्वां जानामि तत्त्वतः ..........जनोऽयं कृतार्थतां नीयताम्।'या ओळींमधील भाव आद्य शंकराचार्यकृत भवान्यष्टकाची आठवण करून देतो ज्यामध्ये आचार्य म्हणतात की, 'न जानामि तीर्थं.........गतिस्त्वं गतिस्त्वं त्वमेका भवानि ।'

अशाप्रकारे प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेवर उपनिषदांचा आणि स्तोत्रवाङ्मयाचाही प्रभाव पडलेला आहे, हे लक्षात येते.

**प्रीतगौरीगिरीशम् मधील सांगितिक बाबी**

प्रीतगौरीगिरीशम् या नावामध्येच अनुप्रास अलंकार दिसून येतो. अनुप्रासाचा यथेच्छ वापर प्रस्तुत सांगितिकेत केलेला असून त्याद्वारे लेखकाने गेयता साधली आहे. याशिवाय यमक अलंकाराचाही येथे गीतनाट्य फुलवण्याच्या दृष्टिने वापर केला आहे. संस्कृत भाषेत दुर्मिळपणे वापरलेल्या आणि मराठी भाषेतील पद्यांमध्ये मुक्तपणे वापरलेल्या चरणान्तयमकाचा वापर हे या सांगितिकेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेत आर्या हे नेहमीचे मात्रावृत्त सोडून इतर अनेक मात्रावृत्तांचा वापर केलेला आहे. यामुळे सुद्धा नाटकाची गेयबद्धता वाढली आहे.

संगीताच्या दृष्टिने अनेक ठिकाणी प्रयोजनानुकूल संधिविच्छेद करण्यात आले आहेत. या संधिविच्छेदांमुळे गायनाच्या दृष्टिने शब्दोच्चार सुलभ होतात आणि नाटकाची संवादात्मकता टिकून राहते. संधिविच्छेदांमुळे आधुनिक काळातील परिवर्तनशील संस्कृत भाषेचे दर्शन रसिकांना घडते.

मराठी भाषेतील आरती, करूणाष्टके आणि स्वागतगीत या तीन संगीत प्रकारांचा संस्कृत आविष्कारही प्रस्तुत सांगितिकेत पहायला मिळतो. उमेने गायलेली शंकराची आरती अतिशय हृद्य आहे. तसेच उमेने शंकराला मनापासून घातलेली साद मराठी भाषेतील करूणाष्टके किंवा अभंग सदृश भक्तिगीतांची आठवण करून देणारी आहे. उमेने बटूचे स्वागत करण्यासाठी म्हटलेले गीत म्हणजे मराठी संस्कृतीत अनेक ठिकाणी म्हटले जाणाऱ्या स्वागतगीताचा सुंदर असा संस्कृत आविष्कारच होय.

**प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेवर आधुनिक मराठी भाषेचा प्रभाव**

प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेवर मराठी संगीत रंगभूमीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. संस्कृत गीतनाट्याची निर्मिती करण्याच्या लेखकाच्या संकल्पनेमागे 20व्या शतकामध्ये सुवर्णकाळ असणाऱ्या मराठी संगीत रंगभूमीचा प्रभाव असावा. कारण प्रस्तुत सांगितिकेमध्ये वापरण्यात आलेली पद्यरचना मराठी संगीतनाटकांशी साधर्म्य दर्शवणारी आहे.

संवादात्मकता साधण्यासाठी वापरलेले 'आम्, ज्ञातम् .....' किंवा 'अम्मो, भगवन् ......'यांसारख्या वाक्यरचनेवर मराठी बोलीभाषेतील 'होय, कळलं.........'आणि 'अय्या......' अशा उद्गारांचा प्रभाव पडलेला आहे, हे लक्षात येते.

भरतवाक्यातील 'कण्ठाश्लेषं रसयति धरा दिव्यलोकस्य यत्र ।' या वाक्यावर मराठी भाषेतील प्रसिद्ध कवी ग. दी. माडगूळकरांच्या प्रसिद्ध अशा गीतरामायणातील' आकाशाशी जडले नाते धरणामातेचे.......या प्रसिद्ध ओळींची छाप आहे, असे लक्षात येते.

काही ठिकाणी मराठी कवितांमध्ये वापरण्यात येणाऱ्या शब्दद्विरूक्तीचाही प्रभावी वापर प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेत केला आहे.

उदा. अकाली वसंत ऋतूचे आगमन सूचविताना सखी आणि उमा कविता उच्चारल्यासारखे कुञ्जे कुञ्जे विपिने विपिने सपदि पुष्पिता द्रुमाः ..... असे गीत म्हणतात

**उपसंहार**

कालिदासरचित उमाबटुसंवादाचे विस्तृत भाषण नाट्यमयतेच्या दृष्टिने प्रस्तुत सांगितिकेत संक्षिप्त केले आहे. मूळ महाकाव्याच्या प्रसंगातील नाट्यमयता शोधून त्यावर आधारित सांगितिका रचण्याचे लेखकाचे कौशल्य अतुलनीय आहे.

कालिदासाच्या मूळ कलाकृतीचे सौंदर्य अबाधित ठेवणे आणि कालिदासाचे विनम्रपणे अनुकरण करत स्वकलाकृतीचे नाविन्य जपणे या दोन्ही गोष्टी लेखकाने प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेमध्ये साधल्या आहेत.

अलंकार व वृत्ते यांचा संगीतानुकूल वापर, आधुनिक काळातील रसिकांना रूचेल अशा प्रवाही, अर्थगर्भ, सुगम संस्कृत भाषेचा उपयोग आणि कथानकातील नाट्यमयता व रसपरिपोष जपण्यासाठी केलेले प्रयोगानुकूल बदल ही प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत.

आधुनिक काळातही संस्कृत भाषेमध्ये होणारी सकस साहित्यनिर्मिती, मराठी सारख्या प्रादेशिक भाषांकडून संस्कृत साहित्यात होत असणारे आदानप्रदान आणि त्यातून दिसून येणारे संस्कृतभाषेचे प्रवाहीपण व परिवर्तनशीलता या सर्व गोष्टी प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेच्या अध्ययनातून दिसून येतात.

एकविसाव्या शतकातही संस्कृत भाषेच्या वाङ्मयकोशात अनुवादित साहित्याशिवाय अनेक दर्जेदार, नाविन्यपूर्ण कलाकृती निर्माण होत आहेत, हेच संस्कृतभाषेचे श्रेष्ठत्व प्रीतगौरीगिरीशम् या सांगितिकेच्या अध्ययनातून लक्षात येते.

## संदर्भग्रंथसूची

1.कण्टकार्जुनः, प्रीतगौरीगिरीशम्, ज्ञानमुद्रा, पुणे, 1993

2.त्रिपाठी ब्रह्मानन्द, कालिदास – ग्रन्थावली, चौखम्बा सुरभारती प्रकाशन, वाराणसी, 2002

3. ईशादि नौ उपनिषद्, गीताप्रेस, गोरखपूर, 1998

# पं.म.स. आपटीकर यांचे संस्कृत स्तोत्रांचे योगदान

**घाडगे शंकर धारबा**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरमहाविद्यालय, राणीसावरगाव,ता. गंगाखेड, जि. परभणी

shandhaghadge358@gmail.com

## सारांश

21 व्या शतकातही अनेक संस्कृत साहित्यिक, कवि होवून गेलेले आहेत. काही कारणास्तव त्यांचे साहित्य प्रकाशात येवू शकलेले नाहीत. मी संस्कृतचे अभ्यासक आशा विखुरलेल्या कवि व त्यांच्या साहित्याला प्रकाश झोतात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. पं.म.स. आपटीकर यांनी संस्कृत भाषेचे धडे न गिरविताही संस्कृत भाषेत खूप मोठी साहित्य रचना केलेली दिसून येते. पं.म.स. आपटीकर यांचे 21 व्या शतकातील संस्कृत साहित्यात खूप मोठे योगदान आहे म्हणून मी पं.म.स. यांचे बालपण, शिक्षण, लेखन व काव्य रचना या अनुषंगाने विचार विनिमय करून त्यांचे संस्कृत स्तोत्र रचना वाङ्मय घेऊन प्रस्तुत शोधनिबंध प्रकाश झोतात आणण्याचा प्रयत्न करीत आहे.

## प्रस्तावना

शतकानुशतके नवनवीन विचार देणाऱ्या संस्कृत भाषेबाबत आज वाद-प्रतिवाद आढळत असले तरीही दिन-प्रतिदिन संस्कृत भाषेचे महत्व वाढतच आहे. आजही अनेक विद्वान संस्कृत भाषेत नियतकालिके, वर्तमानपत्र, साप्ताहिक, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके,षण्मासिके, वार्षिक यासह महाकाव्ये, खंडकाव्ये, गीतिकाव्ये, सुभाषिते, कथा, स्तोत्रे, रूपके अशा संस्कृत साहित्याची रचना करत आहेत. अशा ह्या विद्वानापैकीच पं. महादेव सखाराम आपटीकर यांनी सन १९५० पासून विविध संस्कृत रचना करण्यास प्रारंभ केला. त्यांच्या साहित्यातून अर्वाचीन काळातही संस्कृत साहित्यात नवनिर्मिती होत आहे म्हणून पं. महादेव सखाराम आपटीकर यांनी मराठी व संस्कृत साहित्याची रचना केलेली आहे. प्रस्तुत शोध निबंधामध्ये पं.म.स. आपटीकर यांनी रचलेल्या संस्कृत स्तोत्रांचे आढावा घेऊन त्यांचे २१ व्या शतकात संस्कृत स्तोत्र साहित्यातील योगदान मोलाचे असल्याचे स्पष्टपणे दिसून येणार आहे.

**अ) जन्म, बालपण व शिक्षण**

पं. महादेव सखाराम आपटीकर यांचा जन्म २३ एप्रिल १९१२ साली शिरवळ या गावी झाला असून त्यांच्या आईचे नाव जानकी व वडिलांचे नाव सखाराम होते नंतर भोरजवळ आपटी या गावी त्यांच्या बालपणाची नऊ वर्षे गेली. त्यांनी नवव्या वर्षी आईला रामायण व महाभारत हे ग्रंथ वाचून दाखविले होते. भोर येथेच राजा रघुनाथ हायस्कूलमधून मॅट्रिक पास झाले. त्यांनी अत्यंत गरिबीत दिवस काढले होते. अन्न खायला नसताना दोन-दोन दिवस कडू-लिंबाचा पाला खाऊन भूक शमवित होते. मित्रांकडून पुस्तके आणून रात्री जागरण करून अभ्यास करीत होते. महाविद्यालयीन शिक्षण फर्ग्युसन कॉलेज पुणे येथून पूर्ण केले.

**ब) नौकरी व लेखन प्रेरणा :-**

इ.सन. १९३८ मध्ये पं.म.स आपटीकर हे न्यू इंग्लिश स्कूल, सातारा येथे माध्यमिक शिक्षक म्हणून रुजू झाले. पुढे त्यांनी लवकरच डी.पी.एड ही पदवी संपादन केली होती. त्या महाविद्यालयाची गरज जाणुन त्यांनी बी.ए. ला इंग्रजी विषय असूनही संस्कृत हा विषय शिकविण्याची जबाबदारी स्वीकारली होती. कारण लहानपणापासूनच घरात संस्कृतचे

बाळकडू मिळालेले होते. संस्कृत विषय शिकविताना त्यांनी कधीच हातात पुस्तक घेतले नाही. तसेच व्याकरण सुद्धा सहज सांगत होते. शाळेत शारीरिक शिक्षणाचेही प्रमुख होते. विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षक होते.

**क) काव्य रचना :-**

पं.स.म. आपटीकरांनी शालेय जीवनात मराठी काव्यरचना करीत होते. त्यांनी बालपणापासूनच अध्यात्माची ओढ होती. ध्यानधारणा, योगासने, सूर्यनमस्कार हा व्यायाम पाहटे वय वर्ष ९५ पर्यंत करीत होते. त्यांनी संस्कृत व मराठी साहित्यात नवनवीन रचना केलेल्या आहेत. काही मराठी ग्रंथाचे संस्कृत भाषेत तर काही संस्कृत ग्रंथाचे मराठीत अनुवाद केलेले आहेत. त्यांनी ३०० पेक्षा जास्त संस्कृत सुभाषितांची रचना केलेली आहे. यांचे समग्र वाङ्मय पुढीलप्रमाणे आहे.

**१) प्रकाशित संस्कृत साहित्य :-**

१)बिल्वदलमाला (शिवस्य १११ स्तोत्राणि त्रीशेलकात्मकाति) २) शिवस्तोत्रतारावली (शिवस्य २८ स्तोत्राणि) १

३) स्तोत्रपञ्चदशी (विवध देवतांना १५ स्तोत्राणि) १

४) ऋतुगीतम (नृत्यनाट्यम्) १

**२) अप्रकाशित संस्कृत साहित्य :-**

अ) सुभाषितांनी । आ) अन्यतमानि स्तोत्राणि

इ) बालगितानि ई) गन्धमूल्यम् (सांगीतिका)

उ) अन्यकाव्यानि

**३) प्रकाशित संस्कृतानुवाद :-**

१) रामदासकृत २) करुणाष्टकानि ।

३) भीमरूपी स्तोत्रम् ।

**२) ज्ञानेश्वरकृत :-**

१) गीर्वाण- हरिपाठः (२८ अभंगः)

२) चांगदेवपञ्चषष्ठीः (६५ श्लोकाः)

३) मुक्ताईविरचित – द्वारं ज्ञानिन्नपावृणु (११ अभंगाः)

४) तुकारामरचित – नित्यपाठाभङ्गः

**४) अप्रकाशित संस्कृतानुवाद :-**

१) स्वरूपानन्दस्य वर-प्रार्थना ।

२) अद्य सुवर्णस्य दिनम् ।

**५) प्रकाशित मराठी अनुवाद :-**

संस्कृत-व्याव्हार सहस्त्री (१००० वाल्यांनि संकृत मराठी)

**६) अप्रकाशित मराठी- अनुवाद :-**

१) श्रीमद्- आद्य- शंकराचार्यकृत :-

अ) अपरोक्षानुभूतिब) प्रबोध सुधाकर

क) मोहमुद् गर

२) ईशाषास्योपनिषद्३)शिवसंकल्पसुक्त

४) डॉ.श्री.भा. वर्णेकर- रचित संघगीत

**७) मराठी साहित्य :-**

१) धुमकेतू- स्फुट कवितांचा संग्रह (४४)

२) संगीतिका - अभिमन्यु, एकलव्य, औदार्य, मानसकन्या, सावित्री, शास्त्रसाधना, उपलब्ध नाही.

३) जीवनलहरी ४) अभंगाजलि

५) कवित (४५) ६) बालगीते – चिमणचार, पूनमचांदणे

७) देशभक्तीपर (२४) गिते ८)दिनकरकृत – उर्वशी महाकाव्यांचा- अनुवाद उपलब्च झाला नाही.

**९) शेवटची इच्छा- पं. नेहरू (पद्यानुवाद) :-**

अशा प्रकारे पं.म.स. आपटीकर हे संगीत, राग, काव्य साहित्यशास्त्र यांचे यथार्थ ज्ञान असणारे प्रतिभावंत सिद्धहस्त कवी असल्याचे दिसून येते.

**ड) स्तोत्र साहित्य रचना :-**

कवी मम्मटांनी सांगितलेल्या सहा प्रयोजानापैकी, 'शिवेतराक्षतये' करण्यासाठी काव्यनिर्मिती केली जात होती. यामुळे उपास्य देवतांच्या पुजेसाठी किंवा मानसिक

शांततेसाठी लिहिलेली देवतांची स्तोत्रे सर्वच, भाषेमध्ये आढळतात, ईश्वराची स्तुती व त्याला कळवयाची केलेली प्राथना या गोष्टी ज्यात असतात त्याला स्तोत्र असे म्हणतात 'स्तुयते अनेन इति।' ज्याच्या सहाय्याने स्तवन केले जाते ते स्तोत्र होय.

ऋग्वेद काळात अग्नी, इंद्र इत्यादी, स्तोत्र, होत तर पुराणकरांच्यामते ऐहिक वैभवापेक्षा मानवाचे आत्मकल्याण साद्य करणारे स्तोत्ररचना होती. शंकराचार्यांच्या काळानंतर शिव, विष्णू, देवी, गणपती सूर्य या पाच देवतांना महत्व आले. विष्णूच्या मत्स्यकुर्मापासून रामकृष्णापर्यंतचे अवतारही सर्व दैवते स्तोत्रांचे विषय बनली आहेत. पुराणात तर अशा अनेक देवतांच्या स्तोत्रांची भांडारेच आहेत. बौद्ध, जैन अचार्यांनीही स्तोत्रे रचलेली आहेत. तसेच काही स्तोत्रे नृत्यगीत साहित्यप्रकारात रचलेले आहेत. उदा. जयदेवाचे 'गीतगोविदम्' भारतीय उपासना परंपरेत भक्तीमार्गात स्तोत्र साहित्याचे स्थान आढळ आहे.

प्राचीन काळापासून आजतागायतपर्यंत स्तोत्र वाङ्मयाची भर पडत गेलेली आहे. २१ व्या शतकातील विवध विषयावर स्तोत्र रचना करणारे पं.म.स. आपटीकर होत. यांनी रचलेल्या काही देवतापर स्तोत्राचे उदाहरणे देऊन विवेचन करीत आहे.

**इ) पं.म.स. आपटीकर यांचे स्तोत्र वाङ्मय :-**

**१) शिवस्तोत्रे :-**

पं.म.स. आपटीकर यांनी बिल्वदलमाला या ग्रंथात शिवला स्तुतीपर १११ बिल्वदले वाहिलेले आहेत. या शंकराच्या विविध नावांची, विशेषणाची, साम्बोधनाची व गुणवर्णनांची भावपूर्ण गुंफण केलेली आहे. बिल्वदलमालेच्या प्रथम पानावरील एका श्लोकात आपटीकर यांना आई-वडील गुरूच्या ठिकाणी शिवाचे अस्तित्व जाणवले आहे.

**मातपिता गुरुस्त्रता त्वमेवासि मम प्रभो ।**
**पुत्रस्य बाल-लीलाभिस्तुष्टो भव महेश्वर ।।**

**बिल्वदल ग्रंथातील १११ पैकी नाममात्र एक स्तोत्र पाहणार आहे.**

**त्रिलोचनं त्रिशूलिनं त्रितापतापहारिणं**
**त्रिदोषदोषनाशिनं त्रिलोकसौख्यकारिणम् ।**
**त्रिकालभक्तरक्षकं त्रिवर्गलाभदायकं**
**त्रिलोकनाथमीश्वरं नमाम्यहं सुरार्चीतम् ।**

हे स्तोत्र १२ व्या दलातील असून यात कवीने तीन या संख्येचे महत्व प्रतिपादन केलेले आहे. त्रिलोचन-सूर्य- चंद्र- अग्नी, त्रिताप-अधि-भौतिक-अधिदैविक-आध्यात्मिक, त्रिदोष-वात-पित्त-कफ,त्रिलोक-स्वर्ग-पृथ्वी-पाताळ,त्रिकाल-भूत-वर्तमान-भविष्य,त्रिवर्ग-धर्म-अर्थ-काम, त्रिलोक-श्रेष्ठ-मध्यम-कनिष्ठ या संख्याविशेषणांना जोडलेली क्रियाविशेषणेही अत्यंत यथार्थ आहेत.

शिवस्तोत्रतारावली यात-कवीने भगवान शंकरराव २६८ श्लोक १०७५ ओळीनीयुक्त २८ स्तोत्रे रचलेली आहेत. ही २८ स्तोत्रे विवध संस्कृत वृत्ते-जाती-अलंकार यात रचली आहेत. यातील २८ वे स्तोत्र अतिशय महत्वपूर्ण आहे. यात श्लोक क्रमांक १ ते ८ मधील आद्याक्षरे महादेवविरचिता ही शब्दकला साकारली आहे.

**महेश्वरं महादेवं महेशानं महाद्यूतिम् ।**
**हाटकेश्वरनामानं हारभूषित कन्धरम् ।**
**देवेन्द्रपूजितं देवंदेव देवेशमीश्वरम् ।**
**वराभयकरं व्याद्यं वरेण्य वरदायकम् ।**
**विनाशकं च विद्यानं विनायकगुरुं विभूम ।**
**रितिप्रियन्तकं रम्यं रजनी शविभूषितम् ।**
**चिताभस्माङ्कितं शर्वं चित्तमालिन्य हारिणम् ।**
**ताण्डवे सततं मग्नं तापसाणददायक्रम् ।**

या स्तोत्राने कवीचे मनोज्ञ दर्शन घडते.

**२) गणेश स्तोत्र :-**

गणेश देवतेवर श्रीगणेशाष्टकम्, श्रीगणेशस्तवनम् व ध्यानम अशी, स्तुतीपर स्तोत्रे रचलेली आहेत.

**सुदूर्वाकुरैरेंक्तु पुष्पैर्लसन्तं सदा मोदकैर्मोदमानं गरस्यम् ।**
**शमीपत्रतुष्टं सुगन्धप्रियं त्वां भावाम्भोधिभाग्नो भवन्तं भजे हम्**

या अष्टकात गणेशाला या संसार सागरातून तारण्याची विनवणी केली आहे.

**३) रामे स्तोत्र :-**

कवीने ९ श्लोक प्रभू रामचंद्राचे वंश, गुणवैशिष्टे आणि कार्यकर्तत्व यावर प्रकाश टाकलेला आहे.

**नमामि दानवान्तकं नमामि तं चिदात्मकम् ।**
**नमामि भक्तिगोचरं नमामि तं प्रात्परम् ।**
**नमामि चित्तशान्तिदं नमामि सर्व सौख्यदम् ।**

**४) दत्तस्तोत्र :-**

कवीने ९ श्लोकात दत्तगुरुचे महत्व स्पष्ट केलेले आहे.

**दु:ख-हुताशन-तप्तमधीरं दत्त दयार्णव दीनजनं माम।**
**तारय पाहि निरन्तर-तप्तं दत्तगुरो प्रणमामि सदा हम् ।।**

कवी दत्तगुरूकडे दु:खरुपी अग्नीतुन स्व:ताला वाचविण्यासाठी याचना केलेली दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंध वाढतच जात असल्याने थोडसं संक्षिप्त करीत आहे. कवीने कोणत्या देवतेवर किती स्तोत्र श्लोक रचले आहे याचा आढावा घेत आहे.

श्रीकृष्णावर-१४ स्तोत्र, ब्रह्मदेवतेवर- ३ स्तोत्र, भवानी देवीवर-१० स्तोत्र, दुर्गा देवीवर- ८ स्तोत्र, उमादेवीवर-१८ स्तोत्र, चण्डिकादेवीवर- ६ स्तोत्र, गंगा नदीवर- १० स्तोत्र, कृष्ण नदीवर-१० स्तोत्र, श्रीमन्दाकिनीवर- ८ स्तोत्र काही विभूतीवरसुद्ध स्तोत्र आहेत. तिलकं तं नमाम्यहम १० श्लोक, रवींद्रनाथ टागोर यांच्यावर राजयोगीन रवींद्र म्हणून ८ श्लोक रचलेले आहेत. गान्धीप्रशस्ति, गान्धी गौरवगानम् म्हणून महात्मा गान्धीवर २ श्लोक रचले आहेत. वह्नीशिखा म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकरावर १० श्लोक स्तोत्र, महामानवं तं प्रवन्दे अरविन्दम् म्हणून अरविंद घोषांवर ५ श्लोक स्तोत्र, संतावरही काही स्तोत्र आहेत- ज्ञानेश्वरं तं प्रणमामि म्हणून ९ श्लोक स्तोत्र, शिवानन्द स्वामिन – म्हणून शिवानंद स्वामीवर – ८ श्लोक स्तोत्र नमो वयं भक्तीयुक्तता: सदा तं म्हणून श्रीकांचिकामकोटी शंकराचार्य- श्री. चंद्रशेखरेंद्र- सरस्वती – स्वामि महाराजांच्या शताब्दी महोत्सवानिमित्व ४४ स्तोत्र श्लोक रचले होते.

आदर्श स्तोत्र म्हणून शिव राज्स्तव: शिवाजी महाराजावर ४ स्तोत्र श्लोक रचले आहेत, शरीरविषय क षटचक्रस्तोत्रम म्हणून शरीरातील चक्रांचे महत्व ७ स्तोत्र श्लोक, अवतार स्तोत्रात विष्णूच्या विविध अवतारांसंबंधी २ स्तोत्र श्लोक, पक्षी स्तोत्रात-विहङ्गराजस्तव: म्हणून ६ श्लोक स्तोत्र, निसर्गस्तोत्रन सप्तसप्तिकम् ४ श्लोक स्तोत्र रचलेले दिसून येतात.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) शर्मा उमाशंकर संस्कृत साहित्य का इतिहास
२) जोशी महादेव शास्त्री (संपा) भारतीय संस्कृतिकोष खंड-६.
३) आपटीकर म.स.बिल्वदलमाला.
४) शिवस्तोत्रतारावली, श्री. शिवप्रभातम्
५) खरवंडीकर दे. खं. गुञ्जारव: जुलै- सप्टेंबर-२०००
६) आपटीकरांची अप्रकाशीत स्तोत्र.

# विसाव्या आणि एकविसाव्या शतकातील महानुभावीय संस्कृत साहित्य

**मीनाक्षी सुभाष भांदककर**

स्व. मदनगोपाल मुंधडा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे, जि. अमरावती

bhandakkarms@gmail.com

## सारांश

*महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. इथे पुरातन काळापासून ते आजतागायत अनेक संत जन्माला आले. इसवी सनाच्या बाराव्या शतकात याच भूमीत स्वामी श्रीचक्रधर यांनी महानुभाव पंथाची निर्मिती केली. मराठी भाषेचा कैवार घेतलेल्या स्वामींनी आपल्या अनुयायांना सुद्धा मराठी भाषेतच तत्त्वज्ञानाचे निरूपण केले. त्यामुळे या पंथातील कविमनाच्या भक्तांनी प्रारंभकाळी पंथीय तत्त्वज्ञानाची मांडणी मायबोली मराठी भाषेतच केली. स्वामींचे जास्तीत जास्त भक्त हे विद्वान् ब्राह्मण असल्यामुळे त्यांचे मराठी सोबतच संस्कृत भाषेवरही प्रभुत्व होते. म्हणून कालांतराने अशा संस्कृतप्रेमी पंडितांनी पंथीय तत्त्वज्ञानाची रचना संस्कृत भाषेत करण्यास सुरुवात केली. तेव्हापासून आजतागायत या पंथात संस्कृत भाषेत साहित्यनिर्मिती होऊ लागली. प्रस्तुत लघु शोधनिबंधात केव विसाव्या आणि एकविसाव्या शतकात निर्माण झालेल्या महानुभावीय संस्कृत साहित्याचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

भारतीय तत्त्वज्ञान हे जगद्वंद्य आहे. जीव आणि परमेश्वर याविषयीच्या मतमतांतरामुळे हिन्दू धर्मात अनेक लहान मोठे पंथ दिसून येतात. या पंथांनाच संप्रदाय असेही संबोधले जाते. या सर्व संप्रदायांमध्ये ईश्वरी अवताराचे सखोल ज्ञान असलेला 'महानुभाव पंथ' हा महाराष्ट्रभूमीत शालिवाहन शकाच्या बाराव्या तर इसवी सनाच्या तेराव्या शतकात उदयाला आला. सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी हे महानुभाव पंथाचे संस्थापक आणि प्रवर्तक आहेत. आज 'महानुभाव' या नावाने हा पंथ जरी ओळखला जात असला तरी याची 'महात्मा', 'अच्युतगोत्रीय', 'जयश्रीकृष्णी पंथ', 'प्रतीतीपंथ', 'भटमार्ग', 'परमार्ग' अशी अन्य नावेही आहेत. 'महान् अनुभवो बलं तेजः यस्य सः महानुभाव:' म्हणजेच 'ईश्वराच्या महान अनुभवाची, बलाची आणि तेजाची ज्यांना अनुभूती आली आहे ते महानुभाव होत.'[१]असा या पंथाला ईश्वरानुभूतीविषयी विशेष अभिमान आहे. स्वामींनी आपल्या अवतार काळात ज्या शिष्य परिवाराला जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर या चार पदार्थांचे ज्ञान दिले त्यापैकी 'आचार्य नागदेव' हे अग्रगण्य होते. सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी यांच्या उत्तरापंथे गमनानंतर आचार्य नागदेव हे निरंतर स्वामींच्या लीळा आठवण्यात मग्न असायचे. आचार्यांसारखे आपल्यालाही स्वामींचे स्मरण आणि चिंतन करता यावे यासाठी माहिमभट्ट या अनुयायाने स्वामींच्या आठवणी शब्दबद्ध करून 'लीळाचरित्र' नावाच्या ग्रंथाची निर्मिती केली. हाच मराठी भाषेतील सर्वात पहिला चरित्रग्रंथ ठरला. माहिमभट्टांच्या याच प्रेरणेतून पुढे महानुभाव पंथात विविध प्रकारच्या ग्रंथनिर्मितीला सुरुवात झाली. स्वामींनी मराठी भाषा ही धर्मभाषा मानली असल्याने प्रारंभकाळात या पंथाचे सर्वच साहित्य हे केवळ मराठी भाषेतच प्रसूत झाले; परंतु अंतरीच्या कळा मनुष्याला स्वस्थ बसू देत नाहीत असे म्हणतात तेच खरे. म्हणूनच स्वामींच्या परावरज्ञानसामर्थ्याने त्यांच्याकडे जे विद्वान, तत्त्वज्ञानी, साम्प्रदायिक आणि रसिक पंडित आकृष्ट झाले होते ते संस्कृत साहित्याचे आणि व्याकरण शास्त्राचे गाढे अभ्यासक होते. बालपणापासून या सर्व पंडितांचे अध्ययन आणि अध्यापन देवभाषेतूनच झाले असावे. यासाठीच त्यांची संस्कृत भाषेवरील आस्था कायम होती. एखादी गोष्ट अंत्यत कुशलतापूर्वक करता येत असूनही

ती न करण्याचा आदेश असला की मनाची जी घालमेल होते तीच या विद्वानांची झालेली असावी. अंतरीच्या कळा अनावर झाल्यामुळेच म्हणूनच महानुभाव पंथ हा सर्वस्वी मराठी भाषेचे लावण्य वृद्धिंगत करण्यास कटिबद्ध असला तरी काही भक्तिवंत वैदग्ध्य कवींनी देववाणीचे लेणेही समृद्ध करण्याचा प्रयत्न केला. आचार्य केशीराज व्यास यांनी चौदाव्या शतकात लीळाचरित्रावर आधारित 'रत्नमालास्तोत्र' नावाचा महाकाय संस्कृत ग्रंथ रचला. याच ग्रंथाने महानुभावीय संस्कृत साहित्यातील पहिला ग्रंथ असण्याचा बहुमान पटकावला. तसे पाहिले तर स्वामींच्याच एकांक काळात त्यांच्या नीळभट्ट भांडारेकार या शिष्याने 'विंगुलिकास्तोत्र' नावाचे उत्स्फूर्त काव्य रचले होते; परंतु ते अत्यंत लघु असल्याने त्याचा स्तोत्रकाव्यात समावेश होतो. म्हणूनच असे म्हणता येईल की, 'सुमारे तेराव्या शतकापासून आजतागायत महानुभाव पंथात विपुल आणि विस्तृत प्रमाणात संस्कृत साहित्याची निर्मिती होत आहे.' यात प्रामुख्याने चरित्रात्मक, तत्त्वज्ञानात्मक, प्रबोधनात्मक, शिवेतरक्षतिस्तोत्रात्मक, लीळावर्णनात्मक इत्यादी कावयाचे अनेक प्रकार आढळतात. यात प्रामुख्याने पंडित केशिराज व्यासविरचित रत्नमालास्तोत्र, दृष्टांतस्तोत्र, ज्ञानकलानिधीस्तोत्र, दृष्टांतनामावलीस्तोत्र तसेच पंडित भास्करभट्ट बोरीकररचित 'चालीसाख्यस्तोत्रमूर्तिवर्णनम्, नरविलापस्तोत्र, संस्कृतपूजावसर प्रसिद्ध आहेत. पंडित आनेराजव्यास लिखित 'द्वात्रिंशल्लक्षणरत्नाकर, लक्ष्मीन्द्रभट्ट देऊळवाडेकर रचित 'ज्ञानभास्करस्तोत्र' इत्यादींचा समावेश होतो. या सर्व साहित्यग्रंथांचे तात्विक, साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, व्यक्तिचित्रणात्मक या दृष्टीने विविध पैलू अभ्यसनीय आहेत.

विसाव्या आणि एकविसाव्या शतकात महानुभावीय संस्कृत साहित्यनिर्मितीस पुनश्च एकदा उभारी आलेली दिसून येते. महानुभावीय संस्कृत साहित्यक्षेत्रात महंत सारंगधर पुसदेकर यांचे नाव आदराने घेतले जाते. प्राध्यापक पदावरून निवृत्ती स्वीकारून पंथीय दीक्षा स्वीकारलेले महंत पुसदेकर यांचे वास्तव्य अमरावती जिल्ह्यातील पुसदा या गावी असले तरीही ते सध्या संस्कृत गुरूकुलम, फैजपूर येथे विद्यार्थ्यांना आपल्या ज्ञानाचा अनमोल ठेवा व्यग्र झालेले आहेत. त्यांनी महानुभावीय तत्त्वज्ञानावर आधारित 'परमहंसशास्त्रपद्धती' आणि 'काव्यचूडामणी' या दोन स्फुटकाव्यात्मक ग्रंथांची निर्मिती केली आहे; परंतु ही दोन्हीही काव्ये आजतागायत अप्रकाशित आहेत.

एकविसाव्या शतकातच सर्वज्ञ श्रीचक्रधरस्वामींच्या जीवनचरित्रावर आधारित महंत दि. वि. बीडकर यांनी 'बालानां सुखबोधाय' साठी 'सार्थ सुबोधसर्वज्ञ श्रीचक्रधरलीलामृतम' या कथा स्वरूपातील संस्कृत ग्रंथाची रचना केलेली दिसून येते. बालगोपालांसाठी अत्यंत रमणीय आणि बोधप्रद अशा स्वामींच्या लीळा सुमधुर सुबोध संस्कृत भाषेतून समजावून सांगितल्या आहेत.

मूळ मराठी लीळाचरित्रात ७०० च्या वर लीळा आहेत; परंतु प्रस्तुत कथाकाव्यात स्वामींच्या एकूण १०८ लघुकथा वर्णिल्या आहेत. विस्तारभय आणि बालकांची आकलनशक्ती याचा विचार करूनच लेखकाने या ग्रंथात लीळारुपी कथा निर्मिल्या आहेत. या कथाकाव्याविषयी जळूकर वैद्य यांची अभिप्राय स्वरूपातील खालील प्रतिक्रया अत्यंत बोलकी आहे.

सर्वेषां सुखलाभाय, कथाभि: कीर्तितं खलु
सच्छिर्बिडकरोपाह्वैर्महन्तैर्नात्र संशय:॥
सरला सुगमा भाषा, कथा बोधप्रदा खलु
ग्रन्थोऽयं प्रेरणादायी, सर्वेषां नात्र संशय:॥[2]

या काव्याची भाषा अत्यंत सरल आणि सुगम आहे. यात कठिन संधी किंवा दीर्घ समासरचना आढळत नाही.

अलंकारांची रेलचेलही दिसून येत नाही. प्रासादिक आणि सुमधुर असलेली भाषा सहज गम्य आणि हृद्य आहे. बिडकर कवी आपल्या कथांमध्ये तृतीय भूतकाळाचा उपयोग वारंवार करताना दिसतात. भाषाकाठिण्य दिसत नाही. कवी अर्थविपुल शब्दभांडाराचे धनी आहेत म्हणूनच त्यांनी मूळ मराठी भाषेत असलेल्या ग्रंथाचे संस्कृत भाषेत इतक्या लीलया प्रवेश करून बालांचे मनोरंजन केले आहे.

अशाप्रकारे महानुभाव संस्कृत साहित्यात एकमेव असलेले हे कथाकाव्य नवप्रवेशित पंथीयांसाठी किंवा पंथीयेतर विद्वानांना लीळाचरित्र समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. महंत दि. वि. बिडकर यांनी अशाप्रकारचे महानुभावीय साहित्य रचून संस्कृत साहित्याच्या दालनातील बालसाहित्यामध्ये कमालीची भर घातलेली आहे.

विसाव्या आणि एकविसाव्या शतकातील महानुभावीय संस्कृत साहित्यापैकी अनेक ग्रंथ अप्रकाशित आहेत. काहींचा केवळ नामोल्लेख आढळतो. प्रा. मनोहरशास्त्री शेवलीकर यांच्या 'दृष्टांतस्तोत्रम्' या ग्रंथाच्या मलपृष्ठावर 'श्रद्धांजलिः' (1983), 'पुष्पांजलिः (1991), 'श्रीचक्रधरम' (1994) या संस्कृत काव्यांचा उल्लेख आढळतो. ही पुस्तके जालनापुरकर शास्त्री यांच्या टीकेसह प्रकाशित झाली असल्याचे कळते.

पंडित श्री भीष्माचार्य व्यास वाईन्देशकर हे अत्यंत विद्वान् आणि संस्कृत व्यासंगी होते. त्यांच्या 'संजीवनीस्तोत्र', 'पदारविंदस्तोत्र', 'महात्मदीक्षस्तोत्र', 'आम्नायस्तोत्र', 'ध्यानचन्द्र स्तोत्र, 'भीक्षास्तोत्र, 'गायत्रीस्तोत्र' आणि 'दत्तात्रेयप्रबंध' या त्यांच्या संस्कृत रचना अप्रकाशित आहेत.[३]

महंत दि. वि. बिडकर यांनी महानुभाव पंथावर आधारित तीन नाटके लिहिली जी त्यांनी जळगावच्या आकाशवाणीकेंद्रावरून प्रसारित केली होती. आजमितीला ही नाटके अप्रकाशित आहेत. अशाप्रकारे महानुभावीय कवींनी श्रीचक्रधर स्वामींची स्तुती करीत असताना आपली भक्तिभावना प्रकट करण्यासाठी जे गद्यपद्यात्मक संस्कृत साहित्य निर्माण केले ते आज संस्कृत साहित्याला अमूल्य असे आभूषण ठरले आहे. हा केवळ महानुभावीयांसाठीच नाही तर देववाणीच्या दालनात अमृताचे कुंभ प्राशन करत असलेल्या सर्वांसाठीच असलेला एक अनमोल ठेवा आहे.

संस्कृत ही अतिप्राचीन भाषा आहे. आजच्या काळात ही भाषा शिकून काय लाभ? असा प्रश्न कोणी विचारल्यास महानुभावीयांकडे याचे अत्यंत मार्मिक उत्तर आढळेल. म्हणूनच महानुभाव पंथ हां सर्वस्वी मराठी भाषेचा उदोउदो करणारा पंथ असला तरी आजही महानुभावीय वासनिक आणि महंत हे संस्कृत भाषेचा अभ्यास करताना दिसून येतात.

विसाव्या आणि एकविसाव्या शतकात महानुभावीयांनी केवळ संस्कृत साहित्याचीच रचना केली नाही तर भारतीय आध्यात्म क्षेत्रातील संस्कृत भाषेचे महत्त्व जाणून या भाषेचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी संस्कृत विद्यापीठाची निर्मितीही केलेली आहे. पंथातील काही विद्वान महंतांनी याकडे लक्ष पुरविले आणि आजच्या विज्ञान युगातील सुशिक्षित माणसाला भक्तिसंपन्न करण्यासाठी आणि भक्तिवानाला ज्ञानवंत करण्यासाठी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यात माळवाडगाव येथे सर्वज्ञ विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. तसेच महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात 'श्रीचक्रधर गुरूकुलम' हे संस्कृत महाविद्यालय आहे. येथे सर्वच महानुभाव धर्माग्रंथान्चा अभ्यास होत असला तरीही महानुभावीय संस्कृत साहित्याचा समावेशही पाठ्यक्रमात केलेला दिसून येतो. 'महानुभावीय आजही संस्कृतच्या प्रचारप्रसारासाठी अहोरात्र झटत आहेत' अशा मताची एक प्रतिक्रिया नागपूर विद्यापीठाच्या संस्कृत

विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. के. रा. जोशी यांनी दिलेली आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे झाल्यास, 'एवं गते$पि मराठीभाषायां धर्मभाषात्वेन मानयन्तो महानुभावा: पुनरपि संस्कृतम अधिगन्तुं प्रयतिता: दिवं गताः आराध्य मुरलीधरशास्त्रीण: स्वयं फैजपुरे आजीवनं संस्कृतमहाविद्यालयं संस्कृतं अध्यापयितुं प्रचलितवन्तः/ सम्प्रदायस्य दार्ढ्यार्थे, प्रसारार्थे प्रचारार्थे च भारते तथा प्रवृत्ति: स्वाभाविकी तिष्ठति/ साम्प्रतं देशीभाषामुखेन संस्कृतोन्मुखीकरणं यथा समाजहिताय भवति तथा अद्यत्वे सुबोधसंस्कृतोपयोगेन संस्कृतदिशा समाजप्रवर्तनं श्रेयसे भवति/"[४]

मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव येथील निवृत्त संस्कृत प्राध्यापक म. मो. केळकर यांची प्रतिक्रया महानुभावीयांच्या संस्कृत साहित्याच्या योगदानासाठी अत्यंत मार्मिक आहे. ते म्हणतात, "माननीयेन श्रीबिडकरमहोदयेन श्रीचक्रधरस्वामिनः जीवने घटिता: घटना: वर्णिता:/ एता: घटना: मूलतः मराठी भाषायां एव लिखिता: सन्ति / तत् संस्कृत भाषांतरस्य किं प्रयोजनम्? इति केचित् आक्षेपं कुर्युः/ संस्कृतभाषा सर्वभाषाणां जननी/ दाक्षिणात्या: भाषा: संस्कृताधारा: एव/ अतः एताः कथाः दक्षिणभारते उत्तरभारते$पि प्रसारिता: भवेयु: इति संस्कृतानुवादस्य प्रयोजनं इति मे मतिः/"[५]. महानुभावीय संस्कृत साहित्य यत्रतत्र विखुरलेले आहे. त्यांना एकत्रित करणे म्हणजे महाराष्ट्रच काय; परंतु संपूर्ण भारतभर जिथे कुठे महानुभावीय आश्रमात विद्वान भक्त ग्रंथ प्रकाशनाचे कार्य करत असतील अशा सर्व स्थळांना भेटी देऊन ग्रंथसंशोधन करणे गरजेचे आहे. हे अत्यंत कठीण कार्य आहे; पण अशक्य नक्कीच नाही. त्यामुळे प्रस्तुत शोधनिबंधात दिलेली संस्कृत ग्रंथांची नामावली किंवा ग्रंथांचे विवेचन हे एवढेच आहेत किंवा यापेक्षा अधिक संस्कृत ग्रंथ प्रकाशित तसेच अप्रकाशित स्वरूपात आढळणारच नाहित असे मुळीच नाही. म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की, आज महानुभाव संप्रदाय आणि त्यातील संस्कृत साहित्यातील अनेक संदार्भांचे नीट आकलन न झाल्याने या संप्रदायांसंबंधी गैरसमज अधिक आहेत. यासाठीच महानुभाव संप्रदाय आणि त्यातील संस्कृत आणि मराठी साहित्याचे यथायोग्य पुनर्संशोधन होण्याची आवश्यकता आहे.

## संदर्भ सूची -


1) महानुभावांची अक्षरलेणी, संपादक- डॉ. राजेन्द्र वाटाणे, पृष्ठ क्र. ५
2) सार्थ श्रीचक्रधर लीलामृतम्, दि. वि. बीडकर, अभिप्राय, पृष्ठ क्र. ३
3) पूजावसर, संपादक - महंत डॉ. श्री सोनपेठकर महानुभाव, पृष्ठ क्र. ८६
4) सार्थ श्रीचक्रधर लीलामृतम्, दि. वि. बीडकर, अभिप्राय, पृष्ठ क्र. 4
5) सार्थ श्रीचक्रधर लीलामृतम्, दि. वि. बीडकर, अभिप्राय, पृष्ठ क्र. 5

# विवेकानंद विजयम्महानाटकात वर्णित भारताचे सौंदर्य

**मीनल श्रीगिरीवार**

डॉ. सौ. इं.भा.पा. महिला महाविद्यालय औरंगाबाद

minalnimish2010@gmail.com

## सारांश

*आधुनिक संस्कृत साहित्यातील सुप्रसिद्ध 'विवेकानंदविजयम' हे संस्कृत महानाटक विवेकानंदांच्या जीवनावर आधारित दहा अंकी महानाटक आहे. महाविद्यालयीन नरेंद्राच्या जीवना पासून सुरु होणारे हे महानाटक नरेंद्र ते विवेकानंद असा दीर्घ व्रतस्थ जीवन प्रवासाचे वर्णन करणारे महानाटक आहे. या दहा अंकी महानाटकात नाटककाराने विवेकानंद यांच्या जीवनातील विविध प्रसंगांचे सविस्तर वर्णन केलेले असून त्यांच्या हिंदू धर्माच्या अद्वितीय ज्ञानामुळे हिंदू धर्माच्या तत्वांना एक नवीन प्रकाश मार्ग मिळाला ज्याद्वारे हिंदू धर्माच्या मूलभूत तत्त्वांना संपूर्ण विश्वाने मान्य केले. हिंदू धर्म हा सनातन धर्म आहे. हा विचार त्यांनी शिकागो धर्मपरिषदेत सर्व विद्वान विद्वानांनं पुढे मांडला. तत्पूर्वी भारताविषयी जाणून घेण्यासाठी त्यांनी भारत भ्रमणाला आरंभ केला . या भारत- भ्रमणा दरम्यान त्यांनी जे भारताचे अप्रतिम सौंदर्य आपल्या चक्षूनिं अनुभवले त्याचे सविस्तर वर्णन 'विवेकानंदविजयम्' महानाटकाच्या सातव्या अंकात वर्णिले आहे. भारत मातेच्या विविध रूपांची गुणांची , येथील थोर आणि पराक्रमी वीर पुरुषांची गाथा तसेच भारत मातेच्या उदरातून जन्माला येणारे विविध औषधी येथील, वेदविद्या, नद्या, पर्ववत, सागर यांचे मनोरम वर्णन या अंकात नाटककाराने विवेकानंदांच्या मुखातून मुक्तहस्ताने केलं आहे.*

*प्रस्तुत नाटकात विवेकानंदांच्या संपूर्ण जीवनाचा प्रवास मांडलेला आहे. त्यांच्या जीवनातल्या अनेक घटनांवर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. असे असले तरी या संपूर्ण विषयांवर चर्चा एका लेखात शक्य नाही म्हणून 'विवेकानन्दविजयम्' महानाटकातील सातव्या अंकातील विवेकानंदांनी केलेले भारत मातेचे सौंदर्य वर्णन एवढाच विषय मर्यादित करून यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.*

## प्रस्तावना

प्रज्ञाभारती डॉ.श्रीधर भास्कर वर्णेकर हे आधुनिक संस्कृत साहित्याचा अभ्यासक ,संस्कृतला पुनरूज्जीवन देणारे आधुनिक संस्कृत महाकवी आहेत. यांचा जन्म ३१ जुलै १९१८ रोजी विदर्भातील नागपूर येथे झालं. डॉ. श्री. भा. वर्णेकर यांनी चाळीसहून अधिक संस्कृत साहित्य रचना करूनआधुनिक संस्कृत साहित्याचा अनमोल ठेवा प्रदान केला आहे. भारतमातेवर मनापासून प्रेम करणाऱ्या डॉ. श्री. भा. वर्णेकर यांच्या लिखाणातही भारतमातेच्या रक्षणासाठी जीवन अर्पण करणाऱ्या थोर पुरुषांचा प्रभाव दिसून येतो.शिवाजी महाराजांवर 'शिवराज्योदयम' हे त्यांचे अतिशय प्रसिद्ध असलेले महाकाव्य .या महाकाव्याला साहित्य अकादमीचा पुरस्कारही प्राप्त झाला. भारत भूमीचे वीरपुत्र शिवाजी महाराजांवर आधारित त्यांनी 'शिवराज्याभिषेक' हे नाटक ही लिहिले. तर हिंदू धर्म तत्वाचे वास्तविक रूप जगासमोर मांडण्याचे धैर्य करणाऱ्या स्वामी विवेकानंदांच्या धर्म विजयावर आधारित विवेकानंदविजयम्' हे दहा अंकी महानाटक रचले.

साहित्य केवळ मनोरंजनात्मक नसून ते हिताचा उपदेश करणारेही असावे. याच तत्त्वाला साहित्यनिर्मितीचा उद्देश मानून डॉ.श्री.भा. वर्णेकरांनी समाजाचे विशुध्द मनोरंजन करणे हे प्राथमिक ध्येय डोळ्यासमोर ठेऊन नाटकाची रचना न करता समाजाची बौध्दिक, नैतिक उन्नती करणारे, भौतिक वादात अडकलेल्या, स्वैर जीवनातच आनंद मानणाऱ्या तरुण पिढीला आदर्श जीवनाची प्रेरणा देणारे साहित्य निर्माण केले. उपभोगवादी जीवनाला सत्य मानणाऱ्या, हिंदू धर्माच्या

ज्ञानापासून अनभिज्ञ स्वरूप जाणवून देण्यासाठी नाटककाराने 'विवेकानन्दविजयम्' या महानाटकाची रचना केली. या महानाटकाद्वारे त्यांनी केवळ स्वामी विवेकानंदांचे चरित्रच नाही तर त्यांच्या कर्तृत्वामुळे हिंदू धर्माला परत मिळालेले याचे उच्च स्थान सर्वांसमोर मांडले. अंधारात अडकलेल्याला ज्याप्रमाणे सूर्यप्रकाश मार्गदर्शक ठरतो. त्याप्रमाणेच जीवन जगत असताना मनुष्याच्या जीवनात आलेला अंध:कार नाहीसा करुन त्याला सुयोग्य जीवन जगण्यासाठी भगवद्गीता कशी मार्गदर्शक ठरते हे ज्या व्यक्तीने आपल्या जीवनाची जडणघडण होत असताना श्रीमद्भगवद्गीतेला आपले मार्गदर्शक मानले, अशी आदर्श जीवनप्रणाली असणाऱ्या स्वामी विवेकानंदांचे चरित्र व त्यांच्या धर्मविजयाचा आदर्श तरुण पिढीसमोर ठेवण्याच्या उद्देशाने 'विवेकानन्दविजयम्' हे संस्कृत महानाटक नाटककाराने रचले .

नाटकाच्या सहाव्या अंकात विवेकानंदांचे गुरु रामकृष्ण परमहंस हे समाधी स्वीकारतात.

त्यांची शिकवण आणि हिंदू धर्माचे तत्वज्ञान संपूर्ण जगताला पटवून देण्यासाठी रामकृष्ण यांच्या समाधीनंतर स्वामी विवेकानंद भारत भ्रमण करण्यास पायी निघाले. त्यांच्या संपूर्ण भारत पैदाल यात्रे दरम्यान त्यांनी अयोध्या, वाराणसी, आग्रा, वृंदावन, अलवर यासह अनेक ठिकाणी भेटी दिल्या. २३ डिसेंबर १८९२ रोजी विवेकानंद कन्याकुमारी या भारताच्या दक्षिण टोकाला जाऊन पोहोचले. तेव्हा त्यांनी समुद्रात उडी मारली आणि शिलाखंडावर जाऊन ध्यानात बसले.तेथे ते ३ दिवस गंभीर समाधीत राहिले. त्यावेळी भारतातील अलौकिक भौगोलिक सौंदर्य, देवतांचा पादस्पर्श जिला प्राप्त झाला आहे, अध्यात्मिक ज्ञानात सर्वश्रेष्ठ असलेल्याभारत मातेच्या दर्शनाने त्यांचे मन अधिकच हळवे झाले.

भारत मातेला लाभलेल्या या अलौकिक सौंदर्याचे अप्रतिम वर्णन डॉ. श्री. भा. वर्णेकर यांनी 'विवेकानंदविजयम्' सातव्या अंकात खालील प्रमाणे केलेली आहे.

**किरीटः सद्रत्नप्रभव इति गीतो नगपतिः**

**समुद्रोऽयं रत्नाकर इति मतो वल्गुवलयः ।**

**अजस्रं सम्पन्ना पुरुषमहिलारत्ननिवहै :**

**अहो राजत्येषा भुवनतलरत्न भरतभूः ।।६ ।।१**

श्रेष्ठ रत्नांचा स्त्रोत असलेला हिमालय पर्वत भारतभूमी चा मुकुट बनवून शिरोभागी शोभायमान आहे. ही भारत भूमी जणू स्त्री रत्नच आहे, तर समुद्र हे या भारतभूमीचे कंकण आहेत. भौगोलिक दृष्टीने भारताची आकृती ही अतिशय सुंदर असून समस्त भारत देश नरनारी रुपी रत्नांच्या समूहाने संपन्न आहे.

**अवाच्यां भूरेषा मलयजरजः सौरभमयी**

**प्रतीच्या माधुर्यप्रचुरफलसम्भारसुरसा ।**

**उदीच्या काश्मीर प्रभवकमनीयद्युतिमती**

**तथा प्राच्यामुच्चैर्विपुलकलमक्षेत्रसुभगा । ७।।२**

धनधान्याने समृद्ध असलेली ही भारत भूमी अधिकच सुंदर भासते. हीचं वर्णन करताना स्वामीविवेकानंद म्हणतात की " या भारतभूमीच्या दक्षिण दिशेला मलयगिरि पर्वत आहे जो चंदन निर्माण करतो ज्याच्या सुगंधामुळे संपूर्ण दक्षिण दिशा सुगंधित झालेली आहे. भारत देशाच्या पश्चिम दिशेला माधुर रसयुक्त फळ अधिक प्रमाणात निर्माण होतात. भारत देशाच्या उत्तर दिशेला कश्मीर पासून उत्पन्न होणारी मनोहरी आभावली आहे आणि पूर्व दिशेला तर विविध तांदळांच्या शेताने ही भूमी अधिकच सुंदर दिसत आहे ". या श्लोकात

नाटककाराने भारताच्या चारही दिशांना प्रामुख्याने उत्पन्न होणाऱ्या उल्लेख केलेला आहे.

**विधाता निर्माय प्रथितरचनं विश्वमखिलम्**

**अदृष्ट्वा चिन्तार्तो भगवदवतारोचितभुवम् ।**

**सरित्पूतां सस्यप्रचयविभवां रम्यविपिनाम्**

**तपोभूमिं पुण्यां तदनु भवतीं संघटितवान् ।।९ ।।३**

प्रस्तुत श्लोकात नाटककाराने भारताला निर्माण करण्यामागची ईश्वराची भूमिका काय असावी याचे अतिशय समर्पक वर्णन केलेली आहे. भारत भूमीच्या पवित्र रमणीय वैभवशाली स्वरूपाला बघून जणू विधात्याने संपूर्ण विश्वाला निर्माण केल्यावर भगवंताचा अवतार योग्य भूमीच नाही असे जाणून चिंतीत झालेल्या विधाने पवित्र जलाने युक्त नद्या असलेली, धन- धान्या राशीच्या वैभवाने युक्त, रमणीय वनांने नटलेली, तप: स्थली असलेली ही भारत भूमी निर्माण केली. ईश्वरांना अवतार घेण्यासाठी या भारत भूमी व्यतिरिक्त अन्य कुठलेही स्थान पावन नाही. भारतभूमीला

**म्हणूनच देवांची भूमी म्हटले जाते**

**शुभावम्भःकुम्भावुभयजलधी अत्र निहितौ**

**स्थिरारक्षौ पूर्वापरककुभवस्थौ गिरिवरौ ।।**

**सरिल्लेखारंगावलि हिमनगोच्चैःकलशमृत्**

**तवागारं पुण्यं भगवति शरण्यं विजयते ।। १० ।।४**

या भारत देशाच्या एकाबाजूला हिंद महासागर तर दुसऱ्या बाजूला बंगाल चा उपसागर हे दोन्ही सागर जणू शुभ जलघटाप्रमाणे आहेत . पूर्व आणि पश्चिम दिशेला विंध्याचल आणि अरवली पर्वत भारत देशाला स्थाई सुरक्षा देतात. नद्यांमुळे पंक्ती रुपी रांगोळी निर्माण झालेला हिमालय पर्वत रुपी उच्च कलश धारण करणारा हा भारत देश सर्वदा विजयी होवो. भारताच्या सीमा कशाप्रकारे निसर्गाकडूनच सुरक्षित आहे म्हणून हा देश नित्यविजयशील होवो अशी प्रार्थना स्वामी विवेकानंदांनी केलेली आहे.

**वसन्ते त्वं वाणी रसितरसिके कोकिलकुले**

**शरत्काले लक्ष्मीर्दिशि दिशि लसत्पद्मनिवहे ।।**

**अपर्णा हेमन्ते खलु गलितपर्णेषु तरुषु**

**विलोके त्वां मातः सततमभितो दैवतमयीम् ।।१३।।५**

ही भारत माता वेगवेगळ्या ऋतूंमध्ये कसे स्वतःचे रूप बदलते याचे अतिशय मनोहारी वर्णन नाटककाराने स्वामी विवेकानंदांच्या मुखातून केलेले आहे. स्वामी विवेकानंद भारत मातेत सरस्वती, लक्ष्मी आणि दुर्गा या तिघांचेही रूप बघतात या तिन्ही देवता क्रमशः विद्या, धन आणि शक्तीच्या प्रतीक आहेत. भारत देश विद्येच्या वैभवमुळे विश्वगुरू मानला जातो, धनाच्या बहुलतेमुळे 'स्वर्ण चटका' आणि महाशक्ती मानला आहे. ह्या वर्णनातून डॉ. श्री. भा . वर्णेकरांची अप्रतिम वर्णन शैली दिसून येते . विवेकानंद म्हणतात" हे माते वसंत ऋतु त कोकिळेच्या मधुर कूजनाने तू सरस्वती प्रमाणे भासतेस. प्रत्येक दिशेला उमललेल्या कमल समुहामुळे शरदऋतूत तू लक्ष्मी प्रमाणे शोभून दिसते तर हेमंत ऋतूत पतित पर्णामुळे अपर्णा भयंकर शक्तिशाली दुर्गेप्रमाणे भासतेस. खरोखरच ही भारत माता प्रत्येक ऋतूत देवतामयी रूप धारण केलेली मला दिसतेस."

**अयोध्या शत्रूणां , त्वमसि मथुरा पावनहृदां**

**खलानां वा माया जननि ! खलु काशी सुतपसाम् ।**

**अवन्ती चार्तानामयि विधृतकांची विमनसां**

**विमुक्तेरावत्यपि दिविषदां त्वं ननु पुरी।।१८ ।।६**

भारत माता तू मोक्ष प्रदान करणारी करणारी आहेस. तू शत्रूसाठी अयोध्या आहे म्हणजेच युद्ध करण्यास योग्य नाही .तात्पर्य युद्धात शत्रू कधीही जिंकू शकणार नाही. ज्यांचे हृदय पवित्र आहे अशांसाठी तू मथुरा आहेस. हे भूमी तू पापात्मा

पुरुषांसाठी नाही. दृष्टांतसाठी तू माया आहेस. श्रेष्ठ तपस्वीसाठी मुक्ती प्रदान करणारी काशी आहेस. दुःखी जणांसाठी तू अवंती आहेस. निस्पृह लोकांसाठी कांची समान आहेत. तेजस्वी पुरुषांसाठी तू मुक्तीचा द्वार असलेली. द्वारावती आहेस .

**प्रपाः पुण्याः शीतामलजलमयाः सप्तसरितः ,**

**प्रसन्नास्ते काश्मीरजमलयजोद्गन्धपवनाः । ।**

**सुगीतं पाथेयं तदुपनिषदां सारमतुलं**

**विमुक्तेमार्गे त्वं खलु सकलधर्माश्रमसमा । । १९ । ।७**

हे भारत माते! तुझ्या पवित्र शीतल स्वच्छ जलाने युक्त सातही नद्यांचे पाणी म्हणजे अमृत आहे. कश्मीर पासून उत्पन्न होणाऱ्या केसर मुळे आणि मलयगिरि पर्वतापासून उत्पन्न होणाऱ्या चंदनाच्या तीव्र सुगंधाने वायु देखील निर्मल सुगंधित झालेला आहे. उपनिषद् हे मोक्ष मार्गावर पाथेयाप्रमाणे आहेत.निश्चितच हे भारत माते तू सर्व धर्मांच्या आश्रमात प्रमाणे आहे.

**चिराय स्वर्भोगादुपग नुगुप्सा इव हि ते**

**तव ब्रह्मज्ञानामखिलजगदुद्धारमनसाम् ।**

**सदन्तेवासित्वं कथमपि समासाद्य विबुधा:**

**समीहन्तेऽवाप्तुं त्वयि जननि ! सायुज्यपदवीम् ।।२१ । ।८**

भारत भूमीच्या महिमेचे गुणगान करताना स्वामी विवेकानंद म्हणतात की " हे माते दीर्घकाळापर्यंत स्वर्गाचा उपभोग घेतल्यामुळे जुगुप्सा निर्माण झालेले देवतागण निश्चितच समस्त संसाराचा उद्धार करण्याच्या इच्छेने ब्रह्मज्ञानींचे शिष्यत्व प्राप्त करून तुझ्याच सायुज्य पदवीला प्राप्त करण्याची इच्छा करतात.

संपूर्ण भूमंडलावर ज्ञानभूमी म्हणून विख्यात असलेल्या ह्या भारत भूमीत सर्वप्रथम चारही वेदांचे उच्चारण महान ऋषींनी केले. जीव आणि ब्रह्म यांची एकता याच भूमीवर सर्वप्रथम सांगितल्या गेली. जेव्हा संपूर्ण संसार वाणीहीन होता दीन, शिशु प्रमाणे अज्ञान अंधकारामध्ये जीवन यापन करत होता तेव्हा गंगेच्या तटावर निर्मल प्रतिभारुपी ऋषीगण चारही वेदांचे उच्च स्वरांमध्ये गायन करत होते. म्हणूनच ज्ञानाची जननी म्हणून ही भारत माता संपूर्ण विश्वात ओळखली जाते.

हे भारत माते! तुझ्या पवित्र शीतल स्वच्छ जलाने युक्त सातही नद्यांचे पाणी म्हणजे अमृत आहे. कश्मीर पासून उत्पन्न होणाऱ्या केसर मुळे आणि मलयगिरि पर्वतापासून उत्पन्न होणाऱ्या चंदनाच्या तीव्र सुगंधाने वायु देखील निर्मल सुगंधित झालेला आहे. उपनिषद् हे मोक्ष मार्गावर पाथेयाप्रमाणे आहेत.निश्चितच हे भारत माते तू सर्व धर्मांच्या आश्रमात प्रमाणे आहे.

**न मूलं यत् किंचिन्नवमपि हि तेऽनौषधीमगि**

**न चामन्त्रं किंचित् तव सुरगिरो ह्यक्षरमणि । ।**

**अगङ्गा नो काचिल्लघुतरसरिच्चापि गणिता**

**न जीवस्त्वय्यम्ब शिव इति कश्चिन्निगदितः । । ३६ । ।९**

स्वामी विवेकानंद हे भारतातील प्रत्येक झाडाला वनौषधी स्वरूप बघतात, संस्कृत भाषेतील प्रत्येक अक्षर हा त्यांच्यासाठी मंत्रा प्रमाणे पवित्र आहे तर प्रत्येक नदी ही गंगा समान पावन आहे.

**शिवं सत्यं दिव्यं यदमृतमयं सुन्दरतरं**

**विभूतिश्रीमद्वा शुभमथ यदूर्जस्वलतमम् ।**

**असारे संसारेऽवगतपरसारे तदखिलं**

**श्रुतिश्वासोच्छ्वासे प्रथममिह तेऽभ्याविरभवत् ।। ५२ । ।१0**

या भारतभूमी व्यतिरिक्त या जगात सत्य - शिव - सुंदर असे काहीच नाही . ही सर्वांची आश्रयदाती आहे . या भारतभूमीने अनेक वीर पुरुषांना जन्म दिला . तुझ्या परमब्रह्म साक्षात्कारी रूपाचे अध्ययन करण्यासाठी आधुनिक युगातदेखील लोक तुझ्या चरणी लीन होत आहे .

**"रसैः सान्द्रं काव्यं जगति शिरसा धार्यमितरैः,**

**सुखप्राप्यं स्वर्गं नृपितगणयांचाभिरिह वा ।**

**चरित्रं शिक्षेरन् द्विजजनसकाशात् स्वकमिति ,**

**श्रुतो दिङ्गागैस्ते जननि ! सुयशोदुन्दुभिस्वः ।। ६२ । ।११**

या भारत मातेचे यशो रुपी दुंदुभी स्वर सर्वत्र निनादत आहे. या भारतभूमीत अनेक औषधी , गंगाजलरूपी अमृत अनेक शारीरिक व्याधींना दूर करण्यासाठी समर्थ आहे , तर मन : तापरूपी पापांपासून दूर करण्यासाठी संस्कृतवाणीरूपी संजीवनी याच भूप्रदेशात आहे . स्वर्गातील अप्राप्य सुख या धरतीवर प्राप्त होते .

**त्वदीयाना मातः सकलसुगुणानां खलु भवेत् ,**

**यदा काव्योद्गानं कविवरवचोभिः स्तुतिमयैः**

**तदा मन्ये शक्यं निविडवनपर्णालिगणनं .**

**परिच्छेदज्ञानं सुलममिव कुम्भैश्च जलधेः ।।८१ । ।१२**

या भारत मातेचे गुणगान सर्वत्र झाले आहे. या श्रेष्ठ गुणांची गणना करणे म्हणजे जंगलातील वृक्षांच्या त्यांची गणना करणे होय. घोड्याला समुद्राचे पाणी पिऊन संपत असे म्हणणे होय. म्हणजेच जशा या दोन्ही गोष्टी अशक्य आहेत तसेच भारत मातेचे गुणवर्णन पूर्ण करणे अशक्य आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात की या धरेवर मला जे स्वर्ग सुख प्राप्त होते ते अन्यत्र कुठेही होऊ शकत नाही. अन्य ठिकाणी मला उच्च स्थानावर बसण्यापेक्षा माझा या भारतभूमीवर पुनर्जन्म घेऊन मी मी कोणत्याही प्राण्याच्या स्वरूपात देखील तेच सुख प्राप्त करेल.

उपसंहार

अशाप्रकारे विविध श्लोकांनी स्वामी विवेकानंदांनी भारतमातेचे वर्णन केले व "माझ्या समक्ष स्थित असलेल्या भारत देशाचे मला उत्थान करायचे आहे हा आदेश मला ध्यानावस्थेत प्राप्त झाला. 'श्रीरामकृष्ण परमहंस यांच्या दिव्य आदेशानुसार सात महासागरांचे उल्लंघन करून आध्यात्मिक ज्ञानाने परिपूर्ण दीपप्रज्वलन करण्यासाठी मी परदेशी जाणार आहे असे म्हणून हा अंक येथेच समाप्त होता. सातवा अंक हा नाटककाराची वर्णनशैलीची प्रतिभा दर्शविणारा अंक आहे. नाटककाराने चौऱ्यांशी श्लोकांमध्ये हिमालय ते कन्याकुमारी तसेच वेदकालीन भारतापासून तर आधुनिक भारताचे सखोल परिपूर्ण वर्णन केले आहे .

'विवेकानंदविजयम् 'नाटकातील सप्तम अंक भारतमातेवरील भक्तीने ओतप्रोत भरलेला, भक्तिरसाचा आस्वाद देणारा अंक आहे. विवेकानंदांचे जीवन चरित्र वर्णन करत असताना त्यांच्या भारत यात्रेतील विविध ठिकाणचे वर्णन डॉ. श्री. भा. वर्णेकर यांनी अतिशय सखोलपणे केलेली आहे. भारत मातेच्या चारही दिशांचे, अध्यात्म ज्ञानाचे, ईश्वरीय भूमीचे, येथील वीर पुरुषांचे, पवित्र नद्यांचे, वृक्षांचे, समुद्राचे, महत्त्वाच्या धनधान्य यांचे, विविध ऋतूंचे, त्या ऋतूमध्ये भारत मातेच्या रूपात होणाऱ्या बदलाचे सविस्तर वर्णन 'विवेकानंदविजयम्' या महानाटकाच्या सातव्या अंकात ८४ श्लोकात नाटककाराने केलेले आहे. हे वर्णन वाचल्यावर निश्चितच भारताविषयी चा अभिमान जागृत होतो आणि तिचे हे सौंदर्य आपल्या नेत्रांनी बघण्याची इच्छा निर्माण होते.

**संदर्भ**


1. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक-४८८
2. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक-४८८
3. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक-४८८
4. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक-४८८

5. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक-४८८
6. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक-४८८
7. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक- ४८९
8. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक- ४८९
9. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक-४९०
10. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक-४९०
11. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७, पृष्ठ क्रमांक-४९१
12. प्रज्ञाभारतीयम् -'विवेकानंदविजयम्'- अंक ७ पृष्ठ क्रमांक-४९२

संदर्भ ग्रंथ सूची

१) प्रज्ञाभारतीयम् डॉ. श्री. भा.वर्णेकर महाशयानांसमग्र संस्कृत साहित्य संग्रह:- डॉ. श्री. भा.वर्णेकर, नागपूर, प्रथमावृत्ती

२)स्वामी विवेकानंद -राष्ट्राला आवाहन -श्रीकृष्ण शिवानंद स्मृतिग्रंथ माला नागपूर नववी आवृत्ती२००४

३) आधुनिक भारताचा इतिहास-प्रा. ब्रह्मानंद देशपांडे, कैलास प्रकाशन , औरंगाबाद ,द्वितीय आवृत्ती१९८६

४) माझा भारत अमर भारत- स्वामी विवेकानंद नागपूर प्रथमावृत्ती २००९

५) अर्वाचीन भारताचा इतिहास-प्रा. शं. रा. हणमंते प्रा. खांबटे, धारा प्रकाशन औरंगाबाद प्रथमावृत्ती

६) धर्मभूमी भारत आणि इतर लिखाण- स्वामी विवेकानंद अनु. भाग पहिला प्रा. सहस्त्रबुद्धे भाग दुसरा प्रा. वा. लेले नागपूर पाचवी आवृत्ती

७) आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद- गौतम घोष अनुवादक- माधव माडेकर पुनर्मुद्रण जानेवारी २०१०

# श्री गुलाबराव महाराज विरचित काव्य सूत्राचा परिचय

P.M. Gahukar

Adarsha science, J.B.Arts,Birla Commerce College Dhamabgaon rly, Dist. Amravati.

gapoonam2@gmail.com

**सारांश**

*प्रस्तुत शोध निबंधात प्रज्ञाचक्षू श्री गुलाबराव महाराज म्हणजे विदर्भातील माधानचे (अमरावती) एकोणिसाव्या शतकातील अर्वाचीन कवी, संत व दार्शनिक तत्वज्ञ होय. चवथ्या महिन्यात नेत्रहीन, खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे! अशी सर्वत: विपरीत परिस्थितीअसूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथ लेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे. श्री महाराजांची श्रीकृष्णाच्या ठिकाणी माधुर्य भक्ती असल्यामुळे त्यांनी भक्त कवींच्या काव्याला आधुनिक काव्य क्षेत्रात महत्वाचे स्थान मिळवून दिले आहे. श्री गुलाबराव महाराज यांचे संस्कृत सूत्र ग्रंथातील "काव्यसूत्र संहिता" याचा परिचय करून देण्याचा उद्देश आहे. या सूत्र संहितेत एकूण ८९ सूत्रे आहेत व पांच पादामध्ये उपलब्ध आहेत.*

## प्रस्तावना

**दिव्यां भव्यां सुबोधांच शुद्धामर्थं प्रदायिनीम ।**
**जननी सर्व भाषाणां वन्दे गीर्वाण भारती ।।**

विदर्भातील अलौकिक संतविभूति प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज विसाव्या शतकातील आधुनिक संत कवी व साहित्य सृजन कर्ता आहेत. त्याचबरोबर "मधुराद्वैताचे प्रणेते"; "समन्वय तत्वज्ञान महर्षि" व "अनध्यस्त विवर्त" हया नवीन संज्ञेचे प्रवर्तक, बालान्ध असूनही प्रज्ञाचक्षुने, तर्कवादी विलक्षण बुध्दीने, सर्वांना आश्चर्यचकित करणारी महान विभूती श्री गुलाबराव महाराज होय.

महाराज मुळत: अमरावती जिल्ह यातील चांदुर बाजार 'माधान' या ग्रामचे असून मोहोड वंशामधे त्याच्या जन्म १८८१ मधे झाला. श्री गोंदूजी मोहोड व सौ. अलोकाबाई महाराजांचे पूज्य माता -पिता होत. बालपणापासूनच त्यांची प्रखर प्रज्ञा, अव्दितीय प्रतिभा, अलौकिकज्ञान, अदभूत स्मरण शक्ती व शास्त्रीय, चिकित्सक बुद्धी व युक्ती यांच्या मंथना तुन तयार झालेली दिव्य ग्रंथ संपदा व त्याचे प्रभुत्व अतुलनिय आहे. प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज विदर्भातील आधुनिक युगातील संत होय. नेत्रहीन खेड्यातील जीवन व विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या ग्रंथलेखनरूप ज्ञानयज्ञाचे कार्य अजोड आहे. त्यांची भगवान श्री कृष्णाच्या ठिकाणी माधुर्य भक्ती असल्याने स्वत:ला ज्ञानेश्वरकन्या मानीत व त्यांनी स्वतंत्र "मधुराद्वैत संप्रदाय" प्रवृत्त केला. महाराजांनी ज्ञानेश्वर पराभक्ती आणि कविता, साहित्य, नाटक, व्याकरण कोशलिपी इ. अनेक विषयांवर सूत्र आणि भाष्य रचनेपासून प्रमाणग्रंथपर्यंत विविधप्रकारे ग्रंथ निर्मिती संस्कृत, मराठी, हिंदी व ब्रजभाषा शैलीत करून, साहित्य क्षैत्रात महाराजांनी मौलिक व नवीन योगदान दिले. संस्कृत साहित्य अभ्यासताना, आधुनिक काळातील संत व दूरदृष्टा म्हणून, त्यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान अतिशय मोलाचे असून, नवीन पीढी ला संशोधन करण्याचे आव्हान महाराजांनी आपल्या ग्रंथाद्वारे केले आहे. अर्वाचीन काळात निर्माण होणाऱ्या

साहित्य क्षेत्रात गुलाबराव महाराजांनी मोलाची भर घातली.

**काव्यसूत्र संहितेचा विचार**

"प्रथम पाद काव्य सामुग्री विचार"

"दूसरे पाद काव्य लक्षण विचार"

"तिसरे पाद स्फूर्तिप्रयोजनम्"

"चौथे लक्षणपाद" व

" कवित्वोपाय विचार:"

अशा प्रकारे केले आहे. महाराजांनी हा ग्रंथ सूत्ररूपाने लिहिला आहे. संस्कृत भाषेत यापूर्वी ही काव्यशास्त्रावरील काव्यलंकार, साहित्यदर्पण, अलंकार शेखर असे असंख्य ग्रंथ प्राचीन कवींनी कारिकेत लिहिलेले आढळतात. प्राचीनांपैकी सूत्र शैलीचा वापर विशेषरूपाने केलेला आढळतो. उदाहरणस्वरूप वामनाचा 'काव्यलंकारसूत्राणि', तर मम्मटाचा 'काव्यप्रकाश' नामक ग्रंथ कारिकेत असूनही सूत्रे असे नाव दिले आहे. त्याच प्राचीन शास्त्रकारांचाविचार लक्षात घेऊन महाराजांनी आपले काव्यसूत्र स्वतंत्र पध्दतीने सूत्ररूपात केलेले आहे.

महाराजांनी आपल्या काव्यसूत्रांत काव्यनिर्मितीचे प्रयोजनमधे सर्वप्रथम प्रतिभेला महत्व दिले आहे. आनंदवर्धन म्हणतात. 'अव्युत्पत्तिकृतीदोषः शक्तया संव्रियते कवे:? (आनंद प३३७) अर्थात व्युत्पत्ति कमी पडल्यामुळे उत्पन्न होणारा दोष कवीच्या प्रतिभेमध्ये झाकून जातो पण प्रतिभाकमी पडल्यामुळे उत्पन्न होणारा दोष तत्काल दिसून येतो, राजशेखरने ज्याला प्रतिभा नाही तो कवि आंधळा व ज्याला प्रतिभा आहे तो कवि जन्मांन्ध असूनही अद्ययावत विश्वाला डोळसप्रमाणे पाहू शकतो. ही बाब महाराजांविषयी पूर्णपणे सार्थ ठरते. श्री. गुलाबराव महाराज अव्दितीय प्रतिभेचे धनीच होते. त्यांनी प्रतिभेचा परामर्श आपल्या काव्यात केला असून ते प्रतिभेला कवीचे श्रम व आशय याची अभिव्यक्ति साधुन देणारी व रसिकांच्या ठिकाणी काव्यग्रहण करण्याची शक्ति होय असे मानतात.

प्राचीन शास्त्रकारांना ज्याप्रमाणे तंत्रयुक्तीची जाण होती. माहिती होत्या ते त्याचा उपयोग आपल्या काव्यात करत असत. त्याचप्रमाणे महाराजांनी सुध्दा त्या तंत्रयुक्त्यांचा वापर करून आपले काव्यनेटके य सूत्रबध्द शैलीतच लिहून त्यांनी ती शिस्त काटेकोरपणे पाळलेली दिसून येते.

महाराजांनी केलेले काव्य व पूर्वकाव्याचे साम्य बघितले तर प्राचीन काव्य मीमांसकांनी ललित व कलात्मक काव्य यांचेच वर्णन केलेले आढळते पण महाराजांचा काव्य व काव्यांग याकडे बघण्याचा दृष्टिकोण भिन्न आहे.

"काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये।

सद्यः परनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे ।।२।।

आचार्य मम्मट।नी काव्याची सहा प्रयोजने सागितली कीर्ति, धनलाभ,व्यवहार,समाधी प्राप्ती अशुभ निवारण, आनंदाची प्राप्ती पत्नीद्वारा होते व उपदेशाचा लाभ अशी काव्य प्रयोजने सांगितली. महाराजांनी ही आपल्या ग्रंथात कविनिष्ठ व रसिकनिष्ठ ही प्रयोजने सांगितली आहे. कवीच्या मनात उत्पन्न होणाऱ्या विशिष्ट भावना व्यक्त होऊन त्याना भगवताच्या चरणाची ओढ वाटू लागते ही उत्कण्ठा उत्तरोत्तर वाढत जाते. तेव्हा ते शब्दबद्ध होऊन कवीच्या मुखातून बाहेर पडली की. त्या काव्यातून ब्रम्हानंदाची प्राप्ती होते व कवीला जीवन्मुक्तीची व ब्रम्हनिष्टेची जाणीव करुन देते, असे काव्य जे लौकिकातून परालौकिकाकडे नेणारे होय.

महाराजांनी असे प्रयोजन सांगून आत्मानंदाची प्राप्ती काव्याच्द्वारे कशी होउ शकते ते आपल्या काव्यात सांगितलेले आहे. व्यावहारिकतेच्या पलीकडे ब्रम्हनिष्ठेशी सांगड घालून त्यांनी काव्यलक्षण सांगितले आहे. आता महाराजांच्या काव्याच्या गुणविचारांकडे वळू या-

मम्मटपूर्व मुख्य आलंकारिकांचा परामर्श महाराजांनी आपल्या काव्यशास्त्रात घेतलेला आहे.

काव्यशास्त्राचा स्वतंत्र संसार भरतमुनिच्या नाट्यशास्त्रात बघावयास मिळते. भरतमुनिने (क्रि.पू. २००....क्रि.२००) काव्याकडे एक नाटकाचे अंग मानले. अभिनयाब्दारे व्यक्त होणारे काव्य हे दृश्य-श्राव्य म्हणून सर्वात आधि याचा उल्लेख केला. काव्यशास्त्रांचे रहस्य केवळ त्यांच्याकडे नाट्याग म्हणून किंवा अभिनयापूर्ताच तो मर्यादित न राहता काव्याचा विचार एक "स्वयंपूर्ण रचना" या दृष्टीने हवा. यासाठी काव्यमिमांसकांनी नाट्य मीमांसेतून वेगळे करून त्यामागील भूमिका वेगळी प्रस्तुत केली. भामहाने 'काव्यालंकार हा ग्रंथ लिहिला व त्यात त्याने 'शब्दार्थ संहितौ काव्यम्"- असे काव्याचे लक्षण सांगितले आहे.

श्री. गुलाबराव महाराजांनी कवी लक्षण या पादात । कविर्द्वीविध: ।।१।। कवि हा दोन प्रकारचा असतो एक ईश्वर कवि व दूसरा जीव कवि. कवि कसा असावा? त्याचे लक्षण कोणते? याचे वर्णन केले आहे.

भामहानंतर आचार्य दण्डी (क्रि. ६00-७00) ने काव्यादर्श या ग्रंथात काव्यविषयक भूमिका काहीशी भामहाच्या प्रमाणे आहे, पण इतर मते दोघांचीही भिन्न आहे. आचार्य दण्डीने आपल्या काव्यात श्लेष, माधुर्य, प्रसाद असे दहागुणांबरोबर वैदर्भी व गोडी अशा दोन पध्दती सांगितल्या आहे. महाराजांनी गुणाविषयी आपला विचार मांडताना काव्याचे गुण अप्रत्यक्षपणे सुचवले आहे."जे काव्य अनेकदा ऐकूनही ते वारंवार म्हटल्यावर ही श्रोत्याला उद्विग्न करीत नाही, अशा काव्यात माधुर्य गुण असतो". महाराजानी मधुराद्वैत भक्तीचाच स्वतंत्र संप्रदाय उभारला आहे. त्याच्या काव्यात भगवंतांच्या लीलेचे वर्णन सांगितले असून त्यांनी माधुर्य गुणाला अग्रगण्य स्थान दिलेले स्पष्ट दिसून येते. "क्षणे क्षणे यन्नवता मुपेति तदेवरूपम रमजीयनाया काव्यानंद" असा असतो.

महाराजांनी काव्यशास्त्राची निर्मिती करण्याचे जणु मनोमन ठरविले असावे की काव्याचे निर्माण म्हणजे कोणतीही वस्तु तयार करण्यासाठी सर्वप्रथम त्याची सामग्री जुळवावी लागते. त्याचप्रमाणे श्री. महाराजांनी सुद्धा प्रथमपाद काव्यसामुग्री हा प्रस्तुत केला. काव्यलिहिण्यासाठी लागणारे साहित्य म्हणजे काव्याचे उपादान, अधिष्ठान, कर्ता, परिणाम व त्याचे अंग याचे प्रतिपादन केले. काव्य करणारा कर्ता कसा असावा ते कविलक्षणविचार या दुसऱ्या पादात सांगून त्यांनी कविचे दोन प्रकार सांगितले. दोन मुख्य प्रकार सांगून अन्य उपप्रकार सांगितले आहे. काव्य सामग्री हाताळत असतांना अनेक प्रश्न कवीच्या मनात उत्पन्न होतात त्याचे उत्तर देण्यासाठी तिसरा पाद "स्फूर्ती प्रयोजन" सांगून कवीच्या मनात उत्पन्न होणाऱ्या स्फूर्ति चे तीन प्रकार सांगीतले -

१) नैसर्गिक स्फूर्ति

२) वैचारिकी स्फूर्ति

३) स्वयंस्फूर्ति

जेव्हा जेव्हा या स्फूर्तिच्या साहाय्याने काव्य कसे तयार होऊ शकते अशी जाणीव श्री. महाराजांनी आपल्या काव्यात वर्णन केली आहे. पुढे ते चौथ्या पादात सृष्टीचे दोन विभाग सांगतात एक ईश्वरजा आणि दूसरी जीवजा, सृष्टीचे दोन प्रकार सांगून त्यांची लक्षणे, प्रकार, भावनामय काव्याचे स्वरूप, चित्राचे लक्षण, कविचे प्रकार सांगितले. विव्दान, मूढ व भोगी यांचे

काव्य कशाप्रकारचे असतात. उत्तम कविचे लक्षण सांगितले आहे. व पंचमपादात कवित्वचा विचार करून काव्याची सर्वसाध्यता म्हणून एक स्वतंत्र विचार आपणासमोर ठेवला, शेवटी उत्तम काव्य है ईश्वराच्या चरणांना स्पर्श करून त्याच्या साक्षीने व उपायाने श्रेष्ठ काव्य निर्मिती होते, अशी अभिन्न काव्याची रेखीव सूत्ररुपात. तर्कशुद्ध मांडणी श्री. महाराजांनी केली आहे. श्री. गुलाबराव महाराजांनी आपल्या काव्यात प्राचीन काव्यकराचे मत नवीन पध्दतीने सांगितले. त्यांनी एक नवीन विचारशैली वाचकांच्या समोर प्रस्तुत केली ती अगदी सूत्रग्रंथरूपात महाराजांचा ग्रंथ सूत्रबध्द असून पूर्वसुरीच्या सर्व मताचा सारांश घेवून स्वतंत्ररित्या आपली विचार शैली प्रस्तुत केली आहे.

श्री. महाराजांनी आपल्या काव्यशास्त्रात रसाचे जे विवेचन केले त्याचा परामर्श आपण घेऊया. काव्यसूत्रसामुग्रीविचार या पहिल्या पादात रसाचे विवेचन केले की-, "अंतरंगातील आनंदाचे प्रकटीकरण करणे म्हणजे रसाची अभिव्यक्ति करणे होय." असे (१/२३) मूळ सूत्र लिहिणे या सूत्रात वर्णन केले आहे. महाराजांनी रसाचा संबंध आत्म्याशी जोडलेला आहे. प्राचीन शास्त्रकारांनी सुद्धा रसाचा निकटचा संबंध आत्म्याशी दर्शविलेला आहे. महाराजांचा सूत्ररूप विचार प्राचीन परम्परेलाच धरून आहे. ते आपल्या रचनेत अन्य रसाचा उल्लेख करतात-

काव्यज्ञानां प्रेमलक्ष्म प्रोक्तं प्रेमरसायने ।
श्लोकश्चतुर्थरतत्रस्थः प्रमाणं त्वत्र लिख्यते ।।
रसो ब्रह्मेति सिध्दांत स्थाच्युपाधिवशादयम् ।
नदीतडागप्रमुखैर्भास्वानिव विभिद्यते ।।
(प्रेमरसायने श्लोक ३/४)

येथपर्यंत श्री. महाराज विरचित काव्यसूत्रसंहिता या ८९ सुत्रांचा परामर्श घेतला. प्राचीन शास्त्रकारांची मते श्री. गुलाबराव महाराजांनी युक्तीने, संक्षिप्त रेखीव व स्पष्टपणे आपणासमोर प्रस्तुत केली व एक अभिनव विचार सर्व वाचकांसमोर ठेवले. या लघु काव्यसूत्रात बहुगुणी गंथाचे सामर्थ्य आहे. श्री. महाराजांनी अनमोल अशी ही देणगी सर्च वाचकवर्ग व सुबुध्द लोकांना प्रदान केली !

महाराजांनी 'काव्यसूत्र सहिता यात काव्याची अगदी वेगळी मांडणी केलेली आहे. भक्तिशास्त्र व काव्यशास्त्र यांचा परस्पर संबंध कसा असू शकतो हे सिद्ध करून दाखवले आहे. महाराजांचे काव्य तीन प्रकारांमध्ये त्याची विभागणी करु शकतो -

विषयानंदापासून ब्रह्मानंदा पर्यंत
पामरकवी पासून साक्षी कवी पर्यंत
जडस्वभाव दर्शनापासून भक्तीज्ञानापर्यंत ।

आचार्य मम्मटांनी ज्याप्रमाणे काव्यप्रकाश या ग्रंथामध्ये काव्याचा सांगोपांग विचार करुन 'काव्याचे शरीर कसे असावे. याविषयी सविस्तर चर्चा केली आहे. काव्याचे प्रयोजन, हेतु सांगून तो काव्याचे लक्षण सांगतो –

तददोषौ शब्दार्थौ सगुणावनलंकृती पुनः क्वापि ।।

ते (काव्य म्हणजे) दोषरहित, गुणमंडित आणि क्वचित अनलंकृत असे शब्द आणि अर्थ होत.

भामहसुद्धा म्हणतो की "काव्यं तु जायते जातु-कस्यचित प्रतिभावतः" कवीने व्यंजक शब्द व व्यंग्य ह्यांची ओळख ठेवली पाहिजे. ज्ञानाचेहि अनुसंधानात्मक निरुपण म्हणजे प्रत्यभिज्ञा अत्यंत आवश्यक व महत्वाची असते. तेव्हा व्यंजक शब्द, व्यंग, अर्थ व व्यंग व्यापार असे तीन भेद ध्वनिशब्दामुळे होतात. पंडित जगन्नाथ म्हणतात की भरतमुनीने नाट्य शास्त्रात केवळ ८ रसांचेच वर्णन केले आहे. याचे कारण असे की नाटकाचे रसिक समाजातील प्रत्येक स्तराचे असतात. त्यामुळे नाटकामध्ये भक्ती व शांत रस याचा

उल्लेख त्याने नाटकात केला नाही, त्यामुळे सामान्य माणसाला शांत रसाचा आस्वाद घेताच येत नाही. तर पलीकडच्या भक्तिरसाचा आस्वाद कसा घेऊ शकेल? त्यावर श्री गुलाबराव महाराजांनी भक्ती व शांत रस प्राप्तीसाठी आनंदाचे दोन प्रकार सांगितले -

१) स्वयंरुप आनंद

२) भोगरुप आनंद

ज्याप्रमाणे श्रृंगारादि आठ रस, भोगरूप आनंदाचे प्रकार आहेत. शांत आणि भक्ती हे स्वयंरूप आनंदाचे प्रकार आहे. स्वयंरूप आनंद हा नाटकात कधीच दाखवता येत नाही. श्री महाराजांनी येथे युक्तिवाद साधुन कोणाच्याही मनाला वाईट न वाटु देता व पूर्वसुरींच्या मताला कोणताही दोष न देता, आनंदाचे दोन प्रकार सांगून भक्ती तत्त्वपरक काव्यात भर टाकलेली आहे. असे समन्वयाचे सूत्र सांगून महाराजांनी काव्यशास्त्रात महत्वाची कामिगिरी सिद्ध केली आहे. 'भक्तिपदतीर्थामृतात' महाराजांनी स्वतः भक्तितील दहा रसांचे विवेचन अगदी नवीन स्वरुपात कले आहे. भट्टनायक म्हणतात की - "कविवाणी ही एक दूध देणारी गाय आहे. आपल्या बछड्यासाठी गाय जशी आपणहुन-पान्हावते, त्याप्रमाणे ही वाणी रसिकांची रसतृष्णा शांत करण्यासाठी स्वतःहून रस प्रवाहित करते. योगी परमात्मा-साक्षात्कारासाठी साधना करतात, आनंद प्राप्ति मिळवतात. महाकवींना काव्य रचनेसाठी श्रम पडत नाही. त्यांची प्रतिभा स्वयं स्फुरते. रसिकांच्या अंतकरणात रसप्रवेश झाला व आस्वादन सुरु झाले की ती प्रतिभा जाणवू लागते. भारतीय साहित्यशास्त्रात "अलौकिक सृष्टी उत्पन्न करणारी प्रतिभा म्हटले आहे."

तृतीय पादामध्ये महाराज सूत्र लिहितात - 'साशुद्धा' या सूत्रातील शब्द स्वतंत्र, सर्वथा दोषरहित व स्वयंपूर्ण अशा प्रकारचे अर्थ सूचित करतो.

"नियति कृत नियमरहितां ल्हादैकमयी मनन्यपरतन्त्राम्
नवरसरुचिरां निर्मिती मादधती भारती कवेर्जयति" ।।

काव्यप्रकाशातील वरील कारिकेचे स्मरण होते. त्याचप्रमाणे पंचपादामध्ये कवित्व का साधावे? त्याचे उपाय कोण-कोणते आहेत. ते सांगून कवित्वप्राप्ती म्हणजे जीवन्मुक्ती कशी आहे या सर्व गोष्टींचा विचार केला आहे.

"सद्यः परनिवृत्ति दर्शनात्" या सूत्रात

काव्यंय यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये।
सद्यः परनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशभुजे।।

मम्मटाच्या कारिकेचे स्मरण येथे होते. 'सद्यः पर निर्वृति' या बाबत एकवाक्यता, साम्यता दिसून येते.

रसो वै स: इति श्रुत:।। प्रथम पाद
रसो वै त्यग्निपुराणात ।। तत्रैव

श्रुती, पुराण, ग्रंथाचा उल्लेख करून रसप्रक्रिया वर्णन केलेली दिसून येते. प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराजांनी स्वतःचे काव्य विषयक विचार मूळ संहिता देऊन वर्णन केले. कविने काव्य निर्मितीच्या वेळी सावधचित्त असावे म्हणजे काव्य निर्दोष परिपूर्ण असे निर्माण होईल. ह्या गोष्टीचे आग्रहाने समर्थन केले आहे. "सर्वेषा विकाराणांवणनेऽपि सावधानत्त्व साक्षित्वम". या सूत्रावरुन असे स्पष्ट होते को उत्कृष्ट कवी, उत्कृष्ट काव्य याकरिता कोणत्या गोष्टी आवश्यक आहे. याचे सूक्ष्म चितन महाराजांनी केले. त्याकरिता काव्य सामग्री, कविलक्षणाविचार, सफूर्तीप्रयोजन, काव्यलक्षण, कवित्वउपाय विचार या पाच प्रकरणातून काव्याचे लक्षण, स्वरुप, भेद इ. उत्कृष्ट विवेचन केलेले दिसून येते. कवित्व उपाय वर्णन करताना मात्र "सावधानत्त्वम साक्षितवं" असे

सांगत सावधानतेचा इशारा निर्दोष काव्यासाठीच केला आहे हे स्पष्टपणे जाणवते. भर्तृ हरी नीतिश्लोकामध्ये कवींची प्रशंसा करतो-

जयन्ति ते सुकृतिनो रससिद्दाः कवीश्वराः।

नास्ति येषां यशः काये जरामरणजं भयम्।।

अशी भर्तृहरी रससिद्ध कवींची प्रशंसा करतो. उत्तम साहित्यकृती निर्माण करणारे, रसामध्ये प्रवीण असलेले कविरुपी ईश्वर विजयी होतात असे भर्तृहरी म्हणतो. कारण त्यांच्या यशरुपी शरीराला वृध्दत्व, मरण यांची भीती नसते. कवी देहाने जरी अस्तित्वात नसले तरी त्यांच्या यशाला मात्र अंत नसतो.काव्यासाठी लागणाऱ्या सामग्रीचे वर्णन पहिल्या पादात करतात. महाराजांचे काव्यविषयक विचार पारंपारिक काव्यापेक्षा आधुनिक वाटतात. संहितेच्या प्रथम पादामध्ये काव्याची व्याख्या स्पष्ट केली आहे. काव्याचे लक्षण महाराजांनी अगदी आगळे वेगळे केले आहे.

सृष्टे अन्तः स्वरुप

ईश्वरनिविष्ट काव्यं ।।२ ।।

सर्व नामरूपात्मक सृष्टीच्या अन्तरात असलेल्या ईश्वर स्वरूपाच्या आनंदाचा अनुभव आणून देणारे तेच खरे काव्य ! ही व्याख्या प्राचीन लक्षणाहून अगदी वेगळी असून सृष्टीच्या माध्यमातून जगत्कारणाकडे म्हणजेच ईश्वर स्वरूपाकडे घेऊन जाणारी काव्याची शक्ती येथे महाराजांना अभिप्रेत आहे. भारतीय साहित्यशास्त्रामध्ये लक्षणाकडे या दृष्टीने पाहिले म्हणजे लक्षण हे औचित्याजवळ जाऊन पोचते. कवीच्या काव्यातून दिसून येणाऱ्या शब्द, अर्थ, गुण अलंकार या सर्वांच्या संघटनेवरून काव्य लक्षण ठरत असते."

काव्याच्या श्रवण-वचनामुळे स्थायिभाव रसिकाच्या अंतःकरणात उद्भूत होतो व रसिकांचे अंत:करण काव्याच्या आशयाशी एकरूप होते, आणि रसानंद मिळतो. काव्याच्या आशयाशी मन एकाग्र होण्यासाठी विकाराची आवश्यकता आहे. आणि त्यापासून दुःख न होण्यासाठी केवळ आनंदाचीच प्राप्ति होण्यासाठी विचाराची आवश्यकता आहे. याप्रमाणे स्वतःहूनच भाव नाहीसे झाल्यामुळे निर्विघ्न प्रतीति येते. "काव्याच्या बाबतीत रस ही एक अशी वस्तु आहे की. जिच्याशिवाय शब्दार्थांना ‘काव्य' अशी संज्ञाच देता येत नाही. शब्दार्थ हे काव्याचे शरीर, रस हा काव्याचा आत्मा, माधुर्यादिक हे काव्याचे गुण आणि अनुप्रासोपमादिक हे काव्याचे अलंकार होत, असे सांगितले आहे. अलंकाराचे स्वरूप व प्रयोजन भारतीय साहित्यशास्त्रात स्पष्ट केले आहे. अशाप्रकारे श्री गुलाबराव महाराजांचे काव्य रसप्राप्तीच्या दृष्टीने पाहिले असता, अरसिकापासून सुरुवात केली तर भक्त रसिकांपर्यंत आनंदप्राप्ती होण्याच्या दृष्टीने चढता क्रम आहे असे दिसून येते. भरतमुनी, भामह, आचार्य विश्वनाथ, आचार्यमम्मट, ध्वनिकारआनंदवर्धन यांचे काव्यात्मक विचार या संशोधनात स्पष्ट केले आहे. त्यांचे विचार लोकिक काव्यासाठी आहे, तर महाराजाचे काव्य विचार अलौकिक परमानंद प्राप्त करण्यासाठी आहे.

एकूण महाराजांच्या काव्यशास्त्रीय विवेचनावरून असे दिसते की संतांच्या स्फुट काव्य विचारांना युक्तिसिद्ध शास्त्राची बैठक असल्याचे, महाराजांनी दाखवून दिले. पूर्वसूरींच्या संस्कृत रससिध्दांताचा परिपाक असलेल्या महाराजांच्या शास्त्रीय दृष्टीकोणने रसांची संख्या, स्थायिभावाच्या स्पष्टीकरणातून करून रसाचे आनंददायित्व वगैरे अनेक विषयांवर चांगला प्रकाश पडतो.

**उपसंहार -**

आधुनिक काळातील श्री गुलाबराव महाराजांनी काव्य सूत्रसंहितेवर विचार प्रगट केले आहे. महान दार्शनिक संताने काव्यशास्त्रीय विचार सुत्ररूपाने मांडले आहे. साहित्य

क्षेत्रातील काव्यांचा अभ्यास आचार्य विश्वनाथ, अभिनवगुप्त, भामह, मम्मट, जगन्नाथ पंडित वगैरे मोठ-मोठ्या काव्यज्ञांच्या विचारांचा अभ्यास करण्यात येतो. यूरोपीय पंडितांच्या उपपत्तीचाही विचार होत असतो. मात्र संतकवींनी मांडलेले काव्यासंबंधी विचार मात्र दुर्लक्षित केले जातात. भक्तिपर काव्याचा शास्त्रीय दृष्टीकोनातून विचार करण्याचे कारण नाही;' असे वाटल्यामुळे, हे होणे स्वाभाविक आहे. या पार्श्वभूमीवर पाहता महाराज स्वतः एक भक्त कवी आहेत, भक्तिकाव्याची श्रेष्ठता त्यांच्या अंत:करणात प्रकर्षाने रुजलेली होती. महाराजांनी भक्तिरसात्मक काव्याची रचना करून, साहित्यक्षेत्रात नवीन योगदान दिले आहे. संतांच्या काव्यविचाराची शास्त्रीयता उलगडून स्पष्ट केलेली दिसून येते. त्यांच्या काव्यात कवित्व प्राप्त झालेला कवी जीवन्मुक्ती प्राप्त करतो. या ठिकाणी महाराजाचा वेगळे पणा आप त्याला लक्षात येतो. "सद्य:परनिरवृतये" सम्मटाच्या काव्यप्रकाशातील कारिकेशी एकवाक्यता, साम्यता महाराजांच्या काव्यात दिसून येते. आध्यात्मिक काव्याचे प्रयोजन फक्त परमानंद प्राप्ति आहे. माऊली ज्ञानेश्वर महाराजांनी, जगदगुरू तुकारामांनी, एकनाथानी पद, अभंग, भारुड हे सर्व साहित्य प्रसिध्दीसाठी लिहिलेले नसून परनिर्वृति, परमानंद प्राप्त करण्यासाठी केलेले होय. इतर कोणतीही भावना नसून काव्याद्वारे भगवताचे परमोच्चपद, परमानंद प्राप्त करणे हे त्यांचे प्रयोजन, श्री गुलाबराव महाराज सुध्दा भक्तिकाव्य साधून ईश्वराचे 'सत्-चित्-आनंदमय' स्वरूप प्राप्त करण्याचीच इच्छा त्यांच्या काव्यात करतात, असे आपल्या लक्षात येते.

**तथ्य सूत्राणि**

संस्कृत रचना -श्री गुलाबराव महाराज विरचित, सूचि रत्नावली, षोडशयष्टी काव्यसूत्र संहिता -१/८९

**संदर्भ ग्रंथ-**


1) अग्निपुराण - गर्गसंहिता अंक, गीताप्रेस गोरखपूर
2) काव्यप्रकाश - आचार्य मम्मट
3) काव्यसूत्रसंहिता- श्री. वामन के. लेले
4) भक्तीतत्वविवेक: -श्री. ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ,दहीसाथ,अमरावती
5) श्री गुलाबराव महाराज -संस्कृत रचना
6) श्री गुलाबराव महाराज विचार संपदा -श्री कृष्णघटटे
7) ध्वनि सिद्धान्त: -श्री मधुकर आष्टीकर
8) सार्थ पंचदशीं -श्री विद्यारण्य भारतीतीर्थ विरचित गायत्री साहित्य -सदाशिव पेठ पुणे
9) संस्कृत सूत्र रचना -डॉ. अनुपमा डोंगरे,यवतमाळ
10) भारतीय साहित्य शास्त्र -जी. टी. देशपांडे

# कण्टकाञ्जलितील रामराज्य पद्धतीचे स्वरूप: एक अध्ययन

**प्रज्ञा इंगळे**

महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, अमरावती

profpradnya30@gmail.com

## सारांश:

*प्रस्तुत शोधनिबंध हा 'कण्टकार्जुन लिखित अर्थात श्री अर्जुन वाडकर लिखित 'कण्टकाञ्जलि' या मुक्तसंग्रहातून घेतला आहे. या मुक्तसंग्रहाची निर्मिती २० व्या शतकातील असून प्रेरणादायी आहे. हा कवि नेहमीप्रमाणे संस्कृतातील कवि नाही. या कविचा संस्कृतात एक आगळा वेगळा प्रयोग केला आहे. आज आधुनिक काळात पाहायला मिळतो तो म्हणजे विडंबनात्मक काव्य जे आजपर्यंत वाचकाला वाचायला मिळाले नाही. यात आजच्या समाजाचे स्वरूप विरोधाभासात दाखून समाजाचा खरा चेहरा काय दाखवला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात कण्टकाञ्जलितील'रामराज्य' पद्धतीचा अभ्यास करून समाजातील राजकीय नेते कशाप्रकारे आपले रामराज्य चालवितात हे स्पष्ट केले आहे. यात राज्यकर्त्यांच्या राज्याची, तारेवरची कसरत, ऋणवर्णनम्, लोकतंत्र, दण्डमुक्ती, मद्यब्रम्ह, विद्युत दीपः इ. चे वर्णन केले आहे.*

## प्रस्तावना:

सर्वात प्राचीन भाषा म्हणून ज्या भाषेचा गौरव केला जातो ती म्हणजे संस्कृत होय. जी देववाणी, गीर्वाणवाणी अश्या अनेक नावाने ओळखले जाते. संस्कृत भाषा जरी आताची बोलीभाषा म्हणून पूर्ण अस्तित्वात जरी नसली तरी मात्तुर नावाच्या गावात मात्र आजही संस्कृत भाषा ही व्यवहाराची बोली भाषा म्हणून वापरली जाते. आणि या भाषेचे साहित्य सर्वांना मोहिनी घालणारे आहे हे सर्वांनाच माहित आहे. कालिदासाचे नाव घेतले की त्याच्या सात काव्याची आठवण येते. संस्कृत साहित्य हे प्राचीन काळापासून सर्वांना मार्गदर्शन करणारे ठरले आहे. कारण वैदिक साहित्य हे आजच्या विज्ञानालाही तोलमोलाचे आहे हे आपण सर्वच जाणतातच. पण प्राचीन संस्कृतातीलनाटक, महाकाव्य, खण्डकाव्य, चम्पूकाव्य, गद्यकाव्य, लघुकाव्य, कथावाङ्मय यातील सर्वांचे मार्गदर्शन घेऊन मानवाने आपल्या मध्ये परिवर्तन केले आहे. प्राचीन साहित्य जसे माणसाला ज्याप्रमाणे नैतिकता शिकवते आणि माणूस म्हणून घडविण्याची ताकद ठेवते, ते केवळ या भाषेमुळेच. आजची पिढी समजतेकीसंस्कृत भाषा ही मृतभाषा आहे. असे म्हणत पण ते खोटे आहे. कारण भाषा मरते तेव्हा जेव्हा त्या भाषेचा वापर होत नाही, त्यात साहित्य निर्माण होत नाही, त्याचा व्यवहारात वापर होत नाही तेव्हा ती मृतवत घोषित केल्या जाते. पण संस्कृत भाषेचे तसे नाही हे आजच्या पिढीला समजले पाहिजे कारण संस्कृत भाषा ही आजच्या संगणकाची भाषा झाली आहे आणि होणार आहे. आज २० वे शतक चालू आहे. आणि आजही संस्कृत साहित्याची निर्मितीचा प्रवाह अखंडपणे चालू असलेला दिसून येतो. त्याचे फक्त वाचन होणे आवश्यक आहे आणि वाचकापर्यंत पोहचणे आवश्यक आहे.जोपर्यंत आधुनिक साहित्य वाचकापर्यंत पोहोचणार नाही तोपर्यंत सहृदयवाचक त्यांचा रसास्वाद घेता येणार नाही. म्हणूनच आजच्या या परिषदेला अनुसरून आधुनिक काळातील २० व्या शतकातील नितीशतकाप्रमाणेच असलेला एक मुक्त संग्रहाचा अभ्यास करताना मला लक्षात आले कि नवनिर्वाचित संस्कृत कवी म्हणून ज्याचे २० व्या शतकात नव घेतले जाते ते म्हणजे कृष्ण "श्री अर्जुन वाडकर"यांनी लिखित 'कण्टकाञ्जलि' या नवनीती शतकाचे वाचन करून यावर हा शोधनिबंध

प्रकाशित करावा आणि म्हणूनच मला भोवणारे हे साहित्य वाचकानी अभ्यासावे व माहिती व्हावावा या उद्देशाने हा विषय निवडला.

**कालावधी:**

या संशोधन पेपर चे लेखन करण्यासाठी ज्या आधारभूत ग्रंथाचा वापर केला त्याचा कालावधी १९६५ होय.

**उद्दिष्टे:**

१) आधुनिक सांस्कृतिक साहित्यातील मुक्तकसंग्रहाचा आढावा घेणे.

२) कण्टकाञ्जलितील 'रामराज्य' पद्धतीचा परिचय करून देणे.

३) 'रामराज्य' पद्धतीचा अभ्यास करून समाजापर्यंत खऱ्या राजकीय नेत्याचा चेहरा काय हे समजून देणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोध निबंधात वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**मर्यादा / व्याप्ती:** या शोध निबंधातील प्रस्तुतीकरण 'कण्टकाञ्जलि' या संस्कृत ग्रंथापुरते मर्यादित आहे.

**गृहीतक:-**

'कण्टकाञ्जलितील' प्रत्येक पद्धती ही महत्वाची आहे. परंतु 'रामराज्य' पद्धती ही सांगून समाजातील नेत्याचे खरे चित्र दाखविले आहे. आधुनिक काळातही ते उपयुक्त ठरू शकते.

**विषय निवड:**

कारण 'कण्टकाञ्जलिने' अर्वाचीन संस्कृत वाड्मय नावेदालन उघडले आहे. 'कण्टकाण्जलि' हे संस्कृत वाड्मय आजही निराळा म्हणावा असा काव्यविष्कार आहे. हे वाड्मय साधारण १९६५ साली प्रकाशित झाला आहे. पण सर्व प्रथम सांगावयाचे झाले तर याला नवनीतीशतकम् असाही उल्लेख कवीने केला आहे. आणि या काव्याच्या सुरुवातीला भर्तुहरीची तत्वकेंद्रित दृष्टी, प्राचीन संस्कृत लेखकांची प्रौढवाणी, शुद्रकाचा खळखळता विनोद, पदोपदी तेढी भाषा, समकालीन जीवनाची थरथर, ही सर्व एकवटलेली अनुभवण्याची इच्छा असेल तर कण्टकाञ्जलि वर यथेच्छा ताव मार असे म्हंटले आहे. मित्रा 'कण्टकाञ्जलि' या शब्दाची फोड करावयाची झाल्यास 'कण्टक' म्हणजे काटे तर अंजली म्हणजे 'ओंजळा', अर्थात "काट्याने भरलेली ओंजळ" अशी आपण फोड करू शकतो. म्हणजे काय काटे हे सत्याचे प्रतिक दर्शिविणारे आहे. काट्यांना हात लागल्यावर ज्याप्रमाणे जखम तरी होते किंवा हात तरी रक्तबंबाळ होईल म्हणजे काय त्याचे अस्तित्व काय हे समजेल. त्याचप्रमाणे आजच्या काळातील २० व्या शतकातील या कवीने हीच काव्यरचना रचून आपणास विडंबना मार्फत आपली वास्तविकता कशी आहे हे समजविण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणूनच हे रोचक साहित्य प्रकार वाचकापर्यंत पोहचावे हीच अपेक्षा.

**काव्याची ओळख:-**

'कण्टकाञ्जलि' हा एक मुक्तसंग्रह असून १२ पध्दती मध्ये लिखित आहे. प्रत्येक पध्दती मध्ये अनेक श्लोक, एकुण श्लोक संख्या १८२, काही कण्टक चार हून अधिक चरणारेचे (६ किंवा ८ आहे) शार्दुल विक्रीडीत वृत्तात, आधुनिक विरामचिन्हाचा वापर असलेले हे काव्य होय.

कण्टकाञ्जलिची बलस्थाने दोन:- समकालीन जीवन आणि विडंबनात्मक शैली होय.कण्टकाञ्जलिची रचना झाली तो काळ स्वातंत्र प्राप्तीनंतरची व सुरवातीची काही वर्षे हा होता. हा काळ खडतर होता. त्याचे प्रतिबिंब या कण्टकाण्जलित पडलेले दिसते. संस्कृतातील विडंबन प्रकारचा उपहासपर असा एक मनोज्ञा अविष्कार म्हणूनच या कण्टकाञ्जलित उपहास हा या रचनेचा स्थायीभाव आहे. आणि विंडबन हा

वाड्मयातील प्रकार आहे. टोचण्यापेक्षा यात कापण्याचा जागा जास्त आहे. विनोद हा जीवनातून तुटून वेगळा संसार मांडू शकेल पण उपहासाचे शास्त्र मात्र समाजजीवनाच्या तेजक पाषाणावरच पाजविता येईल. तोच त्याचा निकषही आजच्या जीवनाचे स्वरूप असे घालमेलीचे, ओढओढीचे, घालघसरीचे, बनून गेले आहे कि एखाद्या सरळ माणसाला देखील कुचेष्ठा सुचावी? मग या कवीला सुचली यात काय नवल? एखा दृष्टीने कंटकांचे पीक ही जशी कण्टकार्जुनाची निर्माती आहे. तसाच तो अद्यकालीन जीवन- खताचाही महिमा आहे.

कण्टकाञ्जलि या संग्रहाची सुरवात सुद्धा एका मंगलचरणाने झालेली असून मुखबंध हा त्याचा पहिला विभाग होय. यात श्री १०८ कलमाला अनुसरून त्याला कवि नतमस्तक होतो. तर कण्टक म्हणजे काय यावर वर्णन करीत संस्कृतातील नवी रचनेचा रसिकाने आस्वाद घेत जी सरस्वती नेहमीच विविधतेने नटलेल्या रसाळ वृत्तीने नटलेली होती त्याच सरस्वतीलासुद्धा विरोधाभास दर्शिवित तुझ्या तोंडाची चव पार गेली आहे असे म्हणत ती पुन्हा आणून द्यावयाची असेल तर 'कण्टकांचा' तु नव्या तऱ्हेचा काढा तुला घ्यावा लागेल असे म्हणत या संग्रहाची सुरवात झाली आहे.[१] अर्थात नव्याने काहीतरी जाणून घेण्याची सुरवात झाली आहे.रामराज्यपद्धती हे या मुक्तसंग्राहतील दुसरी पद्धती आहे. या पद्धतीचे नाव जरी 'रामराज्य पद्धती' असेल तरी याचा विपरीत अर्थ यात दाखवलेला आहे सहृदयरसिक ज्यावेळी या शीर्षकाचे वाचन करतो त्यावेळी खरच असे वाटते की खरोखरच या ठिकाणी आपल्याला रामराज्याचे अर्थात भगवान रामाच्या राज्याचे स्वरूप पहावयास मिळेल जे सत्यवचनी राम ज्यावेळी आपल्या सिंहासनावर विराजमान होते त्यावेळी सर्वत्र हर्ष म्हणजेच सर्व राज्यात आनंदाचे वातावरण होते. सर्व भय-शोक दूर होते. दैहिक, दैविक, आणि भोतिक तापापासून प्रत्येक जीव मुक्त होतो. कोणीही अल्प मृत्युरोग-पीडा यांनी ग्रासलेला नव्हता, सर्व स्वस्थ, बुद्धिमान साक्षर, गुणज्ञ ज्ञानी तसेच कृतज्ञ होते. अश्या प्रकारचे राज्य त्याकाळी चाले[२] पण याकण्टकाञ्जलितील 'रामराज्य पद्धतीचा' पहिल्या श्लोकात 'नंदराज्यराज्यम्' हा पहिला श्लोक विडंबणाच्या उपहासांच्या रुपात आला आहे. या पद्धतीत पूर्णपणे विरोधाभास तुम्हाला दिसून येणार आहे म्हणजेच आजच्या समाजजीवनाचे स्वरूप कसे आहे हे स्पष्टपणे दिसून येईल.

यात पहिल्या श्लोकात कौटील्याच्या राज्याचे वर्णन करीत कठोर शासनाने बद्ध असलेल्या चाणक्याचे राज्य दर्शिविले आहे. त्यात त्यांनी त्यांचा विरोध नंदाला उद्देशून म्हटले कि – हे नंदा, निरपेक्ष लोकांचे खुशाल मुडदे पाड, गुन्हेगारी पाठीशी घाल. दंड बसव.[३] अर्थात यात विरोधाभास असा की आज जे समाजात चालेल ते असेच आहे. अपराध करणारे मनमोकडे फिरतात त्यांना सजा होत नाही. तसेच गुन्हेगाराला पाठीशी घालणे चालु आहे सध्या समाजातील लोकावर अत्याचार, दंड बसविणे, त्यांना त्रास देणारे आपण समाजात पाहतोच आहे अर्थात अशी व्यवस्था समाजाची झाली आहे[४]. पुढे ते म्हणतात आजचे जे सत्तेसाठी नेहमीच भांडणारे नेते त्यांची चढाओढ आपण प्रत्यक्षात पाहतोच, त्याचे चित्र डोळ्यापुढे आणणारा दुसरा श्लोक, "असिधाराव्रत" म्हणून मांडला आहे. अर्थात 'तारेवरची कसरत' करणाऱ्या राज्यकर्त्यांची खरी ओळख काय हे पटवून देत ते म्हणतात की, पोटात त्यांच्या धास्ती आहे, ओठांवर मस्ती आहे, प्रथम कृतीत वेगळेपणा दिसते पण मनात मात्र स्वार्थ असतो, वरवर लोककल्याणाचा परमार्थ, स्तुतीसुमनाची उधळण करीत, गुंडांना गुप्तफुस लावत त्यांना

समोर करीत आपले राज्य स्थापन करणारे राज्यकर्ता आपण पाहिले आहे. अर्थात खरे स्वरूप काय हे स्पष्ट केले आहे[४]. तर समाजाला ते कळत नाही. म्हणजेच ते कळावे यासाठी त्यांनी हे समजून घेणे आवश्यक आहे. पुढच्या श्लोकात 'राष्ट्रीयतेचे मानकरी' अर्थात आपले राष्ट्र सध्यपरिस्थितीत कशावर आधारित आहे हे सांगत ते म्हणतात-

"अस्माकं हि बकाः खगाः, अजगराः प्राणी च नो राष्ट्रीयः,
निम्बं चापि फलं, तरुः स्नुहितलः, वाचालता नः कला,
विद्या स्वापः, ऋणानि संपदयिता, निर्वाचन चोद्यमः,
गीतं फिल्मगतं, पदा प्रहरणं क्रीडा च, झिल्ली चवाक्"[५]

अश्या प्रकारे विडंबन करीत राष्ट्राची स्तुती (विरोधात) दर्शविली आहे. यात राष्ट्रीय पक्षी, प्राणी, फल, वृक्ष, राष्ट्रीय कला-बडबड, राष्ट्रीय विद्या झोप, विपुल संपत्ती: कर्ज, उद्योगधंदा:- निवडणुका, संगीत:- सिनेगीत, खेळ:- लाथाळी, राष्ट्रीय भाषा:- झिल्ली (जी कुणालाच समजत नाही). अर्थात विरोधाभास/विडंबन असे की, आज आपली सामाजिक, राष्ट्रीय स्थितीचे स्वरूप, चित्रण सांगितले आहे. निवडणुका आल्या की संपूर्ण लक्ष त्यावरच असत. सर्व पैसे त्यावरच खर्च केला जाते. नेत्यावर एवढे पैसे खर्च करण्यापेक्षा एखादा प्रकल्प करणारा, समाजाचा उद्धार करणाऱ्याला दिले तर, म्हणजे सांगावयाचे झाले उदा: बाबा आमटे सारख्या समाजसुधारकाच्या कामात दिला तर समाज सुधारेल. निवडणुकीवर खर्च करून काय मिळते तर फक्त आश्वासन. पुढे काहीच नाही अश्याप्रकारे वर्णन यात येते.

पुढील श्लोकात पंचतंत्रातील एक गोष्ट सांगत कवि आपल्याला कामराज – योजना काय हे एका गोष्टीतून सांगतो येथे पूर्ण गोष्ट सांगणार नाही. त्यांचा भावार्थ मात्र सांगेल. त्यात स्वामिभक्तीने युक्त असलेलेच लोक शेवटपर्यंत आपले कर्तव्य करीत मरतात पण त्याच्या आजूबाजूला अनेक लोक असतांना सुद्धा त्याला कोणी मदत करीत नाही फक्त त्याची मजा बघतात जणू भासवतात की, आम्ही आपल्या सोबतच आहोत. पुढे अश्वत्यवृक्षाचेही वर्णन करीत की, हे वृक्ष संसारवृक्ष आहे. तो तोडणारा आजपर्यंत जन्म आला नाही, येणार सुद्धा नाही. असा हा संसारवृक्ष अजरामर आहे.[६]

चित्रगुप्त: म्हणून पुढील श्लोक आहे त्याचे विवरण पुढीलप्रमाणे

"न्यायार्थं भुवियां श्रयन्ति सरणीं शिष्टां जनाः, नारदात्
श्रुत्वा तां परमादरणे विषये स्वे चित्रगुप्त: श्रित: ।
नास्थेवाहस्सौ इति प्रतिवचः श्रुत्वा परं पापिनां
स्वे कर्मण्यनुतप्त एष विवशः कुटान् व्यधात साक्षिणः ।। [७]

"चित्रगुप्ताची न्यायसुधारणा"या श्लोकाअंतर्गत कवीने न्यायसुधारणा विषयी आपले मत सांगितले आहे. पण यात त्यांनी आपल्या राज्यात सुरु असलेल्या एखादा आरोपी जेव्हा "तो मी नव्हेच" असे इन्कार करतात तेव्हा तस्काराविषयीचे मत स्पष्ट होते.

पुढे 'मन्त्रीतस्करौ' या श्लोकात मंत्री आणि चोर या दोघाच्या समन्वय दर्शवित दोघाचाही सारखेपणा दाखवला आहे. उदा: "एक मंत्री चोराला म्हणाला, लुच्चा माणसा, लोकांनीमेहनतीने घाम गाळून कमावलेला पैसा तू घरफोडी करून लुटतोस, तू जनतेचा शत्रू आहे, थू तुझ्या जिण्यावर । यावर चोर मंत्र्याला म्हणतो की, आपण लोकांचा पैसा घरफोडी न करताच खिशात घालता, आणि याबद्दल आपणाला शिक्षाही होत नाही. ही काय विद्या आहे मला जरा शिकवा.[८] यात विरोधाभास असा की चोरापेक्षा मंत्री हा समाजासाठी सर्वांत घातक आहे हे स्पष्ट होते.

पुढील श्लोकाच्या स्पष्टीकरणात असे दिसते कि या रामराज्यात शिक्षेची सूट हवी असेल तर राज्यकर्त्यांची खुर्ची आज आवश्यक आहे 'कर्ज' अर्थात 'ऋण' या विषयी श्रुतीस्मृती प्रामाण्याअनुसरून ऋण मुळात ३ प्रकारचे देवऋण,

ऋषिऋण, पितृऋण होय. म्हणजे विरोधाभास असा कि, कर्ज हीच मनुष्याची प्रकृती आहे. आणि निष्क्रियपणा हि विकृती। तेव्हा माणसाने निश्चितपणे कर्ज काढावे ते परत फेडायचे की नाही ते मुलगा पाहून घेईल. म्हणून राज्यकर्ते क्षणोक्षणी कर्ज काढीत असतात.

'मद्यब्रम्ह' नावाच्या श्लोकातून आजची भयानक परिस्थिती दिसून येते ती अशी की कवि सांगतात की आज समाजात आजूबाजूला दारुड्यांचे थवे आजूबाजूला दिसून येतात, बाजूला हिजडे, तमासगिर इतरत्र थुंकतांना दिसतात. हातात गळयात गळे घालून फिरतात, दारू पिऊन शिवीगाड करतात, भुईवर लोटांगण घालताना दिसतात. हे खरे रूप स्पष्ट होते.[९]

'निर्यात नावाच्या श्लोकात म्हणतात सरकार आज प्रत्येक वस्तूची निर्यात करतांना दिसून येतात. जो माल आपल्या राष्ट्रासाठी ठेवावा तो माल विविध देशात निर्यात करताना दिसून येतात. पुढे ते 'विघुतदीप' नावाच्या श्लोकात ते म्हणतात की, गावात असलेली वीज ही बाजारबसवीसारखी उंडारत असते तिचा काय भरवसा? म्हजेच कधी ही दिवे सरकार घालवतील याचे नेम नाही पुढे ते म्हणतात बर झाले सूर्याच्या किरणापर्यंत पोहचले नाही नाहीतर त्याची ही राज्यकर्त्यांनी तस्करी केली असती.

**निष्कर्षः-**

अशा प्रकारे अनेक आश्वासन देणारे राज्यकर्ते आपले राज्य अश्या प्रकारे चालवतात हे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात कवीच्या 'रामराज्याला' सलामी द्यावीशी वाटते. कारण जो कोणी या कण्टकांण्जलीचे पठन करेल त्यालाच खरी परिस्थिती काय हे लक्षात येणार आहे. म्हणून संस्कृतातील हा २० शतकातील मुक्तसंग्रहाचा अर्थात विडंबनपर काव्याची आवश्यकता कायहे दिसून येते. यात आजच्या राज्यकर्त्यांचा खरा चेहरा दिसून येतो. फक्त पैश्याच्या खेळत खेळणारा हा राज्यकर्ते माणसाचे खिसे रिकामे करीत स्वतःचा स्वार्थपणाला लावत आपले 'रामराज्य' कसे चालवत आहे हे स्पष्ट झाले आहे.

## संदर्भ सूची:

### आधारभूत ग्रंथ


1) **कण्टकाञ्जलि :-कृष्ण श्री अर्जुन वाडकर** Print Published edition, August 15 1965, Printed by S.P. Prints Agency VadgavKhurd, Simhagad Road, Pune 411041


### संदर्भग्रंथ सूची


1) कण्टकक्काथ :- श्लोक क्र. ५ – पृष्ठ क्रमांक-४ (कण्टकाञ्जलि)
2) रामराज्य :- http://www.wikipedia.org
3) नन्दराज्यम् :- रामराज्यपद्धती, श्लोक क्रमांक – ६, पृष्ठ क्रमांक- ६(कण्टकाञ्जलि)
4) आसिधाराव्रतम :- रामराज्यपद्धती, श्लोक क्रमांक – ७, पृष्ठ क्रमांक- ७(कण्टकाञ्जलि)
5) अस्माकं राष्ट्रियम् :- रामराज्यपद्धती, श्लोक क्रमांक – ८, पृष्ठ क्रमांक- ८(कण्टकाञ्जलि)

6) अश्वत्थवृक्ष: :- रामराज्यपद्धती, श्लोक क्रमांक – ११, पृष्ठ क्रमांक- ९(कण्टकाञ्जलि)
7) चित्रगुप्तः :- रामराज्यपद्धती, श्लोक क्रमांक – १३, पृष्ठ क्रमांक- ११(कण्टकाञ्जलि)
8) मन्त्रितस्करौ :- रामराज्यपद्धती, श्लोक क्रमांक – १४, पृष्ठ क्रमांक- ११,१२(कण्टकाञ्जलि)
9) ऋणम्, मद्यब्रम्ह :- रामराज्यपद्धती, श्लोक क्रमांक – १७, पृष्ठ क्रमांक- १३ (कण्टकाञ्जलि

# गजानन बालकृष्ण पळसुले यांच्या नाटकांचे योगदान

**Prashant Biradar**

Mahatma Phule Mahavidyalaya, Ahmedpur, Dist- Latur .413515

Mob-9764120822

## सारांश

*संस्कृत साहित्य मध्ये नाटकांची खूप प्राचीन परंपरा आहे या नाटकांचा प्रवाह आधुनिक काळापर्यंत थांबलेला नाही तर निरंतर प्रवाहित होत आहे या अखंड प्रवाहात अनेक नाटककारांनी आपल्या साहित्यकृती निर्माण करून योगदान दिले आहे या प्रयत्नांचे फळ म्हणूनच आधुनिक काळातही संस्कृत भाषेत नवनिर्मिती होताना दिसते प्रस्तुत शोध निबंधाच्या माध्यमातून गजानन बाळ प्रश्न पळसुले यांच्या विसाव्या शतकातील नाटकांचे योगदान पाहणार आहोत यांच्या नाटकामुळे संस्कृत नाट्य परंपरेची ज्योत विद्यमान राहण्यात मदत मिळाली आहे आजही यांचा आस्वाद नाट्यरसिक संस्कृत भाषा तज्ञ घेत आहेत यांच्या रचना व त्यांचे वैशिष्ट्य याचा आढावा या निबंधात घेतला आहे धन्यवाद द्यायला.*

**प्रस्तावना-**

संस्कृत भाषेतील साहित्याचा ओढ आधुनिक काळातही निरंतर प्रवाहित होत आहे. संस्कृत साहित्याचा प्रवाह थांबला नाही हे यावरून सिद्ध होते. अनेक साहित्य कारांनी संस्कृत भाषेवर प्रेम करून तिचा गार्डन अभ्यास करून तिला जिवंत ठेवण्याचे व उंच करण्याचे आटोकाट प्रयत्न केले आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळेच विसाव्या एकविसाव्या शतकात हे संस्कृत भाषेत नवनिर्मिती होताना दिसते आणि याचा मनस्वी आनंद होतो. या साहित्यिकांच्या कृतींना जनसामान्य तून पुरेसा प्रतिसाद मिळाला नसला तरी संस्कृत प्रेमी लोकांचा निश्चितच उत्तम प्रतिसाद आहे. पळसुले यांनी समाजाने लज्जित व्हावे अशी चिंता व्यक्त केली होती की लेखकांनी संस्कृत मध्ये छापलेले पुस्तक विक्री करण्यासाठी विक्रेते उपलब्ध होत नाहीत त्यामुळे त्यांची पुस्तके घरांमध्येच सडून जातात हे विदारक चित्र आजही दिसून येते. तरीही संस्कृत विद्वान आपल्या साहित्यकृती प्रकाशित करून संस्कृत भाषेची ज्योत तेवत ठेवतात याचा अभिमान वाटायला हवा.

विसाव्या शतकातील संस्कृत नाटकांच्या योगदाना मध्ये गजानन बाळकृष्ण पळसुले यांच्या नाटकांचे ही खूप महत्त्वाचे योगदान आहे त्यांची नाटके आधुनिक काळातील चित्र रंगवताना नीतिमूल्यांचा विचार करायला लावणारी आणि देशभक्ती वाढवणारी आहेत.त्यांचा अल्पपरिचय आणि त्यांच्या नाटकांचे समीक्षात्मक रसग्रहण प्रस्तुत शोधनिबंधात करणार आहोत.

**परिचय-**

संस्कृत विद्वानांचा परिचय त्यांच्या लेखणीतून होत असतो. त्यांचे संस्कृत प्रेम आणि गहन अध्ययन यामुळे उत्कृष्ट कलाकृती निर्माण होतात. त्यांचा वैयक्तिक परिचय यापेक्षाही साहित्यिक परिचय खूप महत्त्वाचा ठरतो. त्यांच्या जन्मा पेक्षा त्यांच्या कलाकृतीचा जन्म कसा झाला हा विशेष परिचय होय. पळसुले यांच्या कलाकृतीही अतिशय अभ्यासपूर्ण व मेहनतीने निर्माण झालेले आहेत त्यांचा अल्पपरिचय पुढील प्रमाणे पाहू.

त्यांचा जन्म1 नोव्हेंबर 1921 ला झाला. ते पुण्यामध्ये संस्कृत प्रगत अध्ययन केंद्राचे प्राचार्य होते. त्यांनी भारतवाणी

नावाच्या संस्कृत पाक्षिकाचे संपादन केले होते. ते नेहमी आजारी असत तरीही आपल्या आजारांमध्ये त्यांनी कधीही संस्कृत अध्ययन आणि लेखन थांबवले नाही. ते म्हणतात – ममवांग्मयस्यानल्पो Sशरुग्णशय्यायां लब्धजन्मास्ति।

डॉक्टर बाळकृष्ण पळसुले हे उच्चविद्याविभूषित होते त्यांनी एम ए पीएचडी प्राप्त केली होती त्यांनी संस्कृत भाषेत अनेक ग्रंथ रचले.गजानन बाळकृष्ण पळसुले हे संस्कृतचे गाढे अभ्यासक होते त्यांची संस्कृत वर खूप निष्ठा होती तसेच स्वातंत्र्यवीर वि दा सावरकर यांच्यावरही त्यांची खूप श्रद्धा होती. ते म्हणतात की- संस्कृतम् तथाच सावरकर: द्वे हे श्रद्धास्थानं।

**रचना**–

गजानन बाळकृष्ण पळसुले यांच्या अनेक संस्कृत रचना प्रसिद्ध आहेत.त्यात विनायक वीरगाथा विवेकानंद चरितम्, हिंदू सम्राट स्वातंत्र्यवीर, सांत्वनम्, वयमन्योन्यपृच्छायहे, अग्निजा कमला इत्यादी विविध प्रकारचे साहित्य आणि देशभक्ती विषयक कविताही विद्यमान आहेत.

विसाव्या शतकातील संस्कृत नाट्य परंपरेची महिमा वाढवणारी यांचीही सुप्रसिद्ध तीन नाटके आहेत त्यात समानमस्तू हे मन:,धन्येयंगायनी कला,धन्योऽहं धन्योऽहम्

**समानमस्तू हे मन:-**

नोव्हेंबर 1961 इसवीसन मध्ये भारत शासनाच्या वैज्ञानिक संशोधन आणि सांस्कृतिक कार्य विभागाकडून एक नाटक स्पर्धा आयोजित झाली होती त्याचा विषय होता भारतस्यैकात्मकतान्वेषम्

यात गजानन बाळकृष्ण पळसुले यांनी स्पर्धेसाठी या नाटकाची रचना केली होती स्पर्धेमध्ये या नाटकाला सर्वोत्कृष्ट संस्कृत नाटक म्हणून घोषित करण्यात आले होते आणि दहा हजार रुपयांचे पुरस्कार ही ही दिले गेले होते या नाटकाच्या पृष्ठभूमि त्या घटना आहेत ज्या भाषा निहाय राज्य बनवण्याच्या वेळी आसाम आणि बंगाल प्रांतात घडल्या जर भारताची एकता असेल तर अशा प्रकारचा विसंवाद शोचनीय आहे दुसऱ्या अंकात भारतीय एकतेसाठी पूर्वीच्या विद्वानांनी केलेल्या प्रयत्न आणि परिणामांचे आकलन आहे आवश्यकता आहे एकात्मताजीवीलोकांची केवळ एकात्मता वादी लोकांची नाही.

प्रस्तुत नाटकामध्ये तीन अंक आहेत अंक दृश्यांमध्ये विभाजित आहेत साधारणतः लहान लहान संवाद परंतु कोठे कोठे अतिशय दीर्घ संवाद आहेत दुसऱ्या अंकामध्ये 28 ओळींचा एक संवाद आहे असे संवाद अभिनय नाट्य साठी योग्य नाहीत नाटकामध्ये नांदी आणि भरत वाक्य आहे परंतु भारतीय प्रस्तावनेचा अभाव आहे.

**धन्येयंगायनी कला-**

ही एक एकांकिका आहे या एकांकिका चा नायक ठण ठण पुढचे चक्रम आदित्य आहेत या नायकाचे व्यक्तिमत्व विनोदी आहे तो एका कर्तनालय चे उद्घाटन करतो त्याच्या सभेमध्ये हे अमात्य इत्यादी पात्र चापलुसी करत प्रसन्न निर्माण करतात जसे विक्रमादित्याने कसे लपून छपून आक्रमण करून वाघाचे शेपूट कापले होते त्यांनी त्याचे डोके का छाटले नाही? याचे उत्तर चक्रम आदित्य देतात की तेही कापले असतो पण कोणीतरी अगोदरच त्याचे डोके उडवले होते.

एका गायकाला राजाने आदेश दिला की असे गाणे म्हणा ज्यामुळे नाक आणि डोळे तृप्त होतील आणि राजा गायनाने प्रसन्न झाला त्याने याचना केली की राज्यामध्ये गायनी कला प्रसिद्ध व्हावी. यावर राजाने अमात्यांना आदेश दिला की राज्यामध्ये कोणीही गद्य भाषा करू नये सर्वांनी पद्य भाषेतच बोलावे जो गद्य बोलेल त्याला मारून टाकावे.. राजाच्या या

आदेशामुळे बाजारामध्ये ही ही विनोदी पद्य संवाद ऐकू येऊ लागले जसे

पती म्हणतो लिटरमेकं ददातु तैलं नान्यदिष्यते

इदमेवालयम्।

पळसुले यांचे हे प्रहसन श्रंगार विहीनकोटीचे अतिशय विनोदी आणि रुचकर आहे निश्चितच याची गणना आधुनिक श्रेष्ठ प्रसन्न करांमध्ये करण्यास योग्य आहे.

**धन्योऽहं धन्योऽहम्**

पळसुले यांचे हे तृतीय नाटक आहे या नाटकात चार अंक असून मुख्य विषय स्वतंत्रता संग्रामाचे अग्रगण्य सेनानायक वीर सावरकर आहेत जे पळसुले यांची श्रद्धास्थान आहे. सावरकरांवर पळसुले यांनीअनेक रचना केल्या त्यांच्यावर नाटक न लिहिणे कसे शक्य नव्हते. 1969 70 इस्लाम मध्ये त्यांनी अनेक ग्रंथांचे मंथन करून या नाटकाची रचना केली नाटकाचा प्रारंभ पंधरा वर्षीय सावरकरांच्या वडिलांसमोर आरण्यक वाचण्याने होतो आणि यात त्यांच्या संपूर्ण जीवनाची श्रेष्ठ चरित्रगाथा आहे नाटकाची सरळ भाषा असामान्य रूपाने नाटकास योग्य आहे परंतु यातील ही लांबलचक संवाद योग्य वाटत नाहीत चौथ्या अंकाच्या प्रथम दर्शन मध्ये सावरकरांची एकउक्ती जवळपास शंभर ओळी म्हणजे तीन प्रस्तावामध्ये रचलेली आहे.

नाटकामध्ये नांदी प्रस्तावना आणि भरतवाक्य यांचा अभाव दिसतो हे आधुनिक शैलीचे चरित्रात्मक नाटक आहे पळसुले यांच्या रचना राष्ट्रीय चरित्र निर्माण करण्याच्या दिशेने खूप महत्त्वाचे आहेत विसाव्या शतकामधील संस्कृत नाटकांची गरिमा पळसुले यांच्या साहित्यामुळे वाढते आधुनिक काळातील समाजाचे चित्र त्यात रंगवण्यात आले आहे तसेच विनोद आणि देशभक्ती यामुळे त्यांची नाटके मनोरंजक आणि हृदयाला आनंदित करणारी आहेत देशभक्तीपर नाटकांमधून समाजसेवा आणि स्वातंत्र्य साठीचा संग्राम प्रेक्षकांना प्रेरित करून जातो भाषाशैली सरस आहे.

**संदर्भ ग्रंथ-**

१.शारदा ग्रंथमाला पुणे

२. अमर भारती सिरीज 1964

३. आधुनिक संस्कृत नाटक भाग- 2 रामजी उपाध्याय

# आधुनिक युगातील संस्कृत पत्रकारिता

**राजेन्द्रप्रसाद किशनराव आर्य**
राजर्षी शाहू महाविद्यालय, (स्वायत्त) लातूर

## सारांश

*इंग्रजांकडून पत्रकारितेची सुरूवात करण्यात आली व भारतीयांकडून त्याचे अनुकरण करण्यात आले. भारतात सर्वप्रथम संस्कृत भाषेतील नियतकालिके, पत्र-पत्रिकांची सुरूवात कधी व कुठे झाली त्याबाबतची माहिती व कांही नियतकालिकांची नावे या शोधनिबंधातून आपल्याला दिसून येतील. सद्यस्थितीत भारतात कोठे-कोठे संस्कृत नियतकालिके प्रकाशित होतात व त्यातील प्रमुख नियतकालिकांची माहिती सदरील शोधनिबंधात आहे. तसेच आधुनिक तंत्रज्ञानात व्हॉट्सअप, फेसबुक, टेलीग्राम, दूरदर्शन या प्रसारमाध्यमांच्या आधारे संस्कृत भाषेच्या प्रसार कसा करता येईल याबाबतची माहिती घेऊन या भाषेचा प्रसार न होण्याची कारणेसुद्धा या शोधनिबंधातून प्रामाणिकपणे मांडण्यात आलेली आहेत.*

जेव्हां भारतात इंग्रजांचे राज्य होते तेव्हां त्यांनी आपल्या प्रशासकीय कार्यासाठी व आपल्या अधिकारी, कर्मचारी आणि हितचिंतक लोकांसाठी स्वत:बद्दलची व त्यांना लाभकारक कार्यासाठी त्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पत्र पत्रिकांचे वर्तमानपत्रांचे प्रकाशन प्रारंभ केले. त्याची उपयोगिता पाहून भारतीयांनीदेखील त्यांचे अनुकरण करीत विविध दैनिक, मासिक, त्रैमासिक आदि पत्र-पत्रिकांचे प्रकाशन प्रारंभ केले. इंग्रजांचा उद्देश वेगळा होता व भारतीय लोकांनी मात्र या माध्यमांनी जनजागृती, सामाजिक सुधार राजकीय सुधार, साहित्य सेवा, नव साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी विविध नियतकालीकांची सुरूवात केली.

बंगालवासी पंडित ऋषिकेश भट्टाचार्यांनी 'विद्योदय' नामक संस्कृत मासिकाची सुरूवात इ.स.1869 मध्ये पंजाबात केली. या मासिकाच्या विशेष वैशिष्ट्यामुळे त्याला भारतात खूप प्रसिध्दी मिळाली. सुरूवातीला हे मासिक पंजाबमधून प्रकाशित होत होते पण नंतर काही त्यांच्या वैयक्तिक कारणांमुळे ते पत्र कोलकत्त्याहून पंचेचाळीस वर्षापर्यंत चालू राहिले. नंतर मात्र आर्थिक अडचणीमुळे हे मासिक बंद झाले.

कांचीवरमच्या श्री अनंताचार्य यांनी 'मंजूभाषिणी' नामक मासिक पत्रिकाची सुरूवात केली. यात वैष्णव मताच्या प्रचारासाठी न्याय, वेदांत सारख्या गहन विषयावर लेख असत.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मद्रासचे आर.कृष्णम्माचार्य यांनी 'सहृदया' ही मासिक पत्रिका सुरू केली. यात प्रामुख्याने त्यांनी पौर्वात्य व पाश्चात्य नवीन विद्यांचा उत्कृष्ट समन्वय होते. पंचवीस वर्षापर्यंत यांनी या पत्रिके मार्फत संस्कृत सेवा केली.

अगोदर कोलकाता व त्यानंतर कोल्हापूरातून श्री अप्पाशास्त्री राशिवडेकरांच्या संपादनत्वात 'संस्कृत चंद्रिका' मासिक प्रकाशित होत होती. नंतर मराठी वृत्तपत्राप्रमाणे त्यांनी 'सुनृतवादिनी' हे साप्ताहिक सुरू केले. त्यांनी जीवंत असेपर्यंत हे दोन्ही पत्रके चालू ठेवले. त्यांच्या मृत्यूनंतर हे बंद झाले.

वाराणसीमध्ये चित्रवाणी, संस्कृत भारती, सुप्रभातम्, अच्युतम्, अमरभारती, सूर्योदय: आदि नियतकालिके संस्कृतमध्ये प्रकाशित होत असत. यात अनेक विद्वानांच्या ग्रंथांचे संस्कृत अनुवाद, ऐतिहासिक कथा, स्थलवर्णन, सामाजिक विषयांवर लेख प्रकाशित केले जात होते.

अखिल भारतीय संस्कृत संम्मेलनाचे 'संस्कृत रत्नाकर:' हे मासिक आजदेखील प्रकाशित होत आहे. यांनी वेगवेगळ्या वेद, दर्शन, आयुर्वेद, ज्योतिष आदि विषयांवर विशेषांके काढून संस्कृतची महती सेवा केली आहे.

रामनगरी अयोध्येत इ.स.1930 पासून 'संस्कृतम्' हे साप्ताहिक आजसुध्दा प्रकाशित होत आहे. या साप्ताहिकात इंग्रजीसहित नवीन नवीन शब्दांना वापरण्यावर अधिक भर असतो.

भारताच्या वेगवेगळ्या राज्यात संस्कृत नियतकालिके अनेक विद्वानांनी प्रारंभ केले. त्यांनी काही वर्षे खूप प्रयत्न करून त्याला चालविले परंतु नंतर अनेक अडचणींमुळे त्यांना ते बंद करावे लागले. तरीदेखील त्यातील काही ठळक नियतकालिके या प्रकारे - श्री अनंत त्रिपाठी, ब्रह्मपूर उत्कल यांच्या संपादकत्वाखाली 'मनोरमा' काशीच्या धर्मसंघाची 'प्रतिभा' बंगलोरचा 'अमृतोदय:' पाटणाचे 'मित्रम' काशीच्या विद्वानमंडळाचे मुखपत्र 'सुप्रभातम्' प्रयाग येथून 'आर्यसिध्दान्ता:' मुंबईतून सुरभारती म्हैसूर संस्कृत कॉलेजपत्रिका आदि विशेष उल्लेखनीय आहेत.

कोणतीही कला, विद्या आदि राजाश्रय किंवा लोकाश्रयाशिवाय दीर्घकाळ अस्तित्त्वात राहू शकत नाही. तरीदेखील अनेक गणमान्य विद्वानांनी अथक परिश्रम करून संस्कृत विद्येला अजरामर करण्यासाठी आपल्या परीने आजपण प्रयत्नशील असून सुरभारतीची सेवा करण्यासाठी कटिबध्द आहेत. त्यात प्रामुख्याने वाराणसीच्या संस्कृत महाविद्यालयद्वारा प्रकाशित होणारी 'सरस्वती सुषमा' ही त्रैमासिक नागपूरच्या संस्कृत भाषा प्रचारिणीचे इ.स. 1950 पासून प्रा.श्री. भा.वर्णेकर यांच्या संपादकत्वाखाली प्रारंभ झालेले 'संस्कृतभवितव्यम्' डॉ.ग.बा.पळसुले यांच्या संपादकत्वाखाली पुणे येथून संस्कृत सभेचे पाक्षिक मुखपत्र 'भारतवाणी' तसेच संस्कृत साहित्य परिषदेचे पाक्षिक 'शारदा' दिल्ली येथून 'अर्वाचीन संस्कृतम्' त्रैमासिक श्री रमाकांत शुक्ला यांच्या संपादकाखाली राजस्थानमधील जयपूर येथून 'स्वरमंगला' त्रैमासिक 'भारती' मासिक दिल्ली येथून 'संस्कृत मंजरी' त्रैमासिक, गुरुकुल महाविद्यालय ज्वालापूर मासिक पत्रिका 'भारतोदयम्' संपूर्णानंद संस्कृत विश्व विद्यालय, वाराणसी साप्ताहिक पत्रिका 'गांडीवम्' कानपूर येथून दैनिक वृत्तपत्र नवप्रभातम् कर्नाटक मैसूर येथून दैनिक वृत्तपत्र सुधर्मा संपादक के.व्ही.संपतकुमार आदी.

आजच्या काळात नवीन तंत्रज्ञान ऑनलाईन ई पेपर दैनिक 'विश्वस्य वृत्तांतम्' 2010 पासून सुरू आहे. या व्यतिरिक्त फेसबुक व्हॉट्सअप ग्रुप आदी नव नवीन साधनांद्वारा काहीजण संस्कृत भाषेच्या प्रचाराचे कार्य करीत आहेत. जे आधुनिक युगातील नियत कालिकाप्रमाणे संस्कृत सेवाच करीत आहेत. भारत सरकारच्या दूरदर्शन व आकाशवाणीच्या माध्यमाने संस्कृत वार्ता व साप्ताहिक वार्तावली एक प्रकारे साप्ताहिक प्रमाणे संस्कृत सेवाच होय.

संस्कृत नियतकालिकांची खूप मोठी यादी आहे. परंतु संक्षेपात येथे काहींचे दाखले मी दिले आहेत. या नियतकालिकांमध्ये विविध साहित्य, सिध्दान्त, दर्शन, आयुर्वेद, ललितलेखन आदंीेंचा समावेश आहे. संस्कृतचा पाठकवर्ग कमी असल्यामुळे पाहिजे तेवढा राजाश्रय किंवा लोकाश्रय नसल्यामुळे आर्थिक व मानसिक दु:ख सहन करीत हे कार्य करीत आहेत. सरितवत प्रवाहमान संस्कृतातदेखील या नियतकालिकांच्या भाषाशैलीमुळे सरलता, सुबोधता, धारावाहीपणा प्राप्त झाला आहे. त्यासाठी असे ऋषीतुल्य व्यक्ती खरोखर अभिनंदनास पात्र आहेत.

**संदर्भ ग्रंथ :**

संस्कृत साहित्य का इतिहास. देवर्षि कलानाथ शास्त्री साहित्यागार, जयपुर.

अर्वाचीन संस्कृत साहित्य, प्रा.श्रीधर भास्कर वर्णेकर, मॉडर्न बुक स्टोअर्स, अकोला.

अर्वाचीन संस्कृत साहित्य दशा एवं दिशा, डॉ. मंजुलता शर्मा, परिमल पब्लिकेशन्स, दिल्ली.

आजकालची पत्रकारिता, श्री धारुरकर व्ही. एल. नरेंद्र प्रकाशन, पुणे,

सन.1994

# श्री वासुदेवानंद सरस्वतीं चे संस्कृत साहित्य

**सपना नारायण चिन्नुरकर**

स्वामी रामनद तीर्थ, मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

**सारांश:**

*सनातन भारतीय आर्यधर्म, तत्त्वज्ञान व संस्कृतीचा प्रवाह प्रदीर्घ काळापासून अक्षुण्णपणे प्रवाहित होत राहिला. अशा या भारतवर्षातील तत्त्वज्ञान हे धारणात्मक धर्माचे एक अंग म्हणून विकसित झाले. किंबहुना आचारात्मक धर्माची तत्त्वज्ञानापासून फारकत अशी कधीच केली गेली नाही. विचार आणि आचार यांच्या एकात्मिक समन्वयातूनच संस्कृतीचा विकास होत गेला.*

*विसाव्या शतकात अवतार धारण करून आपले देहप्रारब्ध भोगीत नियोजीत जीवनकार्य पूर्ण करणारे, जीवनादर्शांचा महासमन्वय साधणारे प्रातस्मरणीय थोरविभूतीमत्व म्हणजे पूज्यपाद श्रीवासुदेवानंद सरस्वती होत.*

*श्रीमद्वासुदेवानंद सरस्वतींनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भगवान्श्रीगुरूदत्तात्रेयांची उपासना प्रवर्तित करून विपुल संस्कृत तसेच प्राकृत साहित्याची रचना केली. या विस्तृत ग्रंथरचनेचा परिचयात्मक मागोवा या निबंधात प्रस्तुत करण्यात आला आहे.प्रस्तुत निबंध केवळ श्रीमद्वासुदेवानंद सरस्वतींच्या विविध संस्कृत साहित्याचा परिचय देण्यापुरता मर्यादीत आहे. महाराष्ट्राच्या कोकण प्रांतात सावंतवाडी हे संस्थान होते. तेथूनजवळच माणगाव हे गाव आहे. या माणगावी गणेश भट्टजी टेंबे अत्रीगोत्री कऱ्हाडजातीचे ब्राह्मण राहत होते. त्यांच्या पत्नीचे नाव रमाबाई होते. रमाबाईना गर्भधारणा होऊन श्री शके 1776 (इ.स.१८५४) श्री वासुदेवानंद सरस्वतींचा जन्म झाला. श्रीवासुदेवानंद सरस्वतींचा गृहस्थाश्रम तसा फारसा चांगला राहिला नाही. पत्नीच्या मृत्युनंतर त्यांनी संन्यास घेतला. संन्यास घेतल्यानंतर श्रीवासुदेवानंदसरस्वतींच्या चरित्रातील महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांचे विविध जागी झालेले चातुर्मास होत.याच कालावधीत त्यांनी आपली संस्कृत साहित्यरचना केली.*

*श्रीवासुदेवानंद सरस्वतींनी आपले सर्वप्रमुख ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिले आहेत. त्यांचे प्रमुख संस्कृत ग्रंथ म्हणजे श्री गुरूसंहिता, श्रीगुरुचरितम्, योगरहस्य, बोधरहस्य, श्रीगुरुचरित्रकाव्य, श्रीदत्तपुराण, श्रीदत्तचम्पू, शिक्षात्रयम्, पंचपाक्षितस्तात्रादि संग्रह होत. या निबंधेतील चर्चेवरुन असे दिसून येते की विसाव्या शतकाच्या प्रारंभी संस्कृत भाषेत विपुल गद्य पद्य रचना करणारे श्रीवासुदेवानंद सरस्वती हे एकमेव आधुनिक दार्शनिक व पौराणिक ग्रंथाची रचना करणारे वेदव्यास होत.*

**प्रास्ताविक :**

सनातन भारतीय आर्य धर्म, तत्त्वज्ञान व संस्कृतीचा प्रवाह प्रदीर्घ काळापासून अक्षुण्णपणे प्रवाहित होत राहिला. अशा या भारतवर्षातील तत्त्वज्ञान हे धारणात्मक धर्माचे एक अंग म्हणून विकसित झाले. किंबहुना आचारात्मक धर्माची तत्त्वज्ञानापासून फारकत अशी कधीच केली गेली नाही. विचार आणि आचार यांच्या एकात्मिक समन्वयातूनच संस्कृतीचा विकास होत गेला. अशी ही प्रदीर्घ परंपरा साधारणपणे चार टप्प्यात कालक्रमानुसार मांडता येते. या परंपरेचा पहिला टप्पा ऋषी परंपरेचा आहे. हा टप्पा वेद-उपनिषदांच्या सृजनाचा आहे. दुसरा टप्पा पूज्यपाद आद्य शंकराचार्यांपासून प्रारंभ होतो आणि रामानुज, मध्व, निम्बार्क अशा आचार्य परंपरेच्या चिकित्सक भाष्यग्रंथातून समृद्ध होत जातो असे म्हणता येते. प्रतिकात्मक गूढगहन अशा श्रुत्यर्थाचे ज्ञान-विज्ञान या टप्प्यात भूमिका व या भूमिकेपर्यंत पोहोचावयाचा आधार असलेल्या देहात्मवादी चार्वाकाचार्यांसह द्वैत-विशिष्टाद्वैतादिक भूमिका दार्शनिक चिकित्सेसह या कालावधीत विकसीत होत गेल्या.

विसाव्या शतकात अवतार धारण करून आपले देहप्रारब्ध भोगीत नियोजीत जीवनकार्य पूर्ण करणारे, वरील चारही

टप्प्यांतील जीवनादर्शांचा महासमन्वय साधणारे प्रातस्मरणीय थोर विभूतीमत्व म्हणजे पूज्यपाद स्वामी श्री वासुदेवानंद सरस्वती होत.

**निबंधाचे उद्दीष्ट :**

श्रीमद् वासुदेवानंद सरस्वतींनी विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात भगवान् श्री गुरू दत्तात्रेयांची उपासना प्रवर्तित करून विपुल संस्कृत तसेच प्राकृत साहित्याची रचना केली. या विस्तृत ग्रंथरचनेचा परिचयात्मक मागोवा या निबंधात प्रस्तुत करण्यात आला आहे.

**निबंधाच्या मर्यादा :**

प्रस्तुत निबंध केवळ श्रीमद् वासुदेवानंद सरस्वतींच्या विविध संस्कृत साहित्याचा परिचय देण्यापुरता मर्यादीत आहे.

**निबंधाचा अभ्युपगम् :**

श्री वासुदेवानंद सरस्वतींनी 20 व्या शतकाच्या प्रारंभी दत्त संप्रदायाशी निगडीत विपुल संस्कृत गद्य पद्य साहित्याची रचना केली. हे साहित्य शंकराचार्यांचा वेदांत अनुसरणारे असून ते प्रामुख्याने पद्यात आहेत. पद्यरचनेवर त्यांनी स्पष्टीकरणात्मक स्वोपज्ञवृत्तीची रचना गद्यात केली आहे.

**श्री वासुदेवानंद सरस्वतींचे जीवन चरित्र**

महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर कोकण प्रांत आहे. कोकण प्रांतात सावंतवाडी हे संस्थान होते. तेथून जवळच माणगाव हे गाव आहे. या माणगावी गणेश भट्टजी टेंबे अत्री गोत्री कऱ्हाडे जातीचे ब्राह्मण राहत होते. त्यांच्या पत्नीचे नाव रमाबाई होते. हे श्री दत्तात्रेयाचे भक्त होते. दत्तभक्त असलेले गणेश भटजी गाणगापुरला जाऊन श्री दत्तात्रेयाची उपासना करीत असत. कालांतराने त्यांना वैराग्य प्राप्त झाले. त्यांनी संन्यास दीक्षा घेण्याचे ठरवले. परंतु श्री दत्तात्रेयांचा दृष्टान्त होऊन त्यांनी प्रथम गृहस्थाश्रमाचे पालन करावे अशी आज्ञा त्यांना मिळाली. श्री दत्तात्रेयांच्या आज्ञेप्रमाणे ते माणगावी परत आले आणि गृहस्थाश्रमाचे पालन करू लागले. रमाबाईपण पतीला परमेश्वर स्वरूप मानून घरी आलेल्या अतिथींचा यथायोग्य आतिथ्यसत्कार करीत असत. पती आज्ञेप्रमाणे त्या देखील श्री दत्तमंत्राचा जप करीत. याप्रमाणे त्या दोघांच्या भक्ती भावनेने प्रसन्न होऊन श्री दत्तात्रेयांनी त्यांच्या उदरी जन्म घेण्याचे ठरवले. त्यानुसार रमाबाईना गर्भधारणा होऊन श्री शके 1776 गणेश भटजींनी मुलाचे जातकर्म केले मुलाचे नाव 'वासुदेव' असे ठेवण्यात आले.

श्री वासुदेवानंद सरस्वतींचा गृहस्थाश्रम तसा फारसाचांगला राहिला नाही. पत्नीच्या मृत्यु नंतर त्यांनी संन्यास घेतला. संन्यास घेतल्यानंतर श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या चरित्रातील महत्त्वाचा भाग म्हणजे त्यांचे विविध जागी झालेले चातुर्मास होत. याच कालावधीत त्यांनी आपली संस्कृत साहित्य रचना केली.

**श्री वासुदेवानंद सरस्वतींचे संस्कृत साहित्य :**

श्री वासुदेवानंद सरस्वतींनी आपले सर्व प्रमुख ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिले आहेत. विसाव्या शतकात ब्रिटिशांच्या राजवटीखाली इंग्रजी शिक्षणाचा प्रादुर्भाव होऊन सर्वत्र आंग्ल भाषेचा उदोउदो होत असतांना श्री वासुदेवानंद सरस्वतींनी आपली ग्रंथरचना 'दिव्यागिर्वाण भारती' अशा संस्कृत भाषेत केली ही बाब उल्लेखनीय ठरते त्यांच्या प्रमुख संस्कृत ग्रंथांचा परिचय येथे संक्षेपाने दिला आहे.

**श्री गुरूसंहिता :**

'श्री गुरूसंहिता' हा श्री वासुदेवानंद सरस्वतींचा सर्वात मोठा ग्रंथ आहे असे दिसून येते. हा ग्रंथ 'समश्लोकी गुरूचरित्र' म्हणूनही ओळखला जातो. श्री सरस्वती गंगाधर विरचित् 'श्री गुरूचरित्र' या मराठी ओविबद्ध लोकप्रिय ग्रंथाचाच हा त्यांनी स्वत केलेला संस्कृत अनुवाद आहे. मराठी भाषा भारतवर्षाच्या सर्व प्रांतातील लोकांना समजणार नाही, म्हणून

श्री वासुदेवानंद सरस्वतींनी मराठी भाषेतील 'श्री गुरूचरित्र' या ग्रंथाचा संस्कृत भाषेत अनुवाद केला आहे.

या ग्रंथाच्या रचनेची प्रेरणा श्री गुरू महाराजांना का झाली ते त्यांच्याच शब्दात स्पष्ट करीत पूज्यपाद श्री गुळवणी महाराज नविन आवृत्तिच्या प्रस्तावनेत याबद्दल महाराजांच्या एका पत्राचा संदर्भ देत म्हणतात

"ब्रह्मावर्तास असतांना गावांत प्लेग आल्यामुळे सर्व लोक बाहेर गेले होते. काही वृद्ध राहिले होते. त्यावेळी तेथे समश्लोकी करण्याचे सांगणे झाले व तेथे एक लेखी जुने पुस्तक 51 अध्यायांचे होते. त्यावरून करण्याचे सांगणे झाले."

याप्रमाणे श्री वासुदेवानंद सरस्वतींनी हा आपला ग्रंथ अत्यंत कठिण परिस्थितीत लिहिला आहे असे दिसून येते. ज्याप्रमाणे पिता आपल्या लहान मुलाकडून शब्द वदवून घेतो आणि आनंदीत होतो त्याप्रमाणे माझा अधिकार नसतांना सुद्धा प्रभु माझ्याकडून आपले निर्मल यश आपल्या भक्तांकरिता वदवून घेतले आहे आणि अद्यापि वदवून घेत आहे.

प्रस्तुत ग्रंथात श्री वासुदेवानंद सरस्वतींनी प्रत्येक अध्यायाची गद्यात्मक चूर्णिका म्हणजे संक्षिप्त सारांश दिला आहे. या चूर्णिकेची रचना त्यांनी कावेरी तीरावरील तंजावर येथील संध्या मठात शके 1829 साली केली. ही चूर्णिका क्रमवार मांडली तर श्री गुरूसंहिता या ग्रंथाची 'अवतरणिका' तयार होते.

**श्री गुरूचरितम् :**

संस्कृत गुरूचरित्र किंवा द्विसाहस्त्री गुरूचरित्र असेही या ग्रंथाचे नाव आहे. सरस्वती गंगाधरांनी मराठी भाषेत लिहिलेले जे ओवीबद्ध गुरूचरित्र आहे त्याचे संस्कृत संस्करण म्हणजेच 'श्री गुरूचरितम्' या ग्रंथाचे महत्त्व स्पष्ट करतांना श्री वासुदेवानंद सरस्वतींनी म्हटले आहे. - स एवात्रेयगोत्रोत्थगणेश ब्रह्मपुत्रगां। पुनानोर्थ्यो जयत्यत्र ग्रंथात्मा तारको।व्यय।। - महाराष्ट्र भाषेत जो गुरूचरित्र ग्रंथ आहे तोच ग्रंथरूपी श्री दत्तात्रेय ग्रंथ कर्त्यांच्या वाणीला पवित्र करणारा सर्वोत्कर्षाने येथे विराजमान आहे. नित्य पारायण करणाऱ्या भक्तांच्या सर्व पीडा दूर करून त्यांच्या सर्व कामना पूर्ण करणारा हा ग्रंथात्मा श्री दत्तात्रेय समर्थ आहे. असे आश्वासन श्री वासुदेवानंद सरस्वतींनी या ग्रंथाबद्दल दिलेले आहे.

ग्रंथाच्या प्रारंभी 'श्री गुरूस्तुति' म्हणून एकशे बारा श्लोकाचे एक प्रकरण आहे. गुरूस्तुति प्रकरण संपताच चरित्रास सुरूवात झाली आहे. श्री गुरूस्तुतीमध्ये 'मानस पूजा', 'अपराधक्षमापन स्तोत्र', 'दकारादि अष्टोत्तरशतनामावली', याशिवाय भगवान् श्री गुरू दत्तात्रेयांची विविध स्वरूपे, त्यांचे श्रुतिप्रतिपादित निर्गुण ब्रह्मस्वरूप, भक्तांच्या अंत करणात असणारे सगुण दिव्य स्वरूप, श्री दत्तात्रेयांचा दिनक्रम, अशा विविध विषयांचे वर्णन केलेले आहे.

मराठी गुरूचरित्रातील सर्व कथाभागाचे वर्णन यात आलेले आहे. याशिवाय यदू, प्रल्हाद व कार्तवीर्य अर्जुन यांना भगवान् श्री गुरू दत्तात्रेयांनी केलेल्या उपदेशाचे वर्णन चौथ्या अध्यायात आलेले आहे.

ग्रंथाचा संस्कृत गद्यरूप सारांश या दृष्टीने त्यांनी चूर्णिकाही लिहिली आहे. टीका लिहितांना त्यांच्यासमोर मूळ ग्रंथ उपलब्ध नव्हता हे त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेचे द्योतक आहे.

**योगरहस्य :**

'श्री गुरूचरितम्' ग्रंथाच्या शेवटी परिशिष्टरूपाने आलेला श्री वासुदेवानंद सरस्वतींचा 'योगरहस्य' हा ग्रंथ तसे पाहता श्री गुरूचरितम् या ग्रंथाचाच एक भाग आहे. परंतु हा ग्रंथ म्हणजे एक स्वतंत्र स्फुट ग्रंथ आहे असेही मानले जाते. या ग्रंथात एकूण 42 श्लोक आहेत. या ग्रंथाची रचना श्री गुरूचरित्रातील तसेच अन्य ग्रंथांतर्गत योगविषयक प्रतिपादनाचे रहस्य स्पष्ट

करणे हाच आहे. अर्थातच हा ग्रंथ पतंजलीच्या योगसूत्रांना अनुसरणारा आहे, तसेच एकूण प्रतिपादनाला गीता आणि उपनिषदे यातील प्रतिपादनाची जोड ही त्यास आहे.

यम, नियम, आसन आणि प्राणायाम या बहिरंग साधनांसोबतच श्री वासुदेवानंद सरस्वतींनी धारणा, ध्यान व समाधी या अंतरंग साधनेचा उल्लेख केला आहे.

पतंजलीच्या योगसूत्रात न आलेले काही विषय देखील या छोटेखानी ग्रंथात दिसून येतात. विशेषत मूलबंध, ओडियान बंध व जालंधर बंध, हे तीन बंध तसेच खेचरी मुद्रा, शांभवी मुद्रा हे मुद्राविषयक विचार या ग्रंथात आले आहे. खेचरी मुद्रेची प्रक्रिया सविस्तर वर्णन करण्यात आली आहे. तंत्राला अभिप्रेत असलेल्या नाद आणि बिंदू या संकल्पनांचा संदर्भही येथे आलेला आहे.

याप्रमाणे मोक्ष प्राप्तीसाठी ज्ञान, कर्म आणि भक्ती या तीन्हींचा समन्वय आवश्यक असल्याचे श्री वासुदेवानंद सरस्वतींनी स्पष्ट केले आहे. किंबहूना योग या शब्दाने ज्ञान, कर्म व भक्तीचा समन्वय श्री वासुदेवानंद सरस्वतींनी अभिप्रेत आहे हेच यातून स्पष्ट होते.

**बोधरहस्य :**

'श्री गुरूचरितम्' या ग्रंथाच्या शेवटी परिशिष्ट रूपाने आलेला 'बोधरहस्य' हा ग्रंथ देखील तसे पाहता श्री गुरूचरितम् या ग्रंथाचाच एक भाग आहे; परंतु हा ग्रंथ म्हणजे एक स्वतंत्र स्फुट ग्रंथ आहे असेही मानले जाते. या ग्रंथात एकूण 44 श्लोक आहेत. या ग्रंथाची रचना श्री गुरूचरित्रातील ग्रंथांतर्गत अद्वैत वेदान्ताचा भाग स्पष्ट करण्यासाठी झाली आहे असे म्हणता येते.

बोध म्हणजे आत्मबोध, बोध म्हणजे परमात्म बोध, बोध म्हणजे निजस्वरूप, बोध हा बोध या शब्दाचा अर्थ घेऊनच या ग्रंथातील प्रतिपादन करण्यात आले आहे.

प्रस्तुत ग्रंथाच्या रचनेविषयी श्री वासुदेवानंद सरस्वतींनी आपल्या स्वोपज्ञ वृत्तीत जे स्पष्टीकरण दिलेले आहे, त्यानुसार क्वचित् एखाद्या धीर बुद्धिमान पुरुषाला श्रुतिचे हे रहस्य समजते. गुरूशिष्य संवादरूपाने स्पष्ट केलेले हे रहस्य कोणा एका वेदाध्ययन झालेल्या, तसेच गृहस्थाश्रमातील कर्मे करून उपासनेद्वारे चित्ताचे मल नाश पावलेल्या, तापत्रयीने संतप्त झाल्यामुळे वैराग्य दृढ झालेल्या मुमुक्षु साधकाला केवळ सद्गुरू कृपेनेच प्राप्त होऊ शकते.

यावरून बोधरहस्य हा ग्रंथ म्हणजे उपनिषद प्रतिपाद्य आत्मबोधाचे रहस्य आहे असे स्पष्ट होते.

**श्री गुरूचरित्रकाव्य :**

श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती टेम्बे महाराज विरचित् 'श्री गुरूचरित्रकाव्य' हा ग्रंथ त्यांच्या संस्कृत साहित्यापैकी एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. या ग्रंथाची रचना त्यांनी शके 1823 मध्ये 'महत्पूर' या ठिकाणी मुक्कामाला असतांना 11 व्या चातुर्मासात केली. श्री दत्तसंप्रदायात प्रसिद्ध असलेल्या प्राकृत ओवीबद्ध गुरूचरित्राचे सारांशरूपाने लहानशा संस्कृत काव्यग्रंथात महाराजांनी या ग्रंथाची रचना केली.

या काव्यात श्री वासुदेवानंद सरस्वतींनी चित्रबंध या शब्दालंकाराचा उत्कृष्टरीतीने वापर केलेला आहे. यात महाराजांनी गोमुत्रीकाबंध, सर्वतोभद्र, आणि मुरजबंध यासारख्या बंधाचा वापर केलेला आहे. उदाहरणार्थ-

दत्तं यो भजते नित्यं मुक्ति मेति न संशय।
वित्तं यो भजते। नित्यभुक्ति मेति न संशय।।

वरील श्लोक गोमुत्रिकाबंधाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. यावरून महाराजांनी आपल्या ग्रंथात केवळ अंतरंगावरच नाही तर बहिरंगावर देखील सुक्ष्म चिंतन केल्याचे दिसून येते. श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या चित्रबंध काव्यस्वरूपाचा विचार प्रस्तुत प्रबंधात अन्यत्र करण्यात आला आहे.

**श्री दत्तपुराणम् :**

श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती विरचित 'श्री दत्तपुराणम्' हा संस्कृत ग्रंथ त्यांच्या संस्कृत साहित्यापैकी एक महत्त्वपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण असा ग्रंथ आहे. श्री वासुदेवानंद सरस्वतींचे आराध्य दैवत म्हणजे भगवान् श्री गुरू दत्तात्रेय. अष्टादश पुराणे आणि उपपुराणे अशा विस्तृत पौराणिक साहित्यात श्री दत्तात्रेय या देवतेविषयीचे एकही पुराण नाही. कांही पुराणात भगवान श्री गुरू दत्तात्रेय आणि त्याचे शिष्य यांच्या कथा उपलब्ध आहेत; परंतु या दैवतावर स्वतंत्र असे पुराण नव्हते. ही उणिव श्री वासुदेवानंद सरस्वतींच्या 'श्री दत्तपुराणम्' या ग्रंथाने भरून काढली आहे. हा ग्रंथ पुराण ग्रंथ असल्यामुळे साहजिकच पुराणाची सर्व लक्षणे अर्थात् सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वन्तर, वंशानुचरित अशा पाचही लक्षणांचा अंतर्भाव या ग्रंथात दिसून येतो.

प्रस्तुत ग्रंथाचे ज्ञानकांड, उपासनाकांड आणि कर्मकांड असे तीन भाग असून ज्ञानकांडाची पहिली दोन अष्टके, उपासनाकांडाची तीन ते सहा अशी चार अष्टके आणि कर्मकांडाची सात व आठ अशी दोन अष्टके असा या ग्रंथाचा विस्तार आठ अष्टकांमध्ये आला आहे प्रत्येक अष्टकात आठ अध्याय असून एकूण ग्रंथाचे 64 अध्याय होतात ही अष्टक व अध्याय रचना ऋग्वेदाशी समांतर आहे. त्याचप्रमाणे चौसष्ट अध्यायातील प्रत्येक अध्यायाचे पहिले पद हे ऋग्वेदाच्या 1 ते 64 अध्यायाचे पहिले पद घेऊन क्रमाने रचना करण्यात आली आहे. 'श्री दत्तपुराणम्' हा ग्रंथ पाहतांना ऋग्वेदाचे स्मरण व्हावे हाच या मागील उद्देश असावा.

श्री दत्त पुराणाच्या प्रारंभी आलेल्या 'वेदपाद स्तुति' या स्तोत्राची रचना देखील याच पद्धतीने म्हणजे त्यातील प्रत्येक श्लोकातील आद्य शब्दाच्या जागी ऋग्वेदाच्या प्रत्येक अध्यायातील आद्य शब्द योजून झाली आहे. वेदविद्येच्या पुनरूज्जीवनाविषयीची श्री वासुदेवानंद सरस्वतींची कळकळ यातून स्पष्ट होते.

याप्रमाणे श्री वासुदेवानंद सरस्वतींचा 'श्री दत्तपुराणम्' हा एक गद्यपद्यमय असा अलौकिक पुराण ग्रंथ आहे. गेल्या सहस्रकात लिहिला गेलेला तो एकमेव पुराण ग्रंथ आहे असे देखील म्हणता येईल. भगवान् श्री वेदव्यासांनी अष्टादश पुराणांची रचना केली त्यानंतर विविध उपपुराणे वेगवेगळ्या आचार्यांनी लिहिली परंतु ती देखील व्यासांच्या नावानेच प्रसिद्ध आहेत. हे लक्षात घेता श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती हे गेल्या सहस्रकाच्या शेवटी होऊन गेलेले व्यासच होत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

या ग्रंथाविषयी सद्गुरू श्री गुळवणी महाराज लिहितात, "अनेक शास्त्राrय विषयांचे सप्रमाण प्रतिपादन करणारा हा ग्रंथ असल्याने त्याचे प्रत्यक्ष वाचन व मनन केल्यानेच त्यांचे महत्त्व अधिकारी व्यक्तींना कळून येईल इतकेच या महान ग्रंथाबद्दल आम्ही लिहू शकतो.''

**श्री दत्तचंपू :**

श्री वासुदेवानंद सरस्वती टेंम्ब्ये स्वामी महाराज विरचित् 'श्री दत्तचंपू' हा ग्रंथ त्यांच्या संस्कृत साहित्यापैकी एक आहे. या ग्रंथाची रचना महाराजांनी 15 व्या चातुर्मासात नरसी या ठिकाणी वास्तव्यास असतांना शके 1827 (इ.स. 1905) मध्ये केली. 'दत्तचंपू' या नावाप्रमाणे या ग्रंथात चंपूकाव्याची जी लक्षणे आहेत ती दिसून येतात. चम्पूकाव्य या काव्यप्रकाराची लक्षणे विश्वनाथाने - 'गद्यपद्यमयं काव्यं चम्पूरित्यभिधीयते। अर्थात् गद्य आणि पद्य या रचनेलाच चंपु असे म्हणतात.' अशी केली आहे.

या लक्षणाप्रमाणेच या ग्रंथात गद्य व पद्य या दोहोंचे मिश्रण आहे आणि श्री दत्तगुरूंविषयी वर्णन असल्यामुळे या ग्रंथाला

दिलेले ‘श्री दत्तचंपू’ हे नाव यथार्थ आहे. या ग्रंथात तीन स्तबक आणि साडे तीनशे श्लोक आहेत.

याप्रमाणे श्री दत्तचंपू काव्य हा ग्रंथ चंपूकाव्य या संस्कृत काव्यप्रकाराचा एक उत्कृष्ट नमुना आहे. असे म्हणता येते. चंपुकाव्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गद्यपद्यात्मक शैलीत भगवान् श्री गुरू दत्तात्रेयांचे लीलाचरित्र यात निरूपण करण्यात आले आहे. परिणामी यातील, विषय विशेषत कथानक, श्रीमद् दत्तपुराणातील मांडणीला बऱ्याच प्रमाणात समांतर असे आहे.

**शिक्षात्रयम् :**

श्री वासुदेवानंद सरस्वती विरचित् ‘शिक्षात्रयम्’ हा ग्रंथ त्यांच्या संस्कृत साहित्यापैकी एक आहे. शिक्षात्रय म्हणजे कुमारशिक्षा, युवाशिक्षा व वृद्धशिक्षा या तीन ग्रंथांचा समावेश होय.

**कुमार शिक्षा:**

श्री वासुदेवानंद सरस्वती विरचित् ‘कुमारशिक्षा’ हा ग्रंथ कुमारवयातील म्हणजे ज्या वयात प्रजनन शक्तीचा विकास झालेला नसतो अशा वयातील मुलांसाठी लिहीला आहे.

या ग्रंथात 104 संस्कृत श्लोक असून त्यावर श्री वासुदेवानंद सरस्वतींची ‘स्वोपज्ञवृत्ती’ म्हणजे स्वतच लिहीलेले भाष्य आहे. हा ग्रंथ वैदिक जीवन पद्धती व आचारधर्म अंगी बाणविण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

प्रस्तुत ग्रंथात श्री वासुदेवानंद सरस्वतींनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे अत्यंत प्रासादीक अशा अनुष्टुभ् छंदातील सर्वजन सुलभ श्लोकात लिहिला आहे. तथापि यातील काही श्लोक मात्र इतर छंदामध्ये आहे.

**युवाशिक्षा :**

श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती विरचित् ‘युवाशिक्षा’ हा त्यांच्या संस्कृत साहित्यापैकी एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. हा ग्रंथ सध्याच्या आंध्रप्रदेशातील कृष्णा जिह्यातील कृष्णा नदीच्या तीरावर बसलेल्या मुक्त्याला या गावी 18 व्या चातुर्मासात शके 1830 (इ.स. 1908) मध्ये त्यांनी लिहिला. या ठिकाणाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे कृष्णा नदी उत्तरवाहिनी आहे. युवावस्था ही कुमारावस्थेनंतर येत असते. तारूण्याच्या या अवस्थेतील युवकांची पथभ्रष्ट होण्याची शक्यता जास्त असते आणि ज्या काळाच्या संदर्भात श्री वासुदेवानंद सरस्वतींनी संस्कृत साहित्य रचना केली त्या काळातील युवकांच्या बाबतीत ही भीती जास्त होती. विशेषत ब्राह्मण वर्णाचे युवक आधुनिक शिक्षण घेऊ लागले होते. या ग्रंथातील बराचसा भाग वेद आणि वैदिक कर्म यांचा परिचय करविण्यात खर्च झाला आहे. वेद या शब्दाची व्याख्या करीत श्री वासुदेवानंद सरस्वतींनी म्हणतात.

अपौरूषेयं यद्ब्रह्म सद्धर्म प्रतिपादकम्।
महाभूतसमुत्पन्नं प्रमाणं वेद उच्यते।।

अर्थात् वेद अपौरूषेय आहे. तो ब्रह्माचे व धर्माचे प्रतिपादन करतो व सर्वज्ञ, सर्वशक्तिमान अशा परमात्म्यापासून आविर्भूत झाला आहे म्हणून वेद स्वत प्रमाण आहे.

एकंदरीत युवाशिक्षा हा ग्रंथ कर्मप्रधान असला तरी कर्म हे चित्तशुद्धीसाठी असून ज्ञान हे कर्मसंन्यासानेच प्राप्त होत असते; निर्गुणाच्या प्राप्तीचा मार्ग सगुणातून जातो, याबाबी श्री वासुदेवानंद सरस्वतींनी स्पष्ट केल्या आहेत.

**वृद्धशिक्षा :**

श्री वासुदेवानंद सरस्वती विरचित् ‘वृद्धशिक्षा’ हा त्यांच्या संस्कृत साहित्यातील ‘शिक्षात्रयम्’ या ग्रंथापैकी एक आहे. हा ग्रंथ त्यांनी आपल्या 18 व्या चातुर्मासात शके 1830 अर्थात इ.स. 1907 मध्ये सध्याच्या आंध्रप्रेशातील कृष्णा जिह्यातील मुक्त्याला या गावी लिहिला आहे.

हा प्रकरण ग्रंथ असून प्रस्थान त्रयीतील सर्व विषय अत्यंत सूक्ष्मरूपाने यात ग्रथित केले आहेत कल्पतरूप्रमाणे जो जो अर्थ यातून पाहिजे असेल तो तो देणारा हा ग्रंथ आहे. प्रस्तुत ग्रंथ म्हणजे दशोपनिषदांचा सारांशच आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. उपनिषदातील पदे घेऊन ती आपल्या श्लोक रचनेत गुंफत वेदान्त प्रतिपादन करण्याची श्री वासुदेवानंद सरस्वतींची आगळी वेगळी शैली यातून सहज स्पष्ट होत.

याप्रमाणे 'वृद्धशिक्षा' या ग्रंथात भगवान श्री गुरू दत्तात्रेय हेच श्रुति प्रतिपादित परब्रह्म आहे. अशी भूमिका श्री वासुदेवानंद सरस्वतींनी स्पष्ट केली आहे.

**पंचपाक्षिक :**

श्रीमद् वासुदेवानंद सरस्वतींचा 'श्री पंचपाक्षिकम्' हा ग्रंथ पाच अध्यायात विभागलेला आहे. ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात 8, दुसऱ्या अध्यायात-2, तिसऱ्या अध्यायात-2, चौथ्या अध्यायात-7 व पाचव्या अध्यायात-1 असे एकूण 20 श्लोक असून त्यावर त्यांनी स्वत लिहीलेली टीका आहे. हा ग्रंथ ज्योतिषशास्त्राचा ग्रंथ आहे. ज्योतिषशास्त्राचे सामान्यपणे फलज्योतिष आणि गणितीय ज्योतिष असे दोन प्रकार केले जातात. फलज्योतिषासच होराशास्त्र या नावानेही ओळखले जाते. फल ज्योतिषाचा प्रश्नमार्ग म्हणून लोकप्रिय असणाऱ्या शास्त्रातील हा एक ग्रंथ आहे.

**स्तोत्रादिसंग्रह :**

श्रीमद् वासुदेवानंद सरस्वती विरचित् स्तोत्रादिसंग्रह हा प्रासादिक संस्कृत स्तोत्रांचा संग्रह आहे. स्तोत्र या शब्दाचे स्पष्टीकरण देत प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनेत धुंडिराज कवीश्वर म्हणतात.

"स्तोत्र हे स्तुत्यास प्रसन्न करून घेणेच प्रमुख निकट साधन आहे. स्तोत्र शब्दाचा अर्थ गुणवर्णन असा आहे. ते यथार्थ असे असावे.... स्तवनाने देवता शीघ्र प्रसन्न होते. तिच्या कृपाप्रसादाने जीवांना भुक्ति मुक्तिरूप श्रेय मिळते.''

भगवान् श्री गुरू दत्तात्रेय हे श्री वासुदेवानंद सरस्वतींचे प्रमुख उपास्य दैवत होते. एवढेच नव्हे तर ते स्वत भगवान् श्री दत्तप्रभूंचे अवतार समजले गेले आहेत. भगवान् श्री गुरू दत्तात्रेयांची 45 स्तोत्रे श्री वासुदेवानंद सरस्वतींनी रचली असून त्याशिवाय श्री दत्तात्रेयाच्या 16 अवताराची 16 वेगवेगळी स्तोत्रे देखील आहेत. याप्रमाणे श्री दत्तात्रेय स्तोत्रांमध्ये एकूण 61 स्तोत्रे आहेत असे दिसून येते. यातील लहान मुलांचे रक्षण करण्यासाठी असणारे बालाशिष स्तोत्र, वेदपादस्तुती, श्री दत्तात्रेय अष्टोत्तर शतनामावली इ. स्तोत्रे उल्लेखनीय आहेत. त्याचप्रमाणे दकारादी दत्तात्रेय सहस्रनाम स्तोत्र, दत्तात्रेय कवच ही स्तोत्रे देखील नित्यपाठास उपयुक्त आहे. 112

श्री वासुदेवानंद सरस्वतींनी स्तोत्रादि संग्रहातील पद्यरचना या काव्यगुणांनी संपन्न असून या रचनेमध्ये त्यांनी विविध छंदांचा वापरही केला आहे. त्याचप्रमाणे या रचना अलंकार संपन्न आहेत विशेष लक्षात घेण्यासारखी बाब म्हणजे यातील अनेक रचना मंत्रगर्भ आहेत.

**निष्कर्ष:**

या निबंधेतील चर्चेवरुन असे दिसून येते की विसाव्या शतकाच्या प्रारंभी संस्कृत भाषेत विपुल गद्यपद्य रचना करणारे श्री वासुदेवानंद सरस्वती हे एकमेव अधुनिक दार्शनिक व पौराणिक ग्रंथाची रचना करणारे वेद व्यास होत.

**संदर्भ ग्रंथ सूचि :**

1) श्री गुळवणी वामनराव (संपादित) : (दशमं एकादशं च पुष्पम्)श्री वासुदेवानंद सरस्वती विरचित् समग्र संस्कृत साहित्य खंड 1 ते 10 श्रीवासुदेव निवास पूणे 2013

2) डॉ. जोशी सुनिता : वाङ्मयसंपदा आणि जीवनदृष्टी, श्री वासुदेव निवास पुणे, 2008,

3) श्री गुळवणी वामनराव (संपादित) : (पंचमपुष्पम्) श्री वासुदेवानंद सरस्वती विरचित् श्री दत्तचंपू सटीक, श्लो. 1, टीका

4) श्री गुळवणी वामनराव (संपादित) : श्री वासुदेवानंद सरस्वती विरचित् शिक्षात्रयम् श्री वासुदेव निवास, पुणे, 2013, प्रकाशकाचे निवेदन-वामन दत्तात्रेय गुळवणी

# लोकनायकांचे संस्कृतसाहित्याच्या क्षेत्रातील महत्त्वपूर्ण योगदान

**वैशाली चंद्रशेखर पांडे (गोडबोले)**

श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद

ता.पुसद जि. यवतमाळ - ४४५२०४

## सारांश

*लोकनायक बापूजी अणे हे एक राजकारणकुशल, विवेक निष्ठनेते, उत्तम वक्ते, कर्मनिष्ठ, ज्ञानाभिरुची संपन्न ज्ञानोपासक, स्वयंप्रज्ञ असे श्रेष्ठकवी होते. श्रीतिलकयशोऽर्णवः महाकाव्या व्यतिरिक्त त्यांनी संस्कृत आणि संस्कृतेतर भाषांमध्ये विपुल प्रमाणात लेखन केले आहे. बापूजी अणे प्रत्येक गुढीपाडव्याच्या दिवशी नवीन संवत्सराचे स्वागत करणाऱ्या संस्कृतकाव्याची रचना करीत असत. राष्ट्रगुरुतिलकप्रशस्तिपञ्चकम्, समुद्रमंथनम्, भद्रावतीस्तोत्रम्ह्या त्यांच्या संस्कृतपद्यरचनाही विलोभनीय आहेत. महाकवींनी ह्या महाकाव्यात मराठी म्हणींचा संस्कृतानुवाद केला आहे, तसेच अनेक मराठी व इंग्रजी शब्द त्यांनी संस्कृतात आणले. अशा अनेक वैशिष्ट्यांचे विवेचन करणे आणि लोकनायकांच्या संस्कृत साहित्याच्या क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे हेच या संशोधनलेखाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.*

**मुख्यबिन्दुः** आधुनिक संस्कृतसाहित्य, लोकनायक अणे, श्रीतिलकयशोऽर्णवः, स्फुटरचना

### प्रस्तावना :-

संस्कृत साहित्याच्या क्षेत्रात संस्कृतमहाकाव्य निर्मितीची परंपरा अतिशय समृद्ध होती. रामायणमहाभारताच्या रचनेने वाल्मीकि, व्यास यांना दिगन्त कीर्ती प्राप्त झाली. ज्याच्या यशोदुन्दुभीचे पडसाद संस्कृतसारस्वताच्या मंदिरात आजही निनादत आहेत अशा महाकविकालिदासाने भारतीयसंस्कृतीच्या उदात्त, विशाल रंगपटावर आपले वाङ्मय चित्र रेखाटले. ज्यांची यशोरूपीकाय आजही अजरामर आहे अशा अनेक संस्कृत सारस्वतांची परंपरा आम्हाला लाभली आहे.

साहित्यनिर्मिती मागची पूर्वीची उदात्त प्रयोजने संस्कृतमहाकाव्याच्या ऱ्हासकाळात काहीशी मागे पडू लागली पांडित्य प्रदर्शनाची चढाओढ, साहित्यातून परस्परांना मागे टाकण्याची स्पर्धा , ईर्ष्या, महाकविमाघ, भारवी, कुमारदास, भट्टी इ. च्या साहित्यात दिसते. जगन्नाथपंडितांच्या नंतर संस्कृतकाव्यनिर्मितीत खंड पडला असेही बोलले जाऊ लागले. परंतु संस्कृतकाव्यनिर्मितीची परंपरा निश्चितच `जगन्नाथपण्डितान्ता' नव्हती. ही परंपरा प्रवाहित ठेवणाऱ्या साहित्याची निर्मिती सातत्याने होत होती. प्राचार्य राम शेवाळकर यांनी आपल्या एका लेखात ह्याचा अतिशय समर्पक असा आढावा घेतला आहे ते लिहितात ``जगन्नाथपंडितानंतर संस्कृतकाव्यरचनेची परंपरा उणावली असली तरी खण्डित झाली नाही. संस्कृतकाव्ये, नाटके, स्फुटलेखन, गद्यग्रंथ ह्यांची चालूशतकातील संख्या अगण्य नसली तरी नगण्यही नाही. महाकाव्यनिर्मितीचे ही प्रयत्न देशीभाषेच्या मानाने संख्या आणि गुणवत्ता दोन्ही दृष्टींनी लक्षणीय आहेत. भगवदाचार्यांचे सव्वीससर्गांचे भारतपारिजातम्, अखिलानंदशर्मांचे एकेवीससर्गांचे दयानंददिग्विजयम् आचार्यमेधाव्रतांचे त्याच नावाचे सत्तावीससर्गांचे महाकाव्य, श्रीअन्नदाचरणठाकुरांचे रामाभ्युदयम्, कवीन्द्रपरमानंदांचे कर्णार्जुनीयम्, पं. नरसिंहाचार्यांचे आचार्यनैषधम्, शीघ्रकविशंकरलालयांचे

सावित्री- चरित सारखी परंपरागत प्राचीनकथाभागावर लिहिलेली महाकाव्ये जशी दृष्टोत्पत्तीस येतात. तशी इंग्रजीराजवटीवर, गौरप्रभुत्वावर भाळून लिहिलेली मोहप्रेरित महाकाव्ये ही आढळतात. ए.आर.राजवर्मायांचे `आंग्लसाम्राज्यमहाकाव्यम्  'श्रीधरविद्यालंकारभट्टाचार्ययांचे व्हिक्टोरियाराणीवर केलेले `विजयिनीकाव्यम्' तसेच दिल्लीमहोत्सव काव्यकुल चंद्रवर्मांचे शोकमहोर्मि यासारखी गौरांगप्रभुभक्तिप्रचुरतेची पूर्वसुरींच्या प्रतिभाविलासाबरोबरच राजनिष्ठेचाही वारसा जपणारी काव्ये दाखविता येतील.

समकालीन महापुरुषांच्या विभूतिमत्त्वाने ही भारून गेलेली काही महाकाव्ये आहेत. डॉ. वे. राघवन्यांचे `श्रीदीक्षितेन्द्रचरितमहाकाव्य' डॉ. व्यं. म. केकिणी यांचे शिवकैवल्यचरितम्, रामशास्त्रीशेवाळकरांचे पूर्णानंदचरितम्, पं.क्षमारावह्यांनी आपले तीर्थरूप श्रीशंकरपांडुरंग ह्यांच्या जीवनावर लिहिलेले `शंकरजीवनाख्यानम्' यासारखी अर्वाचीन संदर्भाचे भान ठेवणारी ही महाकाव्ये निर्माण होणे ही संस्कृत भाषेच्या जीवंत प्रवाहित्वाची खूण मानायला हरकत नाही. कविकण्ठवसिष्ठगणपतिमुनी, अप्पाशास्त्रीराशिवडेकर, वासुदेवानंदसरस्वती, गुलाबरावमहाराज, म. म. कृष्णशास्त्रीघुले, ह्यांच्यापासून तो लोकनायक अणे, श्री.भा.वर्णेकर ह्यांच्यापर्यन्त संस्कृतग्रंथकारांची व प्रतिभासंपन्न कवींची परंपरा विसाव्या शतकातही अक्षुण्ण असल्याचे पाहून कोणत्याही संस्कृताभिमान्याला धन्यता वाटेल. विदर्भात नागपूरचे गंगाधरकवी, दारव्ह्याचे माधवरावडाऊ, पुसदचे आबासाहेब पल्लेवार, अचलपुरचे रामशास्त्री शेवाळकर यांच्या सुरवाणीतल्या विदग्धरचना मनाला मोह घालणाऱ्या आहेत."  संपूर्ण अर्वाचीन संस्कृतकाव्यपरंपरेचा ओझरता आढावा श्रीरामशेवाळकर यांनी घेतला आहे.1

संस्कृतसाहित्यात महाकाव्य निर्मितीच्या परंपरेला अखंडित ठेवण्याचे मोलाचे कार्य ज्या कविश्रेष्ठांनी केले, त्यात लोकनायक माधव श्रीहरी अणे उपाख्य बापूजी अणे यांचा फार मोठा वाटा आहे.

`श्रीतीलकयशोऽर्णवः' हे लोकमान्य टिळकांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे महाकाव्य बापूजींनी निर्माण केले. हे एकच महाकाव्य त्यांना `अर्वाचीन संस्कृत महाकवींचा' दर्जा देण्यास समर्थ आहे.

**लोकनायकांचा परिचय :-**

लोकनायक बापूजी अणे ह्यांचा जीवनपट अतिशय भव्योदात्त आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रत्येक पैलू मनाला प्रभावित करतो. `कुशल राजकारणी' आणि `अर्वाचीन संस्कृत महाकवी' ह्या दोन पदव्या सार्थ ठरतील असे त्यांचे अलौकिक व्यक्तिमत्व होते. राजकारणाच्या क्षेत्रात त्यांनी `लोकनायक' ह्या पदवीने सन्मान प्राप्त केला तर साहित्यक्षेत्रात `पद्मविभूषण' ह्या पदवीने त्यांचा गौरव झाला.

लोकनायक बापूजी अणे ह्यांच्या व्यक्तिमत्वाचे काही ठळक पैलू असे सांगता येतील की, ते राजकारणकुशल, विवेक निष्ठनेते, उत्तम वक्ते, कर्मनिष्ठ, ज्ञानाभिरुची संपन्न ज्ञानोपासक, स्वयंप्रज्ञ असे श्रेष्ठकवी होते. ह्या महाकाव्या व्यतिरिक्त त्यांनी संस्कृत आणि संस्कृतेतर भाषांमध्ये विपुल प्रमाणात लेखन केले आहे.

लोकनायक बापूजी अणे ह्यांचा जन्म २९ ऑगस्ट १८८० मध्ये वणी येथे वेदविद्यासंपन्न कुळात झाला. त्यांचे माध्यमिक शिक्षण चंद्रपूरला व महाविद्यालयीन शिक्षण नागपूरच्या मॉरिस कॉलेज मध्ये झाले. बी.ए. झाल्या नंतर एल. एल. बी. करण्याची त्यांची इच्छा होती परंतु आर्थिक अडचणीमुळे त्यांनी प्रथम अमरावती येथे काशीबाई हायस्कूलमध्ये शिक्षकाची नोकरी केली. १९०७ मध्ये कलकत्ताविद्यापीठातून

वकीलीची परीक्षा उत्तीर्ण करून त्यांनी यवतमाळ येथे वकिली सुरु केली आणि एक यशस्वी वकील म्हणून नावलौकिक प्राप्त केला.

लोकमान्य टिळकांच्या कार्याने प्रभावित होऊन ते लोकमान्यांचे अनुयायी बनले. लोकमान्यांनी स्वराज्यप्राप्तीसाठी ज्या साधनांचा अवलंब केला , ज्या चळवळी चालविल्या, जी आंदोलने केली, त्या सर्वांमध्ये बापूजींनी सक्रिय सहभाग घेतला. निष्ठेने एखादे व्रत चालवावे तशा त्या चळवळी त्यांनी पुढे नेल्या.

**श्रीतिलकयशोऽर्णवःमहाकाव्य :-**

**महाकाव्याची लक्षणे :-** पूर्वसुरींनी सांगितलेली संस्कृतमहाकाव्याची लक्षणे सर्वविदितच आहेत. अग्निपुराणातील महाकाव्यासंबंधीच्या धारणा आहेत, वामनाच्या काव्यालंकार, दण्डीच्या काव्यादर्शात, विश्वनाथाच्या साहित्यदर्पणात, आनंदवर्धनाच्या ध्वन्यालोकात, वामनाच्या काव्यालांकरसूत्रवृत्तीमध्ये, रुद्रटाच्या काव्यालंकारातइ. अनेक ठिकाणी आलेल्या काव्यलक्षणांचा आढावा घेता असे लक्षात येते की, श्रीतिलकयशोऽर्णवः हे महाकाव्य `महाकाव्य' या संज्ञेस पात्र ठरते. आधुनिक काळातही संस्कृतभाषेची निर्मितिक्षमता या महाकाव्याने सिद्ध केली आहे. खरोखरच महासागराप्रमाणे हे विशाल महाकाव्य आहे. ह्या महाकाव्यात पंचाऐंशी तरंग व बाराहजार श्लोक आहेत. लोकमान्य टिळकांसारखा धीरोदात्त गुणांनी युक्त, सद्वंशीय नायक ह्या महाकाव्याला लाभला आहे. चरित्रवर्णनाबरोबरच टिळककालीन अनेक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक संदर्भ महाकाव्यात आले आहेत. टिळकांच्या समकालीन अनेक महापुरुषांचे उल्लेख व त्यांच्या कार्याचे वर्णन येथे आले आहे. म्हणून ऐतिहासिकदृष्ट्याही हे महाकाव्य महत्वपूर्ण आहे. महाकाव्याच्या लक्षणांचे परिस्थितिसापेक्ष आवश्यकतेअनुसरण बापूजींनी केले आहे.

श्रीतिलकयशोऽर्णवः हे गुणाढ्यचरित्राचे वर्णन आहे. लोकमान्यांचे चित्रण धीरोदात्त नायकाच्या स्वरूपात कवीने केले आहे. नायकाच्या गुणांचा उत्कर्ष त्यांनी वर्णिला आहे. महाकाव्यात नगर, समुद्र, पर्वत, ऋतू, रात्र, दिवस इ. चे वर्णन असावे ह्या संकेताचे ही पालन महाकवींनी केले आहे. महाकाव्यात सह्याद्रीपर्वताचे, कोकणाच्या रम्य निसर्गसौंदर्याने नटलेल्या भूमीचे वर्णन महाकवींनी केले आहे. तसेच त्यांनी चोवीसाव्यात रंगात केलेले सिंहगडाचे वर्णन महाकवीकालिदासाच्या ऋतुसंहाराचे स्मरण व्हावे इतके रम्य आणि मनोहर आहे. श्रीतिलकयशोऽर्णवः ह्या महाकाव्यात महाकवींनी ` वैदर्भी ' रीतीचा अवलंब केला असून , प्रामुख्याने अनुष्टुभ छंदात श्लोकरचना केली आहे. प्रसंग विशेषी इतरही अनेकवृत्तांचा समावेश केला आहे. डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी सर्व काव्यलक्षणांचा आढावा घेऊन महाकाव्याची प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

असाधारणनायक, नायकाचे विविध पैलूंनी युक्त जीवन, अशा जीवनाचे सांगोपांग दर्शन, हे सारे ज्यातून व्यक्त होईल अशी गतकालीन कथोपकथा, त्यांची सावयवसालंकृत अभिव्यक्ती, सुखपूर्णशेवट व या साऱ्यातून येणारी जीवनाच्या भव्योदात्ततेची प्रतिती2 ह्या महाकाव्याविषयक अपेक्षा श्रीतिलकयशोऽर्णवः महाकाव्याने निश्चितच पूर्ण केल्या आहेत.

**काव्यप्रयोजन :-**

काव्यंयशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये।
सद्यःपरनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे।।3

हे मम्मटाने सांगितलेले काव्यप्रयोजन सर्वविदित आहे. प्रज्ञाभारती डॉ. श्री. भा. वर्णेकर यांनी आपल्या अर्वाचीन

`संस्कृत साहित्य' ह्या ग्रंथात आधुनिकसाहित्यिकांची प्रयोजने सांगितली आहेत ती अशी संस्कृत श्रद्धा, लोकजागृती, अन्यभाषीय साहित्याचा परिचय, समाजहित, छात्रहित, स्वाध्याय, धनाशा, परप्रेरणा, संस्कृतचे अखिल भारतीयत्व, नवीनपद्धतीचे प्रवर्तन, प्राचीन लेखकांचे अनुसरण4

**श्रीतिलकयशोऽर्णवः** –महाकाव्य निर्मितीची महाकविंनी यातील प्रमुख प्रयोजने अनुसरली आहेत. मुख्य म्हणजे संस्कृत श्रद्धा आणि संस्कृतभाषेचे अखिल भारतीयत्व ही प्रयोजने ठळकपणे दिसतात. साहित्यसम्राट न. चि. केळकर यांचे मराठी त्रिखण्डात्मक टिळकचरित्र उपलब्ध असताना ही त्या आधारे महाकवींनी संस्कृत महाकाव्याची रचना केली. लोकमान्यांचे वीरचरित्र समाजाला निश्चितच प्रेरणादायी ठरणारे आहे. `लोकजागृती' आणि `समाजहित' तसेच छात्रहित ही प्रयोजने निर्विवादपणे त्यांच्या डोळ्यासमोर होती. आपल्या महाकाव्याच्या तृतीय खंडात तिलकचरित्राचे वर्णन करताना ते म्हणतात

तिलकचरितमेतदबध्दराष्ट्रस्य मुक्त्यै
प्रबलविमलमार्गदर्शयत्येवनित्यम्।
दलितपतितदीनान्स्वाभिमानेन शीघ्रं
नयति भरतपुत्रान्विश्र्वबन्धुत्वधाम।।5

श्रीतिलकयशोऽर्णवाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, महाकवींनी ह्या महाकाव्यात मराठी म्हणींचा संस्कृतानुवाद केला आहे, तसेच अनेक मराठी व इंग्रजी शब्द त्यांनी संस्कृतात आणले. परिवर्तनशीलता' हा भाषेचा स्वभाव असतो. त्यात अनेक नवीन शब्दांची भर पडते, जुने शब्द मागे पडतात. सुलभीकरणाच्या प्रवृत्तीतून ही प्रक्रिया चालू असते. अशीच प्रवाही भाषा कालौघात टिकून राहते .`जगन्नाथपण्डितान्ता संस्कृतकाव्यपरम्परा' असा प्रवाद निर्माण व्हावा येथपर्यंत संस्कृत भाषेला ओहटी लागलेली असताना हे परिवर्तन अत्यावश्यक वाटते. संस्कृत भाषेत अनेक मराठी, इंग्रजी शब्द ही त्यांनी चपखलपणे बसविले आहेत. हा संस्कृतानुवाद सहजसुंदर, रसिकांच्या मनाला भावणाराआहे . जसे -

`शर्कराखण्डमायान्तियथादूरात्पिपीलिका- - -'6

`नजातुकाकशापेनधेनुकालवशाभवेत्- - - -'7

`Let the dog bark the caravan goes on '
ह्याइंग्रजीम्हणीचा

` नाक्रोशात्सारमेयाणां विजहाति पथं गजः।' 8

असा अनुवाद ते करतात.

`कृष्णवर्णप्रकर्षाय कृष्णाङ्गारस्य घर्षणम्।9

क्षिप्तेनैकेन बाणेन म्रियेते व्दौ हि पक्षिणौ ',10

`संदग्धेप्यग्निना रज्जौवक्रताह्यवशिष्यते ',11

`प्रक्षेपणं हि मुक्तानां वराहपुरतो यथा ' 12

अशा अनेक म्हणींना संस्कृतभाषेचा सुंदर साज त्यांनी चढविला आहे.

लोकमान्यांचे वर्णन करताना अंगरखा या शब्दाचा `अंगरक्षा' असा अनुवाद त्यांनी केला आहे. धुमकेतूला पुच्छतारा, आई, ताई, माई, बाबा, हे मराठी शब्द जसेच्या तसे वापरले आहेत. बुध्दिबळाच्या पटाला ते बुध्दिक्रीडापट म्हणतात, तर क्रॉस एक्झामिनेशनसाठी `तिर्यक्परीक्षणम्' असा शब्दप्रयोग त्यांनी केला आहे. अडकित्त्यासाठी `हस्तकर्तरी' असा शब्द ते वापरतात. बारा हजार श्लोकांच्या ह्या विशाल महाकाव्यात असे अनेक शब्द आढळतात. महाकवींनी केलेले हे नवीन प्रयोग सहज स्वीकार्य वाटतात. आणि संस्कृतभाषा ही केवळ पंडितांपुरती शिल्लक राहिली, अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून तिचे अस्तित्व , या विषयी जेव्हा शंका निर्माण होते, तेव्हा हि भाषा अद्याप ही निर्मितिक्षम असल्याचे अशी महाकाव्ये सिध्द करतात

**लोकनायकांचे स्फुट संस्कृत लेखन :-**

श्रीतिलकयशोऽर्णवः महाकाव्या व्यतिरिक्त बापूजींनी संस्कृतभाषेत काव्यरचना केली आहे. बापूजी अणे प्रत्येक गुढीपाडव्याच्या दिवशी नवीन संवत्सराचे स्वागत करणाऱ्या संस्कृतकाव्याची रचना करीत असत. प्रत्येक संवत्सराच्या नावाला अनुसरून त्याची वैशिष्ट्ये त्यांनी अतिशय सुंदररीतीने प्रतिपादन केली आहेत. चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८६६ रोजी प्रारंभ झालेल्या ` तारण ' संवत्सराच्या शुभेच्छा देताना ते लिहितात -

देवासुरमनुष्यापत्सागरे तारणास्पदम्।

भया दुतारणाब्दोऽयंप्राणिनां भूनिवासिनाम्।।13

`तारण' या शब्दावर अतिशय समर्पक श्लेष साधून हे संवत्सर सर्वांना तारून नेणारे ठरो , अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या आहेत. चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८६७ रोजी प्रारंभ झालेल्या ` पार्थिव संवत्सराच्या' अभिनंदनपर बापूजींनी संस्कृत काव्य रचले. कोलंबो येथे असताना बापूजींनी ही रचना केली होती. या पद्यात राजा वेन , जो स्वायंभुवमनूच्या वंशातील राजा होता , आणि त्याच्यापासूनच निर्माण झालेला राजा पृथु यांचे उल्लेख आले आहेत. हे पार्थिव जन पृथुची अपत्ये आहेत, त्यांनी या पार्थिव संवत्सराचे स्वागत करावे असे बापूजी म्हणतात.

चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८६८ रोजी प्रारंभ झालेल्या व्यय संवत्सराच्या स्वागतपर संस्कृतरचना, चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८६९ रोजी प्रारंभ झालेल्या सर्वजित संवत्सराच्या स्वागतपर संस्कृतरचना , चैत्र शुध्द प्रतिपदा शके १८७० रोजी आरंभ झालेल्या सर्वधारिन्संवत्सराच्या स्वागतपर संस्कृतरचना, चैत्र शुध्द १८७१ रोजी विरोधी नावाचे संवत्सर सुरु झाले त्यावर संस्कृत काव्यरचना, १८७२ ला प्रारंभ झालेल्या विकृति नामक संवत्सराच्या स्वागतपर रचना, १८७३ च्या ` खर' ' संवत्सराचे स्वागत करणारी संस्कृतरचना, १८७५ साली ` विजय ' संवत्सराचे स्वागत करणारी संस्कृतरचना, १८७८ साली दुर्मुख संवत्सराच्या स्वागतपर रचना, अशा अनेक सुंदर रचना बापूजींनी केल्या, त्यातील काही रचना तरुणभारत या दैनिकात प्रसिद्ध झाल्या, तर काही हस्तलिखित स्वरूपात आहेत. कवींचे संस्कृत प्रभुत्व या स्फुटरचनांवरून ही सहजसिध्द होते.

**राष्ट्रगुरुतिलकप्रशस्तिपञ्चकम् :-**

लोकमान्य टिळकांवर बापूजींची नितांत श्रध्दा ह्या काव्यातून दिसून येते. राष्ट्रगुरु असा लोकमान्यांचा सार्थ उल्लेख त्यांनी केला आहे. ह्या काव्याच्या प्रत्येक श्लोकात टिळकांचे वेगळे वैशिष्ट्य त्यांनी प्रतिपादन केले आहे.

राष्ट्रव्याधिहरं भिषग्वरमणिं विद्यावतांशेखरं

ज्येष्ठं नीतिविदां विरक्तचरितश्रेष्ठं समष्टिप्रियम्।

वेदाभ्यासरतं परार्थनिपुणं प्रज्ञास्थितं पण्डितं

बालं राष्ट्रगुरुं नमामि तिलकं तं कर्ममीमांसकम्।।14

या श्लोकात लोकमान्यांच्या व्यक्तिमत्वाचे अतिशय समर्पक वर्णन त्यांनी केले आहे . विस्तारभयास्तव संपूर्ण काव्याचा उल्लेख येथे करीत नाही लोकनायकांच्या स्फुटरचनांमध्ये` विष्णुपदस्तुति ' पद्याचा आवर्जुन उल्लेख करावा असे हे काव्य आहे. `सत्पुरुषवर्णनम्' हे देखील असेच छोटेसे हस्तलिखित काव्य आहे.

२७ जानेवारी १९३९ ला यवतमाळच्या ज्युबिलीलायब्ररीच्या विहिरीवर कोनशिला बसविली त्यावर कोरण्यासाठी बापूजींनी आपल्या प्रियपत्नीच्या स्मृतिप्रीत्यर्थ अशा श्लोकाची रचना केली -

द्विजगुरुजनसेवादेवभक्तिर्जलेऽस्मिन्

अतिथिषुगृह्यातेष्वादरोभर्तृनिष्ठा।

विनयमधुरचर्याचात्मजप्रेमलत्वम्

विकसतु यमुनाया: षड्दलं शीलपद्मम्।।15

आपल्या मृतपत्नीची स्मृती त्यांनी अशी जोपासली होती .

१९४२ सालच्या भारत छोडो आंदोलनाच्या अत्याचाराची जबाबदारी आर्मी सेक्रेटरी रोटनहॅम याने जाहीर रीतीने गांधीजींच्या माथी मारली, तेव्हा ब्रिटिशसरकारच्या निषेधार्थ गांधीजींनी एकेवीस दिवसांचे उपोषण केले होते. बापूजींनी ह्याचा निषेध म्हणून आपल्या व्हाईसरॉय पदाचा त्याग केला, गांधीजींच्या उपवासाबद्दल अनुष्टुभ्छंदात त्यांनी सहाश्लोकांचे संस्कृत पद्य प्रसिध्द केले. ह्या पद्याचा इंग्रजी अनुवाद ही त्यांनी केला.

समुद्रमंथनम्, भद्रावतीस्तोत्रम्ह्या त्यांच्या संस्कृतपद्यरचनाही विलोभनीय आहेत. लोकाग्रणी श्रीबाबासाहेब देशमुख यांना लोकनायकांनी संस्कृत पद्ययुक्त श्रध्दांजली अर्पण केली आहे. हे पद्य करुणरसाचा उत्कृष्ट नमुना आहे. शार्दूलविक्रिडित हे बापूजींना प्रिय असलेले वृत्त त्यांनी येथे वापरले आहे. केवळ पंच श्लोकात्मक काव्यातून समग्र लोकाग्रणी उभे करण्याचे सामर्थ्य बापूजींच्या लेखणीत आहे.

**सारांश :-** बापूजी अणे अतिशय विद्वान, वेदविद्यासंपन्न, क्रियावान्पंडित होते. राजकारणात अत्यंत व्यस्त असून ही त्यांनी संस्कृत भाषेप्रति असलेला जिव्हाळा जपला. त्यांना ` महाकवि ' हा बहुमान प्राप्त करून देणारे श्री तिलकयशोऽर्णवः हे महाकाव्य त्यांच्या चतुरस्त्र प्रतिभेचे साक्षीदार आहे. संस्कृतभाषेत इतरही स्फुटलेखन त्यांनी मोठ्याप्रमाणात केले आहे. पाठीच्या मणक्याच्या दुर्धर आजाराने ग्रस्त असताना, मानसिक सामर्थ्याने शारीरिकव्याधीवर मात केली आणि देववाणीत आपल्या गुरूंचे चरित्र रचले. संस्कृताभ्यसकांना निश्चितच अतिशय मार्गदर्शक ठरावे असे हे महाकाव्य आहे. संस्कृत साहित्य निर्मितीची गंगा अखंडपणे प्रवाहित ठेवण्यात महाकवींचे महत्त्वपूर्ण योगदान आहे .

## संदर्भ


1) शेवाळकर राम – सारस्वताचे झाड अर्वाचीन संस्कृत महाकाव्य
2) डॉ. द. भि. कुलकर्णी – महाकाव्य स्वरूप व समीक्षा पृ. १७
3) मम्मटकृत काव्यप्रकाश, प्रथम उल्लास कारिका– २
4) डॉ. श्री. भा. वर्णेकर – अर्वाचीन संस्कृतसाहित्य पृ . ६, ७
5) अणे मा.श्री.श्रीतिलकयशोऽर्णवः खं– ३ त.७३ श्लोक १०१
6) अणेमा.श्री.श्रीतिलकयशोऽर्णवःखं– १त.१श्लोक-३
7) अणे मा.श्री.श्रीतिलकयशोऽर्णवः खं–१ त.८ श्लोक-२८
8) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –१त.८श्लोक – २९
9) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –१त. ११,श्लोक–१०४
10) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –१त.१७, श्लोक-३४
11) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –१त.२१, श्लोक–३८
12) अणेमा.श्री. श्रीतिलकयशोऽर्णवःखं –२त.३७, श्लोक–६२
13) अणेमा.श्री. हस्तलिखितपद्यश्लोक-१
14) अणेमा. श्री.राष्ट्रगुरुतिलकप्रशस्तिपञ्चकम्श्लोक– १
15) हरदासवीणाताई,लो. अणेवत्यांचाकाळपृ.४७२

## संदर्भसूची

१) शेवाळकर राम - अर्वाचीन संस्कृत महाकाव्य

२) कुलकर्णीडॉ. द. भि. - महाकाव्यस्वरूपवसमीक्षा

३) वर्णेकर डॉ. श्री. भा. – अर्वाचीन संस्कृत साहित्य

४) अणे माधव श्रीहरी - श्रीतिलकयशोऽर्णवः

५) देशपांडे डॉ. गो. ना. - स्मृतिधन

६) हरदास वीणाताई - ओंजळ

७) केळकर न. चि. – लोकमान्य टिळक यांचे चरित्र

# रेणापूरकर यांच्या काव्यमधील सामाजिक दृष्टी

**प्रीती कुणाल शुक्ल**

मू.जे.महविद्यलय, जळगाव

pritikshukla1986@gmail.com

## सारांश

*जवळपास दोन अरख शब्दाने युक्त सर्व ज्ञानविज्ञानाने परिपूर्ण संस्कृत भाषेचे अध्ययन अध्यापन हेच संस्कृतीला उंच शिखरावर पोहोचू शकते. संस्कृत साहित्याची परंपरा फारच प्राचीन आहे. रेणापूरकर यांचे नाव निश्चितम आदराने शैतले जाते. कुठल्याही कविला समजून घ्यायचे असेल तर सर्वप्रथम त्यांच्या कलाकृतीगा आयास करणे आवश्यक आहे.* ***रेणापूरकर यांच्या काव्यातील सामाजिक दृष्टी :-*** *वर्ण जाती तसेच आश्रम व्यवस्थेविषयी चे विचार, दीन, दलित, शोषित तसेच अंधविश्वास विषयोचे विचार. कवीने आपली सामाजिकता केवळ दीनदुबळ्या पर्यंत सीमित न ठेवता मुकेलेले, दुःखी, शेतकरी यांच्या समस्या सुदधा काव्याच्या माध्यमातून सर्वांच्या समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे याच बरोबर गुजरात येथील महाभयंकर मूकंग तसेच महाराष्ट्रातील जलप्रलय याचे वर्णन यासारख्या विषयांची दखल घेतली आहे, स्त्री शिक्षण विषयक विचार तसेच महत्त्व वर्तमान तसंच प्राचीन काळातील महिला विषयक दृष्टिकोन प्रगट करताना कती म्हणतात की, तेथे महिलांगर शिक्षणावर बंदी गहिलाप्या शिक्षणावर मंदी, त्यांच्यावरील अत्याचार यासंबंधी विचार मांडले आहे. या साहित्यात अनेक वैशिष्ठ्य जाणून घेणे त्यातली पाच प्रमुख वैशिष्ठ्याचा अञ्यास करने जसे सामाजिक दृष्टी, सांस्कृतिक दृष्टी, राष्ट्रीय दृष्टी, पार्मिक दृष्टी, राजनैतिक दृष्टी सामाजिक दृष्टीत कवीने, वर्ण, जाती, आश्रगव्यवस्था, दीन-दलित, शोषित तसेच अंधविश्वास विषयीचे विचार स्त्री शिक्षा विषयीचे विवार जनाने है सर्व संशोधनातून मांडणार आहे.*

### प्रस्तावना

**संस्कृतं पठ वैज्ञानिको भव**

**संस्कृतं वद आधुनिको भव**

जवळपास दोन अरब शब्दांने युक्त सर्व ज्ञानविज्ञानाने परिपूर्ण संस्कृत भाषेचे अध्ययन अध्यापन हेच संस्कृतीला उंच शिखरावर पोहोचू शकते. संस्कृत साहित्याची परंपरा फारच प्राचीन आहे. पाश्चात्य साहित्याचा परिचय होण्यापूर्वी तीन प्राचीन परंपरा इतर प्रादेशिक साहित्याच्या बरोबरीने अव्याहतपणे चालू होती. रेणापूरकर यांचे नाव निश्चितच आदराने घेतले जाते. कुठल्याही कविला समजून घ्यायचे असेल तर सर्वप्रथम त्यांच्या कलाकृतीचा अभ्यास करणे आवश्यक आहे. वेदांमध्ये सुद्धा सांगितले गेले जर परमेश्वराला बघायचे असेल तर त्याच्या काव्याला पहा.

**"देवस्य पश्य काव्यं ………….. जिर्यति 1" १**

### उद्दिष्ट

1. कविच्या सर्व साहित्याचे परीक्षण करने .

2. कविच्या साहित्याची आजच्या समाजाला उपयुक्तता तपासने.

3. कविद्वारे वर्णित सामाजिक दृष्टीचे परीक्षण.

### कवि परिचय

कविचा जन्म रोजी रेणापूर नावाच्या 1924 सप्टेंबर 17 गावात झाला येथे त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण झालेत्यानंतर संस्कृतात प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

**"विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः**

**प्रारभ्यचोत्तमजनाः न परित्यजति ।।"[२]**

या उक्तीनुसार महान लोक विघ्नाच्या भयाने कुठलेच कार्य अपूर्ण सोडत नाही. त्यानी आपल्या शिक्षणाचा ध्यास सोडला नाही.1947मध्ये उस्मानिया विश्वविद्यालयातून बीए आणि

एम ची पदवी त्यांनी मिळवली. त्यांनी 1950 ते 1980 पर्यंत वरंगल, गुलबर्गा, चिकमंगळूर येथे त्यांनी सेवाकार्य केले. कवींनी दहा पद्य आणि एक गद्यकाव्याच्या माध्यमातून जवळपास वीस हजार श्लोक लिहिले. या सर्वांना पाहून महाराष्ट्र शासन, भारत शासन तसेच सामाजिक, सांस्कृतिक संस्थेद्वारे कवीला गौरविले गेले आणि सर्वात शेवटी भारताचे राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी बादरायण सन्मानाने त्यांना सन्मानित केले.

**रेणापूरकर यांच्या काव्यातील सामाजिक दृष्टी**

काव्यहेतु चे वर्णन करतांना मम्मटाचार्यांनी येथे कवित्वाच्या बीजरुपी संस्काराला प्रथम स्थान दिले आणि लोकशास्त्रात निपुणता याला द्वितीय स्थान दिले.

**"शक्तिनिपुर्णता लोकशास्त्र काव्य द्यवेक्षणात् ।**

**ककाव्यज्ञाशिक्षायाभ्यास इति हेतुस्तदुद्भवे ।।"[३]**

म्हणजेच कवी आपल्या काव्याला लिहिताना लोकांचे मन समजूनतसेच तत्कालीन युगाचे प्रतिबिंब दिसून येते. याचे आपण खालील प्रमाणे विभाजन करू शकतो.

१. वर्ण जाती तसेच आश्रम व्यवस्थेविषयी चे विचार.
२. दीन-दलित, शोषित तसेच अंधविश्वास विषयक विचार.
३. स्त्री-शिक्षा महत्त्वक विचार.

**1.वर्ण, जाती तसेच आश्रम व्यवस्थेविषयी चे विचार**

प्राचीन काळात काही व्यवस्था बनविली गेली होती. त्यातील एक वर्ण तसेच दुसरी आश्रम व्यवस्था होती. कवी नुसार ही पूर्णपणे वैज्ञानिक होतीजसे .-

**समाजसंधारणपोषणार्थं प्राचीन सामाजिक शास्त्रकारैः ।**

**वर्णाश्रमाख्या परिकल्पिताऽऽसीपूर्व सामाजिक सुव्यवस्था ।।[४]**

वृत- वरणे या धातूचा अर्थ वरण करणे किंवा निवडणे असा होतो. त्यालाच वर्णव्यवस्था म्हटले जाते. प्राचीन काळात हिच वर्णव्यवस्था गुणधर्मांच्या आधारावर तसेच नैसर्गिक वृत्तीवर केली जात होती. यावरून वर्णव्यवस्था ही चार भागात विभागली गेली ती पुढीलप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र .

*वर्णव्यवस्था

**ब्राह्मण :-**

**'ब्रम्ह जाणाति य: स ब्राह्मण:'** ।असा ब्राह्मण शब्दाचा अर्थ संस्कृत मध्ये घेतला जातो कवी नुसार .'जे लोक विद्येचे अध्ययन व ज्ञानाचा प्रचार प्रसाराद्वारे समाजाचे अज्ञान दूर करतात त्यांना ब्राह्मण म्हटले जाते.'[५]मनुस्मृति नुसार हीच व्याख्या आपण पुढील प्रमाणे बघू शकतो.

**"अध्यापनमध्ययनं यजनं तथा ।**

**दानं प्रतिग्रहश्चैव ब्रह्मणानामकल्पयत् ।।[६]**

म्हणजेच अध्ययन अध्यापन आयोजन याजन दान घेणे- इत्यादी कार्य जो करू शकतो तोच ब्राह्मण आहे.

**क्षत्रिय:-**

क्षत्रिय या शब्दाचा अर्थ क्षत्रात् धारयते । किंवा छात्रं धारयति । असा आहे.महर्षी मनू खालील प्रमाणे क्षत्रिया ची व्याख्या करतात.

**प्रजानां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ।**

**विषयष्वप्रसक्तिश्च क्षत्रियस्य समासतः ।।[७]**

प्रजेचे रक्षण, दाल, यज्ञ, अध्ययन इत्यादी कार्य करणारे क्षत्रिय असतात.

कवी **ये मातृभूर"………. सन्ति सुधन्यलोकाः ll"[८]**

या श्लोकाद्वारे क्षत्रिय शब्दाची व्याख्या विस्तृतपणे सांगताना म्हणतात की,मातृभूमीच्या रक्षणासाठी तिच्या पालनासाठी जो नेहमी तत्पर असतो त्याला क्षत्रिय म्हणतात.

**या समाजाच्या आरक्षणाच्या हेतूने या वर्गाला कवीने जसेच्या तसे स्वीकार केले आहे.**

**वैश्य:-**

संस्कृतात 'विश् तू पासून तयार झालेला 'प्रवेशाने-हा वैश्य म्हटला जातो. त्याचा अर्थ लपविणे किंवा झाकून ठेवणे असा होतो. मनुस्मृतित त्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

**पशुनां रक्षणं दानमिज्याध्ययनमेव च ।**

**वणिक् पदं कुसीदं च वैश्यस्य कृषिमेव च ।।**[९]

म्हणजेच पशुंची रक्षा करणे ", दान घेणे, अग्निहोत्र करणे, शास्त्र अध्ययन करणे, व्यापार करणे, व्याज घेणे हे सर्व करणारे वैश्य म्हटल्या जातात."त्याचेच अनुसरण कवीने केले आहे ते म्हणतात की, " व्यापार करणारे शेती करणारे आणि कारागिरी करणारे विविध वस्तू निर्माण करणारे लोक वैश्य वर्णाचे असतात."[१०]

**शूद्र :-**

शूद्र या शब्दाची व्याख्या मनुने

**"एकमेव ............... शुश्रूसामानसुयया ।।"११**

या श्लोकाद्वारे केली आहे. म्हणजेच त्याचे कर्म हे तीनही वर्णची सेवा करणे हे आहे चुकते विस्ताराने पुढील श्लोकाद्वारे सांगितले. **"विद्या कला .......... शुद्रा: ।।"१२**

याद्वारे कवी सांगतात की, विद्या,कला कौशल्य आणि ज्ञान आणि हीन असा व्यक्ती शूद्र म्हंटला जातो. असे व्यक्ती वाणी शरीर याद्वारे केवळ सेवाच करू शकतात.

येथे आपल्याला लक्षात येते की कोणीही व्यक्ती आपल्या गुणांच्या द्वारे किंवा कर्माद्वारे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असू शकतो. कविले याचं वर्णव्यवस्थेला वैदिक म्हणून त्यांची वैशिष्ट्ये सांगितली आहे. कवी वेदांपासून वर्णव्यवस्थेचे उत्पत्ती मानतात कारण स्वतः वेद सांगतात की,

**"ब्राह्मणोऽय मुखमासीद् बाहूराजन्यः कृतः ।**

**ऊरू तदस्य यदवैश्यः पद्भ्यां शुद्रोऽजायत ।।"**[१३]

म्हणजेच या पुरुषी रुपी शरीराचे मुख ब्राह्मण, बाहू क्षत्रिय, उदर किंवा जंघा वैश्य, शूद्र हे पाय आहेत. कविने सुंदर उदाहरण देऊन हीच संकल्पना स्पष्ट केली, "शरीराच्या अवयवाद्वारे हे सुद्धा सिद्ध होते की जेव्हा पायात काटा घुसतो तेव्हा डोळ्यात अश्रू येतात , हात किंवा बाहू रक्षणासाठी असतात, पाय धावून जातात परंतु ब्राह्मण ब्रह्माच्या . मुखातून उत्पन्न होणारे म्हणून श्रेष्ठ आणि शूद्र पायांपासून मनुष्याची प्रवृत्ती आहे".[१४]

मनुने सुद्धा

**"शुद्रो ......... विद्याव्दैशात्तथैव च ।"**[१५]

श्लोकाद्वारे सांगितले गेले की शूद्र ब्राह्मण आणि ब्राह्मण शुद्र होतो तो त्याच्या गुण आणि कर्मानुसार.

**जातीव्यवस्था**

कवी जातीव्यवस्थेला वर्ण व्यवस्थे पेक्षा वेगळे मानतात. कवीच्या मते वर्ण व्यवस्था मनुष्यासाठी वरदान आहे परंतु जातीव्यवस्था ही शाप आहे

**अनन्तदुःखोद्भव" ...............एव तु जातयस्ता ।"**[१६]

या श्लोकांद्वारे कवी स्पष्ट करतात की आजच्या दुःखाच्या उत्पत्तीचे कारण वर्तमान जाती प्रथेचे मूळ हे वर्ण नाही किंवा वर्ण द्वारे उत्पन्नही होत नाही .यांचा एकमेकांशी संबंध नाही . वर्ण तर चारच आहे, तेसुद्धा कर्म आणि गुणांवर आधारित आहे. शेवटी कवी जाती प्रथेला जडातून फेकून देण्याचे आव्हान

**राष्ट्रस्य"..............विपाटनीय"**[१७]

या श्लोकाद्वारे करतात.

**आश्रमव्यवस्था**

प्राचीन काळात वर्णव्यवस्थेने बरोबर आश्रम व्यवस्था सुद्धा ऋषीमुनी तसेच समाजशास्त्रज्ञांनी परी कल्पित केली होती-. या वर्णव्यवस्थेचे प्रमाणे आश्रम व्यवस्था सुद्धा मनूने पुढील श्लोकाद्वारे सांगितले आहे.

**चातुर्वर्ण्यं त्रयो लोका"................ वेदात्प्रसिध्यति ।।"**[१८]

आणि त्यासंबंधीचे प्रतिपादन भगवतगीतेतही पुढील श्लोकाद्वारे पाहायला मिळते.

**चातुर्वर्ण्यं"मया .......... विध्दकर्तारमव्ययम्।।"**[१९]

**ब्रह्मचर्याश्रम:-**

अथर्ववेदात ब्रह्मचारी चे वर्णन

**ब्रह्मचर्येन तपसा"............. स्वराभरत्।।"**[२०]

याद्वारे केली आहे. याच मंत्राला कवीने स्वतःच्या भाषेत मांडताना म्हटले आहे की,

**"देवौर्जितोमृत्यूरनेन पूर्वम्............... ब्रह्म चर्यस्य महामहत्वम्।।"**[२१]

म्हणजेच ब्रम्हचर्याद्वारे संसारा सोबत मृत्यूवर सुद्धा विजय प्राप्त होऊ शकतो.

**गृहस्थाश्रम:-**

कवी गृहस्थाश्रमाला सर्व आश्रमाचे मूळ आहे असे सांगताना म्हणतात की,

**"स्त्रोतो नदीनामिव .......... सर्वमुक्तं ।।"**[२२]

म्हणजेच ज्याप्रमाणे समुद्रातील सर्व नाले, नद्या या वृक्षवेली चा आधार असतात त्याप्रमाणे गृहस्थाश्रम सर्व आश्रमाचा आधार आहे. याच गृहस्थाश्रमा चे महत्त्व सांगताना अथर्ववेदातील ऋषी म्हणतात की,

**"गृभ्णामि ते सौभागत्वाय हस्तं मया पत्या जरदष्टिर्यथासः ।।"**[२३]

**वानप्रस्थाश्रम:-**

विषयी मनू ने म्हटले आहे,

**"गृहस्तु यदा पश्येत्........... समाश्रयेत्।।"**[२४]

जेव्हा केस पांढरे व्हायला लागतात, जेव्हा मुलाला मुलगा होतो तेव्हा वानप्रस्थाश्रम घ्यावा. याच अर्थाला कवीने आपल्या शब्दात मांडतांना म्हटले आहे की,

**"दृष्ट्वा गृहस्थो वलितं........... स्म ततः सः तत्पुम्।।"**[२५]

म्हणजेच वाढत्या वयामुळे शरीरावर सुरकुत्या आणि केस पांढरे होतात तेव्हा सर्व भार मुलावर सोपवून तप करण्यासाठी वनात निघून जावे.

**संन्यासाश्रम:-**

वानप्रस्थाश्रमात राहून जेव्हा सर्व इच्छा पूर्ण होतात तेव्हा संन्यास ग्रहण करावा. असे मनुने पुढील श्लोकाद्वारे सांगितले....

**"वनेषु च विहृत्यैवं तृतियं भागमायुषः ।**
**चतुर्थमायुषो भागं त्यक्त्वा संङ्गान् परिवर्जयेत्।।"**[२६]

यालाच कवीने आपल्या शब्दात मांडताना म्हटले आहे की,

**"पुत्रषणा लोकघनैषणाङ्गामत ............ विहृतिर्हि लोके ।।"**[२७]

म्हणजेच पुत्रैषणा, लोकैषणा, वितैषणा या वासणांची तृप्ती झाल्यावर संन्यास घ्यावा.

**2. दीन, दलित, शोषित तसेच अंधविश्वास विषयीचे विचार**

मध्य काळात ज्या समूहाला शुद्र मानले जात होते त्यांना लिहिण्याचा वाचण्याचा अधिकार नव्हता. या सर्व बाबी लक्षात घेऊन **धन्यो धन्यः श्रीदयान्दवर्य**"स्वामी दयानंदा च्या कार्याचे वर्णन करताना लिहितात **शुद्रादिभ्यो"........ श्रीदयानन्दवर्य ।।"**[२८]

म्हणजेचशूद्रांना वेद इत्यादी शिकण्याचा अधिकार किंवा सामान्य जीवन जगण्याचा सुद्धा अधिकार नव्हता. अशा सर्व लोकांना अधिकार मिळण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणारे व्यक्तीवर

दयानंद धन्य आहेत कवी अंधविश्वासावर विचार प्रगट . करताना

**अन्धश्रध्दं"** म्हणतात ........ **मुक्तिः स्त्रीणां ।।"**[२९]

अशाप्रकारे त्यांनी आपले विचार प्रगट केली आहे. पुढे ते म्हणतात की, "अंध परंपरेला सोडून बुद्धी वंताला जवळ केले पाहिजे. जे आपल्या राष्ट्र समाज तसेच विश्वासाठी उन्नतीचे मूळ आहे."[३०]

कवीने आपली सामाजिकता केवळ दीनदुबळ्या पर्यंत सीमित न ठेवता भुकेलेले, दुःखी, शेतकरी यांच्या समस्या सुद्धा काव्याच्या माध्यमातून सर्वांच्या समोर आणण्याचा प्रयत्न केला आहे. हे आपण **कुत्राप्यवर्षणशान्न कृषिर्न"....... समभूध्दिमूढा ।।"**[३१] या श्लोकाद्वारे बघू शकतो.

याच बरोबर गुजरात येथील महाभयंकर भूकंप तसेच महाराष्ट्रातील जलप्रलय याचे वर्णन यासारख्या विषयांची दखल घेत कवीने आपले विचार "**ध्वजं हस्ते धृत्वा .......... पतितभवनावासनिचये ।।"**[३२]तसेच **तत्रपि" मुम्बयि महानगरे....... महाविनाश ।।"**[३३]या श्लोका द्वारे व्यापकपणे मांडले आहे .

**3. स्त्री शिक्षण विषयक विचार तसेच महत्त्व**

वर्तमान तसेच प्राचीन काळातील महिला विषयक दृष्टिकोन प्रगट करताना कवी म्हणतात की, 'येथे वैदिक काळात स्त्री आणि पुरुष यांच्या शिक्षणात भेद नव्हता. जसे इंद्राणी, सरमा ,यमी, उपनिषदात घोषा, जुहू, रोमशा , श्रद्धा, श्री, निषद, उर्वशी, अदिती, वाक् लक्ष्मी, इंद्रमाता इत्यादी अनेक विद्ध, मंत्रद्रष्टा आणि विदुषी पंडिता ऋषिकेचे नाव आपण वाचू शकतो.'[३४]

परंतु मध्यकाळात खूप विचित्र स्थिती आपणास बघावयास मिळते तेथे महिलांवर शिक्षणावर बंदी महिलांच्या शिक्षणावर बंदी, त्यांच्यावरील अत्याचार यासंबंधी विचार आपण पुढील श्लोकात द्वारे बहु शकतो.

**"अभुत काशी शाश्वतं ...... घोषितमभुत ।।"**[३५]

शिवाय स्त्रियांवर होणारे अत्याचारचे वर्णन करताना कवी म्हणतात,

**"उद्घाटितेप्रतिदिनं ........... ह्यभिगम्य दृष्ट्वैव ।।"**[३६]पुढे ते लिहितत की, **"नरिजनस्य नहीं रक्शित ........ शिलम।।"**[३७] म्हणजे चोर, डाकू, दृष्ट इत्यादींचे साम्राज्य असताना स्त्रियांचे चारित्र्य सुद्धा सुरक्षित नाही. त्यात कवी या सर्वांचे कारण सदाचार, धर्म, चारित्र्य या सर्वांचे दुर्लक्ष आणि धन किंवा पैसा यांनाच सर्वकाही मानणे यामुळे हे सर्व कृती आज घडत आहे कवीने प्रातिनिधिक रूपात दोन महिला विदुषी चे . प्रशंसा करताना कवी लिहितात, "**आसढोऽसौ धवल ............ नेत्र कौतूहलानाम्।।"**[38] कवी पुढे सांगतात, **"श्रृता घोषा.........साक्षातकृतमभूता ।।"**[39] म्हणजे आजपर्यंत भारतात प्राचीन ज्ञानविज्ञानाची घोषा-, अपालादी सारखी वेदाच्या ऋषिकेश चे नाव ऐकले होते तसेच . .शंकराचार्य सोबतच भारतीचे शास्त्रार्थ पांडित्य ऐकले होते परंतु प्रज्ञा देवीने पूर्ण भारतात भ्रमण करून भारतीय जनतेला आपले श्रेष्ठ वैदिक धर्माप्रती आपल्या मधुवनी द्वारे जागृत केले हे सर्वसामान्यास माहीत नव्हते.

अशाप्रकारे कवीने दोन वेगवेगळ्या क्षेत्रात स्त्रीशक्तीचे वर्णन करून आपला स्त्रीवादी दृष्टीकोन सुद्धा व्यापकपणे स्पष्ट केलेला आहे.

**निष्कर्ष**

रेणापूरकर यांचे साहित्य विशाल आहे तसेच या साहित्यात अनेक वैशिष्ट्य आपल्याला दिसून येतात.त्यातली पाच प्रमुख

वैशिष्ट्य आपण बघू शकतो जसे सामाजिक दृष्टी, सांस्कृतिक दृष्टी, राष्ट्रीय दृष्टी, धार्मिक दृष्टी, राजनैतिक दृष्टी.
सामाजिक दृष्टीत कवीने-दीन ,आश्रमव्यवस्था ,जाती ,वर्ण , शोषित तसेच अंधविश्वास विषयीचे विचार स्त्री ,दलित

**प्रयोजन"विना मन्दोऽपि न प्रवर्तते"** या संशोधना द्वारे काही निष्कर्षापर्यंत पोहोचता येईल.
१.आजची ज्वलंत समस्या जातिवाद आहे यासाठी कवीने मनुस्मृति इत्यादींचे प्रमाण घेऊन हे सिद्ध केले की मनुस्मृती किंवा वेदात जातीप्रथा अंधविश्वास या संबंधित काहीच उल्लेख नव्हता.
२.कवी वर्णव्यवस्थेला वैज्ञानिक मानतात. तसेच त्यांच्या मते कर्तव्यकर्म वेगवेगळे होऊ शकतात.कवीच्या मते जन्माने कुणीच लहान किंवा मोठे नसते तर प्रत्येक व्यक्ती आपल्या कर्मा नुसारच लहान किंवा मोठा मानला जातो याच गोष्टीला समाज किंवा राष्ट्राने मानले तर आंतरजातीय वाद मिटतील.
३. आश्रम व्यवस्था प्राचीन काळात आवश्यकतेनुसार उत्तम व्यवस्था होती. कारण परिवाराचे एकमेकांपासून दूर राहणे हेच समाज दुरावण्याचे कारण बनत आहे.
४. स्त्री किंवा शेतकरी यांच्यावर अन्य भाषेत बरेचसे साहित्य उपलब्ध आहे कवीने प्राचीन तसेच अरवाचीन संदर्भ देऊन हे सिद्ध केले की प्राचीन काळात स्त्रियांना उच्च स्थान दिले जात होते पण आजच्या काळात ही परिस्थिती आपल्याला दिसून येत नाही.

## संदर्भ सूची


1) अथर्ववेद, म.10, सू.8, मं32, पा.नं.238
2) नीतिशतकम्, श्लो.27, पा.नं.15
3) कव्यप्रकाश, उ.1, का.3, पा.नं.16
4) प्र.भा.सं. श्लो.1, पा.नं.168
5) प्र.भा.सं. श्लो.5, पा.नं.191
6) वि.म., अ.1-89, पा.नं.54
7) वि.म., अ.1-89, पा.नं.56
8) प्र.भा.सं. श्लो.21,92, पा.नं.194
9) वि.म., अ.1-90, पा.नं.57
10) प्र.भा.सं. श्लो.22-23, पा.नं.194-195
11) वि.म., अ.1-91 पा.नं.58
12) प्र.भा.सं. श्लो.29-30 पा.नं.195-196
13) यजुर्वेद अ.31, मं.41,पा.नं.166
14) प्र.भा.सं. श्लो.39,40,41 पा.नं.198
15) वि.म., अ.10-65, पा.नं.501
16) प्र.भा.सं. श्लो.90-91 पा.नं.206
17) प्र.भा.सं. श्लो.136 पा.नं.213
18) वि.म., अ.12-97, पा.नं.534
19) भ.गी. अ.4, श्लो.13
20) अथर्ववेद, म.11, सू.5, मं.19, पा.नं.259
21) प्र.भा.सं. श्लो.49 पा.नं.173
22) प्र.भा.सं. श्लो.67 पा.नं.179
23) अथर्ववेद, म.14, सू.1, मं.50, पा.नं.308
24) वि.म., अ.6-33, पा.नं.265
25) प्र.भा.सं. श्लो.108 पा.नं.183
26) वि.म., अ.6-2, पा.नं.259
27) प्र.भा.सं. श्लो.108 पा.नं.186
28) काव्यो. श्लो.09 पा.नं.49
29) काव्यो. श्लो.19 पा.नं.78
30) काव्यो. श्लो.22 पा.नं.78

31) काव्यो. श्लो.09 पा.नं.81

32) काव्य.नि.श्लो.3 पा.नं.17

33) काव्य.नि.श्लो.2 पा.नं.14

34) प्र.भा.सं. श्लो.42 पा.नं.268

35) श्रध्दा. श्लो.6 पा.नं.62

36) कव्योद्या. श्लो.6 पा.नं.13

37) श्रध्दा. श्लो.7 पा.नं.18

38) ईंदिरा.श्लो.22 पा.नं.10

39) श्रध्दा. श्लो.7 पा.नं.63

**संदर्भग्रंथ**


1) अथर्ववेद संहिता, श्रीपाद दामोदर सातवलेकर, प्रका. स्वाध्यय मंडल पारडी, जि. सूरत, 1957
2) यजुर्वेद संहिता, श्रीपाद दामोदर सातवलेकर, प्रका. स्वाध्यय मंडल पारडी, जि. सूरत,
3) प्राचीन भरत संस्कृतीयम्, प्रा. हरिशचंद्र रेणापूरकर, प्रका. श्री. पी व्ही. शंकरन्, अडीशनल, रजि. भारतिय विद्याभवनम्, मुंबई -7, प्रथमावृत्ती-2007
4) कव्योन्मेश, प्रा. हरिशचंद्र रेणापूरकर, भारतिय विद्याभवनम्, मुंबई -7, 1989
5) कव्यनिर्झर, प्रा. हरिशचंद्र रेणापूरकर, प्रका.गुलबर्ग, प्रथमावृत्ती- मे 2005
6) कव्योद्यानम्, प्रा. हरिशचंद्र रेणापूरकर, प्रका.गुलबर्ग, प्रथमावृत्ती- मार्च-2006
7) श्रध्दाकुसुमान्जलि, प्रा. हरिशचंद्र रेणापूरकर, प्रका.गुलबर्ग, प्रथमावृत्ती- मे 2007
8) ईंदिरापतनोत्थन्म्, प्रा. हरिशचंद्र रेणापूरकर, प्रका.गुलबर्ग.
9) मनुस्मृती (विशुध्द), प्रा, सुरेंद्र कुमार, आर्यसाहित्य प्रचार, दिल्ली 2006 चौथी आव्रुत्ती 1996
10) भगवदगीता,स्वामी रामसुरदास, गीतागोरखप्रेस गोरखपुर, आ. 15 वी.
11) कव्यप्रकाश,मम्मट, ज्ञानमंडल लिमि. वाराणसी, सहावी आव्रुत्ती, 1960
12) नीतिशतकम्,भत्रुहरि,सं. अ.अ.शर्मा, विद्याभारती प्र. लातूर 2005

# संस्कृत-मराठी-संस्कृत स्थित्यंतर

## ( संगीत सौभद्रम् च्या आधारे )

**पंकजा माधव वाघमारे,**

संस्कृत विभाग, शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

**सारांश**

*संस्कृत नाटकांचा प्रभाव सर्वच भारतीय भाषांवर पडलेला दिसून येतो. महाभारतातील सुभद्राहरणाच्या कथेवर आधारित संगीतसौभद्र हे नाटक अण्णासाहेब किर्लोस्करांनी रचले आणि मराठी रंगभुमीला संगीत वैभव प्राप्त करवीन देणारे हे एक चिरतरूण नाटक ठरले. साहित्याच्या विकासात आदान-प्रदानाचे एक महत्त्वपूर्ण योगदान आहे. पूर्ववर्ती काव्याचा प्रभाव परवर्ती कृतींमध्ये नेहमीच पडत असतो. संगीत सौभद्र हे एवढे प्रभावशाली नाटक बनले की, या नाटकाने प्रभावित होऊन एका संस्कृत विद्वानाने अर्थात श्री. भि. वेलणकर यांनी संगीत सौभद्र चा सस्कृतानुवाद 'संगीतसौभद्रम्' केला आणि सुभद्रेच्या विलोभनीय कथेचा संस्कृत-मराठी-संस्कृत असा प्रवास अस्तित्वात आला.*

**प्रस्तावना**

लोकवृत्तींचे, मनुष्याच्या जीवनातील सुख आणि दुःखाच्या अवस्थांचे अनुकरण म्हणजे नाट्य होय. दर्शकांच्या रसानुभूतीकरिता नाटकाची निर्मिती झाली असे म्हणता येईल. संस्कृत नाटकांमध्ये भारतीय जीवनदृष्टीचे एक विलक्षण आणि प्रभावी रूप बघायला मिळते. संस्कृत नाटकांमध्ये नैतिक विवेकाने केलेल्या मनुष्याच्या कार्यांची, भावांची, जीवनाच्या विविध अवस्थांची अत्यंत कलात्मक आणि कल्पनाशील अनुकृती दाखवली आहे ज्यायोगे दर्शकांना रसात्मक अनुभवाच्या आनंदप्राप्तीसोबतच सत्याचा पण बोध होतो.'नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्।' असे महाकवी कालिदासाने सुद्धा प्रतिपादन केले आहे.

भारतात नाट्याची परंपरा ही अत्यंत प्राचीन काळापासूनच अस्तित्वात आलेली आहे. भरतमुनींनी (इ. स. पूर्व तिसरे शतक) आपल्या नाट्यशास्त्र या ग्रंथात या विषयावर प्रकाश टाकला आहे. संस्कृत नाटककारांनी भारतीय नाटकाची परंपरा समृद्ध केलेली आहे. भारतीय नाट्यसृष्टीचा विचार केला तर संस्कृत नाट्यसृष्टीच्या वैभवाचा आवर्जून उल्लेख करावाच लागतो. अश्वघोष, भास, कालिदास, शुद्रक, हर्षवर्धन, भवभूती, विशाखदत्त यांच्या नाट्यकृतींनी संस्कृत नाट्यसृष्टीला अक्षरशः आदर्श बनवले आहे. संस्कृत नाटकांचा प्रभाव सर्वच भारतीय भाषांवर पडलेला दिसून येतो.

मराठीमध्ये मात्र नाट्यवाङ्मय प्रकार फार उशिरा झाला. 1843 साली विष्णू अमृत भावे यांनी सांगली येथे 'सीतास्वयंवर' या नाटकाचा प्रयोग केला. हा प्रयोग म्हणजेच मराठी नाट्यपरंपरेचा आरंभ मानण्यात येतो. इ. स. 1857 पासून संस्कृत नाटकांची मराठीत भाषांतरे होऊ लागली होती तोपर्यंत संस्कृत नाटकांची श्रीमंती मराठी रसिक प्रेक्षकाला कळली नव्हती. अण्णासाहेब किर्लोस्कर म्हणजेच बळवंत पांडुरंग किर्लोस्कर हे भारतीय नाट्यपरंपरेचे अभिमानी होते. रसात्मकता व आल्हादैक्यता ही त्यांच्या नाटकाची प्राणभूत लक्षणे होती व त्यांचा नाट्यसंप्रदाय हा भरतप्रणीत संप्रदाय होता. समकालीन नवविचाराच्या प्रवाहापासून वेगळी सांप्रदायिक, पारंपारिक व पुराणप्रिय अशीच त्यांची निर्मिती राहिली. इ. स. 1880 ते 85 या पाच वर्षात अण्णासाहेबांनी

केलेल्या 'संगीत शाकुंतल', 'संगीत सौभद्र', 'संगीत रामराज्य वियोग' या नाट्यनिर्मितीने संगीत नाटक हा पूर्णरूप नाट्यबंध जन्मास घातला.

या संगीत नाटकांपैकी 'संगीत सौभद्र' ही कलाकृती अत्यंत प्रसिद्ध झाली. सुभद्राहरणाची मूळ कथा ही महाभारताच्या आदिपर्वात 219, 220, 221 व्या अध्यायात येते. सौभद्र हे कृष्णाने घडवून आणलेले गोड कपट नाट्य आहे. संगीत सौभद्र या नाटकाच्या कथानकाचे उपजीव्य महाभारत हा संस्कृत ग्रंथ आहे तर सौभद्र ची रचना ही देखील संस्कृत नाट्य पद्धतीस अनुसरुनच आहे. कालिदासीय नाटकातील रचनातंत्राप्रमाणे रचनातंत्राचा स्वीकार केलेला असला तरी अण्णासाहेबांनी रचलेल्या किर्लोस्करी नाटकाच्या जडणघडणीत, रंगरूपात व प्रयोगपद्धतीत क्रांती घडवून आणली.

संगीत सौभद्र ही एक हलकी-फुलकी संगीत सुखांतिका आहे. निर्भेळ करमणूक हा तिचा हेतू आहे. 'संगीत सौभद्र' हे प्रेमळांचे व प्रेमिकांचे जग आहे. म्हणून पौराणिक कथा असूनही अध्यात्मविवेचन व पारमार्थिक बोध यांपासून ते दूर आहे व समकालीन साहित्य हेतू पासून देखील ते दूर राहिले. महाभारत काळापासून बदलत आलेली सौभद्र कथा अण्णासाहेबांच्या कल्पनाविश्वात खूपच बदलली. किर्लोस्करांच्या नाटकात ती दैवतकथा किंवा देवकथा राहिली नाही. महाभारतातील सनातन विभूतीत्व टाकून अण्णासाहेबांनी कुटुंबातील प्रेमळ माणसांचे नाटक लिहिले. संगीत सौभद्र हे सुखी संसाराच्या कल्पना व्यक्त करणारे समकालीन सोज्वळ असे कौटुंबिक नाटक आहे.

यासंदर्भात वि. स. खांडेकरांचा संगीत सौभद्रविषयीचा अभिप्राय हा लक्षणीय आहे. वि. स. खांडेकर म्हणतात, "देवांना वार्धक्य कधीही येत नाही, अशी समजूत आहे. अशा देवकोटीला पोचलेल्या मराठी नाटकांची यादी करु लागल्यास तिच्यात श्रीकाराच्या खाली सौभद्राचेच नाव लागेल. आज अनेक वर्ष बऱ्या वाईट नाटक मंडळ्या हे नाटक एकसारखे करीत आहेत. पण द्रौपदीची लहानशी थाळी जशी दुर्वासाच्या हजारो शिष्यांची क्षुधा शांत करु शकली त्याप्रमाणे किर्लोस्करांच्या प्रतिभेचे हे सुंदर अपत्य पिढ्यान् पिढ्या नाट्यलोलुप रसिकांचे मनोरंजन करीत आहेत."

मराठी रंगभूमीवर कितीही स्थित्यंतरे आली तरी मराठी रंगभूमीला संगीत-वैभव प्राप्त करुन देणारे संगीत सौभद्र हे नाटक सुखावह तर आहेच पण एक परिपूर्ण कलाकृती असल्यामुळे आणि अण्णासाहेब किर्लोस्करांच्या नाट्यशैलीला संगीताचा अपूर्व साज चढविल्यामुळे एक चिरतरुण असे हे नाटक आहे. साहित्याच्या विकासात आदान-प्रदानाचे एक महत्त्वपूर्ण योगदान आहे. पूर्ववर्ती काव्याचा प्रभाव परवर्ती कृतींमध्ये नेहमीच पडत असतो. हा पूर्ववर्ती प्रभावच उपजीव्य-उपजीवक भाव असतो. महाभारताच्या प्रभावातून निर्माण झालेल्या या संगीत नाटकात आणि महाभारतात उपजीव्य-उपजीवक असा भाव आहेच. संगीत सौभद्र हे एवढे प्रभावशाली नाटक बनले की, अण्णासाहेब किर्लोस्करांनी एका संस्कृत कथेला मराठी संगीत नाट्याच्या अनुबंधात बसवले त्याने प्रभावित होऊन एका संस्कृत विद्वानाने अर्थात श्री. भि. वेलणकर यांनी संगीत सौभद्र चा संस्कृतानुवाद 'संगीतसौभद्रम्' केला आणि सुभद्रेच्या विलोभनीय कथेचा संस्कृत-मराठी-संस्कृत असा प्रवास अस्तित्वात आला आणि संगीत सौभद्र हे श्री. भि. वेलणकरांच्या शैलीने देववाणीमध्ये नवीन रूप घेऊन अवतरले. अमराठीभाषिकांपर्यंत किंबहुना संस्कृत जाणणाऱ्या परंतू मराठी न जाणणाऱ्या नाट्यरसिकांपर्यंत हे अद्वितीय मराठी नाटक या नवीन स्थित्यंतरामुळे जाऊन पोहोचणारे

आहे आणि अगदी साधर्म्याधिष्ठित अनुवादामुळे संस्कृत संगीत नाटक हा साहित्यप्रवाहही प्रवाहित करण्यात श्री वेलणकरांचे नाव अग्रभागी घ्यावे लागणारे आहे. 'संगीत सौभद्र' च्या प्रभावातून जन्मलेल्या 'संगीतसौभद्रम्' बद्दल स्वतः श्री. भि. वेलणकर म्हणतात की,

"In choosing this play for a Sanskrit rendering, I had several objects in view. For producers, desirous of staging Sanskrit plays, a theme handled in modern times and yet drawn from the ancient lore is eminently suitable. In addition, Saubhadra started the modern era the Marathi stage and it is only opt that people of other states should be able to see this epoch-making piece of modern times which made the Marathi stage so much advanced. Music also lured me to this play in particular. A considerable use of Sanskrit vocabulary was as additional facility during the translation. Readers will notice that the maximum amount of original Sanskrit expressions have been preserved in the translation."[i]

अत्यंत सुरस असे हे भाषांतर करत असताना श्री. वेलणकरांना संगीत सौभद्रच या यशाच प्रसिद्धिची जाण होती त्यामुळे या भाषांतरामध्ये अण्णा साहेब किर्लोस्करांच्या रचना सुद्धा अगदी जशाच्या तशा संस्कृतात पोहोचव्यात हा वेलणकरांचा प्रयत्न म्हणजे त्यांच्या अनुवाद कौशल्याचा उत्कृष्ट नमुनाच आहे. क्वचित छंदाच्या योजनेमुळे करावे लागलेले बदल वगळता सौभद्र चे हे नवे रूप अत्यंत आकर्षक बनले आहे. नभ मेघांनी आक्रमिले, नच सुंदरि करु कोपा, प्रिये पहा, राधाधर मधु मिलिंद जय जय किंवा पाण्डु नृपतिजनक जया ही संगीत सौभद्र ची अजरामर कीर्ति प्राप्त केलेली पदे श्री. भि. वेलणकरांनी अनुवाद करत असताना या प्रसिद्धी वलयाची जाण ठेवत या पदांना गीर्वाणवाणीचा अपूर्व असा साज चढविला असल्याने ती नितांत रमणीय भासतात.

| **संगीतसौभद्र**<br>**(श्री अण्णासाहेब किर्लोस्कर)** | **संगीतसौभद्रम्**<br>**(श्री. भि. वेलणकर)** |
| --- | --- |
| वद जाउं कुणाला शरण करील<br>जो हरण संकटाचे। मी धरिन<br>चरण त्याचे। अगं सखये।।धृ।।<br>बहु आप्त बंधु बांधवां प्रार्थिले<br>कथुनि दुःख मनिंचे। ते होय<br>विफल साचे। अगं सखये[ii] | वद शरणं मे ननु कुतो यथा<br>स्यादहं दुरितानां हरणं भजेयं<br>सततं तं चरणम्। सखि सदा ।।धृ।।<br>बान्धवाप्तसुहितैषिणां<br>प्रार्थनैर्मनोव्यथाकथनंविफलितं<br>निखिलमत्र नूनम्।। सखि सदा।।[iii] |

यांव्यतिरिक्त 'बलसागर तुम्ही, नभ मेघांनी आक्रमिले, न च सुन्दरि किंवा राधाधरमधुमिलिंद जयजय' ही पदे संस्कृतात असली तरी ती मराठीप्रमाणेच मनाचा ठाव घेतात. अण्णासाहेब किर्लोस्करांवर कर्नाटकी शैलीचा प्रभाव होता त्यामुळे त्यांच्या नाटकांमधील अनेक पदे ही खास कर्नाटकी संगीतातच तयार झालेली आहेत. हा प्रभाव कायम ठेवण्याचे शिवधनुष्य देखील वेलणकरांनी लीलया पेलले आहे,याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे तिसऱ्या अंकातील नच सुन्दरि करु कोपा हे प्रेमगीत होय.

मूळ महाभारतातील सुभद्रेच्या या संस्कृत भारतीय दैवतकथेला अण्णासाहेब किर्लोस्करांनी मराठीतील प्रेमकथेमध्ये रुपांतरित केलं आणि ही सुभद्रेची प्रेमकथा तितकीच सहज आणि अलगद पुनश्च नव्या रूपात श्री. भि. वेलणकरांनी संस्कृतात आणली आणि या अनुवादित कलाकृतीमुळे सुभद्रेच्या कथेच्या निमित्ताने संस्कृत-मराठी-

संस्कृत असा एक नवीन साहित्यिक अनुबंध अस्तित्वात आला.

**संदर्भ सूची –**


1) कामतीकरप्रकाश, संगीत सौभद्र,साहित्यसेवा प्रकाशन, 1994
2) द्विवेदी रेवाप्रसाद, नाट्यशास्त्रम्, इंडियन इन्स्टीट्युट ऑफ स्टडीज, सिमला, 2014
3) पांडेय रमाशंकर, मालविकाग्निमित्रम्, चौखंबा सुरभारती प्रकाशन, 2014
4) मुलाटेवासुदेव, संगीत सौभद्र, प्रकाशक – के. एस. अतकरे, 1994
5) वेलणकरश्री. भि., संगीतसौभद्रम्,गीर्वाणसुधा प्रकाशनम्, 1961

# पं. म. स. आपटीकर यांचे संस्कृत ललित साहित्यातील योगदान

**मृणालिनी आबासाहेब शिंदे**

वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

mrunalinisanskrit@gmail.com

**सारांश**

*महाराष्ट्र ही ज्ञानपरंपरेची मायभूमी आहे. महाराष्ट्रातील अनेक विद्वानांनी संस्कृतमध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे. महाराष्ट्रातील ज्या ज्या विद्वानांनी संस्कृतसाहित्य निर्मिलेले आहे. त्यांच्यावर अद्ययावत काम होणे आवश्यक आहे व त्यांचे साहित्य आणि ते साहित्यिक प्रकाशात आणणेही गरजेचे आहे. त्या विद्वानांपैकीच एक पं. म.स. आपटीकर हे आहेत. पं. म.स. आपटीकर यांनी विविध विषयांवर वेगवेगळ्या साहित्यप्रकारांत 'सरल' संस्कृतमध्ये विविधप्रकारच्या रचना केलेल्या आहेत. पण आजअखेर त्यांच्या या संस्कृत साहित्यावर सविस्तर संशोधनात्मक काम झालेले नाही. त्यांच्या या अत्यंत दुर्मीळ, दुर्लक्षित पण समृद्ध संस्कृत ललित साहित्यावर संशोधनात्मक अध्ययन होणे गरजेचे आहे. कारण हे संस्कृत ललित साहित्य अर्वाचीन संस्कृत साहित्यात मोलाचे योगदान देणारा दस्तावेज आहे. हे जाणून व त्याचे महत्त्व लक्षात घेऊन प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.*

*प्रस्तुत विषयाची व्याप्ती पं.म.स.आपटीकर यांच्या ऋतुगीतम्, बालगीतानि, गन्धमूल्यम्, आपृच्छेऽयम्, दुःखम् एकम् इदमेव एवढ्याच संस्कृत ललित साहित्यापुरती मर्यादित आहे. पं. म. स. आपटीकर यांनी ऋतुगीतम् नृत्यनाट्य, संगीतिका गन्धमूल्यम्, दुःखम् एकम् इदमेव विराणीकाव्य , हूप् हूप् हूप्, चंद्रमारमणि, चंद्रमाः, मयूरः,मण्डूकपते, काव् काव् काव्, एकैकस्य भाषा ही सात बालगीते ,आपृच्छेऽहम् आत्मकथनकाव्य इत्यादी विविध वाङ्मय प्रकारातील ललित संस्कृत साहित्य निर्माण करून अर्वाचीन संस्कृत ललित साहित्यात मोलाचे योगदान दिलेले आहे.*

**प्रस्तावना-**

साहित्य समाजाचा आरसा असतो. समाजाचा सर्वांगीण विकास करण्याचे काम साहित्यकरीत असते. साहित्य हे समाजातील प्रत्येक घटकाचे अविभाज्य अंग असते. संस्कृत भाषेतील साहित्याने संपूर्ण जगात आपल्या देशाला मानाचे स्थान मिळवून दिलेले आहे. संस्कृतभाषेने भारतीय भाषांना अपरंपार शब्दसामर्थ्य मिळवून दिलेले आहे. भारतीय भाषांना तिने ऊर्जितावस्था प्राप्त करून दिलेली आहे. तिने व्यास, वाल्मिकी, कालिदास यांसारखे जागतिक कीर्तीचे साहित्यकार दिलेले आहेत. तिने वेद, महाभारत, रामायण, पुराणे, बौद्ध,जैन ह्यापरंपरातील ग्रंथाद्वारे एकसंघ संस्कृती घडवलेली आहे. संस्कृत साहित्याने भारताच्या सर्व भाषिक प्रदेशांना एकसूत्रात बांधण्याचे काम केले आहे. त्याच्या सहाय्याने प्रादेशिक भाषांतील वेगवेगळ्या वाङ्मयाला स्फूर्ती मिळालेली आहे. तसेचललितकला, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, आयुर्वेद, गणित, वास्तुशास्त्र, राजनीतिशास्त्र, कामशास्त्र, योगशास्त्र इत्यादी शास्त्रांत मूलगामी विचार मांडणारे थोर साहित्यिक दिलेले आहेत. अशाप्रकारे संस्कृतभाषेतील साहित्य शतकानुशतके संपूर्ण जगाला नवनवीन विचार देत आलेले आहे. आजही संस्कृतभाषेत विविध प्रकारची, विविध विषयांवरील साहित्यनिर्मिती करून संस्कृतभाषेच्या अभ्यासाचा व विकासाचा प्रवाह अखंडित चालू ठेवण्याचे काम अर्वाचीन संस्कृत साहित्यिक करीत आहेत. त्यापैकी एकपं. म.स.आपटीकर हे आहेत.पं. म.स.आपटीकरांनी संस्कृत ललित साहित्याची

निर्मिती करून संस्कृत साहित्यात मोलाची भर घातलेली आहे. हे दिग्दर्शन करण्याचे काम संशोधक प्रस्तुत शोधनिबंधातून करीत आहे.

**उद्दिष्टे-**

१) पं. म.स.आपटीकरयांचा परिचय करून देणे.

२) पं. म.स.आपटीकर यांच्या संस्कृत ललित साहित्याचा परिचय करून देणे.

३) पं. म.स.आपटीकर यांचे संस्कृत ललित साहित्यातील योगदान स्पष्ट करणे.

**व्याप्ती-**

प्रस्तुत विषयाची व्याप्ती पं. म. स. आपटीकर यांच्या ऋतुगीतम्, बालगीतानि, गन्धमूल्यम्, आपृच्छेऽयम्, दु:खम्एकम् इदमेव एवढ्याचसंस्कृत ललित साहित्यापुरती मर्यादित आहे.

**महत्त्व-**

महाराष्ट्र हीज्ञानपरंपरेची मायभूमी आहे. महाराष्ट्रातील अनेक विद्वानांनी संस्कृतमध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे. महाराष्ट्रातील ज्या विद्वानांनीसंस्कृतसाहित्य निर्मिलेलेआहे. त्यांच्यावर अद्ययावत काम होणे आवश्यक आहे व त्यांचे साहित्य आणि ते साहित्यिक प्रकाशातआणणेही गरजेचे आहे. त्या विद्वानांपैकीच एक पं. म. स. आपटीकर हे आहेत. पं. म. स. आपटीकरयांनी विविध विषयांवर वेगवेगळ्या साहित्यप्रकारांत 'सरल' संस्कृतमध्ये विविधप्रकारच्या रचना केलेल्या आहेत. पण आजअखेर त्यांच्या या संस्कृत साहित्यावर सविस्तरसंशोधनात्मक काम झालेले नाही. त्यांच्या या अत्यंत दुर्मीळ, दुर्लक्षित पण समृद्ध संस्कृत ललित साहित्यावर संशोधनात्मक अध्ययन होणे गरजेचे आहे. कारण हे संस्कृत ललित साहित्य अर्वाचीन संस्कृत साहित्यात मोलाचे योगदान देणारा दस्तावेज आहे. हे जाणूनव त्याचे महत्त्व लक्षात घेऊन प्रस्तुत विषयाची निवड केलेली आहे.

**संशोधनपद्धती-**

प्रस्तुत शोधनिबंधाची संशोधनपद्धती विवरणात्मक आहे. पं. म.स.आपटीकर यांचे प्रकाशित व अप्रकाशित संस्कृत ललित साहित्य पुस्तकरुपात व हस्तलिखितस्वरूपात आहे. त्या साहित्याचे संकलन करून त्याचे योग्यरित्या वर्गीकरण करून, नंतर त्याचे सूक्ष्मरीतीने अध्ययन करून योग्य त्याठिकाणी त्यांचे योगदान स्पष्ट केलेले आहे.म्हणूनमूलभूत संशोधनपद्धतीचा अविभाज्य घटक असलेल्या विवरणात्मक पद्धतीचा उपयोग प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी केलेलाआहे.

**विषयविवेचन-पं. म.स.आपटीकर यांचे जीवनचरित्र-**

पंडित महादेव सखाराम आपटीकर यांचा जन्म २३एप्रिल,१९१२साली शिरवळ या गावी झाला. त्यांच्याआईचे नाव जानकी व पित्याचे नाव सखाराम होते. त्यांचे बालपण भोरजवळील आपटी या गावी गेले. त्यांचे बालपण अत्यंत गरिबीत व खडतर गेले.

**शिक्षण-**

राजा रघुनाथ हायस्कूल, भोर येथे त्यांनी मॅट्रिक केले. शाळेत शिकताना आर्थिक परिस्थितीमुळे पाठ्यपुस्तक घेता येत नव्हती. तेव्हा ते मित्रांकडून संध्याकाळी पुस्तके घेऊन त्यावर रात्री टाचणे काढून सकाळी परत करीत असत. त्यांच्यावर सरस्वतीचा वरदहस्त होता, पण लक्ष्मीने मात्र पाठ फिरवली होती. अशा खडतर व गरीब परिस्थितीत त्यांनी माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. पुढे भोर संस्थानाच्या मदतीने फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथून इंग्रजी विषयातील बी.ए. (ऑनर्स) पदवी संपादित केली. कै. रा. ना. दांडेकर, कै. वि. के. गोकाकआदींसारखे मा. प्राध्यापक त्यांना लाभले.[१]

**विवाह** –शिक्षण पूर्ण झाल्यानंतर कर्जतच्या श्री. वासुदेवराव गुर्जर यांच्या विठाबाई या कन्येबरोबर त्यांचा विवाह

झाला.त्यांना एक चिरंजीव भालचंद्र,सुषमा आणि मंगला या दोन कन्या आहेत.[२]

**लेखनप्रेरणा-** पं. म. स. आपटीकर यांना संस्कृतचे बाळकडू घरातूनच मिळाले. त्यांचे जितके इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते, तितकेच संस्कृत भाषेवरदेखील होते.[३]

**नोकरी-**

१९३८ मध्ये न्यू इंग्लिश स्कूल, सातारा येथे माध्यमिक शिक्षक म्हणून रुजू झाले. पुढे त्यांनी डी.पी.एड केले. शाळेची गरज जाणून त्यांनी बी. ए. ला इंग्रजी विषय असूनही संस्कृत विषय शिकविण्याची जबाबदारी स्वीकारली.[४]

**समाजकार्य-**

पं. म.स.आपटीकर यांनी मार्च १९८६मध्ये स्त्रियांना संस्कृत स्तोत्रपठन शिकविण्यासाठी साताऱ्यात वेदपाठशाळा सुरू केली. तिला रामकृष्ण पाठशाळा असे नाव देऊन पहिल्या मोफत पठनवर्गाचे प्रवर्तक ठरले. वेदपाठशाळेत पहिल्या पठनवर्गास ५४विद्यार्थिनी होत्या.आजही त्यांच्या विद्यार्थिनी हे कार्य अत्यंत निष्ठा व श्रद्धेने पुढे चालवित आहेत.[५]

**सन्मान व पुरस्कार-**

पं. म. स. आपटीकरांना अनेक सन्मानांनी पुरस्कृत करण्यात आले होते.

१)अलदा ट्रस्ट, सातारा – अलदा पुरस्कार (१९९२).

२)अभिनंदन संस्था,सातारा – कृतज्ञता पुरस्कार (१९९६).

३)शारदापीठातर्फे – ऋषितुल्य पुरस्कार (१९९९).

४)टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे – आदर्श संस्कृत पुरस्कार (२००२).

५)श्रृंगेरीपीठातर्फे पैठण येथे – संस्कृत पंडित पदवी बहाल (२००६

६)भारतीतीर्थ योगी शंकराचार्य मूळपीठातर्फेसन्मान.[६]

**निर्वाण-** पं. म. स. आपटीकर आषाढी शयनीएकादशीला म्हणजेच २५जुलै,२००७ला रात्री ९:३० वाजता पञ्चतत्वात विलीन झाले.[७]

संस्कृतवर आढळ श्रद्धा असणारे, संस्कृतप्रेमी, संस्कृतप्रेमींना ललामभूत ठरणारे, सिद्धहस्त कवी पं. म. स. आपटीकर आजन्म प्रसिद्धीपरांमुखच राहिले. पण त्यांच्या कार्याचा सुगंध साहित्यरुपातआजही दरवळत आहे.

**पं. म.स.आपटीकर यांचे संस्कृतललित साहित्य-**

१) ऋतुगीतम् । (प्रकाशित)

२) गन्धमूल्यम् । (अप्रकाशित)

३) बालगीतानि।(अप्रकाशित)

४) आपृच्छेऽहम ।(प्रकाशित)

५) दु:खम् एकम् इदमेव।(प्रकाशित)

**ऋतुगीतम् -**

पं. म. स. आपटीकर यांनी रचलेले 'ऋतुगीतम्'नृत्यनाट्य श्रृंगारमूलकगीतिकाव्य प्रकारात मोडते. यानृत्यनाट्यात सहा ऋतुंचे वर्णन केलेले आहे. हेनृत्यनाट्य विविध रागांत निबद्ध आहे.

वसंतऋतुचे वर्णन हिंदोळ रागात केलेले आहे. हे वर्णन श्रृंगाररसप्रचूर आहे. हे वर्णन अभ्यासताना जणूकाही वसंतऋतुचा अनुभव घेत आहोत असे वाटते.

**मनसि मनसिजोविलसति यूनाम् ।**
**मन: सरागं विलासिनीनाम् ।।**
**ऋतुराजो मधु-मधुमासोऽयम् ।**
**सुखयति सकलान् मदन सखाऽयम् ।।**[८]

राग 'दीपक' मध्ये ग्रीष्मऋतुचे वर्णन केलेले आहे. यातून करूणरसाची निष्पत्ती झालेली आहे. ग्रीष्मऋतुची दाहकता पुढील श्लोकात जाणवत आहे.

**त्यजतिशीततां तडाग-तोयम्।**

**अग्नि-शिखा ननु दहन्ति विश्वम् ।।**

**वह्निपूर्ण-घट-भूषित-शीर्षा ।**

**ग्रीष्म-प्रमदा नभसि दृश्यते ।।**[९]

वर्षाऋतुचे वर्णन 'मेघ' रागात, तर शरदऋतुचे वर्णन 'श्री' रागात हेमंतऋतु'भैरव' रागात गुंफलेला आहे.'मालकंस' रागात शिशिरऋतुला बद्ध केलेला आहे.

वर्षा व शरद ऋतुवर्णनात शांतरस पहावयास मिळतो, हेमंतऋतुवर्णनात श्रृंगाररसाची निष्पत्ती होते आणि शिशिरऋतुचे वर्णन करूणरसाने युक्त आहे.

**शिशिरे शिशिरं जलमतिविमलम् ।**

**भवतिसुखकरं रविकरजालम् ।**

**सरसिजरहितं सर: साम्प्रतम् ।**

**सकलं जातं सुषमा-रहितम् ।।**[१०]

या ऋतुगीतम् नृत्यनाट्यात ५४ श्लोकांचा समावेश आहे. या नृत्यनाट्याला कवीने अत्यंत सुंदर प्रस्तावना दिलेली आहे. हे नृत्यनाट्य अत्यंत सुरस, सुबोध, सोपी, सरल भाषा असणारे आहे. तसेच ते काव्यास्वाद देणारे, प्रासादिक, गेय आणि संगीतमय आहे.

या नृत्यनाट्याचे अध्ययन केले असता पं. म. स. आपटीकर यांचे संस्कृत साहित्यातील योगदान लक्षात येते. नृत्यनाट्य रसिकांच्या मनाची पकड घेणारे आहे. त्यांना परमानंद देणारे आहे. याशिवाय रसिकांची वेगळी काय अपेक्षा असते. कारण नृत्यनाट्य वाचताना त्या त्या ऋतुंचा अनुभव घेत आहोत अशी जाणीव होते.

**गन्धमूल्यम्-**

पं. म. स. आपटीकर यांनी एक छोटेखानी'गन्धमूल्यम्' संगीतिका रचलेली आहे.

पं. म. स. आपटीकर यांची गन्धमूल्यम् ही रचना संगीतिका या प्रकारात मोडते. दशरूपकातील कोणतेही निकष या रचनेला लागू होत नाहीत.त्यामुळे त्यांनी पाश्चिमात्य नाट्यवाङ्मयप्रकाराला अनुसरून 'गन्धमूल्यम्' यानृत्यनाट्याची रचना केलेली आहे,असे दृष्टीस पडते. कारण'संगीतिका' याचे सर्व निकष या रचनेला लागू होतात. या रचनेतील संवाद पद्यात आहेत.

**निर्धन: –नास्ति धनं मे खाद्यं क्रेतुं न पुररिहाऽपसरेयमहम् ।**

**न प्रभुता पथि तवेहं तदलं निगद्य वचनं सुदु:सहम् ।।**[११]

तसेच या रचनेतील साहित्य गौण आहे. एक दुकानदार व निर्धन मनुष्य यांच्यात दुकानात असलेले सुगंधी मिष्टान्नाचा वास घेण्यावरून चाललेला विसंवाद यात दाखवलेला आहे. याचा विषय दुय्यम दर्जाचा आहे.

**निर्धन:-अकिञ्चनोऽहं मूल्यंदातुंशक्नोमि न न च वाञ्छामि।**

**न हि याचितुमिदमुचितमपि स्यान्मूढमतिं त्वां गणयामि।।**

**आपणिक:- रे मन्दात्मन्नधिक्षिपसिमां तद् भुङ्क्ष्व**

**स्वाविनयफलम् ।**

**योऽयमिहैतिहिरक्षापुरुष: स दर्शयेत् त्वां स्वभुजबलम्।।**[१२]

संगीतिकेत नाट्यगुण आवश्यक नसतात. या रचनेतही नाट्यगुणांचा अभाव आहे. याची कथा सामान्य आहे. पात्र तीन असून गौण आहेत आणि निर्धन मनुष्य संस्कृतभाषेत बोलत आहे. ही रचना आकाशवाणीवरून प्रसारित करण्याचा कवीचा मानस होता. अशी माहिती त्यांच्या चिरंजीवांकडून उपलब्ध झालीआहे. त्यामुळे 'संगीतिका'श्राव्य असते. हाही निकष या रचनेला लागू होत आहे.खरोखरच पं. म. स. आपटीकरअर्वाचीन संस्कृत साहित्यात पाश्चिमात्य नाट्य-वाङ्मय प्रकारात रचना करून मोलाचे योगदान दिलेले आहे.

**बालगीतानि-** पं. म. स. आपटीकर यांनी आणखी एक वाङ्मयप्रकार हाताळला आहे ,तो म्हणजे बालवाङ्मय.

पं. म. स. आपटीकर यांनीबालकांसाठी संस्कृतमध्ये सात बालगीते रचलेलीआहेत.ती पुढीलप्रमाणे होत.

१)हूप् हूप् हूप् ।

कपिवरवानर हूप् हूप् हूप् ।
भृशं कोपितो यद्यपि बालैः ।
कथं कपे रेभजसे मौनम् ।
आस्यं कृष्णं कस्माद् जातम्।

२)चंद्रमारमणि ।

परिधाय धवलवसनं
आरुह्य रथं रुचिरम् ।
आयाहि चंद्रमारमणि
लाम्बरं सुनीलम् ।।

३)चंद्रमाः ।

आयातश्चन्द्रमाः रिङ्गन्नङ्गणे ।
जाति पुष्पमाला राजते कण्ठे ।।
अहो रमणीयं विभ्रमहास्यम् ।
विलोक्य प्रमोदो राजते चित्ते।।

४)मयूरः ।

अपि वैविध्ये अस्त्येकत्वं
ऐक्ये विलसति तथा विविधता ।।
वर्णाः विविधाः कथयन्त्येते
भारतमातुर्मम माहात्म्यम् ।।

५)मण्डूकपते ।

मण्डूकपते रे भेकपते
कुत्र वर्तते त्वदीय नगरम् ।
मज्जन्नसि रे पङ्के सततम्
डराँव् डराँव् इति गायसि गीतम् ।।

६)काव् काव् काव् ।

काकः कृत्वाकाव् काव् काव्
जागरयसि त्वं ग्रामं निखिलम् ।
कृष्णंकृष्णं त्वदीयमङ्गं
क्षालयसि न किं कृत्वा स्नानम् ।

७)एकैकस्य भाषा ।

चटका ब्रूते चिव् चिव् चिव् ।
कुरूतेकाकः काव् काव् काव् ।
वदति बिडालो म्याँव् म्याँव् म्याँव् ।
भेक आरटति डराँव् डराँव् ।
कूजति कोकिलो कुहू कुहू।
पठति शुकोऽयं विठ्ठल विठ्ठल।
करोत्यजोऽयं बें बें बें ।
करोति श्वानो भो भो भो ।[१३]

वानर, रात्र, चंद्र, मोर, बेडूक, कावळा यांच्यावर बालगीते रचून संस्कृतप्रेमीबालचमूंना कवीने जणू गीतरूपी मेजवानीच दिली आहे. ही बालगीते वाचताना यत्किंचितही सायास पडत नाही.ती अत्यंत सोप्या संस्कृतभाषेत रचलेली आहेत. ही गीते वाचली की, मराठी बालकविता रचणाऱ्या कवींची आठवण आल्याशिवाय राहत नाही. या सर्व रचना 'शिशुगीते' या निकषात तंतोतंत बसतात. येथे कवीचा एक विशेष प्रकर्षाने जाणवतो, तो म्हणजे आज जी 'सरलमानकसंस्कृत' ही योजना राबवली जात आहे. ती कवीच्या बालगीतामध्ये पहावयास मिळते.

**आपृच्छेऽहम्-**

८३वर्षेपूर्ण झाल्यानंतर कवीने स्वतःवर एक काव्य केले,ते म्हणजे 'आपृच्छेऽहम्'. या स्थावरजंगम सृष्टीमधून आजअखेर कवीला स्वतःला जे जे मिळाले त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जणूकाही कवीने या काव्याची निर्मिती केलेली दिसते. शेवटी जाणून-बुजून, अनावधानाने चूक झाली असेल, काही न्यून राहिले असेल, तर मोठ्या मनाने माफ करावे, क्षमा करावी अशी विनंतीही त्यांनीअत्यंत प्रांजळपणे केलेलीआहे.

फक्त दहा श्लोकांनी युक्तअसलेले हे काव्य अभ्यासल्यानंतर मन हेलावून टाकते.कवी कितीमोठ्या मनाचा, उदात्त विचारांचा आहे, याची प्रचिती येते. जन्माचे न उघडलणारे कोडे कवीलाही सुटलेलेनाही. तरीही निसर्गाने मला भरभरून दिले. याची नोंद कवीनेठेवलेली आहे.

**नाहं जाने कुत: आयातो वसुन्धरायामहमस्याम् ।**
**परं वर्धित: सुसंरक्षितो महीजनन्याऽहं प्रेम्णा ।।**
**शरज्योत्स्नया तनु: पुलकिता, नित्यं सुखेन मे जाता ।**
**उदार- तरव: सुखदच्छायां वितरितवन्तसदामयि।।** [१४]

खरोखरच कवी, शिवभक्त 'योगी' होता याची अनुभूती पुढील श्लोकातूनयेते.

**स्मरन्सदा तान् सुंदरस्वप्नान् प्रयातुमीहे कैलासम् ।**
**त एवआसन्नाधारा मे,जीवनयात्रा समयेनित्यम्।।**
**जाता पूर्णाकाल – वसुमिता प्रदक्षिणा मे परित:सूर्यम् ।**
**तस्मैरवये जगज्जनन्यै शतशतनतय: सन्तु ममैता: ।।**[१५]

**दुःखम्एकम् इदमेव** –

पं. म. स. आपटीकर यांनी 'विराणी' काव्यप्रकारात प्रस्तुत काव्य रचलेले आहे.

**विराणी**-

परमेश्वराविषयी विरहभावना व्यक्त करणारे स्फुटकाव्य म्हणजे विराणी होय. अद्वैतात ईश्वर व भक्त एकरूप असतात. यामीलनापेक्षा विरहाचे सुख अधिक असते. म्हणून द्वैतातली विरहाची जाणीव अनेक संतकवींनी परोपरीने आपल्या काव्यात प्रकट केलेली आहे. संतकवींची ईश्वराविषयीची ही भक्ती'मधुराभक्ती' म्हणून संबोधले जाते.मधुराभक्तीत भक्ताने प्रेयसीची, पत्नीची भूमिका घेतलेली असते. वज्याप्रमाणे एखादी विरहार्थ कांतासक्तस्त्री आपल्या प्रियकराच्या वियोगाने व्याकूळ होऊन त्याला आर्त हाक मारील, विनवीलवविरहाने होणाऱ्या अवस्थेचे वर्णन करील. त्याप्रमाणे भक्ताने ईश्वर कांताबद्दल,सख्याबद्दल होणारी मनाची तडफड या काव्यातव्यक्त केलेली असते. यात परमेश्वराविषयीच्या रतीभावाच्या विविध छटा व्यक्त झालेल्या दिसतात. स्नेह, प्रेम, राग, अनुराग या सर्व अवस्थांसून जात शेवटी सख्याचे, परमेश्वराचे वेडच लागलेला हा जीव वेडापिसा होतो.'अवस्था' हा शब्द विराण्यांमध्ये याच अर्थाने येतो. आर्तता, उत्कटता, सूचक वा प्रकट श्रृंगार आणि नादानुकुल रचना हे विराण्यांचे विशेष होत.[१६]

**दुःखम् एकम् इदमेव**

यामध्ये सीतेचे आत्मकथन व्यक्त केलेले आहे.त्यांच्या संपूर्ण संस्कृत साहित्यरचनेतील वैशिष्ट्यपूर्ण असे हे काव्य आहे. फक्त ३४श्लोकांत सीतेने जणू स्वतःचा जीवनपट कवीच्या लेखणीतून साकारला आहे. खरोखरच भक्त, प्रतिभावंत, सिद्धहस्त अशा कवीने 'कवी' ही उक्ती सार्थ ठरवली आहे, असे जाणवते. हे काव्य अभ्यासताना खरोखरच डोळ्यासमोर सीतामाईचे जिवंत चित्र उभे राहते. तो जीवनपट डोळ्यासमोरून जणु सरकत जात आहे, अशी जाणीव होते. शैली काव्याचा प्राणच होय याची जाणीव पुढील चरणांतून होते.

**दु:खार्थमहं जाताभुवने नास्ति स्पृहा मे सुखभोगाय**
**प्रीते: कीर्तिस्तव प्रियतमा**
**पवित्रताया जन – निन्दात्वं बहु मानितवान्,**
**दु:खं न च मे वनवासस्य।**
**दु:खमेकमिदमस्ति मदीयम् ।**
**पुरुषोत्तमोऽपि संशयसर्पं**
**दूरकरोति न च हृदयस्थम्**
**मदिरासक्त-रजकस्य वचस्त्वया मानितम् ।।**[१७]

पुरुषप्रधान संस्कृतीतील स्त्रियांचे आजही असणारे स्थान व तिची आगतिकता सीतामाईच्या तोंडून अत्यंत भावुकतेने

कारुण्यपूर्ण स्वरात वदवलेली आहे. हे त्रिकालाबाधीत सत्य आजही लागू होत आहे. म्हणूनच कवीला यावर विचार मांडावेसे वाटले.

पुढील चरणांत स्त्री स्वतःच्या अस्तित्वाचा कधीच विचार करीत नाही, तर ज्याच्याशी एकनिष्ठ आहे, त्याच्याच अस्तित्वाला आपले सर्वस्व मानते. ही संवेदनशीलता, भावनिकता, मानसिकता कवीनेयेथे मांडलेली आहे.

**विदेहसुताऽहं, कुत आसक्तिर्देहस्य मे ।**

**गङ्गासलिलं प्रविश्यसहर्षं,**

**चिरनिद्रायाश्चिरशान्तिरनुभूता स्यान्मया।**

**परं वर्धते मदीयोदरे रघुनन्दनान्वयाङ्कुरः ।**

**अतो भवेयं पुनरप्यं विपिनवासिनी।**

**सम्प्रार्थयेऽहं जगच्चालकं**

**जन्मनि जन्मनि – विना राघवं**

**न कोऽपिऽन्योऽस्तु मम भर्ता ।**[१८]

**निष्कर्ष-**

पं. म. स.आपटीकर यांनी ऋतुगीतम् नृत्यनाट्य, संगीतिका गन्धमूल्यम्, दुःखम् एकम् इदमेव विराणीकाव्य ,हुप् हुप् हुप्, चंद्रमारमणि, चंद्रमा:, मयूरः,मण्डूकपते, काव् काव् काव्, एकैकस्य भाषा ही सात बालगीते, आपृच्छेऽहम् आत्मकथनकाव्य इत्यादी विविध वाङ्मय प्रकारातील ललित संस्कृत साहित्य निर्माण करून अर्वाचीन संस्कृत ललित साहित्यात मोलाचे योगदान दिलेले आहे.

**संदर्भसूची -**


1) आपटीकर भालचंद्र महादेव यांची मुलाखत
2) आपटीकर भालचंद्र महादेव (संपा.), स्मृतिगंध, पान नं.२८
3) उपरि निर्दिष्टे
4) आपटीकर भालचंद्र महादेव (संपा.), स्मृतिगंध, पान नं.२८
5) तत्रैवपान नं.३
6) कुलकर्णी सुषमा बलभीम, आकाशवाणीवरील भाषण ध्वनिफीत.
7) उपरि निर्दिष्टे पान नं.३८
8) आपटीकर म. स., ऋतुगीतम् , श्लोक नं. ८,९, पान नं.१
9) ९)तत्रैव श्लोक नं. ६,७, पान नं.२
10) तत्रैव श्लोक नं. २,३, पान नं.६
11) अप्रकाशित संगीतिका-गन्धमूल्यम् ।
12) अप्रकाशित संगीतिका-गन्धमूल्यम् ।
13) अप्रकाशित बालगीतानि ।
14) परिजातम्, आपृच्छेऽहम्, मार्च-एप्रिल१९९५, पान नं.३०.
15) तत्रैव, मार्च-एप्रिल१९९५, पान नं.३०.
16) राजाध्यक्ष विजया (संपा), मराठी वाङ्मयकोश,खंड-४, पान नं.३३६.
17) परिजातम्, दुःखम् एकम् इदमेव, सप्टेंबर१९९३, पान नं.२२.
18) तत्रैव, सप्टेंबर१९९३, पान नं.२२.


**संदर्भग्रंथ सूची-**


1) आपटीकर भालचंद्र महादेव (संपा.), स्मृतिगंध, पंडित महादेव आपटीकर, श्रीनिवास पु.वाठारे,सातारा,२००८.
2) आपटीकरम. स., ऋतुगीतम् (नृत्यनाट्य), प्रथमावृत्ती.
3) राजाध्यक्ष विजया (संपा), मराठी वाङ्मयकोश,खंड-४,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,मुंबई,२००२.

4) शास्त्री प्रकाशमित्र, परिजातम्(संस्कृतमासिकम्), प्रेमनगरम्,कानपुर, सप्टेंबर,१९९३.

5) शास्त्री प्रकाशमित्र, परिजातम्(संस्कृतमासिकम्), प्रेमनगरम्,कानपुर, मार्च,१९९५.

6) संत दु. का., संशोधन: पद्धती, प्रक्रिया व अंतरंग, विद्यार्थी गृह प्रकाशन,पुणे, द्वितीयावृत्ती,१९८८.

# संघ प्रार्थना : एक अभ्यास

**Shashikant B. Dargu**

Dept. Of Sanskrit NSB College, Nanded.

**सारांश**

*विश्व संस्कृतीच्या इतिहासात भारत देश सर्वप्राचीन व व सर्व समृद्ध देश आहे. 'वसुधैव कुटुंबकम' अर्थात ही संपूर्ण पृथ्वी एक परिवार आहे, अशी या देशाची धारणा आहे. डॉक्टर केशव बळीराम हेडगेवारांनी स्वातंत्र्यलढ्यात हिरीरीने सहभाग घेतला. इसवी सन 1925 रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर अगदी पंधरा-वीस जणांच्या उपस्थितीमध्ये संघाची स्थापना डॉक्टर हेडगेवार यांनी आपल्या निवासस्थानी केली. संघ प्रार्थनेचा आशय मराठीत तयार करण्यात आला. संघाची प्रार्थना गद्य स्वरूपात तयार झाली. 1939 इसवी सणाच्याफेब्रुवारी महिन्यात अगदी एका दिवसात श्री नरहरी भिडे यांनी*

*'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोहम् ।*
*महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ।।१।।'*

*या ओळींनी प्रारंभ होणारी संघ प्रार्थना रचनाबद्ध केली. अगदी प्रासादिक शब्दांमध्ये साकारलेली ही रचना भुजंगप्रयातवृत्तात रचलेली आहे. अशा पद्धतीने संघाची नवीन संस्कृत प्रार्थना निर्माण झाली.*

## प्रस्तावना

विश्व संस्कृतीच्या इतिहासात भारत देश सर्वप्राचीन व व सर्व समृद्ध देश आहे. 'वसुधैव कुटुंबकम' अर्थात ही संपूर्ण पृथ्वी एक परिवार आहे, अशी या देशाची धारणा आहे. अगदी वेदकाळापासून या देशातील नागरिकांनी मानवतेचा एक उत्तम आदर्श जगासमोर प्रस्तुत केला आहे. आध्यात्मिक प्रवाह हा या देशाचा प्रमुख आधार आहे. धर्मप्रधान या राष्ट्राने संपूर्ण पृथ्वीवर राज्य करणारे वीरपुत्र निर्माण केले, याची साक्ष आपल्याला इतिहासात पहावयास मिळते. देव देश आणि धर्म यासाठी प्राणांची आहुती देणारे अनेक वीर या देशांमध्ये झालेले पहावयास मिळतात आजही हा प्रवाह अखंडित चालूच आहे.

देश म्हणजे केवळ सीमा व त्यातील जमिनीचा तुकडा नसून तो एक राष्ट्रपुरुष आहे किंवा मातृभूमी आहे अशाप्रकारे या देशात धारणा रुजलेली आहे. म्हणून वैदिक काळापासून आजपर्यंत अनेक प्रकारची सूक्त, मंत्र, काव्यरचना, प्रार्थना आपल्याला पहावयास मिळतात. या काव्य निर्मितीच्या परंपरेत संस्कृत साहित्याने फार मोठे योगदान केलेले आहे. आधुनिक संस्कृत साहित्यात 'वंदे मातरम' हे गीत भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाचे समर गीत झालेले पाहावयास मिळते. वंदे मातरम - हा स्वातंत्र्य संग्रामाचा मंत्र ठरला होता.

स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये या गीताने अनेक तरुणांना प्रेरित केले. याच याच मालिकेतील एक तरुण म्हणजे डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार. डॉक्टरांनी स्वातंत्र्यलढ्यात हिरीरीने सहभाग घेतला. परंतु एवढ्याने त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी भारतीय संस्कृती रक्षणाकरिता एका संघटनेची स्थापना करण्याचे ठरविले. इसवी सन 1925 रोजी विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर अगदी पंधरा-वीस जणांच्या उपस्थितीमध्ये संघाची स्थापना डॉक्टर हेडगेवार यांनी आपल्या निवासस्थानी केली. शारीरिक लष्करी आणि राजकीय अशा

तीन प्रकारचे शिक्षण आपण स्वतः घेऊन ते इतरांना द्यावयाची असे ठरले होते. संघटना म्हटल्यानंतर त्याची एक कार्य करण्याची पद्धती निश्चित असावी याद्दृष्टीने वर्धा जिल्ह्यातील श्री नानासाहेब यांच्या सिंदी गावात श्री बबनराव पंडित यांच्या निवासस्थानी चिंतन बैठकांचे आयोजन केले. याप्रसंगी कृष्णराव मोहरील, अप्पाजी जोशी, माधवराव, तात्याराव तेलंग, विठ्ठलराव पत्की, बाळासाहेब देवरस, बाबाजी सालोडकर इत्यादी ज्येष्ठ कार्यकर्ते उपस्थित होते. चिंतन बैठकीतून संघाची कार्यपद्धती निश्चित होत होती. यात संघ प्रार्थनेचा प्रमुख विषय समोर आला. संघाची तत्कालीन

प्रार्थना -

नमो मातृभूमी जिथे जन्मलो मी.
नमो आर्यभूमी जिथे वाढलो मी
नमो पुण्यभूमि जी एच याच कामी
पडो देह माझा सदा ती नमी मी.

अशा पद्धतीने मराठी भाषेतील काव्यपंक्तींनी मातृभूमीला वंदन केले होते. त्यानंतर संघाने मराठी प्रांताच्या सीमा ओलांडल्या तसेच हिंदी प्रांताच्या ही सीमा ओलांडल्या हे जाणून बंगाल, कर्नाटक, गुजरात व समस्त हिंदुस्थानातील सर्वांना म्हणता येईल अशी प्रार्थना तयार करण्याचे ठरले. याविषयी चिंतन बैठकीतील सर्वांनी स्वतःची मते मांडली. गुरुजींनी हा मसुदा डॉक्टरांसमोर ठेवला. तेव्हा भारतीय भाषांची जननी संस्कृत या भाषेत प्रार्थना असावी, असे सर्वानुमते ठरले. प्रार्थनेचा आशय मराठीत तयार करण्यात आला. संघाची प्रार्थना गद्य स्वरूपात तयार झाली. परंतु प्रश्न होता याचे संस्कृत भाषांतर कोण करणार ? अनेक विद्वानांची पंडितांची नावे समोर आली. शेवटी दोन पंडितांकडे प्रार्थना अनुवादकांकरीता पाठविण्याचे ठरले. एका स्वयंसेवी स्वयंसेवकास नागपूरला श्री नरहरी भिडे यांच्याकडे पाठवण्यात आले.

1939 इसवी सणाच्या फेब्रुवारी महिन्यात अगदी एका दिवसात श्री नरहरी भिडे यांनी नमस्ते सदा वत्सले.......या ओळींनी प्रारंभ होणारी संघ प्रार्थना रचनाबद्ध केली. अगदी प्रासादिक शब्दांमध्ये साकारलेली ही रचना भुजंगप्रयातवृत्तात रचलेली आहे. अर्थाप्रमाणे शब्द अवतरले, काव्य एकटाकी लिहून झाले श्री. नरहरी रावांनी स्वयंसेवकाला काव्यरचनसह परत परत पाठविले. दैवी चमत्कारांप्रमाणे सर्वांनाच आश्चर्य वाटले. रात्रीच्या चिंतन बैठकीत या प्रार्थनेचे वाचन करण्यात आले. अशा पद्धतीने संघाची नवीन संस्कृत प्रार्थना निर्माण झाली.

**प्रार्थना**

**नमस्ते सदा वत्सले मातृभूमे**
**त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोहम् ।**
**महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे**
**पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ।।१।।**
**प्रभो शक्तिमन् हिन्दुराष्ट्राङ्गभूता**
**इमे सादरं त्वां नमामो वयम्**
**त्वदीयाय कार्याय बध्दा कटीयं**
**शुभामाशिषं देहि तत्पूर्तये ।**
**अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिं**
**सुशीलं जगद्येन नम्रं भवेत्**
**श्रुतं चैव यत्कण्टकाकीर्ण मार्गं**
**स्वयं स्वीकृतं नः सुगं कारयेत् ।।२।।**
**समुत्कर्षनिःश्रेयसस्यैकमुग्रं**
**परं साधनं नाम वीरव्रतम्**
**तदन्तः स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा**
**हृदन्तः प्रजागर्तु तीव्रानिशम् ।**

**विजेत्री च नः संहता कार्यशक्तिर्**

**विधायास्य धर्मस्य संरक्षणम् ।**

**परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रं**

**समर्था भवत्वाशिषा ते भृशम् ।।३।।**

**भारत माता की जय ।।**[iv]

हे वत्सल मातृभूमे तुला सदैव नमस्कार असो. हे हिंदूभूमी, तू पालन-पोषण केली आहेस. हे मंगले, हे पुण्य भूमी माझा देह तुझ्या कामी समर्पण होऊ दे. मी तुला पुनःपुन्हा वंदन करतो. हे परमेश्वरा, हिंदुराष्ट्राचे आम्ही पुत्र तुला सादर नमस्कार करीत आहोत. तुझ्याच कार्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. त्या कार्यपूर्ती चा आम्हाला आशीर्वाद दे. आम्हाला शक्ती दे. संपूर्ण विश्व नतमस्तक व्हावं असं शुद्ध चारित्र्य दे. आम्ही स्वतःहून पत्करलेला हा काट्यांनी भरलेला मार्ग सुगम होईल अस आम्हाला ज्ञान दे.

उच्च असे आध्यात्मिक सुख आणि ऐक समृद्धी प्राप्त होण्यासाठी लागणारी अशा वीर व्रताची भावना आमच्या अंतकरणात सदैव उत्स्फूर्त होत राहू दे. निष्ठा आमच्या मनात सदैव जागती राहू दे. तुझ्या कृपेने आमची ही संघटीत कार्यशक्ती आमच्या धर्माचे संरक्षण करून या राष्ट्राला वैभवाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचविण्यास समर्थ होऊ दे. भारत माता की जय.[v]

अशी ही संघ प्रार्थना सिद्ध झाली. ही संघ प्रार्थना पुणे संघ शिक्षा वर्गात सर्वप्रथम म्हणल्या गेली. नुकतच इसवी सन 2015 मध्ये संघ प्रार्थनेच्या 75 वा वर्धापन महोत्सव साजरा करण्यात आला.[vi]

प्रार्थनेचे महत्त्व

कोणतेही कार्य करावयाचे असेल तर त्या कार्याचा उद्देश स्पष्ट असावा, आपण तो पूर्णपणे जाणून घ्यावा. एक सर्वसामान्य धारणा असते. संघामध्ये दररोज शाखेवर प्रार्थना म्हटली जाते. प्रार्थना ही प्रत्येक स्वयंसेवक पाठ हवी तिचे उच्चार शुद्ध असावे याकडे कटाक्षाने लक्ष दिले जाते.

प्रार्थना हा एक मंत्र होय म्हणून तिचे उच्चारण शुद्ध स्वरूपात व्हावी तिचा सार स्वयंसेवकाने आपल्या जीवनामध्ये अंगीकारला पाहिजे.

प्रार्थनेच्या पहिल्या श्लोकात –'नमस्ते सदा वत्सले मातृभूमे' मातृभूमीला अभिवादन केले आहे. आपल्या राष्ट्रावर प्रत्येक व्यक्तीची असीम निष्ठा असते. ही भक्ती या पहिल्या चरणात व्यक्त केली आहे. आम्ही सर्व हिंदू म्हणून आमची मातृभूमी हिंदुभूमी होय. 'महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ।।१।।' - हे हिंदूभूमी, तू पालन-पोषण केली आहेस. हे मंगले, हे पुण्य भूमी माझा देह तुझ्या कामी समर्पण होऊ दे. मी तुला पुनःपुन्हा वंदन करतो.ती आम्हाला अतिशय पवित्र आहे म्हणून तिला पुण्यभूमी असे संबोधले आहे. या पवित्र भूमीवर जन्मास येणे हे आमच्या करिता भाग्यकारक आहे मंगलमय आहे. मातृभूमी म्हणजे केवळ दगड धोंडे आणि माती नसून ती एक कर्मभूमी मुख्य भूमी होय, तो एक दिव्यत्वाचा साक्षात्कार होय, आदिशक्ती होय. तिचा साक्षात्कार हेच जीवनाचे अंतिम लक्ष होईल असे जाणून प्राणपणाने दिवस-रात्र तिची सेवा करणे हे आमचे आद्य कर्तव्य होय. 'अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिं सुशीलं जगद्येन नम्रं भवेत् I श्रुतं चैव यत्कण्टकाकीर्ण मार्गं स्वयं स्वीकृतं नः सुगं कारयेत् ।।२।।' हे परमेश्वरा, हिंदुराष्ट्राचे आम्ही पुत्र तुला सादर नमस्कार करीत आहोत. तुझ्याच कार्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. त्या कार्यपूर्ती चा आम्हाला आशीर्वाद दे. आम्हाला शक्ती दे. संपूर्ण विश्व नतमस्तक व्हावं असं शुद्ध चारित्र्य दे. आम्ही स्वतःहून पत्करलेला हा काट्यांनी भरलेला मार्ग सुगम होईल अस आम्हाला ज्ञान दे.

जे सेवा कार्य आपण करीत आहोत तो ऐश्वर्य कार्याचा अंश आहे आणि आपण सर्व या हिंदुराष्ट्राचे अंग आहोत. म्हणून विराम सारखे जीवन जगण्याचे वृत्त आम्ही स्वीकारले आहे या मार्गात येणाऱ्या अडचणींना योग्य प्रकारे तोंड देण्याचा विराचा संकल्प आहे. या मार्गावर अतिशय शांत चित्ताने, विचारपूर्वक वाटचाल करून यश प्राप्त करू शकू इतके डोके शांत आणि अविचल असावे.यानंतर प्रार्थनेत विशुद्ध चारित्र्यसंपन्न जीवन जगण्याची प्रार्थना केलेली आहे.

## References


[iv] Mrs. Mrunalini Joshi (1986) *Om Rashtraya Swaha,* Ravi Ghatpande , Snehal Publication, 1228/B, Shivaji Nagar, Pune 411004 Pg.104

[v] Mrs. Mrunalini Joshi (1986) *Om Rashtraya Swaha*, Ravi Ghatpande , Snehal Publication, 1228/B, Shivaji Nagar, Pune 411004 Pg.104

[vi] Samvada.org 75 years for RSS Prarthana ‘Namaste Sada Vatsale Matrubhume’.May 19, 2015RSS